।। प. प. श्री ईश्वरानन्द सरस्वती प्रसन्न ।।



मार्गशीर्ष शुध्द सप्तमी शके १९४७,
गुरुवार २७ नोव्हेंबर २०२५ रोजी
प. प. स्वामींच्या संन्यासग्रहण योगास
शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत
त्यानिमित्ताने

# ।। ईश्वरानन्द ।।


# स्मरणिका

- स्मरणिका ........................................................ ईश्वरानन्द
- संकल्पना .......................................................................... श्रीकांत जोशी
- संकलन ........................................................ काशी स्वामी भक्त मंडळ, कराड.
- प्रकाशक ........................................................काशी स्वामी भक्त मंडळ, कराड.
- मुद्रक ...............................................मीरा ऑफसेट, ९, सोमवार पेठ, कराड<br>मो. ९३७३३१०९१९
- मुखपृष्ठ संकल्पना ..............................................................श्री. अभय धोंडीराम धोपाटे
- डी.टी.पी. ..............................................................श्री. अभय धोंडीराम धोपाटे
- प्रकाशन सोहळा .......................................................................... सन २०२६
- मुद्रित शोधन ..........................................पं. हरीकृष्ण घळसासी व श्री. रवींद्र माळवदे


For Private Circulation Only

## ..... boIZ gh^mJ .....

- श्री योगेश व्यास
- श्रीमती मालिनी गडेकर
- विजय पटवर्धन
- डॉ. एम बी. जोशी
- सौरभ औदुंबर कुलकर्णी
- धर्मश्री: ईश्वरानंद सरस्वती काशी स्वामी
- धनंजय काशिनाथ कुलकर्णी पुणे
- प्रवीण वेदपाठक कराड
- श्रीकांत जोशी
- विवेक सबनीस
- सौ. शुभांगी येळगांवकर
- श्रीमती विजयाताई सबनीस
- सौ अपर्णा पोळ
- चंद्रशेखर पोळ
- रवींद्र माळवदे
- कु. कमलाताई शिराळकर
- नंदकिशोर पुराणिक
- वे. शा. सं. विनायकशास्त्री गरुड
- रा. नी. पांगारकर
- वे. श्रीकांत भट्ट चितळे
- कु. सुशिलाताई शिखरे
- कु. विजुताई पाठक
- हनुमानदासजी महाराज,
- सौ. सुधा शिराळकर
- श्रीधर किरपेकर
- सौ. कालिंदी गुरूराजन
- विश्वनाथ रेठरेकर (सचिन)
- दत्तात्रय कुलकर्णी
- मदन मोहोळकर
- ना. ल. उमराणी
- हनुमंत नारायण माळवदे
- कु. रंजीता हनुमंत जाधव
- डॉ. विष्णू कोळेकर
- सौ. विजया दि. ढवळीकर
- सौ. प्रतिभा म. जोशी
- प्र.ग. ग्रामोपाध्दे
- सौ. पद्मावती सी. कुलकर्णी
- सौ. सुनीता कुलकर्णी
- अनिल काशिनाथ कुलकर्णी
- इंदुताई लोमटे
- म्रीनल कांती गांगुली कलकत्ता
- शरद वा. शिखरे
- श्री. मधुकर कृ. पानसे
- माधुरी चि. पाठक
- श्रीमती सुनंदा पाटील
- सौ. अपर्णा प्रदीप पोळ
- सौ अंजली अजित पाटील
- सौ. शीला रेठरेकर
- सौ. मनीषा बिडकर
- वसंतराव जोशी
- सौ. मंगल गो. कुलकर्णी
- वेदमूर्ती श्री चंद्रकांत लोहगावकर
- वेदमूर्ती श्री विनायक लोहगावकर
- सौ. वेदवती श्रीकांत जोशी
- सौ. रोहिणी चंद्रकांत लोहगावकर
- यशवंत नारायण देशपांडे
- सौ. निता लोहगांवकर
- यशवंत वा. कुलकर्णी
- वेदमूर्ती चि. मयूर लोहगावकर
- व. शं. आठल्ये
- सौ निर्मला केळकर
- सौ. शालिनी वसंतराव जोशी





# ।। प्रस्तावना ।।

प. प. ईश्वरानंद ही स्मरणिका आपल्या हातात देताना मला अतिशय आनंद होत आहे. २०२५ साल हे स्वामींच्या दीक्षा ग्रहणाला शंभर वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्ताने आपण सर्वजण संन्यास दीक्षा ग्रहण शतकपूर्ती महोत्सव म्हणून साजरा करत आहोत. त्यानिमित्ताने पूर्वी प्रकाशित झालेली स्मरणिका अधिक माहितीसह अधिक लेखांसह पुनःप्रकाशित आपण करत आहोत. स्वामींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आपण २००० साली ही स्मरणिका प्रथम प्रकाशित केली होती. त्यावेळेला असाच दहा दिवसांचा मोठा महोत्सव आपण आयोजित केला होता. त्यावेळेस भागवत सप्ताह, अनेक धार्मिक कार्यक्रम, पालखी सोहळा, अन्नदान, पुस्तक प्रकाशन असे विविध उपक्रम आपण घेतले होते. या महोत्सवासाठी जगद्गुरूंनी आपल्याला आशीर्वाद पर पत्र दिले होते. तेही पत्र या पुस्तकात प्रकाशित करण्यात आले आहे. तसेच संन्यास दीक्षा ग्रहण शताब्दीपुर्ती महोत्सवासाठी पण जगद्गुरूंनी आशीर्वाद दिले आहेत व तसे पत्रही त्यांनी दिले आहे. तसेच करवीर पिठाधीश श्री विद्यानृसिंह भारती दिनांक २४ नोव्हेंबर या दिवशी सकाळी साडेनऊ वाजता ते प्रत्यक्ष उपस्थित राहीले. सर्व स्वामी भक्तांना दर्शन देऊन आशीर्वचन दिले आहे. गेल्या पंचवीस वर्षात स्वामींच्या समाधीच्या ठिकाणी प्रति वार्षिक गुरुपौर्णिमा उत्सव तसेच समाराधना उत्सव हे सातत्याने अखंडितपणे साजरे करण्यात आले आहेत. समाराधनेला सकाळी लघु रुद्राने समाधीला अभिषेक तसेच नंतर १६ ब्राह्मणांचे पाद्यपूजन, त्या तीर्थाची पूजा, पंचपक्वान्नाचा नैवेद्य हे उपक्रम अखंडितपणे होत आहेत. काही विशिष्ट प्रसंगी लघुरुद्राचे अनुष्ठान पण करण्यात येते. सन २००७ साली शृंगेरी पीठाधीश जगद्गुरु श्री भारतीतीर्थ स्वामीजी तीन दिवस कराड क्षेत्री स्वामी भक्तांना आशीर्वाद देण्यासाठी आले होते. जगद्गुरूंची विजय यात्रा जेव्हा कराडमध्ये पोहोचली तेव्हा मिरवणुकीने त्यांना कृष्णाबाई मंगल कार्यालयात आणण्यात आले तिथे आधी धुलीपूजन झाले आणि मग जगद्गुरु कार्यालयात प्रवेश करते झाले.

त्यांनी स्वामींच्या अनेक आठवणी सांगितल्या. ते म्हणाले की ‘‘ काशीस्वामी माझा बहिस्थ प्राण आहेत’’ ते म्हणत माझे परात्पर गुरू चंद्रशेखरभारती स्वामी यांचा विशेष जीव काशी स्वामींवर होता. त्यांचे ते लाडके होते कारण काशी स्वामींनी गुरु सेवा खुप मन लावून केली होती आणि गुरूंना अपेक्षित पूर्ण आचरण त्यांनी ठेवले होते. त्यामुळे श्री गुरूंच्या परीक्षेत काशीस्वामी पैकीच्या पैकी मार्क मिळवून पास झाले होते.

रोज रात्री चंद्रमौलिश्वराची पूजा तसेच दिवसा विविध स्वामी भक्तांच्या घरी जगद्गुरूंचे जाणे झाले व त्यांची पाद्यपूजा पण झाली. स्वामींच्या समाधी जवळ पण जगद्गुरूंची पाद्य पूजा करण्यात आली. सर्वांना जगद्गुरूंनी तीर्थ दिले. दुसऱ्या दिवशी काशीस्वामी समाधी भेट नंतर कमलताई शिराळकर यांच्या घरी, शीलाताई रेठरेकर यांच्या घरी जगद्गुरु गेले. त्याही दिवशी सायंकाळी चंद्रमौलिश्वराची पूजा, तीर्थ वाटप इत्यादी नित्यक्रम पार पडले. तिसऱ्या दिवशी जगद्गुरु साताऱ्याकडे रवाना झाले.

तसेच २०१८ साली संनिधानम विधूशेखरभारती स्वामी कराड येथे आले होते त्यांची निवास व्यवस्था श्री विनायक शास्त्री गरुड यांनी केली होती त्यावेळी विधूशेखरभारती स्वामींच्या समाधीच्या ठिकाणी येऊन गेले व दुपारच्या वेळी सर्व स्वामी भक्तांना त्यांनी कृष्णानदी मध्ये स्वहस्ते स्नान घातले.

भागवत सप्ताहातील काही छायाचित्रे तसेच दोन्ही जगद्गुरुंच्या कराड भेटीची छायाचित्रे या पुस्तकात प्रकाशित करण्यात आली आहेत.

या महोत्सवाच्या निमित्ताने ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यामध्ये पारायण प्रवर्तक म्हणून ज्यांनी जबाबदारी स्वीकारली व उत्तम प्रकारे पार पाडली, ते आमचे गुरुवर्य पूजनीय पाटील काका व पूजनीय पांडुरंग महाराज क्षीरसागर यांच्या बद्दल ऋण व्यक्त केले तर ते माझ्यावर रागावतील तरीपण हे धाडस करतो.

तसेच आमचे देहू आळंदी मधील मित्र मार्गदर्शक ह.भ. प. श्री. खनपटे माऊली ह.भ. प. श्री. सुधीर माऊली व ह.भ. प. श्री. ज्ञानदेव कदम, गोसेवक माऊली यांचे पण ऋण व्यक्त करतो.

या महोत्सवाच्या नियोजनामध्ये कराड मधील ज्ञानेश्वरी जयंती उत्सव मंडळ व त्याचे अध्यक्ष श्री बोधे व सर्व कार्यकर्ते तसेच वेदशास्त्र विद्यासंवर्धन मंडळ, कराड याचे सर्व कार्यकर्ते, तसेच कृष्णाबाई उत्सव कमिटी ट्रस्ट कराड चे श्री. पालकर साहेब श्री. अण्णा शिखरे यांनी पण आम्हाला अमोल सहकार्य केले. या आयोजनामध्ये काशीस्वामींच्या धार्मिक कार्याची धुरा गेली २५ वर्षे वाहणारे वेदशास्त्र संपन्न श्री. सचिनजी गरुड यांचा पण मी ऋणी आहे तसेच धोपाटे प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री. अभयजी धोपाटे, सौ माधुरी धोपाटे, श्री. विनायक विभुते, सौ. सीमा विभूते,श्री राजू गिजरे, सौ. सुरभी गिजरे यांचे पण मनःपूर्वक ऋण व्यक्त करतो.

या महोत्सवाचे स्वागताध्यक्ष पद डॉक्टर श्रीकृष्ण ढगे यांनी स्वीकारले. त्यांच्याबद्दल ऋण व्यक्त करतो तसेच काशीस्वामी भक्त मंडळ कराड याची यानिमित्ताने स्थापना होऊन त्याचे अध्यक्षपद स्वामींचे शिष्य श्री. योगेशजी व्यास यांनी नम्रतापूर्वक स्वीकारले त्याबद्दल त्यांचेही ऋण व्यक्त करतो. या कार्यक्रमाच्या रूपरेषेबद्दल मार्गदर्शन करणाऱ्या व सतत पाठीशी असणाऱ्या कुमारी सुशीलाताई शिखरे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांच्याप्रती श्रद्धा व्यक्त करतो तसेच या स्मरणिकेस संपूर्ण निर्मितीस सहाय्य करणारे श्री. अभय धोपाटे, कऱ्हाड व अन्य ज्यांचे सहकार्य या स्मरणिकेस लाभले त्या सर्वांना धन्यवाद !

कराड मधील परिचित, अपरिचित श्रद्धावान लोकांनी या महोत्सवाला त्याच्या आयोजनाला भरभरून प्रतिसाद दिला व न मागता सर्व प्रकारची मदत केली त्याबद्दल सर्व कराडकरांचे ऋण व्यक्त करतो.



**श्रीकांत जोशी**

**।। नमो नारायणाय।।**



प. प. धर्मश्री: ईश्वरानन्द सरस्वती म्हणजेच आपले काशीस्वामी ह्यांच्या वास्तव्याने करहाटक नगरी व कृष्णा-कोयनेचा संगम परम पावन झाला आहे.

त्यांची कृपा लाभलेले शिष्यगण व सहवास लाभलेले अनेक भाविक हे खरोखरच भाग्यवान होत. कारण स्वामींसारखे परमहंस योगी आता दिसायलाही दुर्मिळ म्हणायला हवेत.

प. पू. स्वामींच्या संन्यास ग्रहण योगास शंभर वर्षे पूर्ण होत आहेत आणि त्या निमित्ताने आपण समाराधना, लघुरुद्र,ज्ञानेश्वरी पारायण,पालखी,विद्यार्थ्यांची अभंग स्पर्धा इ.विविध उपक्रम आयोजित करून सर्व दूर दुरून आलेल्या स्वामीभक्त आणि शिष्य मंडळींच्या सहवासात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करत आहोत.

प. प. स्वामींचे चिरंतन वास्तव्य त्यांच्या समाधी रूपाने कृष्णा-कोयनेच्या ऐतिहासिक संगमावर आपल्याला मार्गदर्शन करीत आहे.

हा चिरस्मरणीय सोहळा संपन्न होण्यासाठी सर्व शिष्यगण,भक्त मंडळी,कराड नगरीतील सात्विक दानशूर मंडळी,विविध संस्था ह्यांचा आर्थिक हातभार तर लागला आहेच पण अनेकांनी शारीरिक श्रम ही घेतले आहेत.

**कुणी कुणाला धन्यवाद द्यावेत?**



**डॉ. श्रीकृष्ण ढगे**
स्वागताध्यक्ष,
संन्यासदीक्षा शतकपुर्ती सोहळा समिती, कराड.

## ।। अध्यक्षीय मनोगत ।।

श्री. योगेशजी व्यास

पूज्य सुशिलाताई, डॉक्टर श्री ढगे साहब, प्रिय मित्र श्रीकांत, शीलाताई और सब गुरुबंधू और भगिनी, नमस्कार ।

पूजनीय श्री ईश्वरानंद स्वामीजी के इस समारंभ मे सम्मिलित होना मेरे लिये बहुत हर्ष और सौभाग्य की बात है । इस समारोह मे श्रीकांत के द्वारा मुझे यहा बुलाना, इसे स्वामीजी का आदेश ही मान रहा हूँ। स्वामीजी मेरे जीवन मे मेरे जन्म के समय से है । मेरे माता और पिता उनके अनन्य भक्त थे और मेरा जन्म ही स्वामीजी के परम आशीर्वाद रूप से हुआ है । मेरी बाल्यावस्था से उनकी तस्वीर जो हमारे मुंबई के घर मे होती थी मेरे मन मे स्थित है । सौभाग्यवश १९९२ के दरम्यान मुझे और मेरे परिवार को कराड मे पूजनीय स्वामीजी के दर्शन हुए थे । उन्होने इन दोनो अवसर के समय हमसे बहुत प्रेमपूर्वक बाते की थी और मेरे माता पिता को भी याद किया था । ये क्षण हमारे जीवन की अनमोल पूंजी है । हम सब आज भी उन स्मृतियों को जी रहे है । सन १९९३ मे स्वामीजी के समाधिस्थ होने के पश्चात कई बार आराधना महोत्सव मे आने का सौभाग्य प्राप्त हुआ । कई बार तो हमारे संतान भी साथ रहते है । उनको भी कराड आने की इच्छा होती है । और हम सब स्वामीजी के स्थान पर दर्शन के लिये आते है । वहाँ आनेपर एक अद्भुत आनंद की अनुभूती होती है । मै नियमित रूप से स्वर्गवासी पूजनीय कमलताई और पूज्य सुशीला ताई और पूज्य शीलाताई के संपर्क मे रहा हुँ जिनके द्वारा पूजनीय स्वामीजी का आशीर्वाद सदैव मिलता रहता है । मेरे जीवन मे कई बार संसारिक सुखद और विषाद के क्षण आये है। ऐसे समय में उनकी स्मृती करने पर उनके अस्तित्व की प्रतिती होती रहती है । इसे मै बहुत बडे आशीर्वाद मानता हूँ। प. प. स्वामींजी के इस संन्यास दीक्षा शताब्दी महोत्सव मनाने की संकल्पना गुरुबंधू श्रीकांत जोशी को आई और फलस्वरूप आज इस पावन अवसर में सम्मिलीत होने का हमे सौभाग्य मिल रहा है । मै हृदयपूर्वक श्रीकांत का ऋणी हुँ । उनका और उनके साथ आप सब का योगदान सदैव याद रहेगा । पूजनीय सुशीला ताई और स्वर्गवासी पूजनीय कमलताई को हमारे प्रणाम । हम सब गुरुबंधू भगिनी पर पूज्य स्वामीजींका आशीर्वाद सदैव रहे यही प्रार्थना करता हुँ । आप सबको हृदय से प्रणाम । अस्तु ।।

# ।। पुण्यस्मरण ।।

**आज अखेर स्वामींचे लाडके अनेकानेक शिष्य आपल्याला सोडून गेले आहेत त्यांचेही स्मरण या निमित्ताने होत आहे.**

- वे.शा. सं. श्री व सौ. प्रभाकर गिजरे
- बाळुकाका कुलकर्णी
- कु. बेबीताई पाठक
- सौ. लतिका मधुकर पानसे
- डॉ गोहाड
- हणमंतराव माळवदे,
- अण्णा भिंगारे,
- नानासाहेब रेठरेकर,
- मालुताई ढवळीकर
- शकुंतला वासुदेव शिखरे
- गोविंद कुलकर्णी (भिंगारे)
- मंगल कुलकर्णी
- पी. डी. पाटील
- दादासाहेब देशपांडे
- कॉम्रेड शंकरराव धावडे
- ज्ञानबा काशिद
- विजया वांकर
- पद्मावती ग्रामोपाध्ये
- श्री. व सौ. प्रभाकर माळवदे
- जयश्री कुलकर्णी
- धोंडो नाईक
- एन. सुमित्राबाई
- एन. अशोक कुमार
- कु. विजुताई पाठक
- दादा पाठक
- हणमंत विठ्ठल शिखरे
- राया पटवर्धन,
- वसंतराव जोशी,
- सौं भिंगारे,
- भागवत सर,
- बंडा कुलकर्णी,
- शरद वासुदेव शिखरे
- बळवंत कुलकर्णी
- पुष्पाताई किरपेकर
- उद्धव रुईकर
- धनाजी कुंभार
- छाया पाटील
- नाना उमराणी
- नरहरी उमराणी
- गोपाळ जोशी
- आर. एन. कुलकर्णी
- राजश्री जौंजाळ
- लीलाबाई नाईक
- एन. सिद्धेंद्र राव
- मिलींद घळसासी
- कुमारी कमलताई शिराळकर
- मधुकर कृष्णाजी पानसे
- सौ. कुसूम हणमंत शिखरे
- आबासाहेब शिराळकर,
- सौ. शालिनी जोशी,
- सचिन रेठरेकर,
- हरी येळगावकर,
- गोपाळ कुलकर्णी
- वासुदेव विठ्ठल शिखरे
- श्रीरंग कुलकर्णी
- अष्टेकर आजी
- सुमनताई अष्टेकर
- दिगंबर भांबुरे
- पार्वती पाटील
- विलास पाटील
- श्री. व सौ. नाईक
- माई उमराणी
- श्रीकांत घळसासी
- सौ. काळेकर

# ।। कृतार्थ मी - तृप्त मी ।।

डॉ. श्रीकृष्ण ढगे, कराड

१९८७ च्या सप्टेंबर महिन्यातली घटना, माझ्या तपासणीच्या खोलीमध्ये एक वयस्कर पेशंट त्यांच्या बरोबरच्या मध्यमवयीन सोबत्याच्या आधाराने आले.

त्यांचे वय साधारण ८० च्या जवळपास असावे. कंबरेला भगवे वस्त्र गुंडाळलेले, खांद्यावर भगवा पंचा घेतलेला, दाढी-मिशा, डोक्यावरील केस गुळगुळीत केलेले अन चेहऱ्यावर सात्त्विक तेज, त्यांचे डोळे तपासावयाचे होते. मी केसपेपर लिहायला घेतला....

नांव ?...... " ईश्वरानन्द सरस्वती '' सोबत्याने सांगितले. मी क्षणभर थबकलो. हे कसले नांव बरं ? पत्ता काय ?... '' भैरोबा मंदिर, सोमवार पेठ, कराड '', त्यांच्या बरोबरची व्यक्ती सांगत होती. हे आपले शांत.

मी तपासून डोळ्यांत मोतिबिंदू आहेत. ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. त्याप्रमाणे सर्व सोपस्कार होऊन हा रुग्ण हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाला, त्यांचे डोळ्याचे ऑपरेशन उत्तम प्रकारे झाले.

आपण सुशिक्षित म्हणवून घेणारी माणसे सहसा भगव्या कपड्यातील लोकांपासून चार हात दूरच राहतो. कोणी भोंदू बाबा तर नव्हेत ? अशी शंका आपल्या मनात येत असते. माझेही अगदी असेच झाले. असतील कोणीतरी बैरागीबाबा, म्हणून मी विशेष खोलात न शिरता इतर सर्वसामान्य पेशंटप्रमाणे त्यांचे ऑपरेशन वगैरे सोपस्कार पार पाडले.

त्यानंतर काही दिवसांनी डॉ. लोमटे भेटले. तेव्हा त्यांनी विचारले, स्वामींचे ऑपरेशन व्यवस्थित झाले ना ? तेव्हा मी होकारार्थी उत्तर दिले. बोलण्याच्या ओघात डॉक्टर लोमट्यांनी स्वामींबद्दल सांगायला सुरुवात केली आणि मी ऐकत राहिलो. डॉक्टरांच्या मनात त्यांच्याविषयी असणारी असीम श्रद्धा व त्यांनी सांगितलेली माहिती ऐकल्यावर मला जरा चुटपुट लागली. अरे! एवढी मोठी थोर विभूती आपल्याकडे उपचार घेऊन गेली आणि आपण तिच्या थोरवीबद्दल अनभिज्ञ राहिलो.

त्यानंतर काही दिवसांनी स्वामी पुन्हा दवाखान्यात तपासणीसाठी आले. छान दिसू लागल्याने स्वारी खुश होती. त्यांच्याबरोबर त्यांचे काही शिष्य होते. माझ्या तपासणीच्या खोलीतच त्यांनी माझ्या हातात मिठाईचा पुडा ठेवला व माझ्या खांद्यावर एक शाल पांघरली. मी लवून नमस्कार केला. आणि त्यानंतर आम्हा कुटुंबियांचे भैरोबाच्या मंदिरात स्वामींकडे जाणे सुरू झाले ते स्वामी देहत्याग करेपर्यंत. गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाचे निमंत्रण न चुकता येत असे आणि दुसऱ्या दिवशी प्रसाद घरपोच होत असे. भैरोबाच्या मंदिराच्या ओवरीत स्वामींकडे जाऊन त्यांच्या पुढ्यात शांतपणे नुसते बसून जे समाधान मिळत असे ते अवर्णनीय आहे. त्यांच्या नुसत्या दर्शनाने मनाला दिलासा, आधार मिळत असे. कशी चाललीय तुझी प्रॅक्टिस ? हा त्यांचा नेहमीचा प्रश्न, माझी, पत्नीची व मुलांची ते अगदी आस्थेने चौकशी करीत असत. त्यांना अर्पण करायला नेलेला खजूर किंवा खडीसाखर नुसता स्पर्श करून आम्हालाच पुन्हा वाटून टाकत असत. मुलंही (वय वर्षे ४ व ५) स्वामींकडे जायचं म्हटलं की खुश असत.

यथावकाश स्वामींचे दुसऱ्या डोळ्याचेही मोतिबिंदूचे ऑपरेशन चांगले झाले. दोन्ही डोळ्यांना उत्तम दिसू लागले. दरम्यान १९९० मध्ये माझ्या नव्या हॉस्पिटलचे व त्यावरच घराचे बांधकाम पूर्ण झाले होते. स्वामींनी एकदा पाय लावावेत अशी प्रबळ इच्छा होती. ते तर कोणाच्या घरी जात नाहीत असे ऐकून होतो. म्हणून एकदा घाबरत घाबरतव विचारले - स्वामी माझे नवे हॉस्पिटल व घर पाहायला याल का ? आश्चर्य म्हणजे स्वामींनी तत्काळ होकार दिला. आता आमच्यापुढे मोठाच प्रश्न उभा राहिला. स्वामी घरी आल्यावर त्यांचा आदरसत्कार कशा पद्धतीने करावा ? पाद्यपूजा शास्त्रोक्त पद्धतीने कशी करावी? यावेळी आमचे धर्मपरायण स्नेही श्री. शिवदास

जांभळे मदतीला धावून आले. त्यांनी धर्मसिंधू वगैरे बऱ्याच धार्मिक ग्रंथातले संदर्भ काढून पाद्यपूजा कशी करावी याची माहिती दिली. स्वामींना काय आवडते, काय आवडत नाही, हे सुशीलाताईना विचारायला गेलो तर पहिल्यांदा त्यांचा विश्वासच बसेना. काय, स्वामी तुमच्या घरी येणार? अहो डॉक्टर, तुमचे भाग्य फार मोठे आहे कारण ते कुणाही गृहस्थाकडे जात नाहीत. असे सुशीलाताई म्हणाल्या. आणि त्यांनी स्पष्टपणे सांगितले की तुम्हाला जे काही अर्पण करायचे असेल ते करा पण ते काहीही स्वीकारणार नाहीत.

ठरलेल्या दिवशी मी गाडी घेऊन भैरोबाच्या मंदिरात गेलो व स्वामींना त्यांच्या शिष्योत्तमांबरोबर घरी घेऊन आलो. घरी चौरंगावर बसवून आम्ही अगदी शास्त्रोक्त पद्धतीने पाद्यपूजा करून फूल-पत्र फळे-दक्षिणा-शाल अर्पण केली. स्वामींनीही मोठ्या कौतुकाने पूजेचा स्वीकार केला. जसे एखाद्या बालकाचे कोडकौतुक पुरवुन द्यावेत किंवा नामदेवाने हट्टाने भरविलेला घास घेण्यासाठी साक्षात पंढरीरायाने तोंड उघडावे त्याप्रमाणे, नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे आमचे आम्हालाच प्रसाद म्हणून पुन्हा वाटून टाकले. स्वामी मोकळेच। स्वामी फोटो काढलेत तर चालेल ना ?

मी घाबरत विचारले. त्यांनी सहजपणे परवानगी दिली. स्वामींच्या भेटीची आठवण देणारे ते फोटो अजूनही संग्रहात आहेत. मी स्वामींचा फोटो काढणार म्हणून हट्ट करून रुसून बसलेल्या आमच्या ५ वर्षाच्या कन्यारत्नास स्वामींनी जवळ घेऊन तिची समजूत काढली व दोन्ही मुलांना जवळ घेऊन फोटो काढून घेतला. त्यानंतर सर्व घर, प्रत्येक खोली फिरून पाहिली. देवघर कोठे आहे म्हणून चौकशी केली व देवघरात आवर्जून काही वेळ थांबले. त्यांच्या तेजस्वी चेहऱ्यावर आणखीनच प्रसन्नता दिसून येत होती. त्यानंतर सर्व हॉस्पिटल फिरून त्यांनी समाधान व्यक्त केले.

नेत्रतज्ज्ञ म्हणून स्वामींचे दोन्ही डोळ्यांचे ऑपरेशन करायला मिळणे हे पूर्वजन्मीचे सुकृतच म्हटले पाहिजे. स्वामींचे चरणी वैद्यकीय सेवा रुजू झाली. म ी कृतार्थ झालो. स्वामींच्या पाद्यपूजनाने व वास्तुस्पर्शाने आम्ही भरून पावलो. आयुष्यातली ही एक मोठी जमेची बाजूच ।



You are, the greatest Lord,
Who is accepted, in the world
You are, the religious truth and kind,
Who ties us, with affectionate bind.
Your teachings, should be ever followed,
Which give us, eternal peace beyond
Your memory will, always remind,
Which brings, valuable lessons around
Meditating you, is, divine sound,
Which is, solvation to the whole mankind
Devoting you, itself is God,
Which inspires, holy thoughts in mind.
You can, never be described,
Which is, as such unsuffice of words.

**(Mrs. Sheela Rethrekar)**

**।। जय श्रीराम ।।**

## ।। गुरु महिमा ।।

**श्रीमती मालिनी गाडेकर**

सध्याच्या काळात सामान्य लोकांना ‘‘ गुरु ‘‘हा शब्द केवळ शब्द म्हणून माहीत आहे. कारण सद्गुरुंशी त्यांची भेट झालेली नाही. भारतात गुरु, गुरुकुल अन् गुरु परंपरा यांना प्राचीन काळापासून महत्व आहे. परंतू वैज्ञानिक प्रगतीमुळे या महान परंपरेकडे दुर्लक्ष झाले. ‘‘ गुरु‘‘ हा सर्व मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. हा वारसा परंपरेने प्रत्यक्ष भगवंताने दिलेला आहे भगवंताने ही सृष्टी उत्पन्न केली खरी पण या सामान्य जीवांना मार्ग कोण दाखविणार ? म्हणून भगवंताला गुरुरुपात व्यक्त होण्याची इच्छा झाली, गुरुचे वर्णन करताना म्हणतात.

गुरुब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

ईश्वराची सर्वरूपे श्री गुरुंच्या ठायी आहेत. गुरु हे ईश्वराचे सगुण-साकार रूप आहे. भारतीय संस्कृतीने गुरु महिमा वर्णन केला । संत कबीर म्हणतात-

गुरु गोविंद दोऊखडे, काके लागु पाय ।
बलिहारी गुरु आपने, गोविंद दियो बताय ।।

गुरु आणि भगवान दोघेही समोर उभे राहिले तर प्रथम गुरुच्या चरणावर नतमस्तक व्हावं. कारण गुरु आपल्याला ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग दाखवतात. कबीरांनी सद्गुरुंना ईश्वरापेक्षाही उच्च पदावर नेऊन बसवले आहे. इतक्या सुंदर शब्दात गुरु -माहात्म्य अन्यत्र कोठेही आढळून येणार नाही. म्हणूनच गुरुंचा सर्वत्र सन्मान केला जातो.

गुरुच विधाता, गुरुच विष्णूही
गुरुच महेशही मज गमतो
परब्रह्म साक्षात गुरु असतो
गुरुला त्या वंदन करतो ।।

किंवा दुसऱ्या शब्दात, गुरु ईश्वर तातमाय, गुरुविण जगी थोर काय ? गुरुवे नमः ।।

प्रथम सद्गुरु तत्वाला मनोभावे नमन करून त्यांच्याच प्रेरणेने माझ्या अल्पमतीतून सद्गुरूंचा महिमा तोडक्या मोडक्या शब्दात लिहिण्याचा प्रयत्न करते. प्रेरणा त्यांचीच, शब्दही त्यांचेच ! फक्त लेखणी माझी !
ते सांगताहेत अन् माझ्याकडून लिहून घेताहेत.

गुरु या शब्दाची फोड करताना गु = गुप्त, रु = रूप जो

देवांच्या गुप्त रुपाशी ऐक्य पावलेला असतो, जो आपल्याला देवाचे गुप्त रूप दाखवतो, तो गुरु । आपल्या प्रपंचात आपले ध्येय आपण ठरवतो. खेळ, संगीत, वक्तृत्व करत इ. क्षेत्रात उच्च पदावर पोहोचायचे कसे ? पण परमार्थात आपले ध्येय सद्गुरु ठरवतात. आपल्याला प्रपंचाच्या पाशातून मुक्त करणारे जे तत्व ते गुरुतत्व ।

समर्थ रामदास स्वामी दासबोधात म्हणतात-

सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरु विण दुःख सकळ।
सद्गुरुविण तळमळ । जाणार नाही ।। ( दशक-५. स-१)

एखाद्या व्यक्तीचा उध्दार करायचा असेल तर त्याला शोधत सद्गुरु येतात. नारद महर्षिंना वाल्या कोळ्या समोरुनच का जावेसे वाटले? त्याच्यात त्यांना कोणते गुण दिसले? नारदांना आकाशमार्गे ही जाता येत होते. त्यांना वाल्यात दोन गुण दिसले

१) प्रामाणिकपणा – वाल्या कोळी गुन्हा झाला की, रोज एक खडा रांजणात टाकायचा अशी सात रांजणे भरली एवढा प्रामाणिकपणा आपल्यात हवा पण तो नाही कारण आपण षड्रिपु मध्ये गुरफटलेले आहोत.

३) जे सांगितले तेवढेच करायचे. वाल्याने नारद महर्षिंनी जेवढे सांगितले तेवढेच केले. 'राम राम '' म्हटले शंका घेतली नाही. नामस्मरण केले. म्हणूनच ते वाल्मीकी झाले. सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुनी उपदेश केले नंतर तसे तुम्ही करता की नाही यावर ते बरोबर लक्ष ठेवतात आणि आपल्याला योग्य मार्गावर आणतात. सद्गुरुविण मनुष्य जन्म म्हणजे जसा आला तसा गेला . कोणत्याही जीवाचा जन्म तमोगुणातून झाला असला तरी तो झाला सत्वगुणासाठी । परब्रह्माने ब्रम्हाला दिलेले, ब्रह्माने वशिष्ठांना दिलेले व वशिष्ठांनी रामाला दिलेले सांदीपनीने श्रीकृष्णाला दिलेले तेच ज्ञान मी तुला देतो असे म्हणून ब्रह्मचैतन्य महाराजांचे गुरु तुकाई महाराजांनी त्यांच्या हातावर '' उ '' काढून दिली. उ म्हणजे अ, उ, म. अ = ब्रह्मा = रजोगुण, उ = विष्णू = सत्वगुण व म = महेश तमोगुण. तुकाई महाराजांनी ब्रह्मचैतन्य महाराजांना पात्रता, योग्यता, क्षमता आणि अधिकार या चार गोष्टी दिल्या या चार गोष्टी गुरुकडून मिळवण्यासाठी आपल्यात मुमुक्षत्व हवे. ध्येयाचा ध्यास हवा. इच्छा संपल्या पण श्वास आहे हा मोक्ष पण श्वास संपला आणि इच्छा आहेत हा मृत्यू . हे ब्रह्मज्ञानात गुरु मुखातूनच प्राप्त होते कितीही ग्रंथ वाचून उपयोग नाही म्हणजे कर्म करताना आपण म्हणू शकत नाही की तो मी नव्हेच उलट आपण म्हणतो त्याला मीच मदत केली अकर्तेपणा आपण घेत नाही आपले आयुष्य ' मी मी ' मध्येच अडकलेलं तर सद्गुरुंचे आयुष्य' तो तो' मध्ये आहे. ' तो कर्ता करविता ' म्हणून सर्व मीच केले, माझ्याच इच्छेने मलाच विचारुन केले पाहिजे. हा विचार सोडून ' ठेविले अनंते तैसेची रहावे ' असे सांगत तुकारामांनी अभंगातून विरक्ती व्यक्त केली. आणि शरीर विठ्ठलाला समर्पित केले. ते म्हणतात, ' गुरु कृपेमुळेच हा दीप उजळाला आहे. त्याचे रक्षण झाले आहे. ' सद्गुरु आपल्या देहाच्या जबाबदाऱ्या घेतात, पण त्यांना अधिकार नको असतो. आपल्याला मात्र अधिकार हवा असतो जबाबदाऱ्या नको असतात खरे तर सद्गुरु म्हणजे काय हे वेदांनाही कळले नाही. कारण सद्गुरु तत्वाची शब्दांना अनुभूतीच नाही. खरे तर सद्गुरुंचा सांगोपांग (सहा अंगांनी व सहा शास्त्रांनी ) विचार करावा. तेव्हां कुठे सद्गुरु म्हणजे काय? हे लक्षात येईल. एकदा सद्गुरु म्हणजे काय? हे लक्षात आले की, त्याच्या अंतःकरणात सद्गुरु स्थिर झाले. आपल्या आयुष्यात आनंदाचा नंदादीप अखंड तेवत ठेवणे आणि त्यावर आलेली काजळी काढून टाकणे हे काम गुरु करतात आपल्या आयुष्यातील ' खऱ्या आनंदाची ' जागा गुरु दाखवतात. हा न संपणारा आनंद जर आपल्याला हवा असेल तर गुरुंनी सांगितलेल्या या ३ गोष्टी स्वीकाराव्यात.

१) मनुष्यत्व – म्हणजे समजण्याचा धर्म–पाप–पूण्य समजते. योग्य तेथे बुध्दी बापरण्याची बुद्धी हवी.

२) मुमुक्षत्व – एखादी गोष्ट करण्याची तीव्र इच्छा हवी. (भक्ती, नामस्मरण)

३) वैराग्य – कोणत्याही गोष्टीबद्दल आशा नको. तक्रार नको. पाऊस पडला नाही तरी तक्रार नाही. पडला तरी तक्रार नाही. हे तेंव्हाच जमेल जेव्हा देहापेक्षा अन्य गोष्टीकडे लक्ष जाईल. आपले दुःख आणि दैन्य घालवायचे असेल तर सद्गुरुविण जन्म निर्फळ आहे.

ग्रंथांचे वाचन करुन आपल्यातील चुका शोधता येतात. ' पाहावे आपणासि आपण । ' चुका कळतात पण त्या आपण मान्य करत नाही. याच चुका समजावून देण्याचे काम सद्गुरु करतात प्रसंगी शिष्यांला दोन फटके मारुन निश्चित ठिकाणी नेतात. आपल्या जीवनात सद्गुरु आले की, ते आपल्या मनाचे भांडे स्वच्छ घासतात कारण

ते षड्रिपूंनी मळलेलेच असते. ' मनाची क्षते एकता दोष जाती।' सामान्य माणसे मतीमंद असल्याने त्यांची मती तेथवर पोहोचत नाही. सद्गुरु तेथे घेऊन जातात. फक्त आपण सद्गुरूंना सांगावे की, ' मला योग्य मार्गावर घेऊन जा ' स्वता:ची अक्कल बाजुला ठेवून त्यांनी सांगितलेल्या मार्गाने आपण जावे. पण त्यासाठी मला अक्कल नाही हे हे कळले पाहिजे. आपण वाचतो पण बोध घेत नाही. कणिक किती मऊ आहे ? हे शब्दाने सांगितल्यास कळत नाही तर प्रत्यक्ष ती हातात दिली तरच कळते. हा बोध सद्गुरु देतात मग खात्री पटते अन् सद्गुरूंचा शोध घ्यावासा वाटतो. तळमळ लागते. विवेकानंदांनी रामकृष्णपरमहंसांना विचारले की, आईचे दर्शन कधी (कालीमातेचे)होईल ? रामकृष्णांनी त्यांना पाण्यात बुडवले. नाका तोडांत पाणी गेले, कधी श्वास घेईन असे त्यांना झाले. रामकृष्ण म्हणाले, '' जगदंबेसाठी अशी अवस्था व्हायला हवी. '' त्यासाठी आशा सुटली पाहिजे. संसाराच्या वडाला आपण मिठी मारली आहे, ही मिठी सोडविण्याचे काम सद्गुरु करतात.

परमार्थात सद्गुरूंची आवश्यकता आहे, हे उपनिषद्‌कारांपासून ते रामदास, तुकारामांपर्यंत सर्वांनी सांगितले आहे. कारण आत्मज्ञान गहन आहे ते स्वत:च्या बळावर घेता येणार नाही. नैराश्याची काळोखी रात्र गुरुकृपेच्या उदयावाचून उजळणार नाही अशा शब्दात ज्ञानेश्वरादी संतानी सद्गुरूंची महती गायली आहे.

एका व्याख्यानात गुरुदेव रानडे म्हणतात '' सद्गुरु शिष्यासाठी काय करतात? गुरूंचे कार्य काय ? तर जसे टेलिफोन एक्सचेंज दुसऱ्याच्या माणसाची बोलण्यासाठी नंबर जोडून देतो तसे गुरु, देव आणि भक्ताची गाठ घालून देतो. आपण मात्र दूर राहतात. सद्गुरु विजेच्या मुख्य तारेप्रमाणे असतात आपण त्यांच्या शाखांना लागलेल्या विजेच्या दिव्याप्रमाणे आहोत. मुख्यतारांमधून विद्युत प्रवाह आला की सर्व दिवे एकदम प्रकाशतात त्याप्रमाणे सद्गुरूंच्या अंत:करणात भरलेला परमेश्वरी प्रकाशाचा झोत त्याच्याशी परमार्थाने बद्ध असलेल्या सर्व शिष्यांच्या अंत:करणात प्रकाश उत्पन्न करतो.

असा मार्गदर्शक गुरु कसा भेटणार ? जगात भक्तीचा व गुरुतत्त्वाचा बाजार चालू आहे. समर्थ रामदासांनी तर अशांना '' अडक्याचे तीन '' म्हंटले आहे म्हणून खऱ्या गुरुचे निकष मानावे लागतात. गुरुच्या अंगी नैतिक शारीरिक, परमार्थिक व सामाजिक असे विशेष निकष असावेत. दासबोधात समर्थ रामदास सांगतात अंतर ही शुद्ध ब्रह्मज्ञान निष्ठेचे भजन, निश्चयाचे समाधान, प्रबल वैराग्य, उदास वृत्ती, निर्मल आचार, अखंड परमार्थ ही सद्गुरूंची लक्षणे आहेत. अशा गुरूंचे अंतरंग भगवंताकडे लागलेले असते. तो भगवंतच होऊन जातो सद्गुरु कोण? याचे उत्तर देताना गुरुदेव रानडे म्हणतात '' ज्याच्याकडे पाहिले असता देवाकडे पाहिल्याचे समाधान मिळते '' गुरुची सेवा म्हणजे त्याच्या देहाची सेवा करणे नव्हे तर आपले जीवनभक्तीमय करणे. हीच त्याची खरी सेवा होय. यावरून सद्गुरुंचे थोरपण ठरते. जेथे साधक एकत्र येऊन साधना करतात, तिथे सद्गुरु असतातच. गुरुभक्तीचे मुख्य अधिष्ठान म्हणजे नामजप होय. समर्थ म्हणतात '' आमच्या मागे जगदीश्यास भजत जावे '' किंवा तुकाराम महाराज म्हणतात '' आम्ही तेणे सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी '' नाम जप करणे,साधना करणे ,निष्ठा ठेवणे हीच खरी गुरु भेट आणि गुरुकृपा होय.

गुरुकृपा होण्यासाठी गुरु देहाने जिवंत पाहिजे असे नाही. सद्गुरूची आपल्यावर कृपा आहे हे पुढील आठ लक्षणांनी पडताळून पाहता येते

१) शांती-दया- क्षमा :- शत्रूच्या ही प्रति आपल्या मनात क्षमेचा दयेचा भाव जागृत व्हायला हवा. क्रोध निर्माण होत असेल तर सद्गुरू कृपा होणार नाही

२) असूया :- कोणाबद्दलच मनात असूया नको. दुसऱ्यात दोष बघू नये. नाहीतर भजन भक्ती नष्ट होते. सद्गुरू कृपेला पात्र ठरत नाही.

३) शारीरिक ,मानसिक शुद्धता :- शरीराची शुद्धता स्नानाने होते पण मन छळ कपट आणि अकसाने मलिन झालेले नको. ते निष्कपट आणि सत्यभावांनी भरलेले असावे म्हणजेच आपण आतून बाहेरून शुद्ध स्वच्छ व पवित्र असावे तर गुरुकृपा !

४) चित्तवृत्ती भगवत् विन्मुख नको व्हायला ज्या कर्मापासून भगवत भजन होत नाही ते कर्म करू नये. धर्माचे आचरण व पालन करावे.

५) भगवत् भजनाचे फळ सर्वांना द्यावे. भजनानंतर सर्वांसाठी फळ मागावे. '' सर्वे भवन्तु सुखेन: । सर्वे संन्तु निरामया ।। रोज जपमाळ करताना ? भगवंतासाठी अन् उरलेल्या सर्वांच्यासाठीच मग आम्हाला काय ? असे मनात न आणता तुमच्या भजनाचे फळ सर्वांना मिळावे, हीच भगवत चरणी प्रार्थना करावी. तरच गुरुकृपा होईल

६) भगवंत भजनाचे फळ भजनच बनवावे. स्वतःसाठी काही न मागणे, दुसऱ्याकडून काही अपेक्षा ठेवायची नाही आणि भजनाचे फळही स्वतःकडे घ्यायचे नाही, तेव्हाच भजनाचे फळ भजनच बनते.

७) कोणत्याही मान-सन्मान प्रतिष्ठेची अपेक्षा ठेवू नये. त्यापासून हे परमेश्वरा मला वाचव. असे सतत म्हणावे तरच गुरुकृपा होईल.

८) कोणत्याही प्राणिमात्रांविषयी दया-करुणा असावी पण ममता नसावी. निर्मोही निरहंकारी असावे. ममता टाकून जो राहतो त्यात शांती मिळते. सद्गुरूची कृपा होते

ही आठ लक्षणे स्वतःच पडताळून पाहावी. कमी असल्यास सुधारणा करावी

'' जो जो जयाचा घेतला गुण तो म्या गुरु केला जाण । '' भागवताच्या एकादशी स्कंदात दत्तानी २४ गुरू केल्याचे सांगितले आहे. साऱ्या ब्रम्हांडाकडून आपण काही ना काही शिकत असतो ते म्हणतात '' ज़्याच्यापासून मी गुण घेतला त्याला मी गुरू केला '' पण ज्याचा दोष पाहून तो मी टाकला तोही माझा गुरु झाला. कारण दोषाचा त्याग करावा हे ही गुरुंनीच शिकवले, असा विचार केल्यास सारे जगच आपल्याला गुरुमय दिसेल. त्या अर्थाने निसर्ग आपला गुरू ! चंद्र , सूर्य कायमचे कधी अदृष्य होत नाहीत. नदी वाहणे कधी थांबवत नाही. पर्वताला वळसा घालून मार्ग काढतेच. झाडे, पर्वत सारे निर्विकार निश्चल ! हे खरे गुरु ! आपल्या जवळचे देणारे परतीची अपेक्षा न ठेवणारे '' सुखदुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ। '' हे खरं पूर्णत्व, ही खरी तटस्थता, हा खरा कर्मयोग, ही खरी आनंद अवस्था हे सारं शिकण्यासाठी माणसाने निसर्गाला गुरू करावे. झाड स्वतःची सावली स्वतःपाशी ठेवत नाही. चंद्राचा गंध दुसऱ्यालाच थंड करतो. माणूस मात्र प्रतिकूल परिस्थितीची खंत करीत बसतो. लोकात मिसळायचं पण समुदायापासून दूर राहायचं. ऐहीक सुखात न अडकता, सामुदायिक सौख्याचा मार्ग दाखवायचा निसर्ग शिकवतो म्हणून तो उत्तम गुरूच आहे. तसेच ग्रंथांनाही गुरु मानावे.

अशा प्रकारे जो ज्ञान शहाणपणा आणि दैवी शक्ती देतो, शिष्याच्या मनातलं जाणतो, मनोमन संवाद साधतो, मनाला आणि आयुष्याला वळण लावतो, शिष्याला त्याच्या ध्येयापर्यंत पोहोचवतो. तोच गुरु ! सद्गुरूची कामगिरी त्याचा महिमा अगाध आहे. '' सद्गुरु वाचून सापडेना सोय । आपणासारखे करतो तात्काळ '' सद्गुरु लोखंडालाच परीस बनवतात. आपल्या डोळ्यावर असलेली षढ्विकारांची पट्टी काढतात पण गुरूच्या चरणी लीन व्हावे तेथे शांती आणि समाधान मिळते काय करावे आणि काय करू नये, हे समजावे म्हणून गुरूंना शरण जावे. भगवंतांनी अर्जुनाला ज्ञान दिले त्याची संभ्रमावस्था गेली. निश्चयात्मक बुद्धी जागृत झाली. सद्गुरूंचे शब्द लाख मोलाचे असतात ते शिष्याचे दैन्य दुःख घालवतात. संसाराच्या अथांग जलाशयात गटांगळ्या खात असताना ज्याचा उपदेश म्हणजे तरुन जाण्यासाठी नावच ठरते. तोच गुरु समजावा. माणसाचा शूद्रपणा तो घालवतो. पशुचा नर आणि नराचा नारायण करतो. दुसऱ्यासाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करतो आपल्या त्यागमय तत्वापासून

ढळत नाही. शिष्याचे भले करणे विसरत नाही. तोच गुरु मानावा. त्याचाच आधार घ्यावा. मातीच्या देहाचे सोने कसे करावे हे गुरु शिकवतो आणि वैचारिक जन्म देतो. त्याचे कोणत्या शब्दाने स्तवन करावे ? किती वाखाणावे ? गुरूंचे वर्णन करताना वाणी तोकडी पडते.

गुरूंची पूजा कशी करावी ?

न होत गुरूंची पूजा, गुरूंसी गंध लावूनीया
न होत गुरूंची पूजा, गुरूंसी माळ घालूनीया
पूजा गुरुची होत असे वचन त्याची ये भावना
तसेच जगी वागणे जरीही कठीण जाईल क्षणा

गुरूंना गंध लावून आणि माळा घालून त्यांची पूजा होत नाही त्यांनी घालून दिलेल्या सद्विचाराप्रमाणे वागले तरच त्यांची खऱ्या अर्थाने पूजा होईल. त्यांचे शब्द वचने आणि नियम आपण आचरणात आणावीत आपल्यापुढे जाणाऱ्या शिष्याचे गुरु कौतुक करतो शिष्याची जात कुळी गुरू विचारत नाही फक्त त्याची तळमळ पाहतो. रिकामा घडा घेऊन गुरू जवळ कोणीही जा आणि वाका, (नम्र व्हा ) तुमचा घडा भरून जाईल. फुललेल्या कमळातील रस पिण्यासाठी भुंगा येतो,रस पिता पिता तल्लीन होतो, तसेच गुरुला जो लुटतो रिकामे करण्यासाठी धडपडतो, स्वतःच्या जीवनाचे भांडे भरतो तो खरा शिष्य! माझे ज्ञान म्हणजे सिंधूत बिंदू आहे असे शिष्याला वाटले पाहिजे. गुरु म्हणजे अनंत ज्ञानाची मूर्ती उचंबळणारा ज्ञानसागर । म्हणूनच ज्ञानेश्वर म्हणतात ' सद्गुरु सारिखा असता पाठीराखा इतरांचा लेखा कोण करी ।' खऱ्या गुरुला ज्ञानाचा वृक्ष वाढत जावा असे वाटते. संयम अन विनय या मौलिक गुणांनी गुरु महान ठरतो. म्हणूनच अशा गुरूंच्या सहवासात आपले गढूळ जीवन निर्मळ होते. गुरूंच्या हाती मूल्यांची परडी असते ती घेऊन तो ज्ञानसुमनांची उधळण आपल्या शिष्यावर करतो. गुरु हा एक कारागीर आहे. पंचेंद्रियांना योग्य तो आकार देऊन त्यांचा विकास करणारा । आकाशात स्वैर उडणाऱ्या पतंगाचा धागा प्रमाणातच बंधनात ठेवून डौलाने उडणाऱ्या पतंगाची झेप पाहण्यासाठी चक्री हातात धरणारा तो गुरु ! ज्ञानरूपाने अमर होतो. जीवन सुंदर कसे करावे? ही कला तो शिकवितो. निर्दोष आणि निष्काम कसे बनावे हे गुरु शिकवतो. गुरु आपल्याला प्रेमाचे डोळे देतो. काम क्रोधाधी व्याघ्रांना कोकरे बनवतो.

गुरु प्रथम आपली परीक्षा बघतात मगच कृपा करतात कारण काही देण्याच्या अगोदर तपासणी होणारच जसजसा मनातील भाव वाढेल तसतसे ते अधिक देतात. ते चिंतामणी असतात पण मागितलेले चुकीचे असेल तर ते न देता योग्य काय आहे तेच देतात. आपल्या मार्गातील अडथळे दूर करतात संकटातून मार्ग दाखवतात येणाऱ्या संकटाची आपल्याला चाहूल ही न लागू देता बाहेरच्या बाहेर नाहीशी करतात. सदगुणी मित्रांशी संपर्क वाढवतात. तुम्हाला त्रास देणाऱ्या लोकांना सोयीस्करपणे दूर करतात. अशा सद्गुरूंच्या दर्शनाने मनाला शांती आणि समाधान मिळते अहंकार गळून पडतो. आचार-विचारात बदल होतो. सद्विचार मनात येऊ लागतात. मन स्थिर होते. सारासार विचार करण्याची कुवत वाढते. निर्णय घेण्याची ताकद वाढते. " तू जा माझे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत, तुझे कार्य तडीस जाईल " अशी गुरूंच्या वाणीत ताकद असते. अशा शब्दांनी सामान्यांना बळ येते.

` जेथे वसंत ऋतू आहे तेथे वने फुलतात. तसेच जेथे गुरु आहे तेथे ज्ञानाचा मळा फुलतो. अशा गुरूंना जाणणे खरोखर अवघड आहे. गुरुचा महिमा वर्णन करणे म्हणजे कापूरास वास देण्यासारखे हास्यास्पद आहे. म्हणून केवळ गुरूंच्या चरणी माथा ठेवून त्यांना मनःपूर्वक नमन करण्याचे योग्य आहे. येथे स्तुतीची बोलणी ही व्यर्थ ठरतात. मग जेव्हा सद्गुरूंचे खरे स्वरूप कळून येईल तेव्हा गुरु आणि देव यात भेद उरणार नाही.

श्री गुरुवे नमः

जय जय रघुवीर समर्थ

## ॥ श्रध्दा ॥

विजय पटवर्धन – बाणेर–पुणे.
मोबा.९४०३४६३४१०

जीवन प्रवास करताना आपल्या गंतव्यास पोहोचेपर्यंत आपल्या वर अनेक शक्तींची,गुरुंची कृपादृष्टी असते. ते अनेकांचे सुरक्षा कवच असते. अनेक अदृश्य शक्तींचे आपल्यावर कृपाछत्र असते. तसेच माझ्यावर व माझ्या सर्व कुटुंबावर ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामींची कृपा दृष्टी आहे.

मी रोज ऑफिसला जायच्या आधी भैरवनाथाचे दर्शनास जात असे. त्याच वेळी मला स्वामींचे दर्शन होत असे. अशा रीतीने रोज दर्शन घेण्याची ओढ लागली. मग रोज बरोबर नेमकी वेळ साधून त्यांचे दर्शन घेऊ लागलो व त्यांच्या बरोबर कालभैरवाष्टक म्हणू लागलो. अशा रीतीने ते पाठ तर झालेच पण आज माझी सौ.,मुलगा,मुली, नातवंडे रोज हे स्तोत्र म्हणतात. यामुळे कितीतरी दृश्य अदृश्य अडथळे संकटे यांचे निवारण होत असे. ही स्वामी कृपा.

स्वामींनी बोलावून एकदा माझे गरोदर पत्नीच्या ओटीत नारळ ठेवला.मला दोन मुलींनंतर मुलगा झाला. ही स्वामी कृपा. दोन महिन्याचा झाल्यावर आम्ही त्याला देव दर्शनाला आणले तेंव्हा स्वामींनी त्याला स्वत:चे मांडीवर घेवून त्याच्या अंगावर वस्त्र घातले व काहीतरी मंत्र म्हटले. आम्हाला खूप खूप आनंद झाला. स्वामींचे कृपेने तो पुढे चांगला हुषार झाला. दहावी बोर्डात आला, शिकला व नोकरीस लागला.


एकदा कांची पीठाचे शंकराचार्य (मोठे) कराडला आले होते. ते स्वत: स्वामींना भेटायला भैरवनाथाचे मंदिरात आले. एके काळी प्रत्यक्ष पंतप्रधानांना भेट नाकारणारे शंकराचार्य आपल्या स्वामींना भेटायला आले आणी पाऊणतास भेट झाली हे विशेष. आपल्या स्वामींची अध्यात्मिक उंची किती उत्तुंग होती हे तेंव्हा सर्वांना समजले.

मी माझे आई वडिलांबरोबर कांचीस गेलो होतो. माझे वडील वेद शास्त्र संप्पन्न असल्याने त्यांनी एक संस्कृत श्लोक म्हटला. त्याबरोबर शंकराचार्यांनी आम्हा तिघांना बाजूला थांबायला सांगितले. सर्वांचे दर्शन होईपर्यंत फार वेळ होणार होता. बाहेरचा रिक्षावाला पण घाई करायला लागला. तेंव्हा आमची चुळबुळ सुरु झाली. तिथला त्यांचा शिष्य म्हणाला अरे पंतप्रधानांना दर्शन न देणारे स्वामी तुम्हाला स्वतः थांबायला सांगताहेत. एव्हढी घाई कसली करताय. मग शंकराचार्य महाराजांनी आम्हाला बोलावलं आमची सर्व चौकशी केली. कराडहून आलोय असं सांगितल्यावर आपल्या स्वामींची चौकशी केली. त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. आम्हाला एक कवठ दिलं आणि उद्या ते फोडून सकाळी घेऊन या म्हणजे पुढे कन्याकुमारीला जायचं की नाही ते सांगतो असं सांगितलं. आम्ही काळजी करू लागलो. सकाळी ते कवठ फोडून घेऊन गेलो तेंव्हा आम्हाला सांगितलं की जाताना समुद्रात दोन्ही बाजूला दोन तुकडे टाकून द्या. तुमचा प्रवास सुखाचा होईल. आम्हा तिघांना प्रसाद दिला आम्ही निघालो. कोणतं तरी अदृश्य येऊ घातलेलं संकट स्वामीकृपेने टळलं. कशामुळे? फक्त आम्ही स्वामींच्या गावचे असल्याचा आम्हाला लाभ झाला.

आजही कराडला आलो की भैरवनाथाचे व स्वामींचे दर्शन न चुकता घेतो. त्याच वेळी ती स्वामीजींच्या प्रदीर्घ वास्तव्याने,मंत्रपठणाने,अनेक ग्रंथांच्या अनेक आवर्तनाने परमपावित्र झालेली स्वामीजींची कुटी ते तुळशी वृंदावन हे सर्व पाहिले की सर्वत्र ईश्वरी चैतन्य भरून राहिल्याची स्पंदने मंदिरात सर्वत्र जाणवल्या शिवाय राहत नाहीत.

स्वामींचे अलौकिक व्यक्तिमत्व, त्यांचे संन्यस्त जीवन, त्यांचे अध्यात्मिक अनुष्ठान, त्यांचे ठायी असलेली अतींद्रिय दैवी शक्ती, निस्सीम वैराग्य, मुखमंडलावर अविचल शांतीची आभा त्यांच्या विश्वात्मक होण्याची साक्ष देतात.

स्वामीजींना साष्टांग दंडवत.





## ।। श्रीगुरूभ्यो नमः ।।

सौरभ औदुंबर कुलकर्णी, कराड

कृष्णा–कोयनेच्या पवित्र संगमतीर्थावर वसलेल्या कऱ्हाडनगरीत भगवान श्रीदत्तात्रेय संध्यावंदनास नित्य येतात. अशा या पवित्र क्षेत्री वास करून अनेक क्षेत्रसंन्यासी, संत–सत्पुरूषांनी या भुमीस अधिकच पावन केले आहे. याच क्षेत्रसंन्यासी परंपरेतील अगदी अलिकडच्या काळातील श्रेष्ठतम् संन्यासी म्हणजेच ''परमहंस परिव्राजकाचार्य धर्मश्रीः श्रीमत् ईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामी '' होत.

श्री स्वामीजींनी या कराल–कलिकालातही शास्त्राचरण व संन्यासधर्माचे आचरण होऊ शकते हे आपल्या स्वतःच्या आचरणातून दाखवून दिले. त्यांचे जीवनचरित्र धार्मिक सज्जनांस (विशेषकरून यतिकुलास) आदर्शवत् राहील असेच होते. श्रृंगेरी जगद्गुरू श्री चंद्रशेखर भारती महास्वामींच्या मार्गदर्शनाखाली कठीण तप करून श्री स्वामीजी ब्रह्म साक्षात्कार संपन्न झाले. आपल्या अजोड गुरुभक्तिने श्री स्वामीजी जगद्गुरू श्री चंद्रशेखर भारती महास्वामींचे जणू बहिश्च प्राणच बनले होते. विशेषकरून त्यांनी अनेक मंत्र सिध्द करून देवतांचा कृपाप्रसाद प्राप्त केला. धर्मशास्त्र, मंत्रशास्त्र, प्रस्थानत्रयी, अनेक भाषांमध्ये पराकोटीचे विद्वान असलेले श्री स्वामीजी कमालीचे प्रसिध्दीपराङ्मुख होते. त्यांचा हा व्रतस्थ जीवनप्रवास संक्षिप्त स्वरुपात समाजासमोर आल्यास धर्मपथावरून वाटचाल करणाऱ्या सज्जनांस निश्चितच प्रेरणादायी ठरेल. या हेतूनेच श्री स्वामींचे कृपापात्र शिष्य श्री. शांताराम श्रीधर कुलकर्णी तथा बाळुकाका यांनी श्री स्वामींचे संक्षिप्त चरित्र लिहिले आहे. ते या भागात समाविष्ट आहे.

आचार्य श्रीमद्गीताभाष्यात '' ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्याद्वैदिको धर्मः'' असे म्हणतात. या वचनास अनुसरून श्रीस्वामींनी संस्कृत भाषेत '' नरजन्मप्रशस्ति । तत् कर्तव्यच । '' हा लेख लिहून मनुष्यजन्माचे सार्थक कशात आहे आणि आत्मकल्याणार्थ मनुष्याने कोणत्या मार्गाने जावे याचा बोध शास्त्राधारे अगदी सहजतेने केला आहे. पण या लेखातील बोध संस्कृत भाषा न जाणणाऱ्यास देखील सहजतेने कळावा म्हणून येथील पं. हरी कृष्ण घळसासी (काव्यतीर्थ, शास्त्री) यांनी या लेखाचे सुलभ मराठी भाषांतर करून आम्हाला उपकृत केले आहे. मूळ लेख व भाषांतर हा या लेखाचा भाग आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे ''श्रृंगेरी–जगद्गुरू श्री श्री भारतीतीर्थ महास्वामींनी ''या ग्रंथास अनुग्रह संदेश (आशीर्वाद) दिल्यानेच ही पुस्तिका आज पूर्णत्वास जात आहे. त्यांच्या चरणी साष्टांग नमस्कार. तसेच शिष्य स्वामी जगद्गुरू शंकराचार्य श्री श्री विधुशेखरभारती महास्वामींच्या चरणी साष्टांग नमस्कार.

विवेक आणि सत्संगति हे नेत्रद्वय बा आहे।
वासुदेवा निर्मल देहें जेणें त्वत्पत्रिं राहें ।।

हेच श्रीस्वामींच्या प्रेरक चरणी मागणे.

**श्री क्षेत्र कराडचे जीवनमुक्त महापुरूष ब्र. प. प. धर्मश्री ईश्वरानन्द सरस्वती तथा काशी स्वामी महाराज सद्गुरू**

ब्राह्म मुहूर्तावर जगन्मातेला पडलेले परमार्थिक स्वप्न म्हणजे ज्ञानस्वरूप अशा सद्गुरू स्वामींचे जीवनचरित्र होय. आपल्या आचरणाने श्री स्वामीजींनी आपला संन्यास आदर्शवत केला. कलियुगात संन्यासाश्रम आचरण अतिशय कठीण पण स्वामींनी आपल्या आचरणाने तो सिध्द केला.

**स्वामींचे बालपण :–**

स्वामीजींचा जन्म चिपळूण जवळील कौंडर नावाच्या छोट्याशा गावात भागवत या चित्पावन कुटुंबात झाला. सत्शील आचार संपन्न असे हे घराणे. १९०० साली ज्येष्ठ शुध्द द्वितीया (दशहार) या शुभदिनी स्वामींचा

जन्म झाला. पहाटेला पाऊस पडत होता म्हणून त्यांचे नाव ' गंगाघर 'असे ठेवले. गंगाधर केशव भागवत असे व्यावहारिक नाव. गंगाधर या नावाप्रमाणेच त्यांचे जीवन शिवस्वरूप होते. घरची आर्थिक परिस्थिती नाजुक त्यामुळे त्यांच्या वडिलांनी त्यांना एका आप्त कुटुंबात शिक्षणासाठी ठेवले. त्यावेळचे त्यांचे शिक्षण बी. ए. पर्यंत झाले. कौंडर ते चिपळूण रोज चालत जाऊन मॅट्रिकची परीक्षा दिली व अशा कठिण परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. त्यांना लहानपणापासूनच व्यवहाराची मुळातच ओढ कमी होती.

एकदा काही कारणामुळे मुंबईस गेले असताना; त्यांची श्री स्वामी सच्चिदानंदसरस्वती या महापुरुषाशी भेट झाली आणि स्वामींचे जीवनच बदलले. संन्यास घेण्याचा विचार येऊ लागला. घरातील लोकांनी त्यास विरोध केला. वडिलांनी श्रीगणपतीची शपथ घातली परंतु वैराग्य, स्वामींना गप्प बसू देईना. वयाच्या २५ व्या वर्षी ''स्वामी ईश्वरानन्द सरस्वती '' या नामाभिधाने ''गंगाधर'' प्रसिध्द झाला. हेच ते काशी स्वामी होत. पुढे श्रीगुरूसेवा, गाईची सेवा करत श्री क्षेत्र काशीत राहिले. स्वामींना ' पाच ग कार ' अत्यंत आदरणीय होते. १. गीता २. गायत्री ३. गंगा ४. गोमाता ५. गोपी (स्त्री) या पाच 'ग ' कारांना त्यांच्या ह्रदयात स्थान होते. श्री स्वामी आपल्या बालपणाबाबत किंवा पूर्वाश्रमाबद्दल बोलत नसत. त्यामुळे विशेष माहिती उपलब्ध नाही.

संन्यास आश्रमानंतर त्यांनी काशीमध्ये असताना गोमातेची खूप सेवा केली. रोज ३० मैल चालत दक्षिण ते उत्तर पूर्ण भारत २ वेळा पदभ्रमण केले.

असेच एकदा श्रृंगेरीत आले तेव्हा पीठाधीश महान योगी ' श्री श्री चंद्रशेखर भारती ' होते. ज्यांना दक्षिणेत WALKING GOD असे म्हणत. त्यांचा अंतरंग सहवास श्री स्वामींना लाभला. अनेक मंत्र, वेदाचे गुह्य स्वामींना श्री जगद्गुरूंकडून लाभले. श्री स्वामींनी श्री जगद्गुरूंची अपार सेवा केली. त्यांच्यावर श्री जगद्गुरूंची विशेष कृपा होती. स्वामींच्यात व जगद्गुरूमध्ये पाहताना खूप साम्य दिसे. श्री स्वामीजी श्रृंगेरी मठात रहात होते तरी भिक्षाही गावातील गृहस्थांकडे मागत. पाऊस असो वा ऊन असो. हा नित्यक्रम होता. पावसातून स्वामी भिक्षेस जात तेव्हा आचार्य वरच्या हॉल मधून पहाताना एकदा म्हणाले, ' स्वामी आंजनेय स्वरूप वाटतात' जगदुरूंचे प्रकृती स्वास्थ्य ठीक नव्हते. त्यांना आराम मिळावा म्हणून अनुष्ठान करण्यासाठी भ्रमण करत करत वाईजवळ कृष्णातीरावरील धोम या गावात आले. तेथे श्रीनृसिहांचे मंदिर आहे. तेथे श्री जगद्गुरूंचे स्वास्थ्य प्राप्तीसाठी अनुष्ठान करत राहिले.

पुढे ते कराडला श्री कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगामावर आले. सोमवार पेठेत ' श्री कालभैरव मंदिर' आहे तेथेच एका छोट्या खोलीत उतरले. नागरिकांनी आपण येथेच रहावे असा आग्रह केल्यावर त्या खोलीत राहिले व येथेच क्षेत्र संन्यास घेतला. आचरणशुध्द तीन घरात भिक्षा, नित्य त्रिकाळ कृष्णामाईचे स्नान असा दिनक्रम. सर्व काळ अनुष्ठान होत असे. त्या खोलीत कोठेच कसलीच सोय नव्हती; परंतु ते स्थान शेवटपर्यंत सोडले नाही. श्री कालभैरावास सोडून कुठेही जाणार नाही असे ते म्हणत.

वैराग्याच्या मुशीत तयार झालेले स्वामीजी कराडवासियांसाठी मोठा आधार होते.

**श्री स्वामींची नित्य दिनचर्या..........................................................................................**

श्री स्वामींची सकाळ पहाटे १ ।। वाजता सुरू व्हायची. प्राणायाम, जप, चिंतन, पहाटे ४ ।। वाजता प्रातः स्नान कृष्णामाईला. पुन्हा जप सकाळी ८ वाजेपर्यंत. नंतर जगन्मातेची पूजा ९ ।। पर्यंत. पुन्हा जप १०। पर्यंत. १० ।। वाजता बाहेर लोकांना दर्शन व नंतर गंगेचे स्नान. साधारणतः ११ ।। नंतर जप, गीतापाठ. १२ वाजेपर्यंत वाचन, १२ ।। वाजता ठराविक तीन घरात भिक्षा मागत असत. शुध्द आचार, शुध्द विचार, श्रध्दावान अशा गृहस्थांच्या घरातच भिक्षा मागितली जायची. देवीला नैवेद्य दाखवून संन्यास आश्रमाच्या नियमाप्रमाणे १२।।। वाजता आहार घेत. नंतर काही वेळ श्रीकालभैरवास प्रदक्षिणा नंतर काही वेळ विश्रांती पुन्हा एकांतात चिंतन, वाचन. ४ ।। वाजता गंगेला स्नान असे त्रिकाळ स्नान होत असे. ५:१० वाजता देवीपाठ व येणाऱ्यांना दर्शन. पुन्हा खोली बंद

पूजा, जप ७.३० पर्यंत. संध्याकाळी लोकांना दर्शन ७.४० पर्यंत. साधारण ८.१५ रात्री दूध प्राशन. ११.३० रात्री देवीची पूजा, ईशचिंतन, रात्री १.३० नंतर पुढचा दिवस सुरू अशी दिनचर्या असे.

**श्री स्वामींच्या सहवासात उत्सव........................................................................................**

श्री स्वामींच्या सहवासात सर्वात मोठा उत्सव होता तो '' श्री व्यासपूजा महोत्सव ''आषाढ शुध्द पौर्णिमा, शास्त्राच्या नियमाचे अखंड आचरण, ठराविक वेळी दर्शन, आचरण शुध्द असलेल्या भक्तांना नित्य सहवास लाभत असे. परंतु याला अपवाद एकच दिवस तो म्हणजे '' श्रीव्यास पौर्णिमा '' हा दिवस. त्यादिवशी श्री स्वामी आपल्या श्रीगुरूंची पूजा व संन्यास आश्रमाच्या नियमात होणारी यथासांग श्री व्यास पूजा. याचवेळी स्वामींचे दर्शनासाठी श्री कराड क्षेत्र व इतर गावाचे भक्त पूजन व दर्शनासाठी येत. एक दिवस मुक्तद्वार. जनतेसाठी दर्शन. त्यामुळे स्वामी खोली बाहेर सर्वांना स्पर्शदर्शन देत. लोकांची, भक्तांची आपुलकीने चौकशी करत. मार्गदर्शन करत. लोकांना हा दिवस म्हणजे वर्षातील मोठी पर्वणी होती. असा हा पहाटेपासून सुरू होणारा भक्तांचा सोहळा रात्री ८ पर्यंत चाले. दुसऱ्या दिवशी उत्तर पूजा होई. यादिवशी स्वामींना विश्रांती म्हणून नसे. भक्ताधीन आम्ही असू हे वाक्य स्वामींच्या आचरणातून दिसायचे.

श्री व्यासपूजेसारखाच महत्त्वाचा आणखी एक सण-उत्सव म्हणजे स्वामीजींचा '' संन्यास दीक्षा ग्रहण दिन '' स्वतःचा जन्मदिवस साजरा करून देत नसत. परंतु भक्त संन्यास दीक्षा ग्रहण तिथी दिन (मार्गशीर्ष शुध्द सप्तमी) हा दिवस साजरा करत. पाद्यपूजा होत असे. वास्तविक यातले त्यांना कोणतेच प्रशस्त वाटत नसे. तरी भक्तांची इच्छा डावलत नसत. कार्तिकी पौर्णिमेला जगदंबेची पूजा पांढऱ्या शेवंतीने बाहेरील अंगणात करत. या व्यतिरिक्त संवत्सरातील मोठे सणादिवशी पाद्यपूजा होत असे.

**स्वामींची शिकवण.**

१) स्वामींचा आग्रह होता की, ब्राह्मणांनी नित्य संध्यावंदन त्रिकाळ योग्य वेळी करावे.
२) शास्त्राच्या नियमाने वागावे,
३) गीता रोज म्हणावी.
४) आचार हिनं न पुनन्ति वेदाः ।
५) गरीबांना मदत करावी.
६) अन्नदान विद्यादान जरूर करावे.
७) गोमातेची सेवा करावी. आई, वडील, गुरू यांची आज्ञा शिरसावंद्य मानावी.
८) जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।
९) वासुदेवः सर्वमिती स महात्मा सुदुर्लभा ।। गीता अ. ७, श्लोक १९.
१०) वेळेच्या मर्यादा पाळाव्या. प्रत्येक क्षण ईश्वरी सेवेत रहावे.
११) आपण समाजाचे देणे लागतो याचे भान ठेवावे.
१२) शास्त्र म्हणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें।
जें घेववी तें न म्हणावें । विषही विरूध्द ।। ज्ञानेश्वरी अ, १६. ओवी ४६०.
१३) सर्वांसी आदराने वागावे.
१४) नित्य थोडे तरी वाचन करावे.

**श्री स्वामीजींची अनन्य श्रध्दा.........................................................................................**

सनातन हिंदू धर्म, आदि शंकराचार्य व त्यांचे तत्वज्ञान वाङ्मय, श्रृंगेरी मठ व जगद्गुरू परंपरा यांच्यावर श्री स्वामींची अनन्यश्रध्दा होती. श्रृंगेरी मठावर अनन्य प्रेम होते. आजपर्यंतच्या जगद्गुरूंच्यावर अंतःकरणात प्रेम होते. ''श्री श्री जगद्गुरू चंद्रशेखरभारती ''त्यांचा आत्मा होता. त्यांची विद्वत्ता, मनाचा सरळपणा याची त्यांचे मनात

आत्यंतिक ओढ होती. आजची जनतेची रहाटणी पाहून त्यांचे मनाला वेदना होत. आजच्या ब्राह्मणांचा आचार बघून त्यांना अतिशय खेद होत असे. संन्यास घेणे व तो टिकवणे खूप कठीण आहे. कारण शुध्द आचार, विचार, उच्चार दुर्मिळ होत चालला आहे. आज जर श्री टेंबे स्वामी (वासुदेवानंद सरस्वती) असते तर त्यांच्या आचरणाला हा समाज अपुरा पडला असता असे म्हणत. सर्वत्र पैसा हेच ध्येय झाले आहे याच्या त्यांना वेदना होत. धर्म हा धंदा झाला आहे असे वाटे. पोटासाठी भिक्षा नसून संन्यास आश्रमासाठी भिक्षा आहे. असे देखील ते म्हणत.

**दयाघन श्रीस्वामीजी..........................................................................................**

कोणाचेही दुःख स्वामींना पाहवत नसे. एका भगिनीला भूतबाधा झाली होती. चुलीवरच्या तव्यावर (तापलेल्या) हात तसाच राही व खूप वेदना होत. झोप येत नसे. व्यवहार नीट करता येत नसे. बाधेमुळे जेवण जात नसे. संपूर्ण जीवन उध्वस्त झाले होते. स्वामींना भेटावयास आलेल्या त्या महिलेच्या पिशाच्चाला आपल्या तपाने मुक्ती दिली. नंतर ती सामान्य जीवन जगू लागली.

एका तरूण मुलीला अशीच बाधा झाली होती. तिची मुले त्यामुळे जगत नसत. त्या भुताला सोडवण्यासाठी स्वामींनी अनेक वेळा प्रयत्न केला. ते म्हणायचे मी राघवेंद्र स्वामींचा गेल्या जन्मी भक्त होतो. मला मंत्रालयास मुक्ती द्या. स्वामींनी सांगितले की इथेच तुला त्या बाईला सोडावे लागेल. कमंडलूने कृष्णाबाईचे पात्रात स्नान घातल्यावर त्या मुलीस मोकळे केले. अनेक भक्तांची दुःखे दूर करून त्यांना सामान्य जीवन बहाल केले; असे परम दयाळू श्री स्वामीजी होते.

**श्री स्वामींचा गौरव..........................................................................................**

श्री क्षेत्र काशी विद्वत सभेने श्री स्वामींचे ज्ञान, वैराग्य, आचार, विचार यांचा सत्कार करून त्यांना ''धर्मश्री:'' ही पदवी देवून त्यांचा गौरव केला. परंतु त्यांना याचे काही विशेष वाटले नाही किंवा ती पदवी आपल्या नामापुढे कधीही वापरलेली नाही. असे प्रसिध्दी पराङ्मुख स्वामीजी होते. एक कौपिन याशिवाय त्यांना कशाचीच गरज वाटत नसे. समारंभ प्रसंगी छाटी वापरत असत. अन्यथा कौपिन हेच वस्त्र असे. स्वामींना संस्कृत, कन्नड, इंग्रजी, हिंदी, मराठी (मातृभाषा) उत्तमरित्या अवगत होत्या. परंतु त्यांचा विशेष अभ्यास संस्कृत भाषेचा होता.

कराडनगरीतील अनेक मंदिरांचा कलशारोहण समारंभ श्री स्वामीजींच्या हस्ते झाला. चाफळ येथील श्रीराम मंदिराचा तसेच बनारस येथील जगन्माता श्री अन्नपूर्णेच्या मंदिराचा कलशारोहण समारंभ श्री स्वामीजींच्या हस्ते संपन्न झाला.

'' तस्मात् शास्त्र प्रमाणं ते । '' यावर असीम श्रध्दा, सद्गुरूंवर गाढ श्रध्दा, जगन्मातेची सेवा हा त्यांचा ध्यास असे. श्री स्वामीजी यांचे दर्शन होणे हे देवदुर्लभच. आपले सर्व जीवन श्री स्वामीचरणी वहाणाऱ्या योगिनींनी आपले जन्म कृतार्थ केलेत.

मार्गशीर्ष शुध्द सप्तमी या दिवशी संन्यासाश्रमाचा वाढदिवस. श्री स्वामी सकाळपासून सर्वांना आशीर्वाद देत होते. थंडीचे दिवस, श्री स्वामींना किंचित ताप होता. संध्याकाळ झाली. श्री स्वामी उत्तरामुख बसलेले आपल्या गुरूंकडे पहात देहातीत झाले. जगदंबेचरणी लीन झाले. ही वेळ संध्याकाळची ७.४०, मार्गशीर्ष शुध्द अष्टमी, सोमवार, दि. २०-१२-१९९३. स्वामीजी ब्रह्मलीन झाले. आज स्वामी समाधी मंदिरात आहेत. तसेच भक्तांच्या हृदयात आहेत. जाणे येणे हे सामान्यांसाठी. श्री स्वामीजी आजही सश्रध्द भक्तांस दर्शन देतात. अशा या महापुरूषाचे चरणी कोटी कोटी प्रणाम !

प. पू. धर्मश्री : श्रीमत् ईश्वरानन्द सरस्वतीजी यांना अखंड दण्डवत !

## ।। नरजन्मप्रशस्ति : । तत् कर्तव्यंच ।।

लेखक – प. प. धर्मश्री : श्री ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी, कराड

यदालंबो दरं हन्ति सतां प्रत्यूह संभवम् । तदालंबे दयालंब लंबोदरपदांबुजम् ।। नमामियामिनीनाथलेखालंकृतकुंतलाम् । भवानीं भवसंतापनिर्वापण सुधानिधिम् ।। कारूण्यसारसांद्राः कांक्षितवरदान कल्पकविशेषाः । श्रीगुरूचरणकटाक्षाः शिशिराः शमयंति चित्तसंतापम् काक्षित अखंडं सच्चिदानंद मवाङ्मनस गोचरम् । आत्मानमखिलाधारमाश्रयेऽभीष्ट सिद्धये ।। यो ब्रह्माणं विदधाति पूर्व यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै । तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षवैंशरण महं प्रपद्ये ।। धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा । धर्मेण हि सहायेन तमस्तरति दुस्तरम् । जातिशतेन लभते भुवि मानुषत्वं तत्रापि दुर्लभतरं खलु भो द्विजत्वं । यस्तन्नपालयति लालयतींद्रियाणि तस्यामृतं क्षरति हस्तगतं प्रमादात् ।। ब्राह्मणस्यहि देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते । कृच्छ्राय तपसेचेह प्रेत्यानंतसुखायच ।। उत्पत्तिरेव विप्रस्य मुर्तिर्धर्मस्य शास्वती। सहि धर्मार्थ मुत्पन्नो ब्रह्मभूयाय कल्पते ।। जन्मानेक शतैः सदादरयुजा भक्त्या समाराधितः । भक्तैर्वैदिक लक्षणेन विधिना संतुष्ट ईशः स्वयम् ।। साक्षाच्छीगुरूरूपमेत्य कृपया दृग्गौचरः सन् विभुः । तत्वं साधु विबोध्य मोचयति तान् संसारकारा गृहात् ।। महता पुण्यपण्येन क्रीतेयं कायनौस्त्वया । पारं दुःखोदधेर्गंतुं तर यावन्नभिद्यते ।। लब्ध्वासुदुर्लभमिदं बहुसंभवांते मानुष्यमर्थदमनित्यमपीधीरः । तूर्ण यतेत नपतेद नुमृत्यु यावन्निश्रेयसाय विषयः खलु सर्वतः स्यात् ।। नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवंसुकल्पं गुरूकर्ण धारम् । मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ।। लब्ध्वा कथंचिन्नरजन्मदुर्लभं तत्रापि पुंस्त्वं श्रुतिपारदर्शनं । यस्त्वात्ममुक्तौ न यतेत मूढधीः सहयात्महास्वं विनिहन्त्यसद् ग्रहात् ।। खादते मोदते नित्यं शुनकः सूकरः खरः । तेषामेषां विशेषः को वृत्तिर्येषां तु तैःसमा ।। एतादृशैरन्यैश्च बहुभिर्वाक्यैः परमदयालुभिर्जगतीमवितुं कलिता कृतिभिर्संतैर्नरजन्मप्रशस्ति स्तत्कर्तव्यं । तत्र मार्गश्च अस्मदुद्धारार्थं बहुधा दर्शितोऽस्ति । अथापि किं कृतार्थता समपादि । किं मनोवेगः खंडितः । किं यावच्छक्यंतदुक्तमार्गोऽन्वसारि । सर्वदा कुपितफणिपतिफणा छाया सच्छायान् विषयान् सुखकरान्भावयन्त । श्रुत भगवद्वाक्यदुर्योधनकक्ष्यामध्यरूक्षाम । एवमेव यदिवयं विशृंखलं वर्तामहे कथं बंध निवृत्तिः । कथं वा नित्यानंदावाप्तिरस्माकं । किमर्थं वा मानुषं जन्म इदानीं संपिपादयिष्यमाणस्य सुखस्य तात्कालिक दुःख निवृत्तेश्च पश्वादिसाधारण्यात् । यदि एते एवास्मकमपि प्रयोजने तदापश्वाद्यपेक्षया विशेषो न स्यात् । उक्तंच आहार निद्रा भय मैथुनं सामान्य मेतत्पशुभिनराणां । धर्मोहि तेषामधिको विशेषो धर्मेण हीना पशुभिःसमानः ।। इति प्राणिषु मनुष्या : श्रेष्ठत्वेन परिगणिताः। भूतानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः ।। बुद्धिमत्सुनराः श्रेष्ठा नरेषु ब्राह्मणाः स्मृताः । ब्राह्मणेषुच विद्वांसो विद्वत्सु कृतनिश्चयाः तत्र पशु साधारण सुख दुःख निवृत्ति मात्रभावत्वे उक्तं श्रेष्ठचं कथमुपपद्येत । बुध्याजीवनस्य उभयता विशिष्टवात् अतः धर्म एव श्रेष्ठत्वे कारणम् तस्मात्धर्मार्थमेव ब्राह्मणस्य उत्पतिः । अतः शास्त्रमधीत्य, तदर्थपरिज्ञाय शास्त्रविहितं विधाय, शास्त्रनिषिद्धं दूरीकृत्य, चित्तं शोधयित्वा, गुरूं प्रतिगत्वा, तं प्रणिपत्य सेवया संतोष्य आत्मज्ञानार्थं प्रश्नंकृत्वा, श्रुत्वात्मानं मत्वा, निदिध्यास्य आत्मानं साक्षात्कृत्य, सर्वं दुःख निवृत्तिपूर्वक नित्य निरतिशय आनंदावाप्त्या, नरजन्म साफल्यं कर्तव्यम् सर्वैः । अयमेव सर्व शास्त्राभिप्रायः ।

यावत्स्वस्थमिदं शरीरमरूजं यावज्जरा दूरतो। यावच्चेंद्रिय शक्तिरप्रतिहता यावत्क्षयो नायुषः ।।
आत्मश्रेयसि तावदेव विदुषा कार्यः प्रयत्नोमहान् । संदीप्ते गहनेतु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः ।।

## मनुष्यजन्माची प्रशंसा आणि त्यासंबंधीत कर्तव्य

लेखक- प. प. धर्मश्रीः सद्गुरू श्री ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी महाराज

ज्याचा आधार, विघ्नांमुळे उत्पन्न झालेला सज्जनांचा गर्व नष्ट करतो त्या दयेचा आधार असणाऱ्या गणपतीच्या चरण कमलांचा मी आश्रय करतो.

चंद्रकलेने जिच्या मस्तकी केश सुशोभीत केलेले आहेत, भवसागरातील दुःख नष्ट करण्यास अमृतसाठा असणाऱ्या (अमृतसरीता असणाऱ्या) भवानी मातेला मी नमस्कार करतो.

कारूण्यरसाने परिपूर्ण असणारे इच्छित वर प्रदान करण्यामध्ये वैशिष्ट्य पूर्ण कल्पवृक्ष असणारे अत्यंत शीतल असे गुरूचरण कटाक्ष, मनाचा संताप शांत करतात.

अखंड अशा, वाणी, मन यांना अगोचर असणाऱ्या सच्चिदानंद अशा सर्व विश्वाचा आधार असणाऱ्या आत्मतत्त्वाचा मी इष्ट लाभासाठी आश्रय करतो.

जो ब्रह्माला प्रथम निर्माण करतो आणि जो त्याच्याकडे वेद अर्पण करतो त्या आत्मबुद्धीने प्रकाशित होणाऱ्या देवाला मोक्षाची इच्छा करणारा मी शरण जातो.

विश्वामधील जे जगत् आहे, जे चर आहे त्याची प्रतिष्ठा धर्म आहे.

धर्माच्या मदतीने पार करण्यास अशक्य असा अज्ञानरूप अंधःकार पार करता येतो. (ब्रह्मप्राप्ती करता येते.)

शंभर जन्मानंतर मनुष्य योनीमध्ये जन्म लाभतो. त्यातही ब्राह्मण जन्म लाभणे महाकर्मकठिण, जो त्या ब्राह्मण धर्माचे पालन करत नाही. इन्द्रियांचे लाड करतो त्याच्या हातात प्राप्त झालेले अमृत त्याच्या चुकीमुळे गळून जाते.

ब्राह्मणाचा हा देह क्षुद्रकार्यासाठी वाया घालवायचा नाही. तर कृच्छासाठी (१२ दिवसांचे प्रायश्चित) आणि तपश्चर्येने येथे (इहलोकी) व नंतरही सुखप्राप्त करण्यासाठी असते. (मोक्षप्राप्तीसाठी ब्राह्मण देह आहे.)

ब्राह्मणाची उत्पत्ती हीच साक्षात् चिरन्तर धर्ममूर्ती आहे. धर्मासाठी उत्पन्न झालेला तोच ब्रह्मत्व मिळवण्यास समर्थ आहे.

शेकडो जन्म भक्तांनी अत्यंत आदरयुक्त भक्तीने वैदिकविधीने आराधना केलेला सन्तुष्ट असा परमेश्वर साक्षात् गुरूपदाला प्राप्त होऊन दृग्गोचर झालेला समर्थ असा तो भक्तांना उत्तम बोध करून संसाररूपी कारागृहातून मुक्त करतो.

महान अशा पुण्याने तू ही शरीररूपी नौका (संसार) दुःखसागर पार करण्यासाठी खरेदी केली आहेस (तेव्हा) जोपर्यंत ती फुटत नाही तोपर्यंत तू (संसारसागर) तरून जा.

अनेक जन्मानन्तर हा मनुष्य जन्म प्राप्त करून जन्म, अर्थ, मदादींचे अनित्यत्व लक्षात घेऊन धैर्यवान माणसाने जोवर मृत्यु प्राप्त होत नाही तोवरच लवकर निःश्रेयसप्राप्तीसाठी (मोक्षप्राप्तीसाठी) मनुष्यजन्मी प्रयत्न करावा. विषय सर्वत्र आहेतच.

अत्यंत दुर्लभ असा नरदेह प्राप्त करून प्रथम समर्थ अशी नाव, गुरू हा कर्णधार, मला अनुकूल असणाऱ्या वाऱ्याने प्रेरित असा मानव जर भवसागर पार करणार नाही तर तो आत्मघात आहे.

अत्यंत दुर्लभ असा नरदेह प्राप्त करून, त्यातही पुरूषदेह आणि श्रुतिशास्त्र पारंगतता; पण जो जडधी

माणूस आत्ममुक्तीकडे तो देह नेणार नसेल तर असद्ग्रहामुळे तो श्रेष्ठ असे आत्मज्ञान नष्ट करेल.

कुत्रा, डुक्कर, गाढव खातात आणि आनन्दित होतात. त्यांच्यामध्ये आणि आत्मज्ञानापासून दूर असणाऱ्यांमध्ये फरक काय? अशांची वृत्ती (वागणूक) ही त्यांच्या (पशूंच्या) प्रमाणे आहे.

– अशा प्रकारच्या आणि इतर बोधवाक्यांनी व योग्य कृतींनी अत्यंत दयाळू अशा संतांनी जगाच्या उद्धारासाठी (रक्षणासाठी) नरजन्माची प्रशंसा आणि सत्कर्तव्ये सांगितली आहेत आणि तेथे बहुतेक ठिकाणी आमच्या उद्धरण्यासाठी मार्ग देखील दाखवला आहे. तरीसुद्धा (आम्ही) कृतार्थता संपादन केली का? आमचा मनोवेग खण्डित केला का ? जेवढे शक्य आहे तेवढा त्यांनी सांगितलेला मार्ग अनुसरला का? सर्वदा रागावलेल्या नागेंन्द्राच्या फण्याच्या छायेप्रमाणे छाया असणाऱ्या विषयसुखांचा विचार करतो. भगवद्वाक्य ऐकलेले आम्ही दुर्योधन मंदिरात प्रवेश करत आहोत. अशाच प्रकारे आम्ही जर उच्छृंखल वागलो तर बन्धमोक्ष कोठून प्राप्त होणार ! किंवा नित्यानन्दाची प्राप्ती आम्हाला कोठून होणार. मनुष्य जन्माचा तरी काय उपयोग. प्राप्त होणाऱ्या सुखाच्या तत्कालिक दुःखनिवृत्तिचा पशू इत्यादींच्याप्रमाणे सामान्य असणाऱ्याचा काय उपयोग. जर हीच आमची प्रयोजने असतील तर आमच्यात पशुंपेक्षा वेगळा विशेष तो कोणता?

म्हटलेच आहे. आहार, निद्रा, भीती, मैथुन या गोष्टी पशू व मानव यांच्यात समानच आहेत. मानवांमध्ये धर्म आहे. हाच त्यांचा विशेष म्हणून धर्महीन असणारे पशूसमान आहेत.

बुद्धी असणाऱ्यांमध्ये माणूस श्रेष्ठ, माणसांमध्ये ब्राह्मण श्रेष्ठ, ब्राह्मणांमध्ये विद्वान ब्राह्मण श्रेष्ठ, विद्वानांमध्ये देखील निश्चयी असणारे श्रेष्ठ ! (मोक्षप्राप्तिनिश्चयी).

त्यामध्ये साधारण सुख-दुःखाची निवृत्ति हाच केवळ भाव असणाऱ्यांमध्ये श्रेष्ठत्व कसे प्राप्त होईल बुद्धीमुळे जीवनाच्या उभयपक्षी वैशिष्ट्यामुळे धर्मच श्रेष्ठत्वास कारण आहे. म्हणून ब्राह्मणाची उत्पत्ती ही धर्मासाठीच आहे. म्हणून शास्त्र शिकून त्याचा अर्थ समजून, शास्त्राधारे वागून. शास्त्राने निषिद्ध मानलेले दूर करून, चित्त शुद्ध करून, आत्मज्ञानासाठी त्यांना प्रश्न विचारून ऐकून स्वतःला जाणून, सतत चिंतन करून स्वतःला समजून, सर्व दुःख निवृत्तिपूर्वक नित्य निरतिशय आनंद प्राप्तीने सर्वांनी मनुष्य जन्माचे सार्थक करावे. हाच सर्वशास्त्रांचा अभिप्राय आहे.

जोपर्यंत हे शरीर स्वस्थ आहे. रोगरहित आहे. म्हातारपण दूर आहे. जोपर्यंत सर्व इन्द्रियांची शक्ती व्यवस्थित आहे. जोवर आयुष्य क्षय नाही. तोपर्यंतच विद्वानाने आत्मकल्याणासाठी महान प्रयत्न करावा. घर पेटल्यावर विहिर खणण्याचा उद्योग काय कामाचा !



## ।। गुरुभक्ती ।।

धनंजय काशीनाथ कुलकर्णी, पुणे

- गुरुभक्ती संकल्पना पाहण्याअगोदर प्रेम शब्द संसारात कोणत्या अर्थाने वापरला जातो हे पाहू.
  संसारात तस पाहिलं तर प्रत्येकजण प्रेम करत आहे पण ते प्रेम कशावर आहे तर ते,व्यक्ती,नातेसंबंध,भौतिक सत्ता, वस्तू,अवस्था, ज्ञान,रूप,रंग आकार आदी वर आहे. म्हणजेच हे प्रेम पंचभौतिक शरीर व त्यापासून निर्मित शक्ती स्वरूप यावरच केंद्रित झालेले आहे असे दिसून येते. वरील प्रेम सुख-समाधान देणाऱ्या रिश्ते-नाते व उच्च सत्ताधीश वा रंग- रूप,कला, धारण व्यक्तिमत्वावर दिसून येते.
- तथापि हे प्रेम द्वैतावर आधारित अशुद्ध प्रेम होय,असेच म्हणावे लागेल.
- भक्ती- हा शब्द उच्चारताच आपल्यापुढे भक्ती करण्याची एकच अवस्था समोर येते, ती म्हणजे ईश्वर.
- आता ईश्वराविषयी अनेक मान्यता लहानपणापासून आमच्या मनावर रुजल्या आहेत,जसे की ईश्वर आकाशात असेल, मंदिर, चर्च, मस्जिद, गुरुद्वार, समाधी स्थळ, मूर्ती,आदी मध्ये आहे.
- या ठिकाणी असलेल्या ईश्वराला केवळ सुख-समाधानासाठी प्रसन्न करून घेण्यासाठी आम्ही ईश्वराची भक्ती करणारे भक्त आहोत,असे म्हणावे लागते.
- यामध्ये अनेकविध मान्यताप्राप्त ईश्वर स्वरूपानुसार अनेक धर्म,पंथ,रूढी हीच भक्तीची माध्यमे मानून आचरण करणारी मंडळी बहुतांश दिसून येतात.
- वरील सर्व करण्यामध्ये आमचा हेतू काहीतरी मिळवण्याचा वा प्राप्तीचा असतो,हे निश्चितच म्हणावे लागेल.
- आता गुरुभक्ती या संकल्पनेत देखील अनेक मान्यता आढळून येतात.जसे की आई-वडील पहिले गुरू,नंतर व्यावसायिक ज्ञान देणारे,कलाविषयक,धार्मिक आचरण शिकवणारे, भौतिक चमत्कार करून दाखवणारे,भूत-भविष्य सांगणारे,तंत्र-मन्त्र दीक्षा देणारे असे अनेक गुरू व त्यांची भक्ती करणारे अगणित भक्त दिसून येतात,पण ही सुद्धा खरी गुरुभक्ती नाही असे म्हणावे लागेल.
- आता मुख्य विषय गुरुभक्ती म्हणजे नेमके काय ?
- तर जे गुरू आमच्या सत्य अस्तित्वाची जाणीव वा आत्मबोध, म्हणजेच आपण भौतिक शरीर व मन नसून चैतन्य- जागृती/आपल्या होण्याचा जीवित एहसास म्हणजेच ईश्वरस्वरूप आहोत हा स्व-बोध देतात ते सद्गुरू होत.
- तसेच शरीर गुरू नसून शुद्धबोध हीच गुरू अवस्था होय,म्हणजेच गुरू ही अंतर शुद्धबोध अवस्था आहे.
- यामध्ये ईश्वरापासून केवळ गलत वा चुकीच्या बोधामुळे अलग झालेल्या मी च्या स्वरूपाचा बोध देणारे गुरू व अशा दिव्य,शुद्ध भक्तीस गुरुभक्ती म्हणणे रास्त आहे.
- यामध्ये हे गुरू आपणास ईश्वरीय अवस्थेत स्थित करून आपणास ही हे गुरुपद बहाल करतात ,जेणेकरून गुरू-भक्त-ईश्वर अलग न राहता एकच होऊन जातात.
- या अवस्थेत सर्वांभूती ईश्वर बघण्याची दिव्यदृष्टी प्रदान होऊन चराचरात केवळ ईश्वरच असल्याची जाणीव प्रगल्भ व शुद्ध होते.
- यामध्ये अंतिम मृत्यू ची भीती गायब होऊन,स्वर्ग-नर्क, सुख-दुःख,पाप-पुण्य,चांगले-वाईट,भूत-भविष्य..आदी दुविधा वा द्वैतरुपी सर्व मान्यतारुपी अज्ञान एका क्षणात गळून पडते व एकम भावात स्थापना होते.
- या अवस्थेत- शिव-शक्ती
  एकरूप होऊन अंतर-बाह्य अवस्था एकाच्याच आहेत हा बोध जागृत होतो.
  गुरुभक्ती खरतर शब्दातीत व अवर्णनीय आहे,तथापि गुरुकृपेनेच हा शब्दबद्ध करण्याचा अल्प प्रयास गुरुचरणी समर्पित.
- अशा शुद्ध गुरुभक्तीस त्रिवार नमन.

# ।। संत संगती ।।

प्रवीण वेदपाठक, कराड.

शतकाशतकातून असा एखादा जन्माला येतो कोटी जन्माची पुण्य संपत्ती गाढी असेल आणि खास ईश्वराचा अनुग्रह असेल तरच एखादा संत जन्माला येतो व तो जेथे जन्माला येतो ते कुळ व देश पावन व धान्य होतो. प. प. काशी स्वामी असेच एक संत रत्न. त्यांच्या संन्यास दीक्षा शताब्दी निमित्ताने व ज्ञानेश्वर माऊली प्रकट दिनास ७५० वर्षे पूर्ण होत आहेत या अमृतयोगाच्या निमित्ताने संत महिमा सांगायला विशेष आनंद वाटतो.

ज्ञानेश्वर माऊलींच्या वेळेला ईश्वरनिष्ठांची मांदिआळी जमली होती असा संत भेटणे व त्याचा सहवास लाभणे कठीण गोष्ट आहे. सर्वसामान्य माणूस संतांकडे प्रापंचिक इच्छेने जात असतो संत त्याची इच्छा पुरी करण्यापेक्षा ती नाहीशी कशी होईल याचा प्रयत्न करतात. प्रापंचिक भावनांनी भरलेल्या मनातून इतर विचार काढून त्यात भगवंताचे नामाचे बी पेरून प्रेमाचे पीक काढण्याचे काम संत करीत असतात. संतांना जो शरण गेला तोच संत होतो व लोकांच्या उपयोगी पडतो म्हणून समर्थांनी म्हटले आहे

'' अरे या संतांचा महिमा । बोलावया नाही सीमा । जयाचे नि जगदात्मा अंतराचे होय ।। ''

खरंतर दुःखी मनुष्य सुखी व्हावा अशी आंतरिक तळमळ संत सज्जन सद्गुरुंना आसते. सूर्योदय झाला की अंधारामध्ये गुरफटलेल्या वाटा स्पष्ट दिसू लागतात. जीवन प्रवास करणाऱ्या माणसाला योग्य दिशेने वाटचाल करता यावी यासाठी सद्गुरू प्रयत्नशील असतात. या जीवन प्रवासात जेव्हा संत सज्जन सद्गुरूंची भेट होते त्यांचा सहवास लाभतो. त्यांच्याशी बोलावयास मिळते त्यांच्या सत्संगा ने माणूस निर्भय बनतो संतांच्या सहवासात स्वधर्म जागा होतो. आपल्या सद्गुरूंच्या बुद्धी मधून निघालेल्या प्रकाशामुळे भक्तांची अंत:करणे उजळून निघतात. यासाठी सर्वांनी गुरुभक्ती केली पाहिजे. संतवाणीतून उमटणाऱ्या अमृतबोलाचे सेवन करून जीवन कृतार्थ करून घेतले पाहिजे. ज्याला सत्संग प्राप्त होतो तो या भवसागरातून तरुन जातो. गुरुप्रसाद मिळाल्यावर परमपदाची प्राप्ती होते प्रत्येक जीवाचा उत्कर्ष सत्संगामुळे होत असतो. तो जीव सात्विक व धार्मिक बनतो. ज्याप्रमाणे मुंगी गुलाबाच्या संगतीने देवाच्या डोक्यावर चढून जाते त्याप्रमाणे माणूस ही महात्म्याच्या उत्तम संगतीने ब्रह्म स्वरूप होतो. आपणाला जीवनाच्या मार्गावरून मार्गक्रमण करीत असताना सद्गुरु उपदेश देऊन जागृत करतात. शिवस्वरूप बनवतात. गुरूकृपा लाभली की जीवन शुद्ध होतेच. जीवनाचे सार्थक होते. माणसांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाल्याशिवाय कार्य सिद्धी होत नाही यासाठी सत्कर्माचे आचरण अव्यहातपणे चालू राहिले पाहिजे

अध्यात्म म्हणजे काय चांगले बोलणे चांगले वागणे, चांगले ऐकणे हे पवित्र आहे त्याला जे पवित्र आहे. त्याला स्पर्श करणे म्हणजे अध्यात्म. देवाचं नाव घेण्याइतक ते सोपं आहे आणि हे सर्व घडण्यासाठी सत्संगती लाभली पाहिजे. यासाठी सद्गुरूची नितांत आवश्यकता आहे संत जनाची सोबत मिळाली की आपल्या जीवनाची वाटचाल योग्य दिशेने चालू राहते तुकाराम महाराजांनी म्हटले आहे

काय वर्णु मी या संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ।।

जीवन कसे जगावे याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे संत. आज समाजामध्ये जी माणुसकी चांगुलपणा पावित्र्य प्रेमभाव शिल्लक आहे तो केवळ संतामुळेच. समर्थांनी सद्गुरु चे वर्णन करताना आपले गुरु श्रीरामचंद्र यांच्या नावाचा कुठेही उल्लेख केलेला नाही. सद्गुरु चे वर्णन करताना सगुणाशी थोडी सुद्धा तडजोड केली जाणार नाही सूर्य,नदी, समुद्र, परिस, मेरूपर्वत,आकाश, वसुंधरा, पाणी, अमृत, कल्पतरू, चिंतामणी, कामधेनू, अशा विविध उपमा देऊन पाहिल्या पण या सर्व उपमापेक्षा सद्गुरु महान आहेत या सर्व उपमा नाश पावणाऱ्या आहेत. सद्गुरु हे परमतत्व निराकार अविनाशी आहे. परमेश्वरी ईच्छेशिवाय काहीच घडत नाही त्या दयाघनाची कृपा हवी. प्रसन्नता म्हणजे परमेश्वर आणि त्यासाठी गुरु पूजा अनिवार्य आहे. जीवन विकासासाठी आत्मिक बळ हवे, हे बळ आपल्याला सद्गुरु देत असतात.

राम कृष्ण हरी

# ।। कराड मधील यवन टांगेवाल्याला आलेला अनुभव ।।

शब्दांकन – श्रीकांत जोशी

मागच्या आठवड्यात घाटावर स्वामी समाधी मंदिराचे रंगकाम चालू असताना एक यवन म्हातारा माझ्याजवळ येऊन बसला आणि म्हणाला काय चाललं आहे. का कुणाची समाधी आहे आणि मला आश्चर्य वाटलं की हा माणूस एवढा आपुलकीने का चौकशी करतोय परंतु त्याला जेव्हा मी सांगितलं की काशीस्वामी ची ही समाधी आहे. तो म्हणाला भैरोबा मंदिरातले ! आणि त्याच्या चेहऱ्यावर आनंद आणि विषाद दोन्ही एकाच वेळेला प्रकट झाले.

मला सुद्धा आश्चर्य वाटलं मी म्हटलं काय झालं तो म्हणे ‘‘ मी आंबेकरी पुर्वाश्रमीचा टांगेवाला, स्वामींची माझ्या कुटुंबावर केवढी कृपा झाली म्हणून तुम्हाला सांगू ! माझा अनुभव आहे ऐकाल तर तुम्ही वेडे व्हाल ‘‘ आणि तो सांगू लागला. मी अत्यंत गरीब टांगेवाला एकावेळी एका दिवशी सकाळच्या वेळेला मी घाटावर असाच त्या पिंपळाच्या पारावर बसलो होतो. तिकडून स्वामी चालत चालत आले. त्यांच्या हातात द्रोण होता आणि द्रोणामध्ये प्रसाद होता त्यांनी मला हाक मारली आणि तो द्रोण माझ्या हातात सोपविला. जा म्हणे हा घरी जाऊन खा. मी त्यानंतर आपल्या वर्दीसाठी स्टॅंड वर गेलो आणि तिथे भूक लागली म्हणून तो प्रसाद खाल्ला आणि मला एक वेगळीच अनुभूती आली.

मग मी त्यांच्या दर्शनासाठी भैरव मंदिरात गेलो तिथून दर्शन घेऊन घरी गेलो. घरी गेल्या गेल्या पत्नीने एक बातमी सांगितली की ज्या बातमीची आम्ही गेले दीड वर्ष वाट पाहत होतो. माझे लेकीचे लग्न जमत नव्हते आणि त्या दिवशी एक स्थळ चालून आले होते. मला पण तो योगायोग विलक्षण वाटला मी सकाळी उठून लगेच स्वामींच्या दर्शनाला गेलो आणि त्यांना सांगितले की , असे लेकीसाठी एक स्थळ आलेले आहे आणि तिकडे जायचे आहे तर स्वामींनी मला सांगितले अकरा वाजल्यानंतर निघ ! त्याप्रमाणे मी अकरा वाजल्यानंतर ते स्थळ पहायला त्या गावाला गेलो. त्या गावी त्यांच्या घरी गेल्यावर मला काही सुचेना. भले मोठे घर दारात दोन ट्रॅक्टर दहा–वीस जनावरे असलं भलं मोठं स्थळ मला कसं पेलणार मी आपलं चला आलोय तर भेटून जाऊ म्हणून गेलो आत बसलो, बोललो आणि घरी आलो. घरी आल्यावर पत्नीला म्हटलं की हे काय आपल्याला झेपणार नाही. दुसऱ्या दिवशी त्यांचा परत निरोप काय झाले. " आम्हाला मुलगी पसंत आहे आमची काहीही अपेक्षा नाही आम्हाला फक्त मुलगी द्या " मला तर काही सुचेना. एवढ्या मोठ्या घरात आपण आपली मुलगी कशी काय द्यायची ? पुन्हा स्वामींकडे गेलो " स्वामी म्हटले काही हरकत नाही, लग्न करून टाक " तारीख ठरली तारखेच्या आधी दोन दिवस परत मी स्वामींकडे गेलो, स्वामींनी अक्षता दिल्या त्या अक्षता मुलाच्या आणि मुलीच्या डोक्यावर टाक असे सांगितले आणि विवाहामध्ये मी श्रद्धेने त्या अक्षता त्या दोघांच्या डोक्यावर टाकल्या त्या दोघांचा संसार अत्यंत सुखाचा झाला. त्या मुलीला आता नात आहे आणि हा प्रसंग सांगताना माझ्या डोळ्यात पाणी येत आहे. आणि ते पाणी मी सुद्धा प्रत्यक्ष पाहिले असा एका यवन टांगेवालाचा अनुभव. स्वामी सर्वांमध्ये एकत्व भाव पाहणारे होते. याची अनुभूती या लेखाच्या मार्फत येते.

## ।। सत्संगती आणि सद्गुरूचे महत्व ।।

विवेक सबनीस, बंगलोर/कराड
मो.९८८०००२०९९

शास्त्रात सत्संग आणि सद्गुरू यांचे गोडवे गायलेले आहेत. आत्मज्ञानाचा पाया म्हणजे सत्संग आणि कळस म्हणजे सद्गुरूभक्ती होय. परमार्थामध्ये सत्संगती आणि गुरुभक्तीला अनन्य साधारण महत्व आहे. याचे नक्की कारण काय? आणि त्याचा साधकाच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी कसा उपयोग होतो? ते आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

''भज गोविंदम'' या उपदेशपर स्त्रोत्रात भगवान शंकराचार्य यांनी जीवनमुक्ती कशी क्रमाक्रमाने साध्य करता येईल हे सांगितले आहे.

**सत्संगत्वे निस्संगत्वं, निस्संगत्वे निर्मोहत्वं ।**
**निर्मोहत्वे निश्चलतत्त्वं, निश्चलतत्त्वे जीवन्मुक्तिः ।।**

आचार्य म्हणतात – सत्संगामधून वैराग्य प्राप्त होते, वैराग्यसंपन्न मन मोह रहित होते आणि विवेकाची जागृती होते. नंतर विवेकजन्य आणि वैराग्यसंपन्न असे मन तत्वाच्या ज्ञानासाठी तयार होते. शेवटी तत्वज्ञानाने तो साधक जीवनमुक्त होतो.

थोडक्यात साधकांसाठी सत्संग ही पहिली पायरी आहे. आता प्रश्न निर्माण होतो हा सत्संग इतका का महत्वाचा आहे ? सत्संगातून वैराग्य कसे निर्माण होते?

व्यवहारातही आम्ही ज्या लोकांच्या सोबत असतो, जे माझे मित्र असतात, ज्यांचा सहवास आम्हाला हवाहवासा वाटतो, जी माणसे आम्हाला आवडतात, त्यांचा प्रभाव आमच्या कळत नकळत आमच्यावर पडतो. आमच्या नकळत आमचा स्वभाव त्यांच्याप्रमाणे होतो. English मध्ये एक वाक्य आहे. – ''A man is known by the company he keeps.'' लहान मुलांवर तर संगतीचा लगेच परिणाम दिसून येतो हा आपल्या सर्व पालकांचा अनुभव आहे.

हे जसे व्यवहारात, प्रपंचामध्ये सर्वांना अनुभवायला येते, तोच अनुभव परमार्थामध्येसुध्दा लागू होतो. म्हणूनच साधकांनी एका बाजूला साधना चालू असताना आपली संगती तपासून घ्यावी. आचार्यांनी गीतेतील ''उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत्।'' या श्लोकावर भाष्य लिहिताना रोगाचा दृष्टांत दिला आहे. आचार्य म्हणतात जसे रोग बरा होण्यासाठी आपल्याला औषधं घ्यावी लागतात. पण औषधांबरोबरच आपल्याला पथ्य पाळणे अतिशय आवश्यक असते. त्याप्रमाणे आम्हाला संसाराचा रोग लागलेला आहे. त्यासाठी आम्हाला औषध म्हणून वेगवेगळ्या साधना/उपासना दिलेल्या आहेत. पण जरी आम्ही दिलेल्या साधना करत असलो, तरी साधना वेळे व्यतिरिक्त आम्हीं काय करतो?, कोणत्या गप्पा मारतो?, किती बहिर्मुख असतो? हेही पथ्य म्हणून तितकेच महत्वाचे आहे. हेच सत्संगतीचे महत्व आहे. आमची सत्संगती चांगली असेल, तर आमचे विचार आणि आचार चांगले होतील. त्यामुळे आमच्या हातून चांगलेच कर्म घडेल. त्यामुळे अर्थातच साधनेचे फळ आम्हाला जास्त प्रमाणात मिळू शकेल.

आता सत्संगती म्हणजे काय ते पाहू. या जगात चांगली माणसे कमी आहेत हा सुद्धा आमच्या सर्वांचा अनुभव आहे. आमच्या आजूबाजूला, दिसभरात भेटणारी माणसे पाहिली, तर बरीच माणसे ही विषयांवर प्रेम करणारी, त्यात रमणारी आणि विषयांचे उपभोग घेऊन तेच आयुष्य आहे असे मानणारी आहेत. त्यांना भेटून,

बोलून आमचे मन कधीच शांत होत नाही. तर उलट अशांतता वाढते. याउलट, धर्माचे अधिष्ठान असलेली, नीतीने वागणारी, ईश्वरनिष्ठ माणसे आमच्या आयुष्यात येणे हीसुद्धा परमेश्वराची कृपाच आहे. अशा माणसांच्या संगतीत नेहमी आनंद मिळतो, मन शांत होते. याचे एकच कारण म्हणजे अशी माणसे ईश्वराव्यतिरिक्त काही बोलणार नाहीत. ईश्वराचे गुण-गान, ईश्वराचे रुप-ध्यान आणि ईश्वराचे संकीर्तन / भजन याशिवाय या ईश्वरनिष्ठ माणसांकडे काहीच नसते. म्हणूनच ज्ञानेश्वर माउलींनी पसायदानामध्ये ईश्वरनिष्ठांची मांदियाळी या भूतलावर असावी अशी मागणी केली आहे.

म्हणूनच सत्संगतीमधून आमची प्रगती होते, मनातील काम, क्रोधादी विकार हळू हळू कमी होतात. आमचे मन शुद्ध होते, शांत होते, बहिर्मुखता कमी होते. याच सत्संगतीचे शेवटचे फळ म्हणजे सद्गुरूंची प्राप्ती होते. आमच्या आयुष्यात महापुरुषाची प्राप्ती होणे हे अतिशय दुर्लभ आहे.

**दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रहहेतुकम् ।**
**मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ।।**

या श्लोकात म्हटल्याप्रमाणे मनुष्य जन्म मिळणे, मोक्षाची कामना होणे आणि सदुरूंची प्राप्ती होणे या तीन गोष्टी अत्यंत कठीण, दुर्लभ आणि दुर्मिळ आहेत. त्या ईश्वराच्या अनुग्रहाशिवाय मिळू शकत नाहीत.

सद्गुरूंच्या प्राप्तीनंतर मात्र साधकाचा प्रवास सद्गुरूंच्या एकमेव संगतीमध्ये सुरू होतो. आता सत्संगती खऱ्या अर्थाने एका प्रगल्भ, स्वतःच्या उद्धाराच्या दिशेने चालू होते. सद्गुरूची संगती ही खऱ्या अर्थाने सत्-संगती असते. वर्षानुवर्षे, जन्मानुजन्मे साधकाने केलेल्या पुण्यकर्माचे ते फळ असते. साधनेच्या या टप्प्यामध्ये सद्गुरू हे असे स्थान असते की त्या ठिकाणी साधक पूर्ण श्रध्देने नतमस्तक होतो, शरणागत होतो, समर्पण होतो. काया, वाचा आणि मनाने तो गुरुमय होतो. पूर्वी ईश्वराच्या ठिकाणी त्याची भक्ती असते, श्रद्धा असते, भाव असतो. आता तो त्याचं भक्तीने, त्याचं श्रध्देने आणि निष्ठेने सद्गुरूसेवा, उपासना चालू ठेवतो. येथे साधकाला सद्गुरूंकडून आत्मज्ञान किंवा परमेश्वरदर्शन याशिवाय काहीही नको असते. सद्गुरूंनी आपले व्यवहारातील प्रश्न सोडवावेत, आपली संकटे दूर व्हावीत, आपल्या जीवनात समृध्दी असावी, यासाठी तो सगुरूभक्ती करत नाही तर ज्या परमेश्वराची भक्ती तो वर्षानुवर्षे करत होता, त्या परमेश्वराशिवाय त्याला बाकी काहीही नको असते.

भगवंताने साधकाची ही अवस्था गीतेमध्ये खालील श्लोकामध्ये सांगितली आहे.

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः । १४.३४।।**

या ठिकाणी सद्गुरु हे नक्की कोण आहेत? याचा विचार करूया. गीतेमध्ये भगवंताने त्यासाठी तत्वदर्शिनः असा शब्द वापरला आहे. ज्याने स्वतः तत्वदर्शन घेतलेले आहे, ज्याला मी कोण आहे? हे माहिती आहे. ज्याला नुसतेच आत्मज्ञान झालेले नाही तर तो त्या ज्ञानात सदैव स्थिर आहे; आत्मनिष्ठ/ब्रह्मनिष्ठ आहे, त्याला सद्गुरू असे म्हणतात. अर्थातच त्यामुळे सद्गुरु म्हणजे केवळ शरीर नाही, तर ते अखंड, अविनाशी तत्व आहे. म्हणूनच सद्गुरूंची भक्ती म्हणजे त्या निर्गुण, निराकार असलेल्या परब्रह्माची भक्ती,

आता सद्गुरूचा संग आम्हाला निःसंगाकडे कसा नेतो ते पाहू. सद्गुरु कधीही शिष्याला प्रथम निर्गुण, निराकार अश्या परब्रह्माचा उपदेश करत नाहीत. तर प्रथम सगुण, साकार असलेल्या जीव, जगत (विषय) आणि ईश्वराचे ज्ञान देतात. शास्त्रामध्ये '' आत्मा-अनात्मा - विवेक,'' '' दृक-दृश्य विवेक ''ही ज्ञान-विज्ञान साधना साधकाला दिली जाते. अनात्मा हा नाशवान असून, कार्य आहे. त्याला उत्पत्ती, स्थिती आणि लय आहे. तो विकारी आहे. या कारणासाठी त्याचा त्याग करावा असा उपदेश सद्गुरू करतात. शास्त्रामध्ये यालाच विषयदोष दर्शन असेही म्हणतात. गुरुमुखातून शास्त्राचे श्रवण, नंतर मनन आणि निदिध्यासना अशी साधना निरंतर केल्याने साधकाला अनाम्याबद्दल म्हणजेच विषयाबद्दल वैराग्य प्राप्त होते. असे शुद्ध, वैराग्यसंपन्न मनच साधकाला साध्यापर्यंत घेऊन जाते.

स्वतः सद्गुरु हे क्षोत्रीय असल्यामुळे, साधक जेव्हा आपल्या सद्गुरुचा उपदेश श्रवण करतो, त्यावेळी शिष्याला शास्त्र काय आहे याची प्रचिती येते. पण शेवटी शास्त्र हे केवळ शब्दच आहेत. पण सद्गुरु हे स्वतः चालते-बोलते शास्त्र असल्याने, ते शास्त्र केवळ तत्वज्ञान नसून ते आचरणात आणता येते हे त्याला सद्गुरुंच्याकडे पाहिल्यानंतर कळते. त्यामुळे शास्त्रावर त्याची आधी श्रद्धा बसते आणि नंतर सद्गुरुंवर भक्ती निर्माण होते. म्हणूनच आत्मप्रचितीसाठी खालील
पायऱ्या सांगितल्या आहेत.

**शास्त्रप्रचिती ➔ गुरुप्रचिती ➔ आत्मप्रचिती**

शेवटी आत्मज्ञान झाल्याने साधकाला कोणतेही शोक-मोह उरत नाहीत. त्याला स्व-स्वरुपाचे स्मरण होते. तो स्वतःच स्वतःच्या स्वरूपामध्ये स्थिर होतो. हीच सहजावस्था किंवा आनंदावस्था होय.

गीतेमध्ये अर्जुन शेवटी सांगतो

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव। ।१८.७३।।**

प.प. श्री. काशी स्वामी यांच्या संन्यासदीक्षा समारंभास यावर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. याचे औचित्य साधून अनेकविध कार्यक्रम कराडमध्ये आयोजित केले आहेत. शास्त्राचे प्रखर आचरण करणाऱ्या स्वामीजींचा अनेक साधकांना प्रत्यक्ष सहवास आणि कृपा लाभलेली आहे. कराडमध्ये अनेक वर्षे त्यांचे त्यागमय जीवन अनेक साधकांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. त्यांच्या सहवासात शांतता आणि आनंद याचा जो अनुभव येतो, हाच सत्संगाचा महिमा आहे. त्यांच्या जीवन-चरित्राकडे पाहिले तर आम्हांला सत्संगती आणि गुरुभक्ती याचे महत्व कळेल यात कोणतीही शंका नाही. प.प. काशी स्वामी यांचा आशीर्वाद सर्व साधकांना लाभावा अशी प्रार्थना मी स्वामीजींच्या जवळ करतो.

।। हि त्सत ।।

# ।। गुरुविना कोण दाखवील वाट ।।

सौ. शुभांगी श्रीराम येळगांवकर, कराड

।। प. पू. इश्वरानन्द सरस्वती काशी स्वामी महाराज की जया।
।। श्री गणेशाय नम : ।।

आज माझ्या स्वामींचा संन्यास दीक्षे शतक महोत्सवा प्रसंगी मला माझ्या आठवणी मांडण्याची संधी मिळाली आहे. त्याबद्दल मी खूप आभारी आहे.

मी लहान असताना माझी आई गेल्यानंतर स्वामींनी मला एक परकर पोलके दिले. नंतर कुमारिका पूजन केले. नंतर त्यांच्या भिक्षेतले काही गोड पदार्थ मला दिले. ते मला कळायचे नाही, पण माझे वडील म्हणायचे कार्टी भाग्यवान आहे, भिक्षेतले खायला मिळते.

माझे लग्न झाल्यानंतर मला कळले की गुरु म्हणजे. काय असत. मी संधीवाताने खूप आजारी होते, झोपून होते पण त्यांनीच मला बरे केले. गुरुमंत्र दिला. त्यापासून संधीवाताचा त्रास मला झाला नाही.

आमचे घरी गुरुपोर्णिमला खूप लोक (शिष्यगण) भोजनास येत होते. माझ्या सासूबाई स्वामींची खूप मनापासून सेवा करत होत्या. खूप वर्ष ते आमचेकडे भिक्षेसाठी एक दिवसाआड येत असत.

सासूबाई गेल्यानंतर आम्ही दिवाळीला नांदेडला गेलो होतो, तेव्हा त्यांनी माझ्या नावाची साडी, ओटी बाजूला ठेवून मला त्यांनी आल्यावर ती ओटी दिली.

माझ्या मुलांवर त्यांचे प्रेम होते. त्यांच्या मुंजी झाल्यावर ते मुलांना आशिर्वाद देताना त्यांचे फोटो काढले. आम्हाला काही अडचणी आल्या की ते विभूती देत असत. आज आम्ही त्यांच्या कृपेने सर्वजण आनंदात आणि आरोग्यदायी आहोत. त्यांचे छत्र खूप मोलाचे आहे.

मला त्यांचा सहवास खूप लहान असल्यापासून मिळाला आहे. त्यामुळे कितीही आठवणी सांगितल्या किंवा लिहील्या तरी त्या कमी आहेत. अशा या महान गुरुमूर्तिला त्रिवार वंदन करते आणि शतशः प्रणाम, नमस्कार करते.

## ।। गुरु ।।

चित्तामुळ व्यर्थच विकारी व विनाशी स्थूल शरीर मानून दुःखाने व शोकाने युक्त तसेच जन्ममरण धर्माचा मानून बसलेला आहे. जोपावेतो तो ह्या अज्ञानाने सुटून आपल्या स्वस्वरुपाला जाणून, तसेच त्यात दृढनिष्ठावान होणार नाही, तोपावेतो त्याची जन्मभरण, जरा व्याधी यापासून आत्यंतिक सुटका होणार नाही व अखंड आनंदाची प्राप्ती पण होणार नाही. या ज्ञानाकरिता चित्तशुद्धीची जरुरी आहे, व परमात्म्याची निष्काम भक्ति केल्याशिवाय चित्तशुद्धी होत नाही. चित्तशुद्धीकरिता शास्त्रांनी अनेक उपाय सांगितले आहेत. त्यात सात्विक आहार, सात्विक वस्तूंचे सेवन, शास्त्रविचार, सद्गुरूंची सेवा परमात्म्याच्या सगुण साकार रुपाची किंवा फोटोची भक्ती , नामजप व कीर्तन, प्राणिमात्राला आत्मरुप समजून त्यांच्याशी तसा व्यवहार करणें, सत्य व प्रिय भाषण करणे, मौन एकांतवास, प्राणायाम तसेच चित्ताला संकल्परहित अवस्थेत ठेवण्याचा अभ्यास, दया, मैत्री, करुणा, शांति, क्षमा व धैर्यपूर्वक सर्वदा आत्मचिंतन करणे, वगैरे मुख्य उपाय आहेत. त्यांचे सदा सेवन करावे. सदा चांगल्या भावनेचा संकल्प करावा. ह्या दृश्य जगात सुख मुळीच नाही. सुख दिसते, परंतु भोगले असता असता परिणामात पदरात दुःखच पडते. जसे कस्तुरीमृगाच्या बेंबीत कस्तुरी असते व त्याचा सुगंध त्याला येतो. परंतु त्याला हे कळत नाही की, हा सुगंध कोठून येतो? या कारणाने वणवण करीत कुठल्या तरी गवतात कस्तुरीचा शोध करतो, पण ती त्याला दुसरीकडे मिळत नाही. ती तर त्याच्या बेंबीत असते. तो व्यर्थच दुसरीकडे शोध करतो व थकून दुःख. भोगतो. याप्रमाणें चित्त आनंदाला शोधीत फिरते. आनंदस्वरुप आत्मा तर चित्ताच्या आत आहे, त्याला न जाणून जगतातल्या प्राणी-पदार्थात आनंदाला शोधतो. परंतु दुसरीकडे ते नसतेच. मग त्याला मिळणार कसे ? प्राणी पदार्थ जे संकल्पाने बनलेले आहेत तें विकारी व विनाशी आहेत. त्यात आनंद कसा असणार ? तथापि मायेने असे वाटते की याच्यात आनंद असेल. मायेचे स्वरुप असे आहे की, नसलेले दिसू लागते, व दिसल्यावर जवळ गेले असता लुप्त होऊन जाते. मायेच्या स्वरुपाचे वर्णन अरवा भक्त करतात  माया करे फजेत । खातां खांडने चावता रेत ।। मृगजळं दुरुन दिसचे,मिळणार कसे ? प्राणी पदार्थ जे संकल्पाने बनलेले आहेत ते विकारी व विनाशी आहेत. त्यात आनंद कसा असणार ? तथापि मायेने असे वाटते की याच्यात आनंद असेल. मायेचे स्वरुप असे आहे की, नसलेले दिसू लागते, व दिसल्यावर जवळ गेले असता लुप्त होऊन जाते. मायेच्या स्वरुपाचे वर्णन अरवा भक्त करतात मअरवा माया करे फजेत । खातां खांडने चावता रेत ।। मुगजळं दुरुन दिसचे, धावत जाऊन घ्यायला जाते तर काही मिळत नाही. अरवा भक्ताने सुंदर उपमा दिली आहे, दिसण्यात साखर आहे असे वाटते, पण तोंडात टाकल्यावर खाऊ लागले असता अनुभवात वाळ लागते. याचे नाव माया. या करिता या मायिक जगतातले प्राणीपदार्थापासून सुख आनंद प्राप्त होण्याची आशा याचा त्याग करून आनंदरूप आत्म्यात चित्त लावावे.

जगतात जितकेही प्राणी होऊन गेले आहे, ते सर्व कालवश होऊन परण पावले. प्रेताला जिवंत करणारे पण मरून गेले. सुखाकरिता अनेक जीवांनी जगतात परिश्रम करूनही सुखाच्या बदल्यात दुःख मिळाले, व ते सर्व शेवटी मरून गेले.  सगुण परमात्म्याला शरण गेल्याशिवाय तसेच सद्गुरुंची सेवा व शरण गेल्याशिवाय कधीही ज्ञान होणार नाही. आत्मज्ञात झाल्याशिवाय जगातल्या संपत्तीने कोटी उपाय करूनही अखंड सुख प्राप्ति होत नाही. परोक्षज्ञान झाल्यावर एकक्षण सुद्धा चिंतन सुटले न पाहिजे. आत्मचिंतन सुटताच पतन होते, तसेच भोगाची अभिलाषा करताच पतन होते, जगतातल्या विषयांत सुखबुद्धि होताच पतन होते. जगाविषयी  सुखबुद्धि हळूहळू अभ्यासपूर्वक काढून टाकून चित्ताला आत्म्यात जोडावे व चित्ताला सदा आत्म्यातच, आनंदाच्या अनुभवातच ठेवावे. हा अभ्यास फार कठीण आहे. तो मोठ्या धैर्याने, न कंटाळता सतत केला पाहिजे. या जन्मात किंवा अनेक जन्मानंतर, असा अभ्यास केल्याशिवाय जीवाच्या तापाचे शमन होत नाही.

सर्वेऽत्र सुखितः सन्तु सर्वे सन्तु निरामयः । सर्वे भद्राणि पश्यतु मा कश्चिद् दुःखभाग्भवेत् ।।

# ।। ज्ञानेश्वरांची मानसपूजा ।।

श्रीमती विजयाताई सबनीस, कराड
(मो. ९२८४५१४८४४)

प. प. काशी स्वामींनी संन्यास दीक्षा घेतली या घटनेस १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित होत आहे. कराडकरांचे ते श्रध्दास्थान आहे. सोमवार पेठेत भैरवनाथ मंदिरात त्यांचे ४० वर्षे वास्तव्य होते. कृष्णेचे त्रिकाळ स्नान, अखंड ध्यान, परमेश्वर चिंतन असा त्यांचा दिनक्रम होता. तीव्र वैराग्यासाठी ते कराडकरांना माहिती आहेत. भैरवनाथ मंदिरानजिक वड्याचा गणपती म्हणून ओळखले जाणारे गणेश मंदीर आहे. तिथे २५० वर्षापूर्वी निरंजन स्वामी नावाचे सिद्‌ध पुरुष होऊन गेले. त्यांचे जीवनही तपस्वी जीवन म्हणून ओळखले जाते. समोर श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर राममंदिर आहे. १९११ साली महाराजांनी तिथे राम, लक्ष्मण, सीतामाईंच्या अत्यंत देखण्या मूर्ती स्थापन केल्या आहेत. ह्या मंदीरात प. पु. शांताश्रम स्वामी नावाचे सिद्ध पुरुष होऊन गेले. ह्यांनी १२ वर्षे मौन राहून नाम साधना केली. असा हा सगळा परिसर अत्यंत पवित्र असा आहे. या सगळ्या सिद्‌ध पुरुषांना ज्ञानेश्वर माऊली गुरुस्थानी असणारच. कारण गुरु ही व्यक्ती नसून ते एक तत्व आहे. गुरु जसे देहाने असतात तसे ते देह ठेवल्यानंतर शक्ती रुपाने असतात. ज्ञानेश्वरांची गुरुभक्ती पराकोटीची आहे. ज्ञानेश्वरीत त्यांनी गुरुची केलेली मानस पूजा साधकांसाठी मार्गदर्शक आहे. या लेखात त्या विषयीच थोडे लिहीणार आहे.

माउली म्हणतात,

**'' आता हृदय हे आपुले । चौफाळुनिया भले । वरी बैसवू पाउले । श्री गुरुंची। ''**

माउली म्हणतात, मी माझ्या अंतःकरण रुपी सिंहासनावर सद्गुरूंच्या पादुका ठेवून त्यांची पूजा करतो. सिंहासनाला चार पाय असतात. इथे अंतःकरणरुपी सिंहासनाला चार पाय आहेत. मन, बुद्धी, चित्त, अहंकार, म्हणजे अंतःकरणात सद्गुरूंची स्थापना केली आहे. अर्थात त्यासाठी अंतःकरण शुद्‌ध हवे. मन निर्मळ हवे. मनामध्ये जन्मजन्मांतरीचा कचरा साठलेला असतो. तो प्रथम काढून टाकायला हवा. जुन्या आठवणी ज्या मन गढूळ करतात त्या विसरायला शिकले पाहिजे. पूर्वी झालेले अन्याय, पूर्वीच्या जीवनातला खडतर प्रवास, इतरांकडून झालेला अपमान सगळे विसरुन मन स्वच्छ करायला हवे. चित्तामध्ये सारखी चलबिचल असते. हेलकावे असतात. ते स्थिर ठेवण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. बुद्धीने योग्य तेच निर्णय घ्यावेत. बुद्धी निश्चयात्मिका असावी आणि अहंकाराची हकालपट्टी करायला हवी. अंतःकरणातला कचरा विवेकरुपी केरसुणीने स्वच्छ करायला हवा. मगच अंतःकरणात सद्गुरूंची स्थापना करता येईल. सद्गुरुंची अतःकरणात स्थापना करुन आता त्यांना अर्घ्य द्यायचा आहे, म्हणजे पंचेंद्रीयांवर प्रथम ताबा मिळवायला हवा. इंद्रिये गुरुच्या चरणी अर्पण करायची आहेत. शब्द, स्पर्श, रस, रुप, गंध हे पंच ज्ञानेंद्रियांचे पाच विषय. मन या विषयांकडे सारखे ओढ घेते. ही इंद्रिये आवरून ती गुरुचरणी लीन करायची आहेत. हाच अर्घ्य आहे. पाद्यपूजा करायची तर पाणी हवे. ही मानस पूजा आहे. डोळ्यामध्ये असणारे कृतज्ञतेचे अश्रु हेच पाणी आहे. हे पश्चात्तापाचेही अश्रु आहेत. याच पाण्याने

सद्गुरूंचे चरण धुतले जातात. सद्गुरूंची कृपा व्हावी या ईच्छारुपी गंधाचे बोट सद्गुरूंच्या चरणी लावायचे आहे. पाद्यपूजा करताना सद्गुरूंचे औक्षण करायचे, आरती करायची पण हा बहिरंगाचा भाग झाला. ही मानस पूजा आहे. तर माउली म्हणतात,

**'' अहं हा धूप जाळू । नाहं तेजे वोवाळू । ''**

अहंकार कमी करून, अहंकारावर विजय मिळवून जणू अहंकार रुपी धूप जाळू असे माउली म्हणतात. मी पणाचा निरास करायचा आहे. मी देह नाही हा बोध हेच जणू तेज आहे. अशा निरभिमान वृत्तीरपी तेजाने . सद्गुरूंना ओवाळायचे आहे. '' आनंद मोद बहळ । सात्त्विकाचे मुकुळ ते उमलले अष्टदल । ठेऊ वरी।'' किती सुंदर कल्पना आहे, आठ पाकळ्यांचे कमळ सद्गुरूंच्या चरणी अर्पण करायचे आहे. पण हे कमळ आहे अष्टसात्विक भावाचे. हे अष्टसात्विक भाव कोणते ?

१) अंगावर रोमांच उभे राहणे २) डोळ्यातून अश्रुधारा वहाणे ३) सर्वांगावर धर्मबिंदु उभे राहणे
४) अकारण हसू येणे ५) देहाला ताटस्थ्य येणे ६) आत्यंतिक प्रेमाने डोल येणे ७) कंठ दाटून येणे
८) प्राणाची गती कमी होणे...

असे हे अष्टसात्विक भाव आहेत. सद्गुरूंची नुसती आठवण झाली तरी हे अष्टसात्विक भाव जागृत होतात. ते व्हावेत ही मानस पूजेत अपेक्षा आहे. सद्गुरूंची पाद्यपूजा झाल्यावर त्यांना पायात घालायला खड़ावा द्यायच्या आहेत. '' माझी तनु आणि प्राण । या दोन्ही पाउवा लेऊ श्री चरण '' असे माउली म्हणतात. स्थूल देह आणि सूक्ष्म देह अशा दोन खडावा पायात घालण्यासाठी द्यायच्या आहेत, भोग आणि मोक्ष श्रींवरुन ओवाळून टाकतात. कारण जशी भोगाची आसक्ती नाही तशी मोक्षाची ही आसक्ती नाही. आता सद्गुरूंकडे काय मागायचे? तर निर्वासन करा हेच मागायचे, निर्वासन होण्यासाठी प्रयत्न माझे पण मदत आणि कृपा सद्गुरूंची म्हणजे सद्गुरूंकडे काही मागायचे नाही. त्यांना सर्व कळते. ते सर्व जाणतात, ते सर्व सत्ताधीश आहेत. माउली म्हणतात, सद्गुरूकृपेने माझ्या वाचेला एवढे तेज येईल की माझी वाचा श्रोत्यांना ज्ञानाची दिवाळी करून टाकेल. हा आत्मविश्वास आहे. प्रौढी नाही. नम्रता आणि आत्मविश्वास हे दोन दुर्मिळ गुण माऊलीच्या ठिकाणी आहेत.

माणसाला जशी अशाची भूक असते तशी परमार्थाचीही भूक असते, जीवाला शिव स्वरुप होण्याची ओढ असते, सद्गुरू जर कृपा करतील तर साधक ब्रह्मरूप होऊ शकेल, यासाठी माऊलींची मानसपूजा सर्व साधकांना मार्गदर्शक ठरेल, माऊलींवर सद्गुरूंची कृपा झाली. तशी आपल्या सर्व साधकांवर व्हावी अशी माऊलींच्याच चरणी प्रार्थना करून ही लेखनसेवा प. प. काशी स्वामींच्या चरणी अर्पण करते.

**'' नमितो योगी थोर विरागी । तत्वज्ञानी संत । तो कविवर परात्पर गुरु । ज्ञानदेव भगवंत । ''**

**।। प.प.धर्मश्रीः श्रीईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामींची आरती।।**

आरती सद्गुरु स्वामींची। ईश्वरानन्द सरस्वतिंची। जोडीली पुण्याची गाठी। घडली चरणाचि भेटी। जळली राशि पापांचि। आम्हा भीति ना कलीची। आरति सद्गुरु स्वामींची। ईश्वरानन्द सरस्वतिंची ।।१।। दर्शन घडता हो यांचे। भेटे ठाणे मोक्षाचे। चुकतील फेरे जन्मांचे। सार्थक मानव देहाचे। आरती सद्गुरू स्वामींची। ईश्वरानन्द सरस्वतिंची ।।२।। दृष्टि अमृत वृष्टिची। भेटी अवघ्या सौख्याचि। लाभति राज्ये इंद्राचि। घेता धुळी पायाचि ।। आरती सद्गुरु स्वामिंची। ईश्वरानन्द सरस्वतिंची ।।३।। स्मरणे यांचे हो आम्हा। होई नित्याची काशी। पुण्ये अवघ्या तीर्थाची। यांचे स्नाना पाठीशी आरती सद्गुरू स्वामिची। ईश्वरानन्द सरस्वतिंची ।।४।। पाहुनि सन्यासि वेशा। आम्हा तृप्ति विश्वेशा। विनवणि स्वामि पायाशि। ठेवी दिना चरणाशि आरति सद्गुरु स्वामिंची। ईश्वरानन्द सरस्वतिंची ।।५।।

रचना : श्री. बाळूकाका कुलकर्णी

**।। प.प.धर्मश्रीः श्रीईश्वरानन्द सरस्वती यांचे हस्ताक्षरातील प्रभावी मंत्र ।।**

ऐंकारिणी शिरः पातु क्लींकारी हृदयं मम। सौः पातु पादयुग्मं मे सर्वांगे सर्वसुन्दरी॥ वाग्भवं च शिरः पातु भालं कुमारिका। भ्रूयुग्मं शांकरी पातु श्रुतियुग्मं गिरीश्वरी॥ नेत्रे त्रिनेत्रवरदा नासिकां मे महेश्वरी। ओष्ठौ पूगस्तनी पातु चुबुकं दशवार्षिकी॥ वक्त्रं महेश्वरी पातु जिह्वां पातु सरस्वती। कपोलौ कमनीयांगी कंठं कामार्चिताऽवतु॥ बाहू पातु वराभीतिधारिणी सांगुली तथा। वक्षःप्रदेशं पद्माक्षी कुचौ कांचीनिवासिनी॥ उदरं सुंदरी पातु नाभिं नागेन्द्रवन्दिता। पार्श्वौ पाशहरी पातु पृष्ठं पापविनाशिनी॥ कटिं कर्पूरवीथ्याभा जघनं ललिताम्बिका। मेढ्रं महेशरमणी पातूरू काललोचना॥ जानुनी जयदा पातु गुल्फौ विद्याप्रदायिनी। पादौ शिवार्चिता पातु प्रपदे त्रिपुरेश्वरी। सर्वांगं सर्वदा पातु मम त्रिपुरसुंदरी॥ चित्तं वित्तेश्वरी पातु पशून्पशुपतिप्रिया। पुत्रान्पुत्रप्रदा पातु पतिं धर्मप्रदायिनी॥ क्षेत्रं क्षेत्रेशवनिता गृहं गंभीरवादिनी॥ धातून्धातुमयी पातु सर्वं सर्वेश्वरी मम॥

इत्येतत्कवचं पुण्यं सर्वपापप्रणाशनम्। सर्वसौभाग्यजनकं सर्वरोगनिबर्हणं॥ विषज्वरहरं भूतवेतालादिनिवारकं। अपस्मारगदाशूलनेत्ररोगाबाधकैः पीड्यमानोऽपि सततं भीतिकैः कायसंभवैः। जपेत्कुमारीकवचं त्रिकालेषु त्रिमासकं॥ मुच्यते सकलाद्रोगात्कंचुकादिव पन्नगः। कुमारीं त्रिशतं जप्त्वा कवचं तु त्रिवारकं॥ पठेद्यस्तु पुमान्वर्षं कुमारी तस्य सिध्यति। गंगातरंगसदृशी वाणी तस्य मुखाम्बुजात्

निःसरत्यप्रयत्नेन सुधाधारासमुज्ज्वला॥ अनेन मंत्रितैस्तोयैरभिषिंचेत्तु यो नरं। नश्यत्यपस्मारस्तस्याशु नात्र कार्या विचारणा॥ संशयः॥ प्रातःकाले तु सलिलं ब्राह्मीपत्रं वचापि च मंत्रयन्सप्तवारान्तु त्या कवचेन पिबेन्नरः। अस्य तस्य प्रबंधस्य व्याख्याता भवति ध्रुवम्॥ यद्यत्साध्यतमं कार्यं तत्तदर्थमिदं जपेत् तत्तच्छीघ्रेण लभते नात्र कार्या विचारणा॥ कुमारी कवचं हित्वा कांक्षते कवचान्तरं। करस्थं कांचनं हित्वा काचार्थी कटकाय सः। बहुनात्र किमुक्तेन सर्वकार्येषु सर्वदा जप्यते यत्प्रयत्नेन तत्तत्सिद्धिकरं महत्॥

इति श्रीत्रिपुरागमे गौरीशिवसंवादे श्रीबालात्रिपुरसुंदरीकवचं संपूर्णम्॥

॥ शुभं भूयात् ॥

अस्य श्री धन्वंतरि मंत्रस्य अपांतरतमः ऋषिः। त्रिष्टुप् छंदः। धन्वंतरिः देवता। ॐ बीजं। स्वाहा शक्तिः। नमः कीलकं। मम श्री धन्वंतरि प्रसाद-सिध्यर्थे जपे विनियोगः।

| करन्यासः | | हृदयादिन्यासः |
| --- | --- | --- |
| ॐ नमो भगवते | अंगु॰ न॰ | हृदयाय नमः |
| धन्वन्तरये | तर्ज॰ न॰ | शिरसे स्वाहा |
| अमृतकलशहस्ताय | मध्य॰ न॰ | शिखायै वषट् |
| सर्वामयविनाशनाय | अना॰ न॰ | कवचाय हुं |
| त्रिलोकनाथाय | कनि॰ न॰ | नेत्रत्रयाय वौषट् |
| विष्णवे स्वाहा | करत॰ करपृ॰ न॰ | अस्त्राय फट् |

**।। परमहंस परिव्राचकाचार्य धर्मश्री ईश्वरानंद सरस्वती काशी स्वामी महाराज की जय ।।**

सौ. अपर्णा पोळ.

या आठ नोव्हेंबर २०२५ ला मला स्वामींचा अनुग्रह घेऊन ३३ वर्षे झाली, पण स्वामी सदोदित माझ्याबरोबर असतात. प्रामाणिकपणे कबूल करायचे तर ,या प्रपंचाच्या धावपळीत म्हणावी तशी साधना माझ्याकडून होत नाही. पण स्वामी खरंच माऊली आहेत माझ्याकडे असे खूप प्रसंग आहेत, कोणतीही अडचण आली की मी खूप प्रयत्न करते पण शेवटी स्वामींच्या पुढे उभे राहून त्यांना अडचण सांगते .सांगायचा अवकाश की त्या अडचणीचे चुटकीसरशी निराकरण झाले असते. आणि मग मी स्वामींपुढे साष्टांग दंडवत घालते. ते सतत माझ्याबरोबर आहेत याची जाणीव म्हणण्यापेक्षा खात्री आहे. स्वामींना आजच्या दिवशी एकच मागणे आहे आता माझे राहिलेले उर्वरित आयुष्य त्यांच्या उपासनेत नामस्मरणात जावो, माझ्या सर्व कुटुंबियांना सुखी व आरोग्यदायी ठेवो हीच स्वामी चरणी प्रार्थना

एक स्वामी भक्त

**।। श्रीस्वामी ईश्वरानन्द सरस्वती**
**काशीस्वामी महाराज की जय ।।**

स्वामी बोला हो माझ्याशी, तुम्हीच मजवर रुसल्यावरती

बोलू मी कोणाशी, स्वामी बोला हो माझ्याशी ।। धृ०।।

तुम्हीच मजला बोल शिकविले, अबोलपण का आज धरीले

बोल शिकवूनी माय अबोला, धरिते काय पिलाशी ? ।।१।। ।। धृ०।।

देह वाहिला तुमच्या पाशी, जिवा शिवाची आशा नाही

कानी पडतील बोल स्वामींचे, आशा हीच उराशी ।।२।। ।। धृ०।।

बोलायाचे नसेल जर का, बोलू नका पण इतुके ऐका

नयन उघडूनी माझ्या वरती, ओता अमृत राशी ।।३।। ।। धृ०।।



## ।। आत्मस्वरुप ।।

डॉ . चंद्रशेखर पोळ

या जगाकडे पाहिले असतां आपल्याला असे दिसून येते की अंतर्बाह्य प्रकृतीच्या बंधनांतून मुक्त होण्याची स्पृहा प्रत्येकाच्या ठायी स्वभावतःच वसत असते. आत्मा हा स्वरूपतःच मुक्त असल्यामुळे मुक्तीची ही आकांक्षा कळत न कळत सर्वांच्याच ठिकाणी विद्यमान असते. आपण स्वभावतः मुक्त असलों तरी आपल्याला प्रतिक्षणीं आपल्या मुक्त स्वरूपाचा विसर पडतो आणि परिणामतः आपण स्वतःच आपली बंधने निर्माण करून त्यांत गुंतून पडतों व दुःख भोगतो. स्वतःच आपला कोश विणून त्यांत अडकून पडणाऱ्या रेशमाच्या किड्याप्रमाणे आपली अवस्था असते. नाना प्रकारच्या बंधनांतून मुक्त होण्यासाठी प्रत्येक माणूस प्रयत्न करीत असतो. स्वतंत्र होण्याच्या या प्रेरणेने साधुसंत जपतप, ध्यानधारणा इत्यादी सत्कर्मे करीत असतात, तर एखादा दरोडेखोर स्वतंत्र होण्याच्या याच प्रेरणेने दरोडा घालीत असतो. दरोडेखोराला देखील त्याच्या कल्पनेप्रमाणे काही बंधनांचा अनुभव येत असतो व त्या बंधनांतून मुक्त होण्यासाठी तो प्रयत्न करीत असतो, पण त्याचे हे प्रयत्न भलत्याच मार्गाने होत असतात. स्वतंत्र होण्यासाठी दरोडेखोराने केलेले कर्म नीतिसंगत नसल्यामुळे आपण त्या कर्माला " वाईट कर्म " म्हणतों व साधुसंतांचे कर्म नीतिसंगत असल्यामुळे आपण त्याला "चांगले कर्म" म्हणतो. स्वतंत्र होण्यासाठी दरोडेखोराने अनुसरलेला मार्ग अनुचित असल्यामुळे खरे पाहतां तो अधिकाधिक बंधनांत पडत असतो, तर साधुसंतांनी अनुसरलेला मार्ग उचित स्वरूपाचा व नीतिसंगत असल्यामुळे ते बंधनाची एक एक कडी तोडीत शेवटी यथार्थतः मुक्त होत असतात. स्वतंत्र होण्यासाठी माणूस आपापल्या बऱ्यावाईट संस्कारांनुसार उचित-अनुचित कर्मे करीत असतो, पण यथार्थ मुक्तीच्या प्राप्तीसाठी माणसाला शेवटी "उचित-अनुचित" "चांगले-वाईट" "शुभ-अशुभ" इत्यादि साऱ्या द्वंद्वांच्या पलीकडे जावें लागतें आणि ही द्वंद्वातीत अवस्था केवळ आत्मलाभानेच प्राप्त होऊ शकते.

हा आत्मलाभ आपण ज्ञानमार्गाने वा भक्तिमार्गाने, कर्ममार्गाने वा ध्यानमार्गाने करून घेऊं शकतों आणि सर्व प्रकारच्या द्वंद्वांच्या बंधनांतून मुक्त होऊं शकतो. आपापल्या रुचीनुसार व स्वभावानुसार आपण उपर्युक्त मार्गांपैकी कोणत्याहि मार्गाचा जरी अवलंब केला तरी एक मुख्य गोष्ट आपण नेहमी लक्षांत ठेवली पाहिजे; ती ही की पूर्णपणें निरहंकार होऊन आपण अंतर्यामी विराजमान असणाऱ्या त्या आत्मनाथाला, त्या आत्मदेवाला सर्वान्तःकरणाने शरण गेलें पाहिजे. तरच तो आत्मदेव आपल्याला त्याचें स्वरूप प्रकट करून दाखवील आणि तेव्हांच आपण अंतर्बाह्य प्रकृतीच्या सर्व बंधनांतून मुक्त होऊं. यावत्स्यात्स्वस्य संबंधोऽहंकारेण दुरात्मना । तावन्न लेशमात्रापि मुक्तिवार्ता विलक्षणा ।। अर्थात् या दुष्ट अहंकाराशी जोवर आपला संबंध आहे, जोंवर आपण या अहंकाराचे दास आहोत तोंवर मुक्तीसंबंधी कांहीहि बोलणें निरर्थक आहे हा विवेकचूडामणीतील श्रीशंकराचार्यांचा उपदेश आपण सर्वदा ध्यानांत ठेवला पाहिजे.

वस्तुतः आपण आत्मस्वरूप आहोंत, सच्चिदानंदस्वरूप आहोंत, पण या सत्याचा आपल्याला विसर पडला आहे. जडवादी स्वतःला केवळ शरीरच समजतात, मानसशास्त्रज्ञ मनालाच अंतिम तत्त्व मानून तेथेच थांबतात आणि बुद्धिवादी बुद्धीलाच सारसर्वस्व मानून बुद्धिच्या पलीकडे जाऊं इच्छीत नाहीत. परंतु आपण मी कोण आहे? याचा सूक्ष्म विचार केला तर आपल्याला शरीर, मन, बुद्धि, अहंकार या साऱ्यांच्या पलीकडे जाऊन या सर्वांना उद्भासित करणाऱ्या, या सर्वांना शक्ती प्रदान करणाऱ्या त्या आत्म्यामधे पोहोचावे लागते.

भगवान श्रीकृष्ण म्हणत " मी कोण " याचा नीट विचार केला असतां भगवान श्रीरामकृष्ण म्हणत, दिसून येईल की "मी" नांवाची कोणती एखादी वस्तु नाही. हात, पाय, रक्त, मांस इत्यादीपैकी "मी"कोण ? कांद्याचे पापुद्रे काढू लागल्यास जसे फक्त पापुद्रेच निघतील, सार म्हणून कांही हाती लागणार नाही, तसेंच सूक्ष्म विचार केला

असतां "मी"अशी कांही वस्तू मिळणार नाही. शेवटी जें कांही उरते तोच आत्मा. तेच चैतन्य होय.

देह, मन , अहंकार ही कांही अंतिम तत्त्वे नव्हेत. त्यांचेहि प्रेरक असें अंतिम तत्त्व आपल्या ठायी वसत असते, ते तत्त्व म्हणजेच आत्मा होय. मनाच्या चंचलतेचा, बुद्धिधीच्या अशुद्धतेचा व अहंकारांतून निर्माण होणाऱ्या गर्वाचा अनुभव सामान्यतः सर्वांनाच येतो. या असल्या सदोष व अपूर्ण गोष्टींना पूर्ण अंतिम तत्त्व मानण्यास कोणताही सुज्ञ माणूस तयार होणार नाही. चंचल मन स्थिर करावे, अशुद्ध बुद्धिधी शुद्ध करावी व गर्वाला जन्म देणारा अहंकार दूर करून नम्र व्हावें असेंहि आपल्याला वाटत असतें आणि त्यासाठी आपण प्रयत्नहि करतो. यावरून मन-बुद्धि-अहंकार यांहून श्रेष्ठ प्रतीची व त्यांच्याहि पलीकडे असणारी व त्यांना प्रेरणा देणारी अशी एक सत्ता आपल्या ठिकाणी आहे असें आपल्या प्रत्ययास येतें. ही सत्ता म्हणजेच आपला आत्मा होय.

वास्तविक पाहतां हा आत्मा, हें शुद्ध चैतन्य हेच आपले खरें स्वरूप होय. हें चैतन्यच इंद्रिये, मन, बुद्धि, अहंकार इत्यादि उपाधिरूपें धारण करून आपल्या ठायी व विश्वांतील यच्चयावत् शरीरांत विलसत आहे. एवढेच नव्हे तर विश्वब्रह्माण्डांतील दृश्यादृश्य, चराचर अशा जेवढ्या म्हणून वस्तू आहेत त्या साऱ्या त्या चैतन्याचींच विविध रूपें आहेत. नित्योऽनित्यानां चेतनश्चेतनानामेको बहूनां यो विदधाति कामान् । तमात्मस्थं येऽनुपश्यंति धीरास्तेषां शांतिः शाश्वती नेतरेषाम् ।। अर्थात् विनाश पावणाऱ्या पदार्थातील जो अविनाशी आहे, सर्व चेतन पदार्थांतील जो चैतन्य आहे, जो एक सर्वज्ञ, सर्वेश्वर अनेक कामनावान् संसारी जीवांना त्यांच्या कर्मानुसार कर्मफलें देतो त्या बुद्धिस्थ आत्म्याचा जे बुद्धिमान प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेतात त्यांनाच शाश्वत शांती लाभते, इतरांना ती लाभत नाही. हे कठोपनिषदांतील यमराजांचे वचन आत्म्याचें स्वरूप कशा प्रकारचें आहे.आपल्याला दर्शविते.

हा चैतन्यस्वरूप आत्मा हेच आपले खरे स्वरूप आहे. हे स्पष्ट करून सांगणारी एक कथा छांदोग्य उपनिषदाच्या आठव्या अध्यायांत आलेली आहे. प्रजापती आणि इंद्र-विरोचन यांच्या या प्रसिद्ध कथेत साक्षीस्वरूप अंतिम सदवस्तूचे-त्या आत्मदेवाचे स्वरूप क्रमाक्रमाने स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न फार मार्मिक पद्धतीने केलेला आहे. मनुष्याच्या दैनंदिन जीवनांत त्याला जागृति, स्वप्न व सुषुप्ति या ज्या अवस्था अनुभवास येतात त्यांत त्या त्या अवस्थांशी तादात्म्य पावणारा जीव हा खरा आत्मा वा देहांतील उत्तम पुरुष नव्हे हें प्रजापतींनी पायरी-पायरीने इंद्राच्या निदर्शनास आणून दिले. देह, मन, बुद्धि इत्यादि उपाधींनी बाधित वा मर्यादित न होणारें व त्यांचे अधिष्ठान असणारें जें नित्य व शुद्ध असें चित्स्वरूप तत्त्व आहे तोच आत्मा होय असा अंतिम सिद्धान्त प्रजापतींनी इंद्राच्या मनावर ठसविला. इंद्राला आत्मस्वरूपाचा बोध करून दिल्यावर प्रजापती त्याला म्हणतात, " मघवन्मर्त्य वा इदं शरीरमात्रं मृत्युना तदस्यामृतस्याशरीरस्यात्मनोऽधिष्ठानमात्तो वै सशरीरः प्रियाप्रियाभ्यां न ह वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिस्त्यश्रीरं वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः ।। (छां. उ. ८.१२.१) अर्थात् हे इंद्रा, हें शरीर मर्त्य आहे, मृत्यूने ते आधीच ग्रासलेलें आहे. परंतू या मर्त्य शरीरांत तो अविनाशी व अशरीरी आत्मा वास करतो. जोवर जीवाला " मी शरीर आहे " असा शरीराभिमान असतो तोवर तो प्रिय व अप्रिय यांनी ग्रासलेला असतो. पण शरीराभिमान सोडल्यानंतर स्वभावतः अशरीर असलेल्या त्या जीवाला मग प्रिय स्पर्श करीत नाहीत. स्व-रूपसाक्षात्काराने तो प्रिय व अप्रिय पलीकडे जातो. प्रजापतींनी इंद्राला देहाभिमान टाकण्यास अर्थ आपण फक्त मी देह आहे हा अभिमान टाकावयाचा नसून मी मन आहे, मी बुद्धि आहे, " मी अहं आहे " हा अभिमानसुद्धा सोडावयाचा असतो. अशा रीतीने ज्या साधकाला "मी देह नाही, मी मन नाही, मी बुद्धि नाही, मी अहंकार नाही, तर मी सच्चिदानंदस्वरूप आत्मा आहे " अशी प्रत्यक्षानुभूति होते तो साधक याच देहांत व याच जगांत मुक्त होऊन जातो.

## ।। श्रीराम समर्थ ।।

श्री. रवींद्र माळवदे (कराड)
मो.९४०४६६०४५४

**आत्मरूप गणेशु केलिया स्मरण । सकल विद्यांचे अधिकरण ।**
**तेचि वंदू श्रीचरण । श्रीगुरुचे ।।**

आत्मरूप गणेशाचे स्मरण करून, सकल विद्यांचे आश्रय, असे जे श्रीगुरुंचे श्रीचरण, त्यांना नमस्कार करु.

**शरीरं सुरुपं तथा वा कलत्रं**
**यशश्चारू चित्रं धनं मेरुतुल्यम् ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे।**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।**

अरोग्यसंपन्न, सुदृढ, देखणे व कमनीय शरीर मिळाले, सुंदर व सुडौल पत्नी लाभली, दृष्ट लागण्या सारखे यश मिळाले, डोंगराएवढ्या धनाच्या राशी संपादन केल्या आणि मन जर श्री सद्गुरुच्या चरणकमळांशी सुस्थिर नसेल तर या सगळ्याचा काय उपयोग ? त्याने कितीसे सुख मिळेल ? जन्म-मरणातून सुटका होईल का? पूढे काय ?

शरीर वृद्धत्वाकडून मृत्यूकडे जाईल, पत्नीचे सौंदर्य व डौल वृद्धत्व हिरावून घेईल. सर्व संपत्ती सुखाची साधने मिळवून देईल पण सुखरूप करेल का?

अज्ञानातून ज्ञानाकडे नेणारे श्री सद्गुरु प्रसन्न झाले तरच जीवाची जीवदशा संपून जन्म-मरणातून सुटका होते. सुखरूपता (ब्रह्म स्वरुपाची,अखंड आनंदाची,सद्चिदानंद स्वरूपाची) प्राप्ती होते. म्हणून श्री सद्गुरूंच्या शरणागतीमध्ये तसेच सेवेमध्येच मनुष्य जन्माचे खरे सार्थक आहे. (कल्याण आहे )

कारण

**गुरु तेथे ज्ञान । ज्ञानी आत्मदर्शन ।**
**दर्शनी समाधान । आथी जैसे ।।**
**ते चालते ज्ञानाचे बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ ।**
**येर माणूसपण ते भांब । लौकिक भागु ।।**

चित्ताची एकाग्रता म्हणजे समाधान, एकाग्रता म्हणजे एक भावात (अद्वैत स्वरूपात) स्थिती म्हणजे समाधान व ही अद्वैत अवस्था श्री सद्गुरू कृपेने होते म्हणून श्री सद्गुरुंना शरण जाऊन त्यांची सेवा करावी. श्री सद्गुरूंची सेवा करणे म्हणजे काय? तर त्यांनी सांगितल्याप्रमाणे आचरण करावे. श्री सद्गुरु आम्हाला शास्त्राप्रमाणे आचरण करण्यास सांगतात.

कारण

**पै अहितापासूनी काढिती । हित देऊनी वाढविती ।**
**नाही गा, श्रुतीपरौती । माऊली जगा ।।**
**म्हणौनि ब्रह्मेसी मेळवी । तव हे कोणे न संडावी ।**
**अगा तुवाही ऐसीची भजावी । विशेषेसी ।।**
**हे विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य ओलावा ।**
**आणि हेचि परमसेवा । मज सर्वात्मकाची ।।**
**तैसे स्वामीचिया मनोभावा । न चुकिजे हेचि परमसेवा ।**
**येर ते गा पांडवा । वणिज्य करणे ।।**

म्हणून

**शास्त्र म्हणेल जे सांडावे । ते राज्यही तृण मानावे ।**
**जे घेववी ते न म्हणावे । विषही विरु ।।**

शास्त्राप्रमाणे आचरण (कर्म, उपासना) करत असता मल, विक्षेप दोष जातात. पुढे कर्मसाम्यदशा येऊन श्री सद्गुरूंची भेट होते.

माऊली म्हणतात

**हे असो विषयजाती । बुद्धी पोळली ऐसी माघौती ।**
**पाउले घेऊनि एकांती । हृदयाच्या रिगे।।**
**धरवणी वेचे सरे । तैसे भोगे प्राचीन पुरे।**
**नवे तव नुपकरे । कांहीची करूं ।।**
**ऐसी कर्म साम्यदशा । होय तेथ विरेशा ।**
**मग श्रीगुरु आपैसा । भेटेची गा ।**

श्री सद्गुरु कृपेने आवरण दोष जातो, आवरण दोष म्हणजे अज्ञान

**आपला आपणपेयां । विसंरू जो धनंजया ।**
**तेचि रूप यया । अज्ञानासी ।।**
**ना राती ना तेज। ते संधि जेवी सांज ।**
**तेवी विरुद्ध ना निज । ज्ञान आथी ।।**
**ऐसी कोण्ही एकी दशा । तिये वादु अज्ञान ऐसा ।**
**तया गुंडलिया प्रकाशा । क्षेत्रज्ञु नाम ।।**

जीवाला आपले स्वरूप ब्रह्म आहे (अद्वैत स्वरुप, अविनाशी स्वरूप) व निराकार स्वरूप आहे असे ज्ञान नसलेने तो नाशवंत अशा देहाला (आकाराला) आपले स्वरूप समजतो व विषयात सुख समजतो. देहसत्य भावामुळे (द्वैतभाव, अहंकार) व विषयासक्ती मुळे तो जन्म-मृत्यूरूपी दुःख भोगतो व जन्म-मृत्यूच्या मध्ये त्रिविधतापरुपी दुःख भोगतो.

हा देहसत्यत्वभाव (द्वैत भाव) जो स्वरुपाच्या (अद्वैत भाव) अज्ञानामुळे होणारा आहे. ते अज्ञान (आवरण दोष) श्री सद्गुरु ‘‘ तत्त्वमसि ‘‘ य़ा महावाक्याद्वारा घालवितात व जीव देहात असतानाच (जीवनमुक्त स्थिती ) प्राप्त करुन घेतो व त्याची जन्म-मृत्यू पासून सुटका होते. तो नित्यमुक्त होतो.

**मग आलिंगिला पूर्णिमा । जैसा उणीव सांडी चंद्रमा ।**
**तैसे होय विरोत्तमा । गुरुकृपा तया ।।**
**तेंव्हा अबोधुमात्र असे । तो तंव तया कृपा नासे।**
**तेथ निशिसवे जैसे । आंधारे जाय ।।**
**नातरी श्रीगुरुवचना । दिठी देतु जतना ।**
**शिष्य आत्मभुवना । माजी पैसे ।।**
**परी हेचि आत्मसिद्धी । जो कोणी भाग्यनिधि ।**
**श्रीगुरुकृपालब्धि । काळी पावे ।।**

स्वामींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आपण २००० साली स्मरणिका प्रथम प्रकाशित केली होती. त्यातील प्रस्तावना......

# प्रस्तावना

## अर्घ्य

'' ईश्वरानन्द '' नांवाची ही स्मरणिका आपणा सर्वांचे हाती सुपूर्त करताना अतिशय आनंद होत आहे. जी विभुती शिवस्वरूप होती तिचेच नांव, ज्या महात्म्याच्या आठवणी लिहिल्या आहेत तो जीवनमुक्त असा महात्मा व ज्यांनी त्या लिहिल्या आहेत ते सर्व भक्त असे की ज्यांच्यावर या योगी विभुतीने कृपानुग्रहपूर्वक छत्र धरले आहे, असा समसमा संयोग झाल्यावर जे जे होईल ते उत्तम, उदात्त, महन्मंगलमय न होईल तरच नवल.

स्मरणिकेत प्रकाशित करण्यासाठी छायाचित्रे, लेख, कविता, स्तोत्रे असे वाङ्मय देऊन सर्वांनी ही स्मरणिका समृद्ध करण्यासाठी जे सहकार्य केले आहे त्या सर्वांच्या ऋणात राहाण्यातच आनंद आहे.

डॉ. एम. बी. जोशी यांनी ' संगणक '' की '' सद्गुरू '' आणि '' क्षेत्रसंन्यासी प.पू. श्रीईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामीमहाराज, कराड ''हे लेख देऊन जी वाङ्मयीन शोभा वाढवून त्या शोभेला प्रासादिकता आणून दिली आहे, त्याबद्दल सोहळा समिती त्यांची ऋणी आहे.

ही स्मरणिका उत्तम होण्यासाठी कु. कमलताई, कु. सुशिलाताई, कु. विजूताई, वे.शा.सं.श्री. विनायकशास्त्री गरुड यांनी विशेष कष्ट घेतले आहेत.

स्मरणिकेचे अक्षरमुद्रणाचे काम करणारे श्री. मोहन जोहारी, मुखपृष्ठाचे काम करून देणारे श्री. मोहन हरकरे व अत्यंत उत्कृष्ट छपाई करून ज्यांनी दिली ते ममता ऑफसेट फर्मचे श्री. अरुण झंवर ह्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

हे सर्व वाङ्मय अर्घ्य आपल्या हाती देताना जे चांगले झाले आहे ते '' इदं न मम '' या भावनेतून असून जर काही चुका झाल्या असतील तर त्या माझ्या समजून उदार अंतःकरणाने क्षमा करावी.

**श्रीकांत जोशी**

## सन २००० साली झालेल्या प. प. स्वामींच्या शताब्दी महोत्सवाची कार्यक्रम रूपरेषा

# प.पू. श्रीईश्वरानन्द सरस्वती जन्मशताब्दी सोहळा, कराड

## कार्यक्रमाची रूपरेषा

| दिनांक | वेळ | ठिकाण | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| २६-११-२००० रविवार मार्गशीर्ष शु॥ प्रतिपदा | सकाळी ७.००<br>सकाळी ७.३० | श्रीभैरव मंदिर<br>प्रीतिसंगम | श्रीभैरव अभिषेक<br>श्रीगंगापूजन |
| | सकाळी ७.४५ | श्रीराधाकृष्ण मंदिर | श्रीगोमाता पूजन |
| | सकाळी ८.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | नित्यपूजा व अभिषेक |
| | सकाळी ८.३० | श्रीस्वामी समाधी मंदिर | उदकशांती |
| २७-११-२००० सोमवार मार्गशीर्ष शु॥ प्रतिपदा | सकाळी ६.३० | श्रीस्वामी समाधी मंदिर | रुद्राभिषेक व नित्यपूजा |
| | सकाळी ८.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | पुण्याहवाचन, प.पू. श्रीस्वामीपादुका, प्रतिमा व श्रीमद्‌भागवत ग्रंथ यांची शोभायात्रा |
| | सकाळी ११.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | प.प.जगद्‌गुरू श्रीविद्याशंकर भारती (करवीर पीठ, कोल्हापूर) यांचे ''प.प.श्रीचंद्रशेखर भारती सभामंडप'' येथे आगमन, स्वागत व पूजन. श्रीजगद्‌गुरूंचे शुभहस्ते ध्वजारोहण, आशीर्वाद व श्रीस्वामी स्मरणिकेचे प्रकाशन |
| | सकाळी ११.३० | श्रीस्वामी समाधी मंदिर | वे.शा.सं.श्री. नंदकिशोरजी पुराणिक (गोंदीकर, जालना) यांचे श्रीव्यासपूजन व श्रीमद्‌भागवत ग्रंथाचे पूजन. श्रीमद्‌भागवत कथा ज्ञानयज्ञ प्रारंभ - श्री. नंदकिशोरजी पुराणिक |
| | दुपारी१.३० ते ३.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | विश्रांती |
| | दुपारी ३.०० ते ५.३० | श्रीस्वामी समाधी मंदिर | श्रीमद्‌भागवत कथा - श्री.पुराणिक |
| | सायं ५.३० | श्रीस्वामी समाधी मंदिर | आरती |
| २८-११-२००० मंगळवार ते २-१२-२००० शनिवार | सकाळी ७.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | नित्यपूजा व रुद्राभिषेक |
| | सकाळी ९.३० ते १२.०० व दुपारी ३.०० ते ५.३० | श्रीस्वामी समाधी मंदिर | श्रीमद्‌भागवत कथा - श्री.पुराणिक |

...... पुढील पानावर पाहा.

| | | | |
|---|---|---|---|
| ३-१२-२००० रविवार | सकाळी ७.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | नित्यपूजा व रुद्राभिषेक |
| | सकाळी ७.०० | श्रीराधाकृष्ण मंदिर | श्रीगीताहवन यज्ञ |
| | सकाळी ९.०० ते ११.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | श्रीमद्‌भागवत कथा सांगता समारंभ |
| | सकाळी ११.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | प.पू. श्रीस्वामीपादुका, प्रतिमा व श्रीमद्‌भागवत ग्रंथ यांची शोभायात्रा |
| | दुपारी १.०० | स्वयंवर मंगल कार्यालय (रॉयल टॉकिजमागे) | महाप्रसाद |
| | सायं ७.३० | श्रीस्वामी समाधी मंदिर | हरिकिर्तन व आरती (ह.भ.प. श्रीपेंढारकरमहाराज) |
| ४-१२-२००० सोमवार मार्गशीर्ष शु।। अष्टमी | सकाळी ७.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | नित्यपूजा व रुद्राभिषेक |
| | सकाळी ७.०० | श्रीराधाकृष्ण मंदिर | श्रीनारायणसूक्ताचे मंडलहवन |
| | सकाळी ११.०० | श्रीराधाकृष्ण मंदिर | श्रीआराधना सोहळा |
| | दुपारी १.०० | स्वयंवर मंगल कार्यालय | महाप्रसाद |
| | सायं ६.०० | श्रीस्वामी समाधी मंदिर | आरती व ध्वजावतरण |

❑ ❑ ❑

**विषय** : भगवंताचे स्मरणाव्यतिरिक्त जेथे आपणांस सुख लाभते तो विषय समजावा.

**वैराग्य** : भगवंताचे विस्मरणाला जे कारणीभूत होते ते सोडणे म्हणजे वैराग्य.

**विवेक** : भगवंताचे सतत स्मरण राहील अशी गोष्ट म्हणजे विवेक.

**प्रपंच** : विषयांच्या संगतीत परमात्म्यापासून वेगळे असणे म्हणजे प्रपंच.

**परमार्थ** : भगवंताचे आठवणीत प्रपंच करणे म्हणजे परमार्थ.

**संकलक - श्रीकांत जोशी**

# अखिल भारतीय श्रीपण्डित परिषद्

## वाराणसी

मातुरन्नपूर्णायाः सेवायै

## अर्हतु पण्डितयशः

### अखिलभारतीयश्रीपण्डितपरिषदः प्रशासनम्

श्रीपण्डितवरेण्य ईश्वरानंद सरस्वती

लोकोत्तरक्रियाभिः स्वसम्भावनाया अशेषजनातिरिक्तत्वेन करणात्

धर्म-श्रीः

इति पदप्रदानेन सभाजयति।

रा. जी. गलगाले
अध्यक्षः

मधुसूदन शास्त्री
मधुसूदन शास्त्री
प्रधानमन्त्री

अखिलभारतीय-श्रीपण्डितपरिषदः


दिनांकः

# ।। प. प. स्वामींची जन्म कुंडली ।।

।। श्री ।।


परमहंस परिव्राजकाचार्य धर्मश्री: श्रीईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामी यांची जन्म कुंडली

जन्म दिनांक : ३० मे १९००
गोत्र : गार्गेय





।। शुभम् भवतु ।।

परमहंस परिव्राजकाचार्य धर्मश्री: श्रीईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामी यांची संन्यासदीक्षा-दिन कुंडली
दीक्षा दिनांक : २२ नोव्हेंबर १९२५




।। शुभम् भवतु ।।

# प. पू. श्रीस्वामींचे हस्ताक्षरातील स्तोत्रे


स्वरूपानुसंधानस्तुतिः
तपोयज्ञदानादिभिः शुद्धबुद्धिर्विरक्तो नृपादेः पदे तुच्छबुद्ध्या
परित्यज्य सर्वं यदाप्नोति तत्त्वं परं ब्रह्म नित्यं तदेवाहमस्मि ॥१॥
दयालुं गुरुं ब्रह्मनिष्ठं प्रशान्तं समाराध्य मत्या विचार्य स्वरूपं
यदाप्नोति तत्त्वं निदिध्यास्य विद्वान् परं ॥२॥
यदानन्दरूपं प्रकाशस्वरूपं निरस्तप्रपञ्चं परिच्छेदहीनं ।
अहंब्रह्मवृत्त्यैकगम्यं तुरीयं परं ॥३॥
यदज्ञानतो भाति विश्वं समस्तं विनष्टं च सद्यो यदात्मप्रबोधे ।
मनोवागतीतं विशुद्धं विमुक्तं परं ॥४॥ निषेधे कृते
नेति नेतीति वाक्यैः समाधिस्थितानां यदाभाति पूर्णं ।
अवस्थात्रयातीतमद्वैतमेकं परं ॥५॥ यदानन्दलेशैः
समानन्दि विश्वं यदाभाति सत्त्वे तदाभाति सर्वं । यदालोचने
रूपमन्यत्समस्तं परं ॥६॥ अनन्तं विभुं निर्विकल्पं निरीहं
शिवं संगहीनं यदोंकारगम्यं । निराकारमत्युज्ज्वलं मृत्यु-
हीनं परं ॥७॥ यदानन्दसिन्धौ निमग्नः पुमान्स्यादविद्या-
विलासः समस्तप्रपञ्चस्तदा न स्फुरत्यद्भुतं यन्निमित्तं
परं ब्रह्म नित्यं तदेवाहमस्मि ॥८॥ स्वरूपानुसंधानरूपां
स्तुतिं यः पठेदादराद्भक्तिभावो मनुष्यः शृणोतीह वा
नित्यमुद्युक्तचित्तो भवेद्विष्णुरत्रैव वेदप्रमाणात् ॥९॥

॥ ब्रह्मज्ञानावलीमाला ॥
सकृच्छ्रवणमात्रेण ब्रह्मज्ञानं यतो भवेत् । ब्रह्मज्ञानावलीमाला
सर्वेषां मोक्षसिद्धये ॥१॥ असंगोऽहं असंगोऽहं असंगोऽहं
पुनः पुनः । सच्चिदानंदरूपोऽहं अहमेवाहमव्ययः ॥२॥
नित्यशुद्धविमुक्तोऽहं निराकारोऽहमव्ययः । भूमानंदस्वरूपो
ऽहं अहमेवाहमव्ययः ॥३॥ नित्योऽहं निरवद्योऽहं निराकारोऽहम
व्ययः । परमानंदरूपोऽहं अहमेवाहमव्ययः ॥४॥
शुद्धचैतन्यरूपोऽहं आत्मारामोऽहमेव च । अखण्डानन्दरूपोऽहं
अहमेवाहमव्ययः ॥५॥ प्रत्यक्चैतन्यरूपोऽहं शान्तोऽहं प्रकृतेः
परः । शाश्वतानंदरूपोऽहं अहमेवाहमव्ययः ॥६॥ तत्त्वातीतः परात्माहं
मध्यातीतः परः शिवः । मायातीतः परंज्योतिः अव्ययः ॥७॥
नानारूपव्यतीतोऽहं चिदाकारोऽहमच्युतः । सुखरूपस्वरू-

पोऽहं अव्ययः ।। मायातत्कार्यदेहादि मम नास्त्येव सर्वदा
स्वप्रकाशैकरूपोऽहं अहमेवाहं अव्ययः ।।७१।। गुणत्रयव्यतीतोऽ
हं ब्रह्मादीनां च साक्ष्यहं ।। अनन्तानन्तरूपोऽहं अव्ययः ।।७२।।
अन्तर्यामीस्वरूपोऽहं कूटस्थः सर्वगोऽस्म्यहं ।। परमात्म
स्वरूपोऽहं अव्ययः ।।७३।। निष्कलोऽहं निष्क्रियोऽहं सर्वात्मा
द्यः सनातनः । अपरोक्षस्वरूपोऽहं अव्ययः ।।७४।।
द्वंद्वादिसाक्षिरूपोऽहं अचलोऽहं सनातनः ।। सर्वसाक्षी

एव च ।। अकर्ताहमभोक्ताहं अव्ययः ।।७५।। निराधार
स्वरूपोऽहं सर्वाधारोऽहमेव च ।। आप्तकामस्वरूपोऽहं
अव्ययः ।।७६।। तापत्रयविनिर्मुक्तो देहत्रयविलक्षण
अवस्थात्रयसाक्ष्यस्मि अव्ययः ।।७७।।
दृग्दृश्यौ द्वौ पदार्थौ स्तः परस्परविलक्षणौ । दृग्ब्रह्म
दृश्यं मायेति सर्ववेदांतडिंडिमः ।।७८।।
अहं साक्षीति यो विद्याद्विविच्यैवं पुनः पुनः ।। स एव
मुक्तः स विद्वानिति वेदांतडिंडिमः ।।७९।।
घटकुड्यादिकं सर्वं मृत्तिकामात्रमेव च ।। तद्वद्ब्रह्म
जगत्सर्वमिति वेदांतडिंडिमः ।।८०।।
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ।।
अनेन वेद्यं सच्छास्त्रमिति वेदांतडिंडिमः ।।८१।।
अंतर्ज्योतिर्बहिर्ज्योतिः प्रत्यग्ज्योतिः परात्परः ।।
ज्योतिर्ज्योतिः स्वयंज्योतिरात्मज्योतिः शिवोऽस्म्य

ॐ

।। श्री शृङ्गेरी श्रीजगद्गुरुसंस्थानम् ।।

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य पदवाक्यप्रमाणपारावारपारीण यमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणसमाध्यष्टाङ्गयोगानुष्ठाननिष्ठ तपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्न श्रीशंकराचार्य गुरुपरम्पराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्य व्याख्यानसिंहासनाधीश्वर सकलनिगमागमसारहृदय सांख्यत्रयप्रतिपादक वैदिकमार्गप्रवर्तक सर्वतन्त्रस्वतन्त्रादिराजधानीविद्यानगरमहाराजधानीकर्णाटकसिंहासनप्रतिष्ठापनाचार्य श्रीमद्राजाधिराजगुरुभूमंडलाचार्य ऋष्यशृङ्गपुरवराधीश्वर तुङ्गभद्रातीरवासि श्रीमद्विद्याशंकरपादपद्माराधक श्रीजगद्गुरु श्रीचन्द्रशेखरभारतीस्वामिगुरुकरकमलसञ्जात

श्रीजगद्गुरु शृङ्गेरी श्रीमदभिनवविद्यातीर्थस्वामिभिः ॥

परमहंसश्री विभूषितानां ईश्वरानन्दसरस्वतीस्वामिनां विषये प्रत्यग्ब्रह्मैक्यानुसन्धानपुरस्सरं विरचिताः शुभाशिषः समुल्लसन्तु।।

भवन्तो जगदाचार्याणां ब्रह्मतां गतानां अस्मदाचार्यचरणानां वरिवस्यां सम्यक् कृतवन्तः। तन्मुखादेव प्रस्थानत्रयस्य सानुग्रहप्रवचनं प्राप्य त्रय्यन्तविद्यां समधिगतवन्तः। तदनुग्रहलब्ध-दिव्यमहामन्त्राः देवान् साधु समुपासितवन्तः। प्रकृतितो वीतरागाः परोपकृतिप्रवणाः प्रशान्तस्वान्ताः कठिनतपसो भवन्तः अस्मदाचार्यमूर्तिप्रतिष्ठापनावसरे समागत्य आचार्यभक्तिं उपायनीकृत्य कृतकृत्या अभूवन्।

धर्मो हि विश्वस्य स्थितौ निदानं भवति। कालमहिम्ना जातया जनानां उपेक्षया धर्मो ह्रसिष्णुः जनाश्च अन्तश्शान्तिशान्तयोऽभवन्। तद् भवन्तः तत्र तत्र पर्यटनावसरे जनान् उपदेशवचोभिः धर्मं प्रबोधयन्तः धर्मजागृतिं जनयन्तु।। परमेश्वरस्य कृपां पोषयन्तु। आर्तान् सुखयन्तु।।

श्रीशारदाचन्द्रमौलीश्वरयोः अकम्पानुकम्पा-परम्परया चिरं समेधन्ताम्।।

२८-३-१९६२,
शृं गे री.

इति नारायणस्मरणम्

## जगद्गुरु श्रृङ्गेरी द्वारा प्रेषित पत्र का मराठी अनुवाद
## प.प. श्री. अभिनव विद्यातीर्थ यांनी
## प. प. स्वामींना पाठवलेल्या पत्राचा मराठी अनुवाद

श्री जगद्गरु श्रृङ्गेरी श्रीमदभिनवविद्यातीर्थ स्वामींचे परमहंस श्रीपद विभूषित श्री ईश्वरानन्द स्वामींना, ब्रह्मैक्यभाव अनुसंधानापूर्वक आनंदमय शुभ आशीर्वाद

ब्रह्मगतत्व प्राप्त झालेल्या आमच्या श्रीगुरुचरणांची त्यांनी मोठी सेवा केली आहे. आमच्या आचार्यांचे श्रीमुखातून प्रस्थानत्रयीवर सानुग्रह प्रवचने श्रवण करून त्यांनी लौकिक, परा व अपरा अशा त्रयीविद्या आत्मसात केल्या आहेत. आमच्या आचार्यांकडून कृपानुग्रहपूर्वक प्राप्त दिव्य महामंत्रांनी साधना करून त्यांनी देवतांची उत्कटपणे साधना केली आहे.

स्वामी स्वभावतःच वैराग्यशील, परोपकारप्रवीण, प्रशांतचित्त व महानतपस्वी असून आमच्या आचार्यांच्या मूर्तिप्रतिष्ठापना समारंभास प्रत्यक्ष उपस्थित राहून आचार्यभक्तीने कृतकृत्य झाले आहेत.

विश्वसंचलनात धर्माचा मोठा प्रभाव दिसून येतो. कालमानानुसार लोकांची धर्माबाबत वाढणारी उपेक्षाच लोकांच्या अशांतीचे कारण आहे. म्हणूनच स्वामींनी भ्रमणकाळात जिथे जातील तिथे लोकांना आपल्या उपदेशवचनांद्वारा धर्मप्रबोधन करून धर्मजागृतीचे कार्य करावे. परमशिवकृपेचा परिपोष करावा. आर्तजनांना सुखी करावे.

श्रीशारदाचंद्रमौलिश्वर भगवंताच्या अक्षय कृपेने त्यांची सर्वांगीण वृद्धी व्हावी.

इतिनारायणस्मरणम्

२८-३-१९६३

श्रृङ्गेरी

## ।। श्रीगुरुचरणारविंदाभ्यांनमः ।।

श्रीशृंगेरीपीठाधीशेभ्यः श्रीचरणेभ्यः प्रणतिविशेषाः ।
प्रार्थनाच हृदयनिस्सृता ।

श्रीचरणेषु प्रणामसहस्त्रपुरस्सरं विज्ञापना यद् गुरुचरणानां श्री ईश्वरानन्द सरस्वति स्वामी महाराजानां जन्मशतीनिमित्तं तथाच तेषां संन्यासग्रहण समारोहस्य पञ्चसप्तति वर्षाणि समतीतानि इत्यतः अमृतमहोत्सवरूपेण पुण्यस्मरणं श्रीचरणानां ससमारोहं समनुष्ठातुं भक्तजनसंघटनाया महोत्सवः उपकल्पितः । महाराष्ट्रेषु कराडनगर श्रीकृष्णा पावनतीरे श्रीस्वामीचरणांनां समाधिमन्दिरे आगामिनी ज्येष्ठमासि द्वितीयातः समारभ्य मार्गशीर्ष शु ।। अष्टमी पर्यन्तं विविधोप्रक्रमाणां समायोजनं कल्पितम्। ससंक्षेपतः स्वरूपं तस्य एवंविधम्।

※ ज्येष्ठ शु. ।। द्वितीया तिथौ शुभारंमनिमित्तं श्रीगणेशपूजन पुरस्सरं लघुरूद्रो अभिषेकः ।
※ आषाढ शुद्ध पूर्णिमायां श्रीगुरु-पूर्णिमा महोत्सवः ।
※ श्रीस्वामी महाराजानां कार्यगौरवार्थ स्मरणिकायाः प्रकाशनम्।
※ श्री नारायणसूक्त मण्डलस्य हवनम् ।
※ श्रीप्रस्थानत्रयी ग्रंथानां समूलचूलमं पारायणम्।
※ श्रीभागवत - पारायणम्
※ इन्दुवासरे मार्ग. शु ।। द्वितीया २७ नोव्हेम्बर २००० प्रारभ्य
भानुवासरे मार्ग. शु. सप्तमी ३ डिसेंबर २००० पर्यन्तं ।
जालनानिवासी वे.शा.सं. श्री नंदकिशोरजी पुराणिक महोदयाः
भागवत पठनं - निरूपणं च कर्तुं सिद्धाः।
※ श्री गीता हवनम्
※ श्रीस्वामी महाराजानां पुण्यतिथी निमित्तं समायोजनम् आराधनायाः। मार्ग. शुद्ध अष्टमी
इन्दुवासरे दि. ४-१२-२००० दिने । तत्र सायं. समारोह निमित्तं शोभायात्रा अपि समायोजिता।

सविनयं सप्रणामं सादरं साञ्जलिबद्धा प्रार्थना श्रीचरणेषु यद् श्रीचरणैः शुभाशिषाः प्रदातव्याः प्रसादश्च करणीयः समारोहार्थं तेन भक्तजनः संघटनाया उपकल्पितोऽ यं समारोहः सफलं मधुरं च पूर्णतां यास्यति। इति नो दृढो विश्वासः। श्रीचरणानां कृपाप्रसादोऽपि भक्तजनानाम् सामर्थ्यम् अद्वितीयम् इति वचनोऽसृत्य प्रार्थयामहे यद् -

" हे भगवन्तः यशोदं, सिद्धीदं करणीयम् । ''

श्रीचरण - वरांवदा
अध्यक्षा
श्री ईश्वरानन्द सरस्वती जन्मशताब्दी सोहळा समिती

श्री श्री जगगुरु शङ्कराचार्य महासंस्थानम्, दक्षिणाम्नाय श्री शारदापीठम्, शृङ्गेरी

**दक्षिणाम्नाय शृङ्गगिरि शारदापीठाधीश्वराणां अनन्तश्री विभूषितानां जगद्गुरु श्री श्री श्री भारतीतीर्थ महास्वामिनां शुभाशिषः ।**

काशीस्वामिन इति प्रथिताः परमहंसयतिवर्याः श्रीईश्वरानन्दसरस्वती स्वामिनः स्मद्गुरुपरम्गुरुचरणानामपारकृपाभाजनानि व्यराजन्त । वेदान्त तत्त्वचिन्तननिरता अपि ते यतिधर्मानुष्ठानपरायणास्सन्तः आदर्शभूता आसन । दयार्द्रहृदयास्सन्तः नैकेषां जनानां क्लेशान्निवार्य तान् सुखिनो व्यदधुः । मन्त्रशास्त्रेऽपि विशिष्टं परिश्रममास्थाय सुपरीक्षितशिष्येभ्यः मन्त्रदीक्षा अपि व्यतरन् । शृङ्गगिरिजगदुरुपरम्परायां महतीं भक्तिमास्थाय स्वशिष्यानपि तो भक्तिमुपादिशन् । विशेषतः अस्माकं महाराष्ट्रायात्रावसरे कराडक्षेत्रे अस्मदीययात्रा – व्यवस्थां सुष्ठ विधाय अस्मानत्यर्थमानन्दयन् ।

तेषां शताब्युत्सवं सन्यासस्वीकारस्य पञ्चसप्तत्यब्दपूर्तिमुपलक्ष्य अमृतोत्सवं च तच्छिष्याः सभक्तिश्रद्धं प्रवर्तयितुं कृतसंकल्पा वर्तन्ते, अस्मिन्नेवावसरे काचन स्मारिकाऽपि प्रकाश्यत इति च विदित्वा नितरां मोदामहे ।

श्रीशारदाचन्द्रमौलीश्वरयोर्निरवग्रहानुग्रहेण समेऽपीमे कार्यक्रमाः सुष्ठ सम्पद्यन्तां अत्र समवेता निखिला अप्यास्तिकाः श्रेयः परम्पराभिः समभिवर्धन्ता मित्याशास्महे ।

शृङ्गगिरिः
विक्रमज्येष्ठ शुद्धद्वादशी,
भौमवासरः । १३.६.२०००.

इति नारायणस्मरणम्

श्री श्री जगद्गुरु शङ्कराचार्य महासंस्थानम्, दक्षिणाम्नाय श्री शारदापीठम्, शृङ्गेरी

## दक्षिणाम्नाय शृङ्गगिरि शारदापीठाधीश्वराणां अनन्तश्री विभूषितानां जगद्गुरु श्री श्री श्री भारतीतीर्थ महास्वामिनां शुभाशिषः ।

काशीस्वामिन इति प्रथिताः परमहंसयतिवर्याः श्रीईश्वरानन्दसरस्वती स्वामिनः अस्मद्गुरुपरमगुरुचरणानामपारकृपाभाजनानि व्यराजन्त । वेदान्त तत्त्वचिन्तननिरता अपि ते यतिधर्मानुष्ठानपरायणास्सन्तः आदर्शभूता आसन् । दयार्द्रहृदयास्सन्तः नैकेषां जनानां क्लेशान्निवार्य तान् सुखिनो व्यदधुः । मन्त्रशास्त्रेऽपि विशिष्टं परिश्रममास्थाय सुपरीक्षितशिष्येभ्यः मन्त्रदीक्षा अपि व्यतरन् । शृङ्गगिरिजगद्गुरुपरम्परायां महतीं भक्तिमास्थाय स्वशिष्यानपिं तां भक्तिमुपादिशन् । विशेषतः अस्माकं महाराष्ट्रयात्रावसरे कराडक्षेत्रे अस्मदीययात्रा -व्यवस्थां सुष्ठु विधाय अस्मानत्यर्थमानन्दयन् ।

तेषां शताब्द्युत्सवं सन्यासस्वीकारस्य पञ्चसप्तत्यब्दपूर्तिमुपलक्ष्य अमृतोत्सवं च तच्छिष्याः सभक्तिश्रद्धं प्रवर्तयितुं कृतसंकल्पा वर्तन्ते , अस्मिन्नेवावसरे काचन स्मारिकाऽपि प्रकाश्यत इति च विदित्वा नितरां मोदामहे ।

श्रीशारदाचन्द्रमौलीश्वरयोर्निरवग्रहानुग्रहेण समेऽपीमे कार्यक्रमाः सुष्ठु सम्पद्यन्तां अत्र समवेता निखिला अप्यास्तिकाः श्रेयःपरम्पराभिः समभिवर्धन्ता -मित्याशास्महे ।

इति नारायणस्मरणम्

शृङ्गगिरिः
विक्रमज्येष्ठशुद्धद्वादशी,
भौमवासरः । १३.६.२०००.

## जगद्गुरू, श्रृङ्गेरी प.प. श्रीभारतीतीर्थ यांनी पाठवलेल्या संस्कृत पत्राचा मराठी अनुवाद

### श्री श्री जगद्गुरू शंकराचार्य महासंस्थानम्

काशीस्वामी या नावाने सुपरिचित असलेले परमहंसयतिवर्य श्री ईश्वरानन्द सरस्वति आमचे गुरू व परमगुरूंच्या अपार कृपेस अत्यंत पात्र होते. ते सदैव वेदान्त तत्व चिंतनात निमग्न राहूनही यतिधर्माचे अनुष्ठान करण्यात आदर्शभूत ठरले. त्यांचे हृदयी दर्याद्रभाव असल्यानेच त्यांनी असंख्य जनांची पीडा दूर करून त्यांस सुखी केले. मंत्रशास्त्राविषयी विशेष परिश्रम घेऊन शिष्यकल्याणार्थ सुपात्र शिष्यांना मंत्रदीक्षाही दिल्या.

श्रृङ्गेरी जगदुरुपरंपरेविषयी त्यांची प्रगाढ भक्ती होती. स्वशिष्यांनाही त्यांनी ह्या भक्तीचा मार्ग दाखविला. विशेषतः आमच्या महाराष्ट्राच्या विजययात्रेप्रसंगी त्यांनी कराडक्षेत्री आमची फार चोख व सुखद व्यवस्था ठेवली होती.

त्यांच्या जन्मशताब्दिनिमित्त तसेच त्यांच्या संन्याससस्वीकृतीस पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून त्यांच्या सश्रद्ध व भक्तिवान शिष्यजनांनी अमृतमहोत्सवाचे आयोजन केले आहे. तसेच या निमित्ताने एक स्मरणिकाही प्रकाशित केली जात आहे याचा आम्हास आनंद वाटतो.

श्रीशारदाम्बा व भगवान श्रीचंद्रमौलीश्वरांच्या कृपेने नियोजित सर्व कार्यक्रम सुफल संपन्न होतील व उपस्थित सर्व आस्तिकजनांची श्रेयवृद्धी होईल अशी आम्हास आशा वाटते.

इतिनारायणस्मरणम्

श्रृङ्गगिरी
विक्रम ज्येष्ठ शु।। द्वादशी
भौमवासरः ।१३-६-२०००

# प. पू. श्री ईश्वरानन्द सरस्वती जन्मशताब्दी सोहळा, कराड

कमलताई शिराळकर,
अध्यक्षा,जन्मशताब्दी सोहळा समिती, कराड

एप्रिल २००० मध्ये एका सायंकाळी आरतीनंतर कु. कमलताई शिराळकर यांनी सांगितले की हे वर्ष प.प. स्वामींच्या जन्मशताब्दीचे व प.प.स्वामींच्या संन्यासाश्रमास ७५ वर्षे पूर्ण करणारे आहे. तेव्हा त्यानिमित्ताने आपण काही धार्मिक कार्यक्रम करू. सर्वांनी कल्पना उचलून धरली व संपूर्ण नियोजनासाठी दि. २० एप्रिलला एक बैठक झाली. त्यामध्ये चर्चा होऊन एक सोहळा समिती स्थापन करण्यात आली व या सोहळ्याची सुरुवात प. प. स्वामींच्या जन्मदिनी म्हणजे ज्येष्ठ शु। द्वितीया दि. ४-६-२००० रोजी श्रीस्वामी मंदिरात श्रीगणेशपूजनाने करण्यात आली. प. प. स्वामींच्या समाधीवर लघुरुद्राने अभिषेक करण्यात आला.

नंतर आषाढ पौर्णिमा दि. १६-७-२००० रोजी गुरुपौर्णिमा उत्सव अतिशय आनंदात साजरा करण्यात आला. प. प. स्वामींच्या समाधीवर लघुरुद्राने, दूधाचा, आम्ररसाचा अभिषेक करण्यात आला दुपारी मंत्रजागर करण्यात आला. सायंकाळी भजनी मंडळ बोलावले होते. त्यांचा भजनाचा कार्यक्रम झाला. दुपारच्या प्रसादाची सोय श्री. श्रीधर किरपेकर यांचे घरी करण्यात आली होती.

या सोहळ्याच्या सांगतेनिमित्ताने श्रीमद्‌भागवत कथा ज्ञानयज्ञ करण्याचे ठरले व त्यानुसार कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. जालन्याचे श्री. नंदकिशोरजी पुराणिक यांना भागवतकथनाची विनंती करण्यात आली व त्यांनी ती आनंदाने स्वीकारली. दि. २६-११-२००० या दिवशी श्रीस्वामी समाधीवर रुद्राभिषेक व श्रीभैरव मंदिरात पण अभिषेक करावयाचे ठरले. या दिवशी श्रीगोमातापूजन होणार आहे. तसेच या दिवशी जिथे हा श्रीमद्‌भागवत ज्ञानयज्ञ संपन्न होणार आहे त्या स्वामीबागेत उदकशांती करावयाचे ठरले.

दि. २७-११-२००० ला सकाळी ७ वाजता प.प. स्वामीसमाधीवर रुद्राभिषेक व तदनंतर पुण्याहवाचनाने श्रीमद्‌भागवत कथेला प्रारंभ करण्याचे योजिले आहे

पुण्याहवाचनानंतर ठीक सकाळी ९ वाजता कराड शहरातून प.प. स्वामींच्या प्रतिमेची पादुकांची व श्रीमद्‌भागवतग्रंथाची शोभायात्रा काढण्याचे ठरले. नंतर श्रीमद्‌भागवतकथा ज्ञानयज्ञ सलग सात दिवस चालला व त्याची सांगता दि. ३-१२-२००० या दिवशी होईल. सांगतेच्या दिवशी सकाळी ७ वाजता श्रीराधाकृष्ण मंदिरात " गीताहवन ''हा यज्ञ करण्याचे ठरले. नंतर श्रीमद्भागवत कथन संपल्यावर पुनश्च शोभायात्रा काढावयाची ठरली. या सांगतेच्या दिवशी सायंकाळी ह.भ.प. श्री. पेंढारकर यांचे हरिकिर्तन ठेवले.

दि. ४-१२-२००० या दिवशी प.प. स्वामींची आराधना सोहळा ठीक १२ वाजता श्रीराधाकृष्ण मंदिरात पार पडला. तत्पूर्वी श्री. नारायणसूक्ताचे मंडलहवन झाले. याच वेळेला प्रस्थानत्रयीचे पारायण, आरण्यकपाठ, कृष्णयजुर्वेद पारायण झाले.

या संपूर्ण आठ दिवसांमध्ये बाहेरगावाहून येणाऱ्या भक्तांची राहण्याची व भोजनाची सोय करण्यात आली. आराधनेसाठी श्री. गरुड परिवाराने त्यांचे श्रीराधाकृष्ण मंदिर, भांडी, कुंडी सर्व मोफत उपलब्ध करून दिले. श्रीक्षेत्र कराड येथील सर्व ब्रह्मवृंद अतिशय आनंदाने या सर्व कार्यात सहभागी झाला. ही अतिशय अभिमानाची गोष्ट . या कार्यक्रमाच्या निमित्ताने ' संन्यासी परंपरा' या विषयांवर शाळांमधून वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या व सोहळा समिती तर्फे यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरवणार आहे.

प.प.स्वामींची "ईश्वरानन्द'' या नांवाने प्रकाशित होणारी स्मरणिका ही या सोहळ्याचे दुसरे आकर्षण होते. या स्मरणिकेत प.प. स्वामींचे अल्पचरित्र, भक्तांना आलेले अनुभव व स्वामींचे फोटो असे साहित्य प्रकाशित करण्यात आले.

असा हा जन्मशताब्दी सोहळा सुफल संपन्न होण्यासाठी सर्व देवतांचे आशीर्वाद तर होतेच; पण श्रृङ्गेरीच्या जगद्गुरूंनी आशीर्वाद पाठवले होते व श्री करवीर पीठाचे जगद्गुरू प.प. श्रीविद्याशंकर भारती यानी या कार्यक्रमाचे आमंत्रण स्वीकारून आम्हाला उपकृत केले.

# भागवत - भावामृत

**सच्चिदानन्दरूपाय विश्वोत्पत्यादिहेतवे ।**
**तापत्रयविनाशाय श्रीकृष्णाय वयं नुमः ।।**

सच्चिदानंद, सकलगुणनिधी, सकलऐश्वर्यविभूषित, सौंदर्यसागर भगवान श्रीकृष्ण तथा नारायणस्वरूप, पूजनीय, वंदनीय, प्रातःस्मरणीय, श्री ईश्वरानन्द स्वामीजीच्या चरणी साष्टांग वंदन करून श्रींच्या आज्ञेवरून यथामतीने भागवत-भावामृताचे विवरण करण्याची सेवा करितो.

**।। तुम्ही संत मायबाप कृपावंत। काय मी पतित किर्ती वानू ।।**

श्री तुकाराममहाराजांच्या या वचनानुसार पतित असतानासुद्धा संत व भगवंताचे गुण, लीला व कीर्तिवर्णनाची अलभ्य सेवा हाच भाग्योदय आहे.

भगवन् अवतार महर्षी वेदव्यासांनी भागवत-भावामृत संजीवनी देऊन अखिल मानवजातीवर महत् उपकार केलेले आहेत. याच ग्रंथराज श्रीमद्‌भागवतपुराणाचा आपण अल्पसा परिचय करून या भावामृताचे रसपान करणार आहोत.

स्वर्गामृत (देवअमृत) प्राप्त केलेले देवसुद्धा अमृतकुंभ घेऊन श्रीशुकदेवांकडे आले व म्हणाले, हे योगीराज, आमचे हे अमृत तुम्ही घ्या व तुमचे कथामृत आम्हाला द्या पण श्रीशुकदेवांनी रजोगुणी व अभक्त अशा देवांना हे कथामृत दिले नाही.

अशा देवदुर्लभ भागवतग्रंथाचे संपूर्णनाम '' श्रीमद्‌भागवत '' आहे. " श्रीमत् " ही संज्ञा केवळ गीता व भागवत या दोन ग्रंथासच जोडली जाते.

''श्रीमत '' या शब्दाचा विग्रह ''श्री + मत् " असा होतो.

" श्री '' म्हणजे शोभा व '' मत् '' म्हणजे संपन्न सर्वशोभायमान असा.

भागवतग्रंथाच्या श्रवणाने कान शोभायमान होतात तर भागवतशास्त्रपठणाने वाणी शोभायमान होते.

संपूर्ण शास्त्रपुराणांची परमशोभाच भागवतपुराण आहे व विद्वानांची परीक्षा (शोभा) भागवतशास्त्रातच आहे.

भागवतग्रंथाच्या अक्षराअक्षरांतून अक्षरब्रह्म भगवान श्रीकृष्णांची शोभा विलसत असल्याने '' श्रीमत् '' संज्ञा प्राप्त झाली आहे.

'श्रीमत् ' म्हणजे ऐश्वर्यसंपन्न. भगवान श्रीकृष्ण षड्गुण ऐश्वर्यसंपन्न आहेत. यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य हे षड्गुण भगवंताने या ग्रंथात स्थापन केले असल्याने यास ' श्रीमत् ' असे म्हणतात.

घेऊ या ग्रंथास 'भागवत ' असे प्रमुख नाम आहे. भागवत नामाच्या काही व्याख्या चिंतनात्मक पद्धतीने विचारात घेऊ.

(१) भगवतूरूपम् - भागवतम्

भगवान श्रीकृष्णांचे प्रत्यक्ष स्वरूप म्हणजे भागवतपुराण आहे.

लौकिक दृष्टीने भगवान श्रीकृष्ण निजधामात गेलेले असले तरी अलौकिकदृष्ट्या भगवान या ग्रंथातच प्रविष्ट झालेले आहेत.

जडमुढादी जीवांना भवसागरातून तरून जाण्यासाठीच वेदमहर्षी व्यासांनी या ज्ञानसागर भागवत पुराणांची निर्मिती केली.

अवतार कार्याच्या पूर्तीनंतर भगवान विश्रांतीसाठी क्षीरसागरात जात असत, परंतु भगवान म्हणाले की मी भागवतरूपी समुद्रातच अखंड विश्राम करणार आहे.

मूर्तीचे जे तीन प्रकार आहेत ते असे. (१) मृण्मयमूर्ती (२) चिन्मयमूर्ती व (३) वाङ्मयमूर्ती हा ग्रंथराज म्हणजे प्रत्यक्ष वाङ्मयमूर्ती भगवान श्रीकृष्ण होय.

२) भागवताणां पुराणं - भागवत पुराणम्

हा ग्रंथ भगवत् पुराण नसून भागवत् पुराण आहे. या पुराणात भावापेक्षा भक्तांच्या महिमेचे अत्याधिक वर्णन असल्याने ' भागवतपुराण ' हे नाम यथार्थ आहे

(३) भगवताप्रोक्तं – भागवतं

प्रत्यक्ष भगवंताने आपल्या मुखाने भक्तांचा महिमा गायिला असल्याने भगवताप्रोक्तं – भागवतं , अशी या नामाची शब्दव्युत्पत्ती आहे.

(४) भा + ग + व + त = भागवत

भागवत शब्दाचा विग्रह करून भा = चैतन्यमय प्रकाश ग = अलौकिक परगती देणारे. व = वरिष्ठ आणि त = तारक असा अर्थ होतो.

(५) भाति वेदेषु सर्वेषुगती सर्वत्र श्रोत्रयाः। वरिष्ठं सर्व शास्त्रेषु। तत्वं भागवतं विदुः।।

ऋग्वेदादि वेद, शास्त्र, पुराणांना बोलावणारा (भाति) असा हा ग्रंथ, पशुपशवादी योनी, पिशाच्चादी योनी व सकाळ जडजीवांना उत्तम गती देणारा असा ग्रंथ आहे.

भागवतशास्त्र हे मुक्ती प्रदान करणारे असल्याने सर्व शास्त्रांत वरिष्ठ आहे.

' अह ब्रह्मास्मि ' पासून ' तत्वमसि 'पर्यंत चारही महावाक्यांची प्रचिती देणाऱ्या या ग्रंथास भागवतपुराण म्हणतात.

हे पुराणाचे ज्ञानदेखील परंपरायुक्त आहे. ज्ञान व ज्ञानी हे परंपरेनेच श्रेष्ठत्वाला पावतात. भगवान महाविष्णुनी हे ज्ञान पितामह ब्रह्मदेवांना चतुःश्लोकात दिले. (भागवत स्कन्द २ श्लोक क. ३० से ३३) हे ज्ञान पितामह ब्रह्मदेवांनी देवर्षी नारदांना दिले. देवर्षी नारदांनी या मानवतज्ञानाचा उपदेश महर्षी वेदव्यासांना केला. महर्षी वेदव्यासांनी केवळ या चतुःश्लोकावर चिंतन करत अनुष्ठप छंदात अठरा हजार श्लोकांत, द्वादश स्कंदांत, तिनशेपस्तिस अध्यायांत या महापुराणात निर्माण केले आहे.

या भगवंताच्या सतराव्या अवतारात अवतीर्ण असलेले महापुरुष भगवान महर्षी कृष्णदैपायन वेदव्यासांना साष्टांग वंदन करू या.धर्मावर श्रद्धा न ठेवणारे पुरुष मोक्ष न मिळविता जन्म–मरणाच्या चक्रात अडकतात. श्रद्धेनेच ज्ञानाची प्राप्ती होते. श्रद्धाहीन व संशयी माणसे अधोगतीला जातात, " संशयात्मा विनस्पति। '' या न्यायाने संशय जाण्यासाठी वा निर्माण होण्यासाठी भागवतशास्त्राची निर्मिती आहे.

भागवत कथा तीन माणसांचा उद्धार करते. (१) वक्ता, (२) श्रोता, (३) प्रच्छक जो कथा सांगतो तो वक्ता, जो श्रवण करतो तो श्रोता व कथाश्रवणात निर्माण झालेल्या संशयनिवृत्यर्थ विषयासंबंधाने व परार्थभावाने जो प्रश्न करितो तो प्रच्छक होय.

जोपर्यंत शरीरात चेतना आहे तोपर्यंत या दिव्य भागवतरसाचे पुनः पुनः पान करणे हितावह आहे. हा रस स्वर्गात नाही. स्वर्गनिवासी देवांनाही दुर्लभ आहे. हा रस केवळ मृत्युलोकात व भागवतग्रंथात आहे. देव रजोगुणांनी व्याप्त, भक्तिहीन व भावहीन असल्याने शुकदेवांनी त्यांना भागवतकथामृत दिले नाही.

भागवतकथामृताचा अधिकारी कोण आहे? ज्याचे ठिकाणी विनय, श्रद्धा, ज्ञान, भक्ती, वैराग्यादी गुण आहेत.तोच याचा अधिकारी आहे.

अशा प्रकारे वेदव्यासांनी भवार्णवातून तरण्याला या भागवतकथामृतरूपी कुंभाला आमच्या स्वाधीन केले आहे. या कुंभात स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग, कंप, वैवर्ण्य, अश्रुपात व प्रलय अशा अष्टसात्विक भावाची व्याप्ती आहे. या कुंभात श्रवणकिर्तनादी नवविधा भक्ती आहेत. या कुंभात शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स अद्‌भुत आणि शांत या नवरसांची प्राप्ती आहे. या कुंभात जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तूर्या व उन्मनी या पाचही अवस्थांची प्रचिती आहे. आणि या कुंभात सलोकता, स्वरूपता, समीपता व सायुज्यतेची उत्तम गती आहे. असा हा वाङ्मयरूपी श्रीकृष्णस्वरूपी कथामृताचा कुंभ आहे. या अमृतरसाचे पान करवण्यासाठीच हा 'कुंभमेळा' आहे. भरतवर्षाच्या भरतखंडात, जंबुद्वीपाच्या दंडकारण्यात, महाराष्ट्राच्या कराड या पुण्यनगरीत कृष्णाकोयनेच्या पावन प्रीतिसंगमावर पूज्यपाद श्री ईश्वरानन्द सरस्वती स्वामीजींच्या जन्मशताब्दीनिमित्त या भव्यदिव्य अशा

अमृतमहोत्सवाचे आयोजन श्रीस्वामीजींच्या भक्तगणांनी केले आहे. या भक्तगणांना मनोवंदना करितो. या भक्तगणांचे ' अहोभाग्यमहो भाग्यं ' म्हणावे लागेल की यांना श्रीपूजनीय स्वामीजींच्या दर्शनाची, सेवेची संधी मिळाली आहे. आचार्य विवेकचुडामणी ग्रंथात म्हणाले मनुष्यत्व, मुमुक्षत्व व महापुरुषांची सत्संगती ही भगवंताच्या कृपेशिवाय होत नाही. भगवंत कृपेचाच हा परिपाक आहे व सत्सेवेचा हा प्रसाद आहे. श्रीमद्आद्यशंकराचार्यजी महाराज एका अष्टकात म्हणाले

**कलंत्र धनं पुत्रपौत्रादि सर्वं। गृहं बान्धवाः सर्वमेतद्विजातम् ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरंघ्रिपद्मे। ततः किं ततः किं तत किं ततः किम् ।।**

सुंदर पत्नी, धन, पुत्र, पौत्र तसेच भाऊबंद इत्यादी प्रारब्धाने सर्व प्राप्त असेल. परंतु श्रीगुरूंच्या चरणी मनाची आसक्ती नसेल तर त्या प्रारब्ध सुखाचा काय फायदा? जीवनाची कृतकृत्यता सद्गुरूंच्या सेवेत आहे.

स्वामीजींच्या भक्तगणांनी आयोजलेल्या या अमृतमहोत्सवात श्रीगणेशपूजनापासून श्रीगुरुपौर्णिमा महोत्सव, श्रीस्वामीजींची कार्यस्मरणिका प्रकाशन, श्रीनारायणसुक्त मंडलहवन, वेदांताच्या प्रस्थानत्रयींचे पारायण, श्रीमद्भागवत पारायण, श्रीमद्भागवत गीताहवन, श्रींची समाराधना आणि श्रींच्या शोभायात्रेने कार्यक्रमांची सांगता होणार आहे. अशाअवर्णनीय भव्यदिव्य सत्संगात सेवेची संधी देणाऱ्या सोहळा समिती अध्यक्षा व समितीचे आजन्म ऋणी आहे.

भावनेच्या ओघात भागवत-भावामृताचे भाव व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या भावदर्शनात जर काही प्रमादांचे दर्शन झाले तर

**पायाच्या प्रसादे। काही बोलीलो विनोदे ।**
**मज क्षमा करणे संती। नाही अंगीभूत युक्ती ।।**

याप्रमाणे वाचकांनी, पाठकांनी क्षमा करावी.

तसेच आजतागायत ज्या महानुभावांनी भागवत पुराणाचा प्रसार, प्रचार केला त्यांचे केवळ नामनिर्देश करून लेखणीस विश्राम देतो. महर्षीव्यास - देवर्षीनारद, उग्रश्रवा सुतजी- महर्षी शौनक, योगीराज शुकदेव राजा परीक्षित, महर्षी मैत्रेय - महात्मा विदुरजी, भगवान श्रीकृष्ण भक्तराज उद्धव, नवनाथजी - राजा जनक अवधुत - राजा यदु तसेच आद्य श्रीशंकराचार्यमहाराज, श्रीमध्वाचार्यजी, श्रीरामानुजाचार्यजी, श्रीप्रभुपादस्वामी श्रीस्वामीश्रीधर, श्रीस्वामी दयार्णव, श्रीक्षेत्र पैठणनिवासी शांतिब्रह्म एकनाथमहाराज, यांचा तर भागवत एकादशस्कंदावर वारकरी सांप्रदायाची प्रस्थानत्रयीतील एक ग्रंथ ठरलेला ' नाथ भागवत.' हा ग्रंथ प्राकृत भाषेत वीस हजार ओव्यांत नाथांनी लिहिला आहे. काशीला हा " नाथ भागवत '' ग्रंथ हत्तीवरून मिरवणुकीने सन्मानित केला. अशी महती या ग्रंथाची व विद्वत्ता श्रीनाथांची आहे. श्रीडोंगरेजीमहाराज त्याचप्रमाणे नाशिक येथील विख्यात वेदवेत्ते श्रीहरिसूरिबाबा यांचे भागवत दशमस्कंदपूर्वार्धावरील ' भक्तिरसायन ' हा श्रेष्ठग्रंथ आहे. अशा कितीतरी ज्ञात-अज्ञात महाभागांना वंदन करू या.

**भवेभवे यथाभक्तिः पादयोस्तव जायते ।**
**तयाकुरुत्व देवेश नाथस्त्वं नो यतः प्रभो ।।**

पुनश्च द्वारिकाधीश भगवान श्रीकृष्णचरणी वंदन करून आणि पूज्यपाद नारायणस्वरूप श्रीइश्वरानन्द स्वामीजींच्या चरणकमली हे वाक्पुष्प समर्पण करितो.

आत्माब्रह्म मती ही विद्या, माया असे जाणुनी।
देव्हारा तनुचा सुमंगल ऱ्हदी, सिंहासनी स्थापुनी ।।
विषयांचे उपभोगसाधन पाहा, पूजेसी हे योजिले ।
ऐसे हे ईश्वरानंद आज नयनी, देखोनी मी वंदीले ।।

श्रीकृष्णार्पणमस्तु
जालना
विजयादशमी, दि. ७-१०-२०००

श्रीस्वामीचरणरज
**नंदकिशोर पुराणिक**



# ।। संगणक की सद्गुरु ।।

– डॉ. एम. बी जोशी, कराड

विज्ञानयुगाने जीवनाची सर्व अंगे व्यापून टाकल्याने धर्म, संस्कृती, नीती, साधना वा सद्गुरू यांबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पूर्वसूरींचे वाङ्मय कालबाह्य वाटू लागले आहे. शास्त्र आणि आध्यात्मशास्त्र यांत संघर्ष निर्माण झाल्याने समाजात सरळसरळ विज्ञानवादी आणि आध्यात्मवादी अशी विभागणी झाली असून विज्ञानवादी हे पुरोगामी तर आध्यात्मवाद्यांना सनातनी वा प्रतिगामी समजण्यात येत आहे. धर्म ही समाजात विषमता निर्माण करणारी संस्था असल्याचा सरळ आरोप धर्माचा विचार मांडण्याऱ्यांवर केला जात आहे. धर्म हे शास्त्र नसून शस्त्र आहे असा आक्षेप घेतला जात असून धार्मिक असणे हे मागासलेपणाचे लक्षण समजले जात आहे. हिंदूंच हिंदूधर्माची निंदानालस्ती करीत आहेत. हिंदूंनी आपल्या धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास न करता अशा ग्रंथांना तुच्छ लेखावे याचे वाईट वाटते. काट्याकुट्यांतून चालताना ‘‘ माझ्या पायाचे रक्षण करणाऱ्या चर्मकारा तुला वंदन असो.’’अशा अर्थाच्या अनेक ऋचा असणाऱ्या वेदांना आम्ही वर्णव्यवस्था आणून जातीव्यवस्था निर्माण करणारे म्हणून दूर लोटले आहे. वेदपठण व अन्य मंत्रपठण आता संगणकामुळे कालबाह्य वाटू लागले आहे. अशा विपरित अवस्थेत संगणक हाच गुरू वाटू लागला असल्याने ‘‘ सद्गुरू ’’कालबाह्य वाटू लागला आहे. संगणक षरीीं असल्याचा दावा केला जात आहे, पण त्यांना हे ठाऊक नाही की संगणक षरीीं असला तरी सद्गुरू तरीीं आहे. संगणक जड तर सद्गुरू चैतन्याचा पुतळा आहे. संगणक फक्त त्याला पुरविलेलीच माहिती देऊ शकतो तर सद्गुरू ‘ नित्यनूतन ’ ज्ञानाचा स्त्रोत पुरवित असतो. संगणक फक्त भौतिक जगाचा विकास कसा करावा याबाबत सांगू शकेल तर सद्गुरू भौतिक जगात राहून आध्यात्मिक विकास कसा साधावा, हे शिकवितो. संगणक संस्कृतीने मनुष्य भावनाशून्य व स्वार्थी झाला असल्याची कितीतरी उदाहरणे सांगता येतील. उलट सद्गुरू हा माणसातील देवत्व जागृत करून त्याला ’ विश्वात्मक ’ बनविण्याचा प्रयत्न करतो. संस्कृती, शील, चारित्र्य, परदुःख आदी गुणांशिवाय भौतिक विकास झाला तर काय होते याची अनुभूती आपण घेत आहोतच. ‘ साक्षरः इति राक्षसः ‘‘ याची प्रचिती सर्व क्षेत्रांत येत आहे. अशा विपरित परिस्थितीतही काही ‘ धर्मस्थापनेचे नर’ देवकार्य म्हणून ‘ धर्मो धर्मस्य रक्षितः’याची कास धरून आहेत. धर्माचा मौलिक विचार समाजात दृढमूल करण्यासाठी प्रयत्नरत आहेत हे आपले भाग्य आहे. अशा सात्विक सत्पुरुषांच्या सहवासाने समाजाचे स्वास्थ्य टिकून आहे. असे ‘ धर्म रक्षिते ‘‘ महात्मे ठायी ठायी असल्यानेच समाजाला थोडेफार सुखसमाधान लाभत आहे. अशा धर्मप्रतिष्ठितांपैकी धर्मश्रीः प.प. श्री ईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामी हे कऱ्हाडक्षेत्री होऊन गेले. त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या दैवी सामर्थ्याचा अनुभव घेणारे त्यांचे सत्शिष्य आपल्या सद्गुरूंचे गुणगान करून अभ्यासक व उपासक असणाऱ्या भक्तांच्या अनुभवविश्वात भर घालण्याचा हा वाङ्मयीन प्रयत्न करीत आहेत. यातील लेख हे वैयक्तिक अनुभवांचे कथन करीत असले तरी अन्य साधकांना ते निश्चितच मार्गदर्शन करतील यात शंका नाही. म्हणूनच हे पाथेय आपणा सर्वांच्या हाती देताना आम्हाला एक प्रकारचा सात्त्विक आनंद आणि गुरुसेवेची संधी मिळाल्याची कृतकृत्यता वाटत आहे.

**‘‘ अनित्यानि शरीराणि विभवो नैव शाश्वतः। नित्यः सन्निहितो मृत्युः। कर्तव्यो धर्मसंग्रहः ।। ’** शरीराचे अनित्यत्व जाणून व मरणाचे स्मरण ठेवून स्वधर्म स्वकर्तव्यकर्म करण्याचा ‘‘ धर्म ‘‘ पालन करण्यासाठी झटणे हाच मोक्ष आहे हे ध्यानात घेऊन धर्माचरण करणारे महात्मे विरळेच सापडतात. अशांपैकी प.पू. श्री काशीस्वामी हे होत. तरुणपणीच वैराग्याला वरून मधले दोन आश्रम न अवलंबिता त्यांनी एकदम चतुर्थाश्रम संन्यासाश्रम स्वीकारला होता, यावरून त्यांचे वैराग्य किती विवेकी होते याची प्रचिती येते. श्रुतींनी वर्णन केल्याबरहुकुम त्यांनी संन्याशाश्रमाचे परिपालन केले होते.

**दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं पिबेत जलम् ।**
**सत्यपूतां वदेद् वाचं मनःपूतंसमाचरेत् ।। (मनु. ६/४६)**

**सारांश:** दृष्टी शुद्ध ठेवून पाऊल टाकावे. वस्त्राने शुद्ध केलेलेच पाणी प्यावे. सत्य आणि शुद्ध अशी वाणी बोलावी.

मनाने पवित्र असा धर्मनिर्दिष्ट मार्ग आचरण करावा. यातील शब्दाला स्वामींनी आचाराचे स्वरूप दिल्याचे अनेकांनी अनुभविले आहे. या व अन्य संन्यासाश्रमातील आचारांचा तपशीलवार परिचय वे. शा. सं. विनायकराव गरुड यांनी आपल्या लेखांमधुन करून दिलेला आहे. तो आपण मननपूर्वक वाचावा म्हणजे कलीयुगात संन्यासाश्रम स्वीकारणे किती अवघड आहे याची कल्पना येऊ शकेल. तरीही स्वामींनी यतिधर्माचे तंतोतंत पालन केले होते. यावरून त्यांच्या मनोनिग्रहाची शक्ती किती प्रबल होती हे आपल्या ध्यानात येईल.या लेखाबरोबरच वे. शा. सं. ग़रुड यांनी आपणा सर्वाच्या माहितीसाठी कऱ्हाडक्षेत्री असलेली थोर यतिपरंपरा विशद करून ' आराधना '' म्हणजे काय हेही सशास्त्र स्पष्ट केले आहे

**'' यज्ञदान गवालंभन । संन्यासं पलपैतृकम ।**
**देवराच्य सतोत्पत्तिं कलौ पंच विवर्जयेत् '' ( गुरुचरित्र अ १२ श्लोक ९२)**

याचा अर्थ असा आहे : कलीयुगात यज्ञ , दान, गवालंभ नावाचा, मधुपरर्काचे वेळी करावयाचा विधी, व संन्यासग्रहण हे अतिशय अवघड आहे. तरीदेखील प.पू स्वामींनी हा आश्रम यथार्थपणे चालवून आत्मोद्धार आणि लोकोद्धार कसा केला, हे कऱ्हाडकरांनी व स्वामींच्या सतशिष्यांनीं जवळजवळ चाळीस वर्षे अनुभविले आहे.

भक्तीची आणि स्मृतीची भावगीते : प.पू:स्वामींच्या आठवणींमधूनही स्वामींचे नित्यदिनक्रमाचे दर्शन होते.त्यांच्या प्रत्येक कृतीमध्ये ईश्वरप्राप्तीची प्रीती कशी भरलेली होती, याचे तपशीलवार वर्णन करणारे लेख आपण अवश्य वाचावेत म्हणजे आपल्या कृतीमध्ये ईश्वरप्राप्तीची प्रीती कशी भरता येईल याचे आपणा सर्वाना मार्गदर्शन होईल. स्नानापासन दानापर्यंत ' धर्म '' कसा करावा याचे वस्तुपाठ देणारेही लेख यात समाविष्ट केलेले आहेत. स्वामींच्या सहवासात सतत असणाऱ्या सतशिष्यांना जो निजसुखाचा – निजानंदाचा लाभ झाला तो त्यांनी स्वतःपुरता न ठेवता सर्वाना ' प्रसाद ' म्हणून वाटला आहे. याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच. कारण आपले आध्यात्मिक अनुभव सहसा कोणी प्रगट करीत नाहीत. पण ज्यांच्यापढे ते प्रगट केल्याशिवाय राहवत नाही अशांपुढेच असे आध्यात्मिक अनुभव उघड केले जातात. त्याचा हेतू आपल्या अनुभवाच्या आधारे अन्य साधकांनाही त्यांची प्रगती साधता यावी हाच असतो.

साधकांना धन. दारा, समाधान, आदी भौतिक साधने सत्पुरुष देतात त्याचे कारण आपला साधक दुःचित्त असू नये हाच हेतू असतो. ऐहिक चिंता मिटल्यावर तरी त्याने पारलौकिक सुखाची कास धरावी असा हेतु असतो. अशा अनुभूतींचा ठेवा सर्वच सत्पुरुषांच्या जीवनचरित्राचा अविभाज्य भाग असतो. सिद्धी असल्या तरी प्रसिद्धीपासून दूर राहून त्या सिद्धींचा ''परताप'' निवारण्यासाठी योग केला जातो. तो केवळ लोकांची ईश्वरी सत्तेवरील श्रद्धा दृढ करण्सासाठीच. त्यामुळेच कोणाला रोगमुक्त करणे तर कोणाला ऋणमुक्त करणे, कोणाला नोकरी तर कोणाला घर अशा भौतिक गोष्टी देऊन त्यांचा भगवद्भाव वाढीस लावला जातो . अशा आठवणी या साधकाच्या दष्टीने कृतज्ञतेचे स्तोत्र असते. त्यामळे अन्य साधकांचेही मन आपोआप साधनेकडे वळते.

स्तवन हार : काही साधकांनी आपल्या सदगुरूंना काव्याचा सुमनोहार घातलेला आहे असा ' स्तवनहार '' भक्तिवीण गुंफता येत नाही. असे काव्यसुमनोहार मराठी. हिंदी, संस्कृत व आंग्ल भाषेत ज्यांनी गुंफले आहेत. त्यांना धन्यवाद. ही काव्यसुमने म्हणजे आपले सद्गुरू ''भावातीत'' ''त्रिगुणरहित'' आणि साक्षात ''परब्रह्म'' कसे आहेत हेच सांगावयाचे असते. ही स्तुती नसून वस्तुस्थिती असते केवळ '' ब्रह्मानंदी जीव जडावा । कृतार्थ व्हावे आपलेजीवन ' एवढाच हेतू असतो.

अशा या सर्वांगसुंदर चिरेबंदी वाड्याचे महाद्वार – मुखपृष्ठ सजविण्याचे कलात्मक कार्य करणारे श्री मोहन हरकरे, पुणे यांनी केले आहे. या ग्रंथाच्या संकल्पनेपासून संकल्पसिद्धीपर्यंत सर्व प्रकारची खटपट करणारे स्वामीभक्त सर्वांच्याच आदरास पात्र आहेत. वैयक्तिक नामोलेख करणे कोणालाही रुचणार नाही या ग्रंथाच्या वाचनाने संगणक की सदगुरू या प्रश्नाचे उत्तर आपणास नक्की मिळेल अशी खात्री वाटते. सर्वाना सर्वकाळी शाश्वत सुखाचा आनंदकंद देणारे सदगुरू सर्वानाच वंद्य आहेत. या निमित्ताने प. प़.स्वामींना ही वाक्सुमनांजली शब्दरूपाने वाहण्याची संधी दिल्याबद्दल संयोजकांना मन:पुर्वक धन्यवाद.

# ॥ भारतीय यती परंपरा ॥

वै.शा.सं. श्री. विनायक शास्त्री गरुड (एम.ए. संस्कृत)
४४१, सोमवार पेठ, कराड ४१५ ११०.
मो.९४२०४९३५०६

भारत हा जगाच्या पाठीवर एकमेव देश आहे, जिथे विविध परंपरा, आचार, विचार हजारो वर्षे चालत आलेल्या आहेत. भारताच्या विविध प्रांतांत प्राचीन काळापासून एक चातुर्वर्ण्य व्यवस्था अस्तित्वात आहे. याच व्यवस्थेला समांतर अशी चतुराश्रम व्यवस्था प्रचलित आहे. १. ब्रह्मचर्याश्रम, २. गृहस्थाश्रम, ३. वानप्रस्थाश्रम, ४. संन्यासाश्रम.

व्यक्तीच्या जन्मापासून साधारणतः आठव्यावर्षापर्यंतचा काळ बाल्यावस्थेत जातो. आठव्या वर्षी उपनयन होऊन ब्रह्मचर्याश्रमाचा स्वीकार होतो. या काळात नियमामध्ये राहून अध्ययनादी स्वकर्मे करावीत, विवाहानंतर गृहस्थाश्रम सांभाळावा व वयाच्या साधारणतः साठीच्या दरम्यान वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. यामध्ये भगवतचिंतनामध्ये काल व्यतीत करावा. या काळात गृहस्थजीवन व अन्य गोष्टींचे चिंतन करू नये. याचबरोबर निष्ठेने अग्निहोत्र कर्म आजीवन करून नंतर संन्यासाश्रम स्वीकारावा. त्यामध्ये अनेक मतप्रवाह व अनेक धर्मग्रंथांची अनेक मते आहेत त्याचा वेगवेगळ्या पद्धतीने अभ्यास होणे गरजेचे आहे. संन्यासी, यती, पारिव्राज अशा विविध संज्ञा ह्या धर्माचे पालन करणाऱ्यांना प्राप्त होतात. त्यांचे विविध अर्थ होतात.

भारतामध्ये विविध प्रांतांत वैयक्तिक रीतीने संन्यास घेण्याची परंपरा प्राचीन काळापासून होती. ह्याचबरोबर जगद्गुरू आद्यशंकराचार्य यांनी संन्यासधर्माचा एका विशिष्ट पद्धतीने पुरस्कार करून चार पीठे स्थापन केली त्यांच्यानंतर आजतागायत अविच्छिन्न संन्यासपरंपरा चालू आहे. मुख्य चार पीठे – १. जगन्नाथपुरी, २. शृंगेरी, ३. द्वारका, ४. ज्योतिषमठ ही होत. याशिवाय कांची पीठदेखील तसे प्रतिष्ठित आहे. करवीर, संकेश्वर अशी उपपीठे–देखील आहेत. याशिवाय विविध प्रांतांत संन्यासाश्रमाविषयी विधिविधाने, नियम, आचार, विचार सांगणारे मन्वादी स्मृतिग्रंथ, उपनिषदे, भाष्ये हे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. खरेतर हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. यती परंपरेविषयी वैदिक ग्रंथांपासून आजतागायत जी विविध विधाने उपलब्ध आहेत त्यांची वैशिष्ट्यपूर्ण संगती लावणे आवश्यक आहे.

संन्यासाश्रमातील तीन प्रमुख ग्रंथांना प्रस्थानत्रयी असे म्हणतात. १. ब्रह्मसूत्र भाष्य, २. दशौपनिषद्भाष्य, ३. गीताभाष्य हे ते ग्रंथ होत. यामध्ये मूळ ब्रहासूत्रे, दहा उपनिषदे व गीता यावर आचार्य आद्य शंकराचार्य यांचे रसाळ भाष्य आहे. या तीनही ग्रंथांचे आपआपल्या मतांमध्ये द्वैत–अद्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत अशा विविध प्रकारे तत्त्वविवेचन करणारे आचार्य होऊन गेले आहेत. त्या त्या आचार्यांनी आपापल्या विचारांचे प्रतिपादन विविध भाषा व तत्वप्रणाली, मतप्रणालीमध्ये केल्याचे दिसते. यावर अनेक विद्वानांनी २० व्या शतकात आपले पाण्डित्यपूर्ण प्रबंध विद्यापीठांना सादर केल्याचे दिसते.

संन्यासश्रमामध्ये कोणत्या आचारांचे पालन करावे वगैरे जे नियम मन्वादी स्मृतींनी कायम केले त्यांचे थोडक्यात या ठिकाणी लोकांच्या माहितीकरिता विवेचन पुढे करीत आहोत. संन्यासाचे नित्यनैमित्तिक असे संध्या–वंदनादी कार्यदेखील वेगळ्या पद्धतीने आहे. त्यांची वर्णने अनेक ग्रंथांत येतात. मनुस्मृतीच्या सहाव्या अध्यायात या संन्यासी धर्मग्रहणाचे व आचारांचे वैविध्यपूर्ण नियम ग्रंथित झालेले आहेत. थोडक्यात, ते असे आहेत–

ब्रहाचर्यादी आश्रमामधील जीवन पूर्ण झाल्यावर क्रमाने जितेंद्रिय होऊन जीवनाचा अंतिम काळ ब्रह्मचिंतनात घालवावा, याकरिता भिक्षाटनादी नियम पाळावेत. संन्याशाने एका गावात अधिक काळ राहू नये. त्याने जे परिभ्रमण करावयाचे आहे तेदेखील नियमात राहूनच करावे. त्याचबरोबर भिक्षा मागायची ती गृहस्थाकडे व तीही अशाकडे की जेथे पंचमहायज्ञ रोज होतात, अतिथी कधीही विन्मुख होऊन जात नाहीत अन्यथा संन्याशाने

फलादीभिक्षा ग्रहण करून जीवन कंठावे. संन्याशाने अग्निसंपर्क करू नये, म्हणजेच स्वतः स्वयंपाक करून भोजन करू नये.

संन्याशाने पूर्वाश्रमीच्या देव ऋषी-पितृ या ऋणांतून मुक्तता मिळाल्यावरच पुढील धर्माचे पालन करावे. माणसाला वरील तीन ऋणे अत्यंत महत्वपूर्ण आहेत. ती मान्य करून त्यांची उतराई होणे आवश्यक आहे. विधिपूर्वक वेदाध्ययन, धर्मानुसार आचरण व गृहस्थाश्रम पालन करून विधिवत यज्ञानुष्ठाने करावीत व नंतरच मोक्षाचे साधन असा हा आश्रम घ्यावा, अन्यथा आपत्ती ओढावतात.

संन्याशाने अत्यंत पवित्र कमंडलू, दण्ड, रक्तवस्त्रे धारण करून मौन धारण करून संन्यास धर्माचे आचरण करावे, इच्छेकडे प्रवृत्त करणाऱ्या भोगवस्तूंचा त्याग करावा. शारीरिक, मानसिक सुख उत्पन्न करणाऱ्या वस्तूंचा त्याग करावा. एकाकी राहून सतत ब्रह्मचिन्तन करावे. संन्याशाने नेहमी अग्नीपासून दूर असावे. गृहादी वस्तूंचा त्याग करावा. स्थिर बुद्धी ठेवावी. ब्रह्मविषयक ध्यान करणारा व ब्रह्माच्याच ठिकाणी बुद्धी ठेवणारा असा संन्यासी असावा.

भिक्षेकरिता कपाल फुटके मातीचे भांडे, राहण्याकरिता वृक्षाच्या मुळाचा भाग, जुन्या झाडाच्या सालीचे वस्त्र व एकटेपण आणि सर्वांच्याविषयी ममता दाखवावी. जगणे आणि मरणे याविषयी उदासीन वृत्ती राखावी, पावसाळ्यात एका जागेवर दोन महिने राहावे. म्हणून संन्याशाचा चातुर्मास आषाढ, श्रावण असा दोन महिन्याचाच असतो बाकी दहा महिने त्याने सर्वत्र संचार करावा.

संन्याशाने नेहमी सत्य बोलावे. कोणालाही त्रास होईल असे बोलू नये. दोषरहित, कठोरतारहित, मधुर बोलावे. कोणाचीही खरी-खोटी निन्दा करू नये.

पुढे एक मनुस्मृतीतील महत्त्वपूर्ण श्लोक देत आहे, तो एक सुभाषित म्हणूनसुद्धा पाहता येतो. तो खरा संन्याशाचा आचार सांगणारा श्लोक आहे.

**दृष्टिपूतं न्यसेत्पदं वस्त्रपूतं पिबेत जलम् ।**
**सत्यपूतां वदेद्वाचं मनः पूतंसमाचरेत् ।। (मनु. ६/४६)**

दृष्टी शुद्ध ठेवून पाऊल टाकावे, वस्त्राने शुद्ध केलेले पाणी प्यावे, सत्य आणि शुद्ध अशी वाणी बोलावी. मनाने पवित्र असा धर्मनिर्दिष्ट मार्ग आचरण करावा, सर्वांशी वैरभावाचा त्याग करावा. क्रोधाचा त्याग करावा.

अशा प्रकारे जीवनात निरपेक्ष पद्धतीने वागावे याविषयी विविध नियम निरनिराळ्या स्मृती व धर्मग्रंथ संन्याशांना सांगतात. या सर्व आचरणांचा आपण आपल्या जीवनात थोडासा जरी अंतर्भाव केला तरी जीवनाचा उत्कर्ष साधण्यात आपल्याला मदत होऊ शकते. अशा प्रकारे आचरण करणाऱ्या संन्याशांच्या दर्शनाने वा स्मरणाने सकल पापांचा नाश होतो.

अग्निमीले नमस्तुभ्यं ईषेत्वोर्जेलसत्तनुः ।।
अग्न आयाहि वीतये शंनोदेवी स्वरूपवान् ।।



## ।। संन्यास आश्रम - एक शाश्वत वैदिक परम्परा ।।

डॉ. श्रीमती अंजली चन्द्रशेखर पोळ,आळंदी

आपल्या सनातन वैदिक जीवनप्रणालीचा एक अंश संन्यास ज्याप्रमाणेच ब्रह्माचर्याश्रम ,गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम त्याप्रमाणेच संन्यास हाही एक आश्रम आहे, एक व्यवस्था आहे. ही वैदिक आश्रम व्यवस्था सगळ्यांच्या जीवनात यथायोग्य वेळी आली पाहिजे, पण आपण त्यांचा स्वीकार करतो किंवा नाही, ही दुसरी गोष्ट.

' आश्रम' शब्दाचा अर्थ ' श्रमाची मर्यादा ' कोणत्या व्यक्तींनी कोणते काम करावे ? कोणत्या योग्यतेची व्यक्ती कशा प्रकारे काम करू शकेल? याचा विचार यात केला जातो.

ब्रह्माचर्याश्रम अध्ययनाचा आश्रम आहे त्यात केवळ ग्रंथपठणच नसते, तर आचरणाचे धडेही असतात. सदैव अभ्यास असतो नियम-संगम सहिष्णुतेचे महत्व असते.

गृहस्थाश्रमही केवळ भोगासाठी नाही तर भोगाच्या इच्छांना, वासनांना मर्यादित करण्यासाठी आहे. गृहस्थाश्रम याचा अर्थ गृहस्थाचे मर्यादित श्रम. मर्यादित, संयमित जीवन व्यतीत करणे म्हणजेच गृहस्थाश्रम होय.

वानप्रस्थाश्रम आश्रमात गृहस्थाश्रमापेक्षाही अधिकच संयमित व मर्यादित जीवन व्यतीत करण्याचा अभ्यास असावा लागतो.

आता संन्यास आश्रम म्हणजे काय ? तर ' जीवन श्रमाच्या मर्यादांपासून मुक्त करण्याचे साधन ' आजकाल लोकांच्या मनात संन्यास आश्रमाबाबतचे जे अज्ञान आहे, भ्रम आहे, त्याच्या निवारणासाठी 'आराधने' सारखे महोत्सव केले जातात. आराधना करण्यामागचा उद्देश जो की आज संन्याश्रमाबद्दलची विसरलेली मर्यादा लोकांच्या लक्षात यावी. या आश्रमाची आवश्यकताही सर्वांना माहीत व्हावी हाच असतो. ही वैदिक आश्रम व्यवस्था आपल्या जीवनासाठीसुद्धा एक अत्यंत आवश्यक जीवनप्रणाली आहे याची आठवण आराधने मधून दिली जाते.

संन्यास शब्दाची व्युत्पत्ती -
संन्यास = सं + नि + आस।
' सं ' म्हणजे सम्यक रीतीने, शास्त्रोक्त विधिने
'नि 'म्हणजे पूर्णरूपाने
'आस' म्हणजे क्षेपण करने, फेकणे, त्याग करणे,
अशा प्रकारे संन्यास याचा अर्थ ' शास्त्रोक्त विधिपूर्वक पूर्णतया त्यागणे.'

वास्तविक आपल्या बाल्यावस्थेपासूनच त्याग करण्याची शिकवण आपल्याला दिली जाते. जेव्हा लहान मुले बरीवाईट गोष्ट तोंडात घालायला लागतात, तेव्हाच त्याचे आईवडील त्याला त्याबद्दल शिकवत असतात. या गोष्टीला स्पर्श करू नकोस, हे खा, खाऊ नकोस, अशा प्रकारे मुलांच्या समोरच विधिनिषेधात्मक विभाग सुरू होतात. कारण जर प्रत्येक वस्तूचा अनुभव घेऊनच मी ती वस्तू सोडेन किवा ग्रहण करीन ही प्रणाली तर मानवाच्या जीवनाचा सत्यानाश करणारी ठरेल. म्हणूनच शिक्षण वा आदेशाच्या स्वीकाराशिवाय मानवजीवन पद्धती सुव्यवस्थित किंवा सुचारू पद्धतीने चालूच शकणार नाही.

श्रुतीमध्ये वर्णन आहे-

'न्यास एषां तासां अतिरिक्तं आहुः । '

अर्थात या संसारामध्ये जेवढी तपे आहेत,त्यात ' संन्यास ' सर्वात मोठी तपस्या आहे. संन्यास याचा दुसरा अर्थ "शास्त्र अविरुद्ध विवेकपूर्वक पूर्णरूपाने आपल्याच अद्वितीय परब्रह्म स्वरूपात बसणे. "

जीवनात त्याग आणि स्थिती या दोघांचाही उचित समन्वय प्रकट करण्यासाठी हा संन्यास आश्रम

कोणतेही स्थान, व्यक्ती, वस्तू यांच्याशी आपला संबंध न मानणे ही संन्यासाश्रमाची एक उच्च कोटीची अवस्था आहे.

एक सत्पुरुष महात्मा होते. त्यागी होते. नदीच्या काठाकाठाने फिरत एका ठिकाणी आले. लोकांमध्ये त्यांच्याबद्दल अतिशय श्रद्धा उत्पन्न झाली. लोक म्हणू लागले, फार मोठा त्यागी महात्मा आहे, तपस्वी आहे, संन्यासी आहे, आपल्यातच रममाण आहे, तत्त्वनिष्ठ आहे. राजापर्यंत कीर्ती गेली, राजा त्यांच्याजवळ आला, राजाचीपण त्यांच्यावर श्रद्धा बसली, त्यांचे शिष्यत्व राजाने पत्करले. राजा म्हटला, " महाराज! आपण येथेच राहावे, " राजाने त्यांना बंगला दिला. सर्व सुखसोयी पुरविल्या. आता महात्मा तिथेच राहावयास लागले. पाच-सहा महिन्यांनी राजा पुन्हा तिथे आला, त्याने म्हटले, " महाराज। आमच्यात आणि तुमच्यात आता काय फरक ? तुम्ही व आम्ही अगदी एकच झालो." संन्यासीमहाराज म्हणाले, " हो! हो ! ठीक आहे. राजन् तत्त्वदृष्टीने आम्ही आणि तुम्ही एकच आहोत. आता तुझी तत्त्वदृष्टी जागी झालेली दिसतेय. आणि माझी सुटून गेली आहे."

त्यानंतर संन्यासीमहाराज उठले, आणि म्हणाले, " राजा, चल नदीकिनारी जरा फिरून येऊ." जेव्हा फिरायला निघाले तेव्हा १ मैल, २ मैल, ३ मैल झाले तरीही संन्यासीमहाराज पुढेच चाललेले. शेवटी राजा म्हणाला," महाराज ! आपण फार लांब आलो, आता परत जाऊ या. " तेव्हा संन्यासीमहाराज बोलले, हे बघ राजा ! आमच्या मनात तर आज हिमालयाची यात्रा करावी असे वाटतेय, आमच्याबरोबर तू पण चल."

राजा म्हणाला, " महाराज! मी आपल्याबरोबर कसा येऊ? मला तर परवानगी घ्यावी लागेल. पत्नीला, मुलांना सांगावे लागेल, राज्यकारभार कोण करेल? मी आपल्याबरोबर कसा येऊ?

महाराज म्हणाले, " नाही! नाही! राजेसाहेब! चलाच. आमच्यात आणि तुमच्यात काय फरक आहे? आम्ही आणि तुम्ही तर एकच आहोत. जसे आम्ही चाललो तसे तुम्हीपण चला नं." राजा म्हणाला, "नाही, महाराज ! मला हे अशक्य आहे, असंभव आहे." महाराज म्हणाले, " राजेसाहेब! आता आपण येथेच राहा. आम्ही आता हिमालयाची यात्रा करायला निघालो आहोत. आम्ही आणि तुम्ही एकच आहोत, परंतु तुम्ही एका विशिष्ट चक्राच्या आत आहात, आम्ही मात्र त्याच्या बाहेर जात आहोत."

म्हणूनच पहिल्यांदा राजाने केलेली जी एकत्वाची भाषा ती पूर्णपणे जबानी जमाखर्चच ठरली.

ज्याच्या मनामध्ये ही कल्पना ठसली, की एक न एक दिवस सर्वांचाच त्याग करून जायचे आहे, तो संसारात कधीही आसक्त होणार नाही. दुसऱ्या लोकांसाठी त्याग करणे, त्याग करतच राहणे हा जीवनाचा केवढा तरी सर्वोच्च विकास आहे. संन्यास आश्रम हा कोणताही पंथ नाही, संप्रदाय नाही, संन्यास एक शाश्वत तत्त्वाच्या अभिव्यक्तीची प्रक्रिया आहे. म्हणून संन्यासाला आश्रमरूपात स्वीकारले गेले आहे. आश्रम म्हणजे आश्रय. आश्रय म्हणजेच अधिष्ठान. तेच सर्वाश्रय आहे. जिथे जगण्यासाठी आणि सुखासाठी अन्य कोणाचीही आवश्यकता राहत नाही तेच खरेखुरे संन्यासीजीवन होय,

**मी माझे ऐसी आठवण । विसरले जयाचे अंतःकरण।**
**पार्था तो संन्यासी जाण। निरंतर ।।**

ज्यांचा अहं अध्यास आणि " ममाध्यास " निवृत्त झाला तो निरंतर संन्यासीच आहे, ही ज्ञानेश माऊलींची तत्त्वनिष्ठ व्याख्या त्यांच्या ऋतंभरा व अनुभूतिसंपन्न प्रतिभेतून साकार झाली असून ती संपूर्ण उपनिषदांच्य तात्पर्यभूत अर्थाला सूत्ररूपाने परंतु अत्यंत स्पष्टरीत्या प्रकट करीत आहे.

ज्याला ब्रह्मातमैक्यानुभूती आहे तोच खरा संन्यासी. आराधनेद्वारे संन्यास धर्माचा जयजयकार करून, त्याद्वारे मनुष्याच्या जीवनात शाश्वत सत्याचे स्मरण करून दिले जाते. अशा प्रकारच्या चतुर्थ आश्रमाचे मूर्तिमंत पालन ज्यांनी केले त्या आपल्या प.प. श्री ईश्वरानन्द सरस्वतींचे आपण सर्वांनी कृतज्ञतापूर्वक स्मरण करून निरामय अशा शाश्वत ब्रह्मसुखात आम्हा सर्वांनाही लीन करून घ्यावे अशी त्यांच्या परम कोमलचरणी प्रार्थना करू या !

# ।। कराड येथील यती परंपरा ।।

वे.शा.सं.श्री. विनायकशास्त्री गरुड,
कराड.

कऱ्हाड हे गाव तसे छोटे आहे. एकेकाळी एक साम्राज्यशाली प्रांत म्हणून कृष्णेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेले एक राज्य म्हणून याचा करहाटक असा उल्लेख इतिहासात व पुराणांमध्ये सापडतो. अशा या नावात बदल होत जाऊन कराड हे आजचे कृष्णा-कोयनेच्या कुशीत वसलेले गाव या गावाला एक उज्ज्वल अशी धार्मिक, सामाजिक परंपरा प्राचीन काळापासून लाभली आहे. भारतीय धर्मशास्त्रामध्ये संन्यासाश्रम म्हणून जो चतुर्थाश्रम ओळखला जातो; त्यामध्ये आपले जीवन व्यतीत करून ईश्वर चिंतनात सारा काळ वेळ देऊन जगणारे जे लोक ते संन्याशी म्हणून ओळखले जातात. स्वामींची बाग म्हणून एक बाग म्हणजेच कराडचे सुपुत्र कै. यशवंतराव चव्हाण यांचे स्मारकस्थान. हे मुळचे संन्याशाचे परमधाम म्हणून ओळखले जायचे. परंपरेनुसार संन्याशांना त्यांच्या देहावसानानंतर जलसमाधी अथवा स्थलसमाधी दिली जाते. त्यानुसार देहावसानानंतर अशा स्वामी लोकांना विधिवत समाधी देण्याचे मान्यस्थान म्हणून ह्या बागेची ख्याती आहे. याच बागेत काही महत्त्वपूर्ण संन्याशी लोकांच्या समाध्या आहेत. त्यामध्ये श्रीपूर्णानंदस्वामींची समाधी आहे. श्रीपूर्णानंदस्वामी एक महान तपस्वी धर्माचरण करणारे होऊन गेले. त्यांचा वास कराड मुक्कामी होता.

कै. पण्डितवर विठोबा अण्णा दफ्तरदार हे एक कराडला भूषणावह असणारे व्यक्तिमत्त्व, ज्यांनी उभा जन्म महाराष्ट्र आपल्या किर्तनरंगात व ग्रंथरचनेने स्तब्ध केला. त्यांच्या चरित्रामध्ये ते एका संन्याशाकडे संस्कृतचा अभ्यास करत असल्याचा उल्लेख मिळतो. ते संन्याशी कराडातील भैरव मंदिरातच राहत असत.


गोंदवलेकर राममंदिर म्हणून जे एक कराडातील राममंदिर प्रसिद्ध आहे त्या राममंदिरात शांताश्रमस्वामी म्हणून संन्याशी होते. त्यांची आराधना आजदेखील प्रतिवर्षी होत असते. त्यांनी अंतः काळापर्यंत कोणाचाही स्पर्श करून घेतला नाही असे जुने जाणकार सांगतात.

श्रीगीतास्वामी म्हणून एक संन्याशी अराणके वाड्यात पूर्वी राहत असत. त्यांचा अधिकार फार मोठा असल्याचे सांगितले जाते. अत्यंत नियमात वावरणारे, सतत गीतेचा पाठ तोंडाने करणारे ते होते. गीता संपूर्ण पाठ असणे आणि त्यासंबंधी ज्ञानवत्ता असणे ह्या दोन गोष्टी भिन्न यांचा अधिकार मोठा, काशिस्थ पण्डित एकदा कार्यानिमित्त कराडला आले असता, त्यांना शास्त्राविषयी शंका उत्पन्न झाल्या त्यांनी कराडातील तत्कालीन पण्डितसभेसमोर या शंका मांडल्या. त्यावेळी सभेने तेथे उपस्थित असलेल्या श्रीगीतास्वामींकडे पाहिले. त्यावेळी स्वामीजींनी एकदोन गीतेतील श्लोक उच्चारले व त्यांचे मात्र संस्कृतात थोडक्यात विवेचन केले. तत्काळ सर्वांचे शंकानिरसन झाले.

प.प. श्री ईश्वरानन्द सरस्वती यांच्याविषयी काय सांगावे? भैरोबा मंदिरात राहून आपल्या तपसाधनेच्या जोरावर सतत मंत्रमुग्ध राहणारे व कराडचे नाव काशीनगरीपासून दक्षिणेत शृंगेरी मठापर्यंत उज्ज्वल करणारे ते होते. शृंगेरी पीठाचे पीठाधिश्वरांचे त्यांचे ठायी विशेष प्रेम होते. ते कराडवरून जाताना श्री ईश्वरानन्दांची भेट घेतल्याशिवाय जात नसत. श्रीईश्वरानन्दांचे सारे जीवन त्यांनी संन्यासधर्म रक्षण करण्यात घालवले.

तसेच हाटकेश्वर मंदिरात जसे अग्निहोत्री म्हणून होते त्यांनीसुद्धा अग्निहोत्र सेवेनंतर अंतकाळी संन्यास घेतला होता. आजचे करवीर पीठाचे अधिपती शंकराचार्य प.पू. श्रीविद्याशंकर भारती हे सुद्धा पूर्वाश्रमीचे कराडकर आहेत.

आज मात्र करहाटक क्षेत्रात संन्यस्त वृत्तीने राहणारी एकही व्यक्ती नाही, ज्या करहाटक प्रांतात कृष्णा कोयनेच्या संगमावर पूर्वी मात्र संन्याशांचे नित्य दर्शन होत असे.



## ।। यती परंपरेतील दीपस्तंभ ।।

श्री. रा. मी. पांगारकर, अहिल्यानगर

प्रातः स्मरणीय परम पूज्य काशीस्वामी तथा श्री ईश्वरानन्दस्वामींना वंदन करून श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज या एका महान, थोर दिगंतकीर्ती योग्यश्वराचा अल्पसा अल्पपरिचय यथापती करण्याचा एक अल्पसा प्रयत्न

तो मी वैकुंठी नसे। रविबिंबीहि न दिसे।
वरि योगियांचिही मानसे। उमरडोनि जाय ।। ज्ञानेश्वरी ।।
तयाचे चोरवटे मानसी। मी होऊनि असे क्षेत्रसंन्यासी।
जयाते निजेलियाही उपासी। वैराग्य गा।। ज्ञा.म.।।
श्रीवासुदेवानंद सरस्वती। भगवान स्वये दत्तमूर्ती।
समर्थ सद्गुरू पावनकिर्ती। चक्रवर्ती योग्यांचे ।।१।।
नास्तिकांचे उग्रकाळ। आस्तिकांचे बाप कृपाळ।
भक्त तारक दीन वत्सल। प्रणतपाळ महात्मे ।।२।।
ज्यांनी धर्म संस्थापिला। प्रचंड ग्रंथ समूह रचिला
लोक भक्तिपंथा लाविला। उद्धरिला आत्मबोधे ।।३।।

**पूज्य वासुदेवानंद सरस्वती महाराजांचे वर्णन –**

पै भवस्वर्गा उबगले। मुमुक्षु योगज्ञाना वळघले।
पुढती न यों इया निघाले। पैजा जेथ ।। ज्ञाने १५/२७७
अहंतादिभावा आपुलिया। झाडा देऊनि आघवेया।
पत्र घेती जया। मूळघरासी ।। १५/२७९
जया पुरुषाचे मन। सांडोनि गेले मोहमान।
वर्षांती जैसे घन। आकाशाते ।। २८५
तैसे सुखदुःखरूपी। द्वंद्वी जे पुण्य पापरूपी।
न घेपिजती सर्पी। गरुड जैसे ।। २९५
आणि अनात्मवर्गनीर। सांडूनि आत्मरसाचे क्षीर।
चरताती जे सविचार। राजहंस ।। २९६

या श्रीज्ञानेश्वरीतील ओव्यांमधून व्यक्त करिता येते.

श्रींचा जन्म सावंतवाडी संस्थानातील माणगाव येथे श्रावण व. ५ शके १७७९ या दिवशी झाला. त्यांच्या वडिलांचे नांव गणेशभट्ट टेंब्ये आणि आईचे नाव रमाबाई. पूज्य गणेशमट्ट टेंबे हे दत्तोपासना आचरित असतांना त्यांना तीव्र वैराग्य निर्माण झाले आणि त्यांनी संन्यास घेण्याचे ठरविले. परंतु श्रीदत्तदृष्टांतानुसार त्यांनी संन्यासाचा संकल्प सोडून गृहस्थाश्रम आचरिला. श्रीवासुदेवानंद हे जणु काय गणेशभट्टांच्या तपस्तेजाचे फलित होते. त्यांचे संस्कृत शिक्षण त्यांचे पितामह हरिभट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. वेदोपनिषदें, पंचमहाकाव्ये, ज्योतिषशास्त्र यांचा व्यासंग त्यांनी अल्पवयातच पूर्ण केला. त्यांचा विवाह शके १७९७ वयाच्या २१ व्या वर्षी झाला.

त्यांची पत्नी अन्नपूर्णाबाई अत्यंत सुशील पतिसेवारत होती. त्यांना एक मुलगा झाला. परंतु तो अकाली कालवश झाला.

मंत्रसिद्धी, ज्योतिष, वैराग्यशील व्यक्तिमत्त्व यामुळे अगदी लहान वयापासून त्यांच्याभोवती साधुत्वाचे वलय पसरू लागले.

तैसी दशेची वाट न पाहता। वयशेचिया गावा न येता।
बाळपणीच सर्वज्ञता। वरी तयाते ।। ६/४५३
मग तिथे सिद्धप्रज्ञेचिये लाभे। मनचि सारस्वत दुभे।
सकळ सारखे स्वयंभे। निघती मुखे ।। ५/४५४

आपल्या पित्याचा दत्तभक्तीचा वारसा त्यांनी उत्तम प्रकारे सांभाळला. एवढेच नव्हे तर स्वतःच दत्तस्वरूप बनून तो वारसा अपरिमित बनविला. वयाच्या २६-२७ व्या वर्षी ते प्रथम नरसोबावाडीस आले. तेथे गोविंदस्वामी नामक महात्म्याच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी दत्तोपासना आरंभिली. या वाडीतील उपासनेच्या काळात त्यांना वेळोवेळी श्रीदतात्रेयांचे साक्षात्कार झाले आणि प्रत्यक्ष दत्तगुरूंनीच त्यांना एका अवधूताचे रूपाने मध्यरात्रीचे वेळी कृष्णातीरी मंत्रोपदेश दिला. पूजाअर्चा, ध्यानधारणा याशिवाय योगाचाही अभ्यास त्यांनी या काळात केला.

वाडीहून माणगांवला परत जाताना त्यांनी एक दत्तमूती बरोबर नेली. एक छोटेसे दत्तमंदिर बांधून ते मंदिरातच राहू लागले. ते स्वहस्ते स्वयंपाक करून एकटे राहत आणि मौनव्रत पाळीत. सात वर्षे अशा पद्धतीने निग्रहाने श्रीदत्ताराधना केल्यावर शके १८११ मध्ये श्रीदत्तात्रेयांच्या इच्छेनुसार माणगांव सोडले आणि बरोबर केवळ एक तांब्या, एक धोतर-उपरणे व एक लुगडे घेऊन भ्रमंती सुरू केली. या भ्रमंतीच्या काळात घर सोडल्यानंतर २ वर्षांनी शके १८१३ मध्ये गंगाखेड या गांवी त्यांच्या पत्नीचे देहावसान झाले. पत्नी गेल्यावर तेराव्याच दिवशी त्यांनी संन्यासदीक्षा स्वीकारली व वासुदेवानंद सरस्वती हे नांव धारण केले.

संन्यासग्रहणानंतर त्यांनी काशीपासून रामेश्वरापर्यंत आणि द्वारकेपासून राजमहेंद्रीपर्यंत भारतभ्रमण केले आणि शास्त्राचरणाविषयी लोकांच्या मनात श्रद्धा निर्माण करण्याचे अथक प्रयत्न केले, त्यांनी अनेक ठिकाणी श्रीदत्तमूर्तीची स्थापना केली. दत्तोपासनेचा प्रचार केला आणि उपासनेला मौलिक अशा साहित्याची निर्मिती केली. त्यांची ही पदयात्रा केवळ २ छाट्या, २ लंगोट्या व कमंडलू एवढ्याच साहित्यानिशी सुरू असे. अनेक तीर्थक्षेत्री त्यांनी संन्यस्त जीवनातील चातुर्मास काढले. माणगांव, वाडी, ब्रह्मावर्त व गरुडेश्वर या ४ ठिकाणी त्यांच्या जीवनाचा बराच कालावधी व्यतीत झाला, श्रीगरुडेश्वरी असतानाच जेष्ठ वद्य ३० शके १८३६ या दिवशी रात्री श्रीदत्तात्रेयांच्यासमोर त्यांनी निजानंदी गमन केले.

श्रीवासुदेवानंद सरस्वतींची ग्रंथरचना फोर मोठी आहे. चार-पाच हजार पृष्ठांचा प्रचंड ग्रंथसंभार स्वामींच्या दत्तभक्तीचे, धर्मनिष्ठेचे, प्रगाढ चिंतनशीलतेचे आणि लोकोद्धाराच्या तळमळीचे प्रत्यंतर घडवितों, वर्णाश्रमोचित कर्तव्ये भक्तीच्या अधिष्ठानात सर्वांनी काटेकोरपणे आचरावीत यावर त्यांचा कटाक्ष असे.

श्रीगुरुटेंबेस्वामीमहाराज नृसिंहवाडीतील दत्तपूजकांना देव समजून त्याच्या इच्छेविरुद्ध वागत नसत. एके दिवशी त्यांनी समाधीअवस्थेत राहून एका स्त्रीभक्ताकरिता योगमायेने दुसरे शरीर धारण केले व तिची भिक्षा स्वीकारली.

त्याप्रमाणे श्रीदत्तप्रभू एकदा पूजाऱ्यांवर, बाप मुलांवर रागावतो तसे रागावले होते. पुजाऱ्यांनी ही गोष्ट महाराजांना कळवली तेव्हा स्वतः महाराजांनी श्रीदत्तप्रभूना अनेक प्रकारांनी आळविले व करुणा भाकली. ती करुणा त्रिपदी " शांत हो श्रीगुरुदत्ता '' प्रसिद्ध आहे.

नर्मदाकाठी कातरखेड गांवी एका संस्थानिकाने गुरुमहाराजांना भिक्षेला नेण्यासाठी लवाजमा व अंबारी घातलेला अन् श्रृंगारलेला हत्ती आणला, श्रीमहाराजांनी आपण न बसता पुजारी केशवभटजींना बसवले व त्यांना पूजादिक उपचार देववून मग आपण पूजा व भिक्षा स्वीकारली.

साठविला हरी। ज्यानी हृदयमंदिरी।
त्यांची सरली येरझार। झाला सफल व्यापार ।।
अगा योगी जो म्हणिजे। तो देवांचा देव जाणिजे।
आणि सुखसर्वस्व माझे। चैतन्य तो ।। ज्ञा ६/४८२
जीवु-परमात्मा दोन्ही। बैसोनि ऐक्यासनी।

जयाच्या हृदयमुवनी। विरजती
हे समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतिरसाचा ओतला भावो।
तो भक्तांमाजी रावो। आणि ज्ञानिया तोचि ।। ७/१३६
जयाचे वक्त्र । वाहे गुरुनामाचे नांव।
गुरुवाच्यावांचोनि शास्त्र। हार्ती न शिवे ।। १३/४४७
बाहेरी कर्म क्षाळला। भीतरी ज्ञाने उजळला।
इही दोही परी आला। पारवाबा एकता ।। १३/४६३
कां रत्नांचे दळवाडे। तैसे सबाह्य चोखडे।
आंत बाहेरी एके पाडे। सुर्यु जैसा ।। १३/४६२

असे ज्ञान-भक्ती-वैराग्य परिपूर्ण लीलाविग्रही, श्रीवासुदेवानंद सरस्वती ज्यांनी संन्यास धर्माचे उत्कृष्ट पालन करून आचारधर्माचे माहात्म्य पुनस्थापित केले त्या दीपस्तंभास कोटी कोटी प्रणाम "

अंतः शीतलतायास्यात्तदनंततपः फलम् ।
अप्यापदि दुरंतायां नैव मंतव्यमक्रमे ।

## धर्मश्रीः प.प.श्री इंश्वरानन्द सरस्वति एकविंशति नामावलिः

(१) श्रीचन्द्रशेखरभारतीस्वरूपाय नमः ।
(२) श्रीललिताार्चनप्रियाम नमः।
(३) श्रावैराग्यमूर्तये नमः ।
(४) श्रीधर्मशास्त्रपारंगताय नमः ।
(५) श्रीकृष्णास्नानसमुत्सकाय नमः ।
(६) श्रीदयासागराय नमः ।
(७) श्रीनिष्कलंकचारित्राय नमः ।
(८) श्रीकालभैरवनिकटनिवासिने नमः ।
(९) श्रीश्रीविद्याजपनिष्णाताय नमः।
(१०) श्रीमर्यादापुरुषोत्तमाय नमः।
(११) श्रीभक्तकामफलप्रदाय नमः !
(१२) श्रीभवव्याधिनिवारणाय नमः ।
(१३) श्रीप्राणायामपरायणाय नमः १
(१४) श्रीजिवनमुक्ताय नमः ।
(१५) श्रीविद्याविनयसंपन्नाय नमः।
(१६) श्रीसर्वदातृत्वमानसाय नमः ।
(१७) श्रीवीतरागाय नमः १
(१८) श्रीयोगमार्गतत्पराय नमः ।
(१९) श्रीआंजनेयस्वरूपाय नमः ।
(२० ) श्रीसत्यज्ञानस्वरूपाय नमः ।
(२१) श्रीधर्मश्रीः ईश्वरानन्द सरस्वती गुरवे नमः।

# आराधना सोहळ्याची माहिती

वे. शा.सं. श्री. विनायकशास्त्री गरुड, कराड.

भारतीय परंपरा अतिशय श्रेष्ठ दर्जाच्या आहेत, यात कोणताही वाद नाही. अशाच परंपरांमध्ये समावेश होतो, तो संन्याशी परंपरेचा या परंपरेमध्ये ब्रह्म विचार करण्याकरिता संन्यास दीक्षा घेतली जाते ही दीक्षा घेण्यापूर्वी दीक्षा घेणारी व्यक्ती पूर्वाश्रमीच्या सर्व गोष्टींचा त्याग करते ही दीक्षा घेण्यापूर्वी स्वत:ची सर्व श्राद्धादी कर्मे त्याच्याकडून केली जातात. त्यामुळे पूर्णपणे पुढील काळ ब्रह्म चिंतनामध्ये घालवता येतो स्वत: किंवा स्वत:चे कुटुंब अशा संकुचित विचारात ती व्यक्ती राहत नाही.

पुढे अन्त झाल्यावर अशा व्यक्तीचे दहन न करता तिचे पृथ्वीतत्त्वामध्ये अथवा जलतत्त्वामध्ये विलिनी करण केले जाते. यालाच समाधी असे म्हणतात. पुढे अकराव्या दिवसापर्यंत सर्व शास्त्रीय विधी केले जातात. अकराव्या दिवशी एकोदिष्टादी श्राद्धे त्यांच्या मुलाला अथवा शिष्याला करता येतात. प्रथम आराधना विधी चौदाव्या दिवशी केला जातो. नंतर प्रत्येक वर्षी हा आराधनाविधी करावा अशी शास्त्रवचने आहेत. आराधना म्हणजे पूजा आराधना या पूजाविभागामागे एक विशिष्ट पद्धत आहे.

ज्या दिवशी आराधना असेल त्यादिवशी प्रातः काळी पवमान पंचसुक्ते वा रूद्रपाठाने श्रीच्या तत्त्वाला अभिषेक करावा. शांत चित्ताने चांगले, शांत स्वभावाचे, उत्तम अभ्यासादीमध्ये तत्पर असणारे, चांगले धर्माचरण असणारे ब्राह्माण पाचारण करावेत. त्यांची संख्या १६, असावी, त्यांनी उत्तम सभामंडपामध्ये रंगावलीने सजवलेल्या पाटावर उपस्थित राहावे, त्यांपैकी पहिले गुरू, दुसरे परमगुरू, परमेष्ठी गुरू व परात्पर गुरू अशा चौघांना क्षण देणे म्हणजेच निमंत्रण देणे, त्यांचे त्या स्वरूपात ध्यान करणे. पुढे ज्या पक्षात आराधना असेल त्या पक्षाप्रमाणे पुढील १२ जणांचे क्षणदान करावे. म्हणजेच शुक्लपक्ष असेल तर केशवादी बारा व कृष्णपक्ष असेल तर संकर्षणादी बारा असे करावे

मग जी व्यक्ती आराधनेचा विधी करते तिने शुद्ध स्वरूपात येऊन आचमन करावे. पवित्रवादी धारण करावे प्राणायाम करून देशकाल, नक्षत्र, तिथी, वार यांचे स्मरण करून संकल्प करावा. " नारायण प्रित्यर्थ ब्राह्मिभूतस्य गुरोः समाराधनं करिष्ये।'

गंध, तुलसीपत्रे, कापूर, अशा सुगंधी द्रव्यांनी युक्त पाण्याने क्रमाने आवाहित ब्राह्मणाचे पाय धुवावेत. त्यांना आचमन करायला सांगून स्वतः दोनदा आचमन करावे. ब्राह्मणांचे पाय धुतलेले पवित्र तीर्थ दुसऱ्या एका तांब्यात एकत्रित घ्यावे. त्यांची स्थापनापूर्वक उत्तम वेदोक्त मंत्रानी गंधाक्षत पुष्पादी पवित्र गोष्टींनी पूजा करावी व पुढील श्लोक प्रार्थनापूर्वक म्हणावा.

आनंदमानंद करं प्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोध रूपं ।
योगींद्रवद्यंभवरोग वैद्यं श्रीमद्गुरूं नित्य महं नमामि।

या श्लोकाचा आशय असा की हे आनंदस्वरूप, प्रसन्न ज्ञानस्वरूप असे माझे गुरू जे योगी लोकाकडून पूजिले गेले आहेत, आणि संसाररूपी सागरामध्ये औषधरूपाने, वैद्यरूपाने विश्वाला मार्गदर्शन करतात त्यांना नेहमी माझा नमस्कार असावा. अशा प्रकारे कलशाची पूजा झाल्यावर प्रार्थनापूर्वक ब्रह्मस्वरूप अशा त्या कलशाची नमो नारायणाय या मंत्रानी, पुरुष सूक्तानी षोडषोपचार पूजा करावी.

नंतर त्याचबरोबर ब्राह्मणांची सत्कारपूर्वक पूजा करावी. ब्राह्मणांचे पुढे चौकोनी मंडले करून त्यावर पाने मांडून त्यावर पायसादी विशिष्ट द्रव्यांनी युक्त असे पदार्थ वाढून ते पदार्थ तुपानी युक्त करावेत. गायत्री मंत्राने पात्र प्रोक्षण करावे व हे वाढलेले सर्व अन्न माझ्या गुरूंकरिता आहे असा संकल्प करावा, मंत्र पाठ करावा व ' ब्राह्मणभोजन' करावे'योगींद्रमीडयम ' हा पाठभेद आहे

ब्राह्मण भोजन चालू असताना विविध वैदिक सुते, उपनिषदे, गीता आदींचा पाठ करावा

सुंदर जागेवरती चौकोनी मंडल गोमयांनी सारवून तिथे रंगावली काढून त्यावर पूर्वकलश ठेवून तिथे गंगादी तीर्थे भावना करून पुरुषसूक्ताने प्रत्येक ऋचेने 'तीर्थराजाय नमः' अशा मंत्रानी समस्तोपचार पूजा करून ते पात्र डोक्यावर धारण करावे व यजुर्वेदाच्या तैतरीय शाखेतील आनंद उपनिषद पाठ करावा.

हे आनंद उपनिषद म्हणजे सृष्टीतील पंचमहाभूते पंचेंद्रिये या संबंधाने अत्यंत महत्वपूर्ण गोष्टी उलगडून दाखवणारे आगळे वेगळे उपनिषद आहे. माणसाच्या जीवनात आनंद ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु हा आनंद फार काळ टिकत नाही. सर्वांत आनंद महत्त्वाचा आहे तो ब्रह्मानंद, तो फक्त यतिवर्यच मिळवू शकतात. तो वाणीने सांगता येत नाही आणि तो सर्वसाधारण गोष्टींपेक्षा अत्यंत भिन्न आहे. हे सर्व जो जाणतो तो खरा.

अशा उपनिषदांचा मनःपूर्वक पाठ झाल्यावर हरिनाम संकिर्तनपूर्वक हर्षोल्लासित होऊन नृत्य करत ते पात्र पुन्हा जागेवर ठेवावे. चंदनादींनी विशिष्ट पूजा करून बांधव शिष्य वर्गाने नमस्कार करावा.


सर्व ब्राह्मणांना प्रदक्षिणा घालावी. ही प्रदक्षिणा घालताना पूर्वीचा ''आनंदमानंद ''' हा श्लोक म्हणावा तसेच ''गुरुर्ब्रह्मा '' हा सुप्रसिद्ध श्लोक म्हणून नमस्कार करावा. ब्राह्मणांना, तीर्थराजाला नमस्कार करावा. तीर्थ कलशातील तीर्थ जठरामध्ये धारण करावे, त्याचे मंत्र

अविद्यामूलशमनं सर्वपाप प्रणाशनम् ।<br>
गुरू पादोदकंतीर्थ संसारद्रुमनाशम् ।।१।।<br>
शोषणं पापपंकस्य दीपनं ज्ञानतेजसः ।<br>
गुरोः पादोदकं तीर्थं पुत्र पौत्रप्रवर्धनम् ।।२।।

नंतर ब्राह्मणांचा संतोष झाल्यावर आपण मित्र-परिवारासह भोजन करावे. याप्रमाणे प्रतिवर्षी आराधना करावी. सोळा ब्राह्मण मिळणे व बोलावणे कठीण असेल तर आठ, चार वा दोन ब्राह्मण निमंत्रित करून आराधना करावी, अशा प्रकारे आराधनेचा विधी झाल्यावर हरिकिर्तन करावे.

(हा आराधनेचा सर्वसाधारण विधी आहे. याशिवाय जुन्या प्राचीन हस्तलिखित पोथ्यांमधून आराधना या विधीसंदर्भात विविध दाखले व कुलाचार, देशाचार स्पष्ट होतात. तो एक वेगळाच संशोधनाचा विषय आहे)

**हा लेख वे.शा.सं. कै. हरिअण्णा वासुदेव गिजरे यांच्या स्मृतीस सादरार्पण.**



।। श्री ।।

सरले काज या जन्माचे । दर्शन घडता गुरु चरणाचे ।।धु।।<br>
बन्ध मोक्ष हा भ्रम ना उरला। सुख दुःखाचा भाव निमाला<br>
भव सागर हा सहजचि तरला। जीवन झाले स्वानंदाचे ।।१।।<br>
विश्व कोंदले आनंदाने। मीतूपण हे मन ना माने<br>
कणकन भरला अद्वैताने। भान न उरले अस्तित्वाचे ।।२।।<br>
तव नामाने दिन उमलावा। तव स्मरणाने क्षण फुलवावा<br>
ब्रह्मानंदी जीव बुडावा। कृतार्थ जीवन निर्माल्याचे ।।३।।

(रचना: श्री. बाळूकाका कुलकर्णी)

# ।। आराधना उत्सव ।।

वेदमूर्ती श्रीकांत भट्ट चितळे, श्रीक्षेत्र आळंदी

वैदिक धर्म हा एक श्रेष्ठ असा आचार आणि विचारधारा सांगणारा धर्म आहे. सर्व जीवांचे धारण, पोषण करणे आणि त्यांचा सर्वांगीण उत्कर्ष करणे हे त्याचे प्रधान कार्य आहे. ' वेद 'हा या धर्माचा प्रमाणग्रंथ आहे. म्हणून याला वैदिक धर्म असे म्हणतात. श्रेयस आणि निःश्रेयसाचा म्हणजेच इह आणि परलोकीचा हा विचार करून जीवमात्रांना विशेषतः मनुष्यमात्राला हा मार्गदर्शन करतो.

कार्यनिश्चितीसाठी चार प्रमाणे मानली आहेत. प्रत्यक्ष प्रमाण, तर्क प्रमाण, शब्द प्रमाण आणि आत्म प्रमाण, आत्मप्रमाण सामान्यांसाठी नाही, प्रत्यक्ष आणि तर्क प्रमाणाने जेव्हा कार्य किंवा वस्तूबोध होत नाही तेव्हा वेदधर्म तेथे मार्गदशन करतो.

' प्रत्यक्षेणानुमित्यावा वस्तुपायोन बुध्यते एवं विदन्ति वेदेन तस्मात् वेदस्य वेदता ' अशी सायणाचार्यांनी वेदाचे प्रयोजन सांगितले आहे. शब्दप्रमाण हे वेदाचे बलस्थान आहे. त्यावर विश्वास, श्रद्धा ठेवून मार्गक्रमण करणारे सुखसमाधानाला पावले आहेत. देहधारी जीवनानंतरही एक जीवनयात्रा आहे आणि त्यालाही गती, अधोगती आणि मुक्ती आहे. उत्तम गतीसाठी गांठी सत्कर्मयुक्त असे पुण्य पाहिजे. पापाचरणाने अधोगती प्राप्त होते. मुक्तीला केवळ शुद्ध ज्ञानच पाहिजे

जन्म हा वासनेपोटीच येत असतो. ही वासनापूर्ती व्हावी आणि त्या जीवाला उत्तम गती प्राप्त व्हावी म्हणून शास्त्रांनी श्राद्धविधी सांगितला आहे. ते श्रद्धेने करायचे म्हणून त्याला त्या विधीला श्राद्ध अशी संज्ञा आहे. मृत जीवाचे त्यांच्या पुत्रादिकांनी ते अवश्य करावे अशी वेदाज्ञा आहे. मनुष्यमात्रांची प्राथमिक वासना किंवा इच्छा अन्नोदकात आहे. म्हणून श्राद्धविधी अन्नोदकानेच केला जातो.

ब्रह्मचारी – गृहस्थ – वानप्रस्थी आणि संन्यासी असे सर्वांचे श्राद्ध करावे. संन्याशाचे श्राद्ध त्यांच्या पुत्रादिकांनी करावे. त्याला श्राद्ध असे म्हणतात आणि शिष्यादिक करतात त्याला आराधना असे म्हणतात. संन्याशाच्या निर्वाणदिनी श्राद्ध करून आराधना करावी.

श्राद्धासाठी दोन किंवा पांच ब्राह्मण निमंत्रित करतात. देवस्थानी दोन ब्राह्मण आणि पितृस्थानी तीन ब्राह्मण असावेत किंवा या दोन स्थानांसाठी किमान दोन ब्राह्मण असावेत. ब्रह्मीभूत पिता पितामह प्रपितामहानां असा उच्चार करून तीन पार्वणयुक्त संकल्प करावा. ब्राह्मणांची पूजा–भोजन दक्षिणाप्रदान इत्यादिकांनी पुत्राने श्राद्ध संपन्न करावे

आराधनेसाठी ब्रह्मिभूतस्य गुरो – परमगुरू – परमेष्ठीगुरु परत्परगुरवेनमः असा चार पार्वणांचा संकल्प करून शिष्यवर्गाने आपल्या संन्यासी गुरूची आराधना करावी. या विधीत सोळा ब्राह्मण किंवा सोळा संन्यासी निमंत्रित करावे, सोळा संख्या शक्य नसल्यास बारा, आठ किंवा चार अशा संस्थेत निमंत्रण करून त्यांचे पूजन, भोजन वस्त्रादिकांनी संतुष्ट करावे.

गुरू शुद्धपक्षात समाधिस्थ झाले असतील तर संध्येतील केशवादी चोवीस नामांपैकी पहिल्या बारा नावानी ब्राह्मणांना निमंत्रण द्यायचे असते आणि कृष्णपक्षात जर समाधिस्थ झाले असतील तर पुढच्या बारा नावांनी निमंत्रण द्यायचे असते. ब्राह्मणपूजन भोजनादी झाल्यावर त्यांच्या पादोदकांचे तीर्थराज म्हणून पूजन करावे. उपनिषद मंत्राचे पठण करावे.

पितृपक्षातील द्वादशीला पुत्राने आपल्या ब्रह्मिभूत संन्यासी पित्याचे महालय श्राद्ध करावे.

संन्यासी हा सामान्य जीवापेक्षा श्रेष्ठ असतो. त्याची कशातही वासना असण्याची शक्यता नसते. कारण तो ब्रह्मिभूत झालेला असतो. तरी आपले पुत्र किंवा शिष्य या नात्याने हा विधी करण्याचे कर्तव्य ठरते. कृतज्ञता आणि ऋणविमोचनता हीसुद्धा या विधीची प्रयोजनता आहे.

### प.प. श्रीईश्वरानन्दस्वामींच्या समाधीनंतर २८-१२-१९९३ रोजी दैनिक ऐक्य, कराड या वर्तमानपत्रातछापून आलेला श्रीस्वामींबद्दलचा चरित्रलेख

करडचे श्री ईश्वरानन्द सरस्वती यांनी दि. २१ रोजी देहत्याग केला.
धर्मप्रसारार्थ भारतभर भ्रमण केलेल्या या अलौकिक व्रतस्थाचा जीवनप्रवास


वेदविद्यासंपन्न श्रीईश्वरानन्द सरस्वती ऊर्फ काशीस्वामी गेली ४० वर्षे कराडला भैरोबाचे देवळात व्रतस्थ राहून अनुष्ठान आणि ध्यान-धारणेत मग्न असत. स्वामीजींचा जन्म १४ मे १६०० रोजी कोकणातील चिपळूणनजीक कौंडर या गावी भागवतांचे घराण्यात झाला. शेठ रामबिलास लाहोटी कन्या प्रशालेचे निवृत्त मुख्याध्यापक अ. श्री. भागवत हे स्वामीजींचे पुतणे होत. काशी क्षेत्री राहून वेदवाङ्मयाचा त्यांनी अभ्यास केला. हे अपौरुष वाङ्मय त्यांचे मुखोद्गत होते ते भाषाप्रभू होते. संस्कृत, हिंदी, इंग्रजी, मराठी, कानडी, गुजराथी आदी भाषा त्यांना उत्तम प्रकारे अवगत होत्या. काशीच्या पंडित सभेने त्यांना 'धर्मश्री:' ही उच्चतम पदवी प्रदान केली.

१९२५ साली मार्गशीर्ष शु। सप्तमीला त्यांनी संन्यासाश्रम स्वीकारला व श्रीईश्वरानन्द सरस्वती असे त्यांचे नामाभिधान झाले. धर्मप्रसारार्थ त्यांनी भारतभर संचार केला. " केल्याने देशाटन पंडित मैत्री, सभेत संचार । ग्रंथशास्त्र विलोकेन मनुजाचातुर्य येतसे फार । " या उक्तीचे स्वामीजी प्रतीकच होते असे म्हणावे लागेल. अशा संचारात १९५३ साली ते अनुष्ठानासाठी कराडला आले आणि कृष्णा-कोयनेच्या पवित्र प्रीतिसंगमाच्या प्रेमात पडले. काही भक्तांच्या आग्रहामुळे भैरोबाच्या देवळात त्यांनी प्रस्थान ठेवले. त्यांचे अनुष्ठान अत्यंत कडक असे. तिन्ही त्रिकाळ कृष्णा स्नान, निर्वाहापुरती मधुकरी, रात्री १० ते १।। एवढा काळ झोप, दिवसातून प्रत्येकी १ तास याप्रमाणे सकाळ, संध्याकाळ भक्तजनांची विचारपूस एवढा काळ सोडला तर सर्वकाळ ते अध्ययन, ध्यानधारणेत मग्न असत. ते देवी-भक्त होते. अनेक मंत्र सिद्ध झालेले सत्पुरुष अशी त्यांची ख्याती होती. क्षा ुरी श्रुरी र ीींविशपीं. अत्यंत कडक शिस्त, धर्माविषयी जिव्हाळ्याची निष्ठा, गोरगरिबांबद्दल कमालीची कणव ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये. अनेक भक्तजनांवर त्यांचा वरदहस्त होता. काशीचे विद्वान स्वामी, कराडला स्थिरावले म्हणून साहजिकच कराडकर त्यांना काशीस्वामी असे संबोधू लागले.

त्यांचा अनुग्रहित शिष्यवृंद व भक्तजनांचा वर्ग मोठा आहे. त्यांचा शिष्यसमुदाय महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, पश्चिम बंगाल यामध्ये पसरलेला आहे. कराडमधील त्यांच्या सेवेची, कार्याची व शिष्यवृंदाची धुरा प्रा. शांताराम ऊर्फ बाळासाहेब कुलकर्णी यांचेकडे स्वामीजींनी सोपविली आहे व ते ती अत्यंत समर्थपणे पेलत होते व आहे. त्यांच्या शिष्योत्तमा कमलाताई शिराळकर, शिखरे, पाठक यांनी तहहयात स्वामीजींचे सेवेत स्वतःचे आयुष्य अत्यंत सन्यस्त वृत्तीने व्यतीत केले. नगरचे श्रीकांत जोशी यांचे कुटुंबचे कुटुंब त्यांचे अनुग्रहित शिष्य आहे, कराडचे धनाजी कुंभारही त्यांचे अनुग्रहित शिष्यवृंदात समाविष्ट आहेत.

श्रृङ्गेरी पीठाचे विद्यमान मठाधिपती श्री सद्गुरु भारतीतीर्थ यांचे गुरु श्री अभिनव विद्यातीर्थ व काशीस्वामी हे सहाध्यायी होते. स्वामींना भेटण्यासाठी श्रीजींनी दोनदा कराडला भेट दिली होती. काशीस्वामींचे शुभहस्ते जवळ-जवळ शंभराचे वर मंदिरावर कळस चढविणेचे सोहळे संपन्न झाले. चाफळचे सुप्रसिद्ध राममंदिर हे त्यापैकी एक. कराडमधील ज्योतिबा, कालिका, सोमेश्वर, गणपती या मंदिरांचे कलशारोहण त्यांनी केले आहे. श्रृङ्गेरीच्या "श्री' नी आपले प्रतिनिधी म्हणून २ उपाध्याय उत्तरीय विधीच्या मार्गदर्शनासाठी कराडला पाठवले

अशा या थोर यतीचे महानिर्वाण मार्गशीर्ष शु।। सप्तमी या दिवशी म्हणजे स्वामीजींनी संन्याश्रम स्वीकारला त्यांच्या वाढदिवशी झाले. प्रा. बाळासाहेब त्याबद्दल म्हणतात की, हा निर्वाणदिन त्यांनी आधीच निश्चित केला होता. त्यामागची त्यांची भावना अशी की जयंती आणि पुण्यतिथी एकाच दिवशी असली म्हणजे भक्तजनांना दोन उत्सव करण्याचे कारण पडणार नाही. महानिर्वाणाच्या दिनी सकाळी वाढदिवसाकरिता जे जे भक्तजन उपस्थित होते त्यांची त्यानी आपुलकीने, प्रेमाने विचारपूस केली. त्यांना प्रसाद आणि आशीर्वाद दिले आणि शांतपणे रात्री ८।। वाजता देहत्याग केला. दि. २१ रोजी दुपारी १ वाजता स्वामींच्या बागेत ह.भ.प. साखरेमहाराजांच्या उपस्थितीत त्यांचे पार्थिव शरीर प्रा. बाळासाहेब कुलकर्णी यांचे हस्ते समाधिस्थ करणेत आले. कराडचे सुप्रसिद्ध दशग्रंथी उपाध्याय प्रभाकरपंत गिजरे यांनी यतिमहाराजांचे विधिवत उत्तरीय संस्कार पार पाडले.





## ।। सद्गुरू श्रीईश्वरानन्द , साक्षात परब्रह्म ।।

कु. कमलताई शिराळकर, कराड

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वराः।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ।

माझ्या गुरूंचे वर्णन करण्यास बुद्धी व शब्द अपुरे आहेत.

प. प. स्वामी श्री ईश्वरानन्द सरस्वती (काशीस्वामी) आंध्रप्रांतात अनुष्ठानासाठी चालले असताना ते कराड मुक्कामी श्रीगोंदवलेकर राममंदिरात उतरले. त्याची सर्व सोय भैरवमंदिरात करून त्यांना येथेच वास्तव करण्यास सांगितले, परंतु अंतर-संकेत वेगळाच होता. माझी आई सौ. सुंदराबाई त्यांना कॅन्सर झाला होता. मुंबई येथे उपाय चालू होते. परंतु डॉक्टरने काही उपयोग होणार नाही म्हणून घरी पाठवले. आम्ही सर्वजण दुःखात होतो. दैवापुढे हात जोडून स्वस्थ राहिलो. काय करावे ते सुचेनासे झाले. त्याचदिवशी मला पहाटे देवीने स्वप्नात येऊन दृष्टान्त दिला.

तू कराडला जा. तेथे तुला एक थोर योगी, देवीभक्त व संन्यासी भेटतील त्याप्रमाणे मी कराडला आले. तर महान तपस्वी स्वामीजींचे दर्शन झाले, मला ते साक्षात ईश्वर दिसले, मला त्यांनी पावन केले. मी कृतार्थ झाले. माझ्या आईचे गुरू " रघुप्रेमतीर्थ '' (आंध्रप्रदेश) थोर संन्यासी होते. घरच्या व्यापामुळे मला परमार्थ घडत नाही. तरी मी काय करावे असा माझ्या आईने आपल्या गुरूंना प्रश्न केला, माझी आई उदार अंतःकरणाची होती. तिला गोरगरिबांवर प्रेम व त्यांना सहाय्य करण्याची प्रवृत्ती होती. आईचे वर्तन गृहस्थआश्रमाला योग्य असे होते. माझ्या आईला तिच्या गुरूंनी सांगितले तू काळजी करू नकोस. तुला अन्तकाळी एक थोर संन्यासी येऊन मुक्त करेल. आम्ही रोज प. स्वामीजींचे दर्शनास जात होतो. एक दिवस स्वामीजी मला म्हणाले, मी उद्या तुमच्या घरी येणार आहे. मी काही घेणार नाही. काही खाणार नाही. मोटारने मी येणार नाही. त्यांच्या सर्व अटी मान्य केल्यावर माझे भाऊ आबासाहेब शिराळकर यांचेबरोबर प. स्वामीजी घरी आले. आईजवळ प. स्वामीजी बसले. विभुती लावली व आशीर्वाद दिला माझ्या सर्व तपश्चर्येचे फळ तुला देतो म्हणून आईचे उजव्या हातावर पाणी सोडले व न बोलता निघून गेले. प. स्वामीजींनी आपली सर्वस्वी तपस्या आपल्या भक्तास दिली. प. स्वामीजींच्या उदारतेची धन्य आहे ! आईच्या तोंडावर ब्रह्मतेज आले आहे असे सर्वजण म्हणू लागले. आईच्या गुरूंनी सांगितल्याप्रमाणे अन्तकाळी माझ्या गुरूनी स्वामी ईश्वरानन्द सरस्वती यांनी येऊन शेवटी माझ्या आईचा उद्धार केला. दोन दिवसानी आईने " श्रीराम " म्हणून देह सोडला. आम्हा सर्वांना फार दुःख झाले. आईने मला स्वप्नात येऊन सांगितले, मला स्वामीजींनी माझी देहभावना काढून टाकली व मला मुक्त केले आहे. तुलाही ते मुक्त करतील त्यांच्या पायावर मस्तक ठेव. ते कधीही काढू नकोस व त्यांना कधीही सोडू नकोस. माझे मस्तक सदैव स्वामीजींच्या चरणी लीन आहे. माझे विसाव्याचे ते स्थान आहे. माझ्या मस्तकावर स्वामीजींना हात ठेवला त्यावेळी जगातले काही कळत नव्हते. त्यांचे सामर्थ्य अफाट आहे. आबासाहेबांनी ऋषितुल्य म्हणून जे वर्णन केले आहे ते अगदी योग्य आहे. प. स्वामीजी थोर योगी, गुरुसेवापरायण, मंत्रशास्त्रप्रविण, वेदशास्त्रकुशल होते. प. स्वामीजींनी धर्माचरण करून " धर्मश्रीः" पदवी मिळवली. माझे जीवन सुखी केले. प. स्वामीजींच्या समाधीचे ठिकाणी भक्तांना प.स्वामींचे साक्षात दर्शन होते. तेथेच एक प. स्वामीजींचा मोठा फोटो आहे. त्यांचे शिष्य श्री. संभाजी भिंगारे हे एकदा स्वामीजींच्याबरोबर स्नानास गेले होते. संभाजी त्यांना म्हणाला, " स्वामीजी, मला तुमचा फोटो हातांनी स्वतः काढायचा आहे." त्यावर स्वामीजी म्हणाले, " माझा तुला आशीर्वाद आहे. तुझी इच्छा पूर्ण होईल. " प. स्वामीजींच्या आशीर्वादाने संभाजीने फोटो काढला. तो समाधीच्या ठिकाणी ठेवला आहे. त्या फोटोमध्ये साक्षात स्वामीजी

दिसत असून ते बोलत आहेत असा सर्वांना अनुभव आहे. प. स्वामीजींचा सहवास मला घडला. त्याचा आनंद वर्णन करता येणार नाही. त्यांच्या सहवासात सुखाचा सागर होता व दुःखाचा लवलेशही नव्हता. प. स्वामीजीनी ब्रह्मानंदाचा अनुभव देऊन धन्य केले !

न लगे मुक्ती धनसंपदा। संतसमागम देई सदा।

प. स्वामीजींचे मंत्रशास्त्र प्रभावी होते. प. स्वामीजींनी गुरुमुखाने सर्व मंत्र घेऊन सर्व अनुष्ठान करून ते मंत्र सिद्ध केले होते. त्यांनी मला पंचदशी, भुवनेश्वरी, बालामंत्र व नृसिंह अशा अनेक मंत्राचा उपदेश केला आहे. स्वामीजींच्या आशीर्वादाने मी या सर्व मंत्रांची अनुष्ठाने केली आहेत. मी भुवनेश्वरी मंत्राचे अनुष्ठान करताना माझेसमोर देवीची दिव्यमूती उभी राहिली. तिने माझा प्राण ब्रह्मरंध्रात नेऊन तेथून तो बाहेर कसा काढायचा हे प्रत्यक्ष दाखवून मला अनुभव आणून दिला. त्यावेळी माझ्या शरीरातून विजेसारखा प्रवाह बाहेर पडताना मी पाहिला. त्यावेळी मला शरीरशून्य होऊन शरीर नसल्याचा भास झाला. सर्वत्र शून्यवत वाटले व वाटत होते. डोळे मिटताक्षणी मला निरनिराळ्या देवदेवतांची दर्शने झाली. दिव्य, स्पर्श, रस व गंध यांचेही अनुभव आले आहेत. गुरुकृपा व ईश्वरीप्रसाद यामुळेच मला हे अनुभव आले आहेत. गुरूंनी दीक्षा दिल्यानंतर प्रत्यक्ष फळ दिसू लागते. गुरुपासून मंत्र उपदेश याचा अर्थ शक्तीचे दान असा आहे. ब्रह्मनिष्ठ श्रीसद्गुरुचरणी माझे सतत कोटी कोटी प्रणाम ।

प. स्वामीजींची सेवा जन्मोजन्मी पडो हीच प. श्रीईश्वरानन्दचरणी सविनय प्रार्थना



।श्री।।

गुरुदर्शन घेतां, सुख येई हाता
दिव्य आशीर्वचन लाभे, धन्य वाटे मना, धन्य वाटे मना
गुरुमाये, मजपाशी, काही नाही देण्या
वंदन करिते,प्रेमे तुज चरणा
करी कृपा दिनाकरी, असशी दयाळा, असशी दयाळा ।।१।।
गुरुप्रेमाचा तो, अलोट आनंद
चाखेल तो गोडी, भाग्यशाली
अनुभवाविणे कोणा, कसा कळे स्वाद, कसा कळे स्वाद ।।२।।
देह कष्टविती, सोसवेना हृदया
तपोलेज पाहता, देवादिक लाजे
तुझी मूर्त कोरली हृदयी, मनी हर्ष दाटे, मनी हर्ष दाटे ।।३।।
गुरुसानिध्यानें, विरे देहमान
वरदहस्त ठेवी, लाभे समाधान
काय वानु उपकार, धन्य गुरुमाय, धन्य गुरुमाय ।।४।।
गुरू आर्शीवांदे, टळे जन्म-मरण
हृदीयी स्मरूया, सद्गुरू चरण शरण
मी आले चरणा, उध्दरी या जीवा, उध्दरी या जीवा गुरुत्वदर्शन घेता,
सुख येई हाता ।।५।।



(रचना: सुशिलाताई शिखरे)

## ।। श्री सद्गुरू कृपा ।।

।। ऱ्हि नमः ।।

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरुभ्यो नमः ।

**कु. सुशिलाताई शिखरे, कराड**

श्रीमंगलमूर्तीचे स्मरण करून श्रीसरस्वतीला आवाहन करते. तिला भावफुलांनी नटवून हृदयी विराजमान होण्यास विनती करते. श्रीगुरुचरणी भक्तीने वंदन करते. गुरुकृपेचा महिमा वर्णन करावा अशी मनामध्ये स्फूर्ती झाली, परंतु अल्पमतीमुळे आपल्याला कसे जमणार? तरीपण गुरुकृपेचा महिमा चार शब्दांत तरी वर्णन करण्याची मनीषा होती. कऱ्हाड क्षेत्र, कृष्णाकोयना प्रीतिसंगम अशा पवित्र स्थळी महान विभूती पूजनीय प. स्वामीजींचे वास्तव्य हा आमचा भाग्योदय होय !

**गुरुकृपा झाली त्वरा। आनंदाचा वाहतो झरा।**

प. स्वामीजींचे दिव्यदर्शन होताच त्यांचे कोमल चरणकमल पाहताच मन शांत व प्रसन्न व्हायचे. गुरुदर्शनाची महती फार थोर आहे. महत्‌भाग्याने व पूर्वपुण्याईने साक्षात ईश्वर गुरुरूपाने भेटले याचा आनंद लुटताना जीवन सुखमय होऊन गेले. माझे गुरू म्हणजे साक्षात ईश्वर! त्याचे नावच श्री ईश्वरानन्द सरस्वती नावाप्रमाणे मूर्ती आनंदी, तेजस्वी व महान तपस्वी. सर्वांत गुरू श्रेष्ठ गुरुउपदेशाशिवाय जीवाचा उद्धार नाही. प. स्वामीजींनी वयाच्या २४ व्या वर्षी संन्यास घेतला, कॉलेजमध्ये शिकत असताना गुरुजींनी धर्म स्थापनेकरिता चार विद्यार्थी पाहिजेत असे सांगितले. चार विद्यार्थी तयार झाले. त्यांत पू. स्वामीजी हे एक होते. संन्यास घेण्याची जशी वेळ जवळ आली तसे तीन विद्यार्थी गडबडले. परंतु प. स्वामीजी आपल्या ध्येयापासून न डगमगता सर्वत्याग करून संन्यास घेण्याचे ठरविले. संन्यास घेण्याचे ठरल्यानंतर आईवडिलांना नमस्कार करण्यास गेले. संन्यास घेणार म्हटल्यावर सर्वांचे उपदेश झाले. वडिलांनी तत्वमसि " गणपतीची शपथ '' घातली. परंतु स्वामींचा दृढ निश्चय होता. त्याप्रमाणे त्यांनी संन्यास घेतला व धर्मस्थापनेच्या कार्यास सुरुवात केली. प. स्वामीजींची हुषारी अवर्णनीय आहे. संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी व कानडी या सर्व भाषा स्वामीजींना येत होत्या.' श्रृङ्गेरीपीठाशी' त्यांचे निकट संबंध होते. श्रृङ्गेरीपीठाचे जगद्गुरू प. चन्द्रशेखरभारती हे स्वामीजींचे गुरू. त्यांचे गुरू महातपस्वी होते. प. स्वामीजींनी दक्षतेने व श्रद्धाभक्तियुक्त गुरुसेवा केली. अध्यात्मविद्या व शांकरभाष्य त्यांनी गुरुमुखाने ऐकले. ते ऐकून मी कृतार्थ झालो असे स्वामीजी म्हणत होते. गुरूंनी मंत्रविद्या दिली. चारीधाम पायी करून खडतर तपस्या केली. त्या तपस्येचे तेज त्यांच्या दिव्यमूर्तीवर झळकत असे. गुरुसेवा व संन्यासधर्माचे पालन करून त्यांनी देवदेवतांचा अनुग्रह संपादन केला. सर्व मंत्राचे अनुष्ठान करून मंत्रसामर्थ्य मिळविले. सर्व भक्तमंडळींना उपदेश करून सन्मार्ग दाखवून त्यांचे कल्याण केले. अंतः सामर्थ्य कसे असते हे अनुभव देऊन सिद्ध केले आहे. मला प्रथम एक श्लोक सांगितला. त्याचा ४५ दिवस रोज १००० जप करण्यास सांगितला. प. स्वामीजींच्या आशीर्वादाने अनुष्ठान सुरू केले. त्या अनुष्ठानामध्ये देवतेचे दर्शन व देवतेचा अनुग्रह झाला. मला फार आनंद झाला. प. स्वामीजींनी मस्तकावर वरदहस्त ठेवला. देहभान राहिले नाही. त्या स्थितीचे वर्णन करणे शक्य नाही. त्यांचे सामर्थ्य व दिव्य शक्तीचे अनुभव अनेक आहेत. प. प. स्वामीजींचे माझेवर अनंत उपकार आहेत.

प. प.. स्वामी म्हणजे मूर्तिमंत वैराग्य .स्वामीजी तीन वेळा गंगेचे स्नान करत असत. एक वेळ १२ वाजता भिक्षा करीत असत. आपल्या अनुष्ठानात ते सतत मग्न असत. बाहेर जगाशी त्यांचा संबंध नव्हता कोणाकडून कधीही कशाचीही अपेक्षा केली नाही. ते फार कडक शिस्तीचे होते. धर्माविषयी ते कडक होते. धर्माचरण करून त्यांनी सर्व सार्मथ्ये मिळविले होते. धर्माचे बल काय आहे हे त्यांनी अनुभव घेऊन पटवून दिले आहे.

' अखिल भारतीय धर्मपरिषद '' (वाराणसी) भरली असता प.स्वामीजींना ' धर्मश्री: ' ही पदवी बहाल करण्यात आली. धर्मनिष्ठ आदर्श संन्यासी म्हणून त्यांची कीर्ती आहे. प. स्वामीजींचे वर्णन करण्यास शब्द अपुरे आहेत. स्वामीजी म्हणजे दयेचा सागर त्यांच्या हृदयात दयेचा प्रवाह वाहत होता. अनेक भक्तांना अनेक संकटातून वर काढून त्याचे जीवन त्यांनी सुखी केले आहे. एका भक्तास पिशाच्चबाधा झाली. १२ वर्षे कष्ट भोगले. ती

स्वामीजींच्या दर्शनाला आली स्वामीजींनी पिशाच्यापासून सुटका करून त्याभक्ताचे कल्याण केले. " जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती " याप्रमाणे स्वामीजींनी आडमार्गी गेलेल्या जनास सन्मार्गास लावलेले आहे. मला अनेक संकटांतून वर काढले आहे. उदार अंतकरणाने सर्वावर दया करणारे माझे हे गुरू।

दयालुं गुरू ब्रह्मनिष्ठं प्रशांतं समाराध्यभक्त्याविचार्यस्वरूपं
यदाप्नोतितत्वं निदिध्यास्यविद्वान् परंब्रह्मनित्यं तदैवाहमस्मि ।।

स्वामीजीसारखे गुरु हेच माझे ऐश्वर्य, प. स्वामीजींची शिष्या म्हणवून घेण्यात मला आनंद वाटतो व मी स्वतःला भाग्यवान समजते. प. स्वामीजींनी सगुण उपासना कशी करावी? ईश्वरास भक्तिप्रेमाने आळवून त्याला कसे प्रसन्न करून घ्यावे. याचे मार्गदर्शन उत्तम रीतीने केले आहे. स्वामीजी व्यासपूजा (गुरुपौर्णिमा) फार उत्तम करीत होते. त्या दिवशी ते कडक उपवास करीत होते. त्यांच्या दिव्य, भव्य व तेजपुंज मूर्तीवर ब्रह्मतेज झळकत असे. त्या पूजेचा सोहळा अप्रतिम असे. जणूकाही सर्व देव पूजेला अवतरले आहेत असे दृष्य त्यादिवशी दिसत असे. ते नेहमी अंतर्मुख व मौनवृत्ती धारण करीत त्यांनी विवेकचुडामणी, योगवशिष्ठ अशा अनेक ग्रंथांवर प्रवचने केलेली आहेत. अध्यात्मविद्या कशा तऱ्हेने साध्य करायची याचे विवेचन मधुर व सुलभ भाषेत केले आहे. जगाचे व ब्रह्माचे स्वरूप कसे आहे? सत्-असत् वस्तूंचा विवेक व तीव्र वैराग्य असणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. षड्रिपू जिंकून या अफाट मायेपासून दूर राहणे जरूर आहे. " देह खोटा आहे व ब्रह्म सत्य आहे " हा विषय त्यांनी त्यांचे रसाळ वाणीने व उत्तम रीतीने विवरण करून सांगितलेला आहे. देहाचे मिथ्यत्व व ब्रह्माचे सत्यत्व अनेक दृष्टांत देऊन स्वामीजींनी पटवून दिले आहे. प. स्वामीजींनी आमचेवर ज्ञानबोधामृताचा वर्षाव करून अज्ञान, अंधकार नष्ट होण्याकरिता स्वस्वरुपानुसंधानाचा मार्ग दाखविला आहे. शास्त्राप्रमाणे व गुरुवाक्यावर विश्वास ठेवून शिष्याने आपला उद्धार करून घ्यावा असे ते नेहमी सांगत असत. प. स्वामीजींनी आपल्या अमृततुल्य वाणीने ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून मला पावन केले अशा सद्गुरुचरणी सहस्त्रकोटी प्रणाम.

साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा।

प. स्वामीजी माझे घरी आले होते. आम्हा सर्वांना खूप आनंद झाला. त्यांचे आगमनाने आमची वास्तू, पवित्र आली प. स्वामीजींची शिखरे घराण्यावर प्रीती होती. त्यांनी आपल्या प्रवचनात त्याचा एकदा उल्लेख केला होता आम्हा सर्वांना मंत्रोपदेश देऊन आमच्या सर्वांचे जीवनाचे सार्थक केले आहे. " धन्य ती माऊली। कृपेची साऊली। "

प. स्वामीजी रोज पहाटे २ वाजता उठून अनुष्ठान करीत असत. ते रोज २ तास प्राणायाम करीत असत, त्यांचे तपोबल अफाट होते. त्यांनी ९४ वर्षापर्यंत आपले अनुष्ठान व तपस्या कधीही सोडली नाही. ज्या दिवशी समाधी घेतली त्या दिवशीही २ वाजता उठून प्राणायाम व आपले अनुष्ठान केले. त्यादिवशी सर्वांना आनंदाने व प्रेमाने आशीर्वाद दिले. त्याच दिवशी ७ च्या सुमारास मी स्वामीजीकडे गेले. स्वामीजी म्हणाले, " सुशी आली काय? " असे दोनदा म्हणाले मी म्हणाले, स्वामीजी मी आले आहे स्वामीजींनी कृपाकटाक्ष टाकून आपले नेहमीप्रमाणे आसन घालून बसले मी हे सर्व प्रत्यक्ष पाहिले आहे.

**प्रयाणकाले मनसाऽचलेन**
**भक्त्या युक्तो योगबलेन चैव**
**भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सस्यक्**
**स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ।**

भगवान श्रीगीतेत सांगतात ' अन्तकाली एकाग्र चित्ताने भक्तिपूर्वक योगसामर्थ्यांनी आपले प्राण दोन भ्रुकुटींच्या मध्यभागी पूर्णपणे प्रविष्ट करून ध्यान करीत प्राणत्याग करतो तो परमेश्वरस्वरूप होतो.

भगवंतांनी सांगितल्याप्रमाणेच प्रयाणकाली प. स्वामीजींनी अंगात ताप असतानाही उठून, बसून त्या परमपुरुषाचे ध्यान करीतच योगसामर्थ्यांनी स्थूलदेहाचा त्याग केला व त्या परमपुरुषातच ते विलीन झाले. त्या सर्वव्यापी परमेश्वरस्वरूप सद्गुरूंना त्रिवार वंदन करूनच विराम घेते.

## ।। माझ्या जीवनाला श्रीस्वामींचा परिसस्पर्श कसा झाला ? ।।

कु. विजूताई पाठक, कराड

माझे गुरू धर्माचा हिमालय होते
माझे गुरू सत्याचा मेरू होते
माझे गुरू दयेचा सागर होते
माझे गुरू मायेची पाखर होते
माझे गुरू कैवल्याची खाण होते

आपल्यावर देवाची कृपा झाली की तो आपल्याला सच्चा गुरूची गाठ घालून देतो. माझे गुरू प.प.स्वामी ईश्वरानन्द मला भेटले आणि मी देवाच्या राज्यात स्वर्गात गेले. मी लहान होते तेव्हा कृष्णाकाठी नदीवर गेले की मला असे वाटे की आपण कायम येथेच राहावे. किर्तनाला गेले की मला असे वाटे हेच आपले घर असावे. जपाला बसले की मला असे वाटे आपण उठूच नये. आपली शाळा संपली की आपण सारखा जपच करायचा असे म्हणून मी उठत असे. आमच्या गावात एक प्रवचनकार आले. " महाभारतातले शक्तिपर्व " प्रवचनाचा विषय होता. चातुर्मास आणि अधिकमास असे पाच महिने मी, माझी मावशी व माझी बहीण प्रवचनाला जात होतो. चातुर्मास संपला. प्रवचनकार निघून गेले. मी रात्री अंथरुणावर विचार करत होते. आपल्या आयुष्यात काहीतरी तत्त्व अस़ावे असा मला ध्यास लागला. मी उठून बसले. डोळे झाकले. दत्तदिगंबर माझ्या डोळ्यासमोर आले. मी मनोमन प्रार्थना केली आणि मला झोप लागली, असे दोन दिवस गेले. तिसरे दिवशी भैरवाच्या देवळातले स्वामी माझ्या स्वप्नात आले. एक मोठी उंच डगर होती. उंच मोठा रस्ता होता. वर एक रम्य छोटीशी कुटी होती. प. प स्वामी खाली माझ्यासमोर उभे होते. भगवी छाटी नेसलेले, हातात दंड-कमंडलू होता. ती तेज:पुंज मूर्ती बघून मी दीपून गेले. त्यांच्या पायावर डोके ठेवून मी पाया पडले. वर बोट दाखवून त्यांनी मला त्यांच्या कुटीत यायला सांगितले. मी हात जोडून त्या तेजाकडे नुसते पाहत राहिले. मी दूसरे दिवशी त्यांच्याकडे भैरवाच्या देवळात गेले. प्रवचन नुकतेच संपले होते. मी त्यांच्या पाया पडले आणि माझ्यात जे अधुरेपण होते ते अश्रुपुराच्या वाटे वाहून गेले. त्यांनी मला आशीर्वाद दिला. पाच-सहा मंत्र दिले. ब्रह्मज्ञानावली, बालाकवच पण दिले आणि मी माझ्या खऱ्या आयुष्यात पदार्पण केले. पुढे माझे मला काही माहिती नाही. माझे सर्व स्वामींनी केले. माझे वडील बरेच तापट होते, पण सगळी माझी संकटे, दुःखे, तऱ्हेतऱ्हेची वादळे कशी संपली, मी कशी त्यातून पार पडत होते ते माझे मलाच कळले नाही. मी त्यांच्या मायेच्या सावलीत जगले, त्यांनी आम्हाला लहान बालकासारखे सांभाळले, काहीही आमच्यापर्यंत येऊ दिले नाही. आम्ही कल्पवृक्षा खाली बसलो होतो आनंदात. सुखात, निवान्त समाधानात.

दुःख म्हणजे काय ? संकटे काय असतात ? आम्हाला काहीही कळले नाही. आम्ही सुखाच्या स्वर्गात होतो स्वामींशिवाय आम्हाला काहीही दिसत नव्हते. त्यांनी आम्हाला सर्वोच्च मार्गावर नेऊन उभे केले. पुढे नीट चालणे आमचे काम आहे त्याच्यासाठी त्यांनीच द्यावी आम्हाला मतिशक्ती! ते आमचे सर्वस्व होते आणि अजूनही ते आमच्यावर पाखर घालून आहेत हाच आनंद ते आम्हाला शेवटपर्यंत देतील ह्याची आम्हाला मनोमन खात्री आहे. ह्या जगातील कशाचीही आशा आम्हाला नसावी हेची दान द्यावे स्वामी, तुमच्यातच राहावे आम्ही !

**।। आमचे दिव्य स्वामी ईश्वरानन्द सरस्वती ।।**

माझ्या गुरूंचे मूळ नांव श्री गंगाधर केशव भागवत. ते चिपळूणमधील कौंडर गांवचे राहणारे कुटुंब मोठे होते. ते खूप हुषार होते. शाळेत त्यांचा नेहमी पहिला नंबर असे ते खूप दयाळू होते. वर्गात ते सर्वांना मदत करीत तेवढेच ते करारी सुध्दा होते एकदा त्यांचे धोतर फाटले म्हणून ते वडिलांना सांगायला गेले. इतक्या लवकर कसे

फाटले ? असे वडिलांनी जोरात म्हटल्याबरोबर ते उंबऱ्यातूनच माघारी वळले. ते घराबाहेर पडले. एका बाईच्या घरी ते राहिले पहिल्या रात्री ते अस्वस्थ झाले. मुकाट्याने जाऊन एका कडेला झोपले. त्या बाई खूप प्रेमळ होत्या. त्यांना ते कसेसेच झाले. त्यांनी त्यांना जवळ बोलावले. इथे जवळ झोप पोरा. त्या म्हणाल्या. त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. तेव्हापासून त्यांनी तिला आईच मानले ती पण त्यांच्यावर मुलासारखे खूप प्रेम करायची. गाईच्या, जनावरांच्या धारा त्यांनी काढल्या की त्यांचा दूधाचा पेला ती पहिल्यादा भरत असे. ते पहिल्यांदा जरा अशक्त होते. रस्त्याने जात असताना दोन मुले त्यांना हसली. त्यांना वाईट वाटले, ते निश्चयी होते. तालमीत जाऊन ते पहिल्या नंबरचे पहिलवान झाले. त्यांच्या जेवणाला दृष्ट लागेल म्हणून त्यांची मानलेली आई त्यांना खास स्वयंपाकघरात जेवायला बसवत असे. एकदा गावात टायफॉईडची साथ आली. खूपजण आजारी पडले. त्यांची आई आजारी पडली. घरची सर्वच माणसे आजारी झाली. त्यांना त्यांनी बोलावणे पाठविले. मी ह्या स्थितीत तुमच्याकडे येऊ शकणार नाही मला माझ्या आईचे कर्तव्य आधी केले पाहिजे असे त्यांनी उत्तर दिले. ते दिवसभर खूप काम करायचे आणि शाळा शिकायचे. फी पण स्वतः भरायचे. तेव्हापासून त्यांनी घरचे काहीही घेतले नाही. एकदा त्यांच्या वडिलांनी त्यांच्या खिशात बदाम, खडीसाखर ठेवली. त्यांनी मुकाट्याने ती काढून ठेवली. एकदा मास्तर वर्गात नव्हते. मुलांनी खूप दंगा केला. मास्तरांनी शिक्षा केली. छडी मारायला लागले. गंगाधराची पाळी आली. " मी छडी घेणार नाही हा मॉनिटरचा दोष आहे. त्याला विचारा असे त्यांनी स्पष्ट उत्तर दिले. मागच्या मुलांच्या छड्या वाचल्या. ते नेहमी पहिल्या नंबरने पास होत असत. ते मॅट्रिक झाले आणि पुढील शिक्षणाला ते सांताक्रूझ येथे गेले. ते तेथे एकाकडे काम करून शिकत होते. ते इंग्लिश भाषेत प्रविण होते, ते अस्खलीत इंग्लिश बोलत. त्यांना सर्वच भाषा अवगत होत्या, कर्नाटकी, हिन्दी, संस्कृत ते उत्तम बोलत. एक दिवस ते एका प्रवचनाला गेले. ते धर्मप्रचारक संन्यासी होते. देशात सच्या धर्मप्रचाराची फार गरज आहे. कोणी संन्यास घ्यायला तयार असल्यास मी देणार आहे असे त्यांनी घोषित केले. चार-पांचजण तयार झाले. आयत्या वेळी सर्व गळाले. एकट्या स्वामींनी संन्यास घेतला, जेव्हा संन्यास घेतला तेव्हा त्यांना संभाळलेली त्यांची आई फार कष्टी झाली व म्हणाली, "पोराचे कष्ट काही सुटत नाहीत. " ते निघाले तेव्हा तिने आपल्या गळ्यातली सरी काढली. पोरा ही तुझ्याजवळ ठेव, तुला उपयोगी येईल. आई म्हणाली ते काही बोलले नाहीत. खाली मान घालून नमस्कार करून ते तसेच निघून गेले.

संन्यास दिलेल्या गुरूंची पण त्यांनी खूप सेवा केली. त्यांच्या गाई, म्हशी खूप होत्या. त्यांचे सर्व स्वामीच करीत. गुरूची भिक्षा पण तेच करीत. नंतर राहिलेले ते स्वतः खात असत. त्यांनी गुरूंची सेवा स्वतःचे सर्व सोडून केली पण आम्हाला काहीही करायला देत नसत. ते फार करारी होते. त्यामुळे त्यांच्यापुढे आमचे काही चालत नसे. त्यांचे जीवन अतिशय कष्टमय होते. तेज मात्र अफाट होते. त्यांना सर्वजण घाबरत. त्यांनी सर्व देशाचा प्रवास पायी केला. अपुरी वस्त्रे, जवळ खाण्याचे काही नाही, पायात काही नाही, पायातून रक्त आले तरी पायाला पाने बांधून त्यांनी प्रवास केला. शेवटपर्यंत ते तसेच होते. ते अगदी निर्मोही होते. स्वामींच्या गुरूंची " योगिनी " नावाची एक शिष्या होती. गुरूंच्या सामानावर स्वामी हक्क सांगतील अशी तिला भीती होती; परंतु गुरू निर्वतल्यावर आपल्या प.पू. स्वामींनी कोर्टात जाऊन सर्व हक्क सोडून दिला. मधूनमधून त्या गोष्टीची व तिच्या वागण्याची स्वामींना आठवण होई, पुढे ते श्रृङ्गेरीस काही दिवस होते. त्यावेळी श्रीचंद्रशेखरभारती पीठाधीश होते. तेथेही स्वामींनी गुरूंची खूप सेवा केली. प. प. श्रीचंद्रशेखरभारती स्वामींचेशिवाय कोणाचे ते ऐकत नसत त्यामुळे काही प्रसंग आल्यास स्वामींना बोलावणे येई, स्वामीना श्रृङ्गेरीत फार आदर व मान होता. त्यांचे गुरुबंधू " श्रीअभिनव विद्यातीर्थ " त्यांची अण्णा म्हणून ओळख करून देत. त्यांचे गुरू त्यांना " आंजनेय " म्हणत असत. श्रृङ्गेरीत स्वामींची भिक्षा तेथील स्त्रिया आदराने व कडक सोवळ्यात श्रीस्वामींना करून घालत असत.

काशीस्वामी म्हटले की लोक घाबरत असत. मुलांना पण आया काशीस्वामींचा धाक दाखवित. तेथे श्रृङ्गेरीच् " शांकरभाष्याच " पारायण सुरू व्हायचे, पण पुरे होत नसे. ह्यात लिहिणाऱ्या वाणींचा दोष नाही पुस्तकाचा दोष नाही, दोष आपला आहे असे म्हणून जिद्दीने पूर्ण करण्याच्या कराराने श्री स्वामींनी पूर्ण करून दाखवले. शेवटच्या दिवशी मुसळधार पाऊस आला. सारी श्रृङ्गेरी शांत झाली.

गुरूंना बरे वाटावे म्हणून अनुष्ठान करण्यासाठी ते निघाले, कऱ्हाडचा भैरव घाट आणि भैरव देऊळ त्यांना आवडले. नदीकाठी देऊळ आणि संपर्क नाही. त्यामुळे मालकाच्या संमतीने ते तिथे अनुष्ठानाला राहिले. त्यावेळी ते देऊळ फार जुनाट होते. कधी कधी गाढवे जनावरेही आंत शिरत. पण तरी ते शांत निवांत म्हणून तसेच राहिले. एक दिवस पेपरमध्ये श्रृङ्गेरीच्या जगद्गुरूंची निर्वाणाची बातमी त्यांना समजली. त्यांना फार वाईट वाटले. पुढे तिकडचा संबंध कमी झाल्याने ते तेथेच देऊळात राहिले. हे जग आणि त्यातले सर्व खेळ मिथ्या आहेत हे त्यांच्या नसानसांतून भिनल्याने ते तात्पुरते अस्वस्थ होत, पण सारा व्यवहार पुन्हा नित्याप्रमाणे चालूच असे ते व्यासपूजा श्रृङ्गेरीच्या – सर्वांत मोठे पीठ पद्धतीनुसार व्यवस्थित करायचे. पुढे पुढे भक्तमंडळी वाढली. त्यांचे सर्वांचे त्यांनी कल्याण केले. ज्यांना ज्यांना जे हवे ते त्यांनी मुक्त हस्तांनी दिले. त्यांची गुरुतत्त्वावर अपार श्रद्धा होती. गुरू म्हटले की ते कशाचीही; देहाचीही पर्वा करीत नसत. गुरुपौर्णिमेला ते सर्व लोकांना मुक्त हस्तांनी आशीर्वाद देत. त्यांच्यासाठी बरेच आधीपासून ते खूप जप करीत असत, त्या दिवशी गुरूंचा दिवस म्हणून ते सर्वांना पाया पडायला देत असत, सारे कऱ्हाड यायचे. रात्री दहा–साडेदहापर्यंत सोहळा चालू असे. ते त्या दिवशी तोंडात पाणीही घालीत नसत, शेवटपर्यंत ते तसेच होते. " गुरुपौर्णिमा " " शिवरात्र " " गोकुळाष्टमी " ते निराहार करत असत. त्यांचा धर्मावर फार कटाक्ष होता. धर्मासाठीच त्यांचे जीवन होते. त्याबाबत ते कोणाचीही पर्वा करत नसत. त्यांना कशाचीही अपेक्षा नव्हती. ते त्यांचे अनुष्ठान व नदी ह्यापलिकडे त्यांचे जग नव्हते. आलेल्या माणसाला धर्माप्रमाणे वागायला सांगणे हेच फक्त त्यांचे कार्य होते. त्यांच्याकडे आलेली सर्व मंडळी सुखी झाली.

त्यांच्या गुरूंचे निर्वाण झाले तसेच त्यांचे झाले. त्या दिवशी त्यांच्या संन्यास घेतलेल्या दिवसाचा वाढदिवस होता. आम्ही तो जोरात साजरा करत असू, त्यांना सर्वांना वाटून द्यायची फार आवड होती. म्हणून मी त्यांच्या वाढदिवसाला १०८ नारळ वाटायचे ठरवले होते. सर्वांनी तऱ्हेतऱ्हेची सामग्री फळे, फुले, प्रसाद, मिठाई आणली होती. समारंभ झाला. ते थोडे व्यग्र होते. म्हणावे तसे प्रफुल नव्हते. राहिलेल्या सर्वांना प्रसाद वाटा. असे त्यांनी सांगितले, कोणाकोणाला नारळ द्यायचे ते पण त्यांनी सांगितले. कोणाला काही यत्किंचितही कल्पना नव्हती, पण सर्वजण मनाने बेचैन होते. नेहमीप्रमाणे ते संध्याकाळी गुरूंच्या फोटोपुढे मांडी घालून अनुष्ठानाला बसले. फोटोकडे पाहात ते म्हणाले, " माझे गुरू युगपुरुष साक्षात देव होते. त्यांचा संन्यास आणि निर्वाण एकाच दिवशी झाले " असे म्हणून त्यांनी डोळे मिटले. काय घडलेय ते कुणालाही कळले नाही. सगळीकडे कालोळ झाला. पुढे सर्व प्रयत्न झाले पण सारे मुक होते. कोणाला काही सुचत नव्हते सगळीकडे दाट अंधकार होता. एक प्रज्वलित ज्योत मात्र ढळवळीत दिसत होती. सांगत होती. धर्माने राहा! धर्माने राहा!! धर्माने राहा !!!

जायच्या आधी त्यांनी जशा काही गोष्टी करायला सांगितल्या ते तसे त्या रात्री बऱ्याच भक्तांकडे गेले. प्रत्येकजण त्यांची एक एक हकिगत सांगत होते. त्यांची तपस्या खडतर होती. त्याच्या बऱ्याच गोष्टी आम्ही ऐकून होतो. त्यांनी बरेच मोठे आजार मंत्राच्या शक्तीवर बरे केले. आमच्या देखतच त्यांनी दोन अतिशय त्रास देणारी पिशाच्चे पार पळवून लावली. त्यांच्या तीर्थाचा, विभूतीचा पण फार प्रभाव होता. मी पण त्यांच्याकडे जायच्या आधी वरचेवर आजारी असायची. दोन दोन दिवस जेवण अजिबात नसायचे, दिवाळीत तर तळण्याचा त्रास नको म्हणून मला तिसऱ्या मजल्यावर राहायला लागायचे. मी त्यांच्याकडे आले आणि हे सर्व जादूसारखे बंद झाले. एका

व्यासपूजेदिवशी मला खाली पायाला बोटामध्ये काहीतरी चावले. मी जरा चोळले. तेल लावले. पण दुसऱ्या दिवशी काळ्यानिळ्या शिरांचे मोठे जाळे माझ्या पायावर उठले मी घाबरले. ते जाळे तासातासाला वर चढायला लागले आणि मांडीपर्यंत आले. कोणी म्हणाले हा कदाचित हत्तीरोग आहे. मी आणखीनच घाबरले आणि प. स्वामींचेकडे गेले. त्यांनी मंत्र म्हणून पाणी करून देत. त्यांनी मंत्र म्हणून पाणी माझ्या पायावर जोरात शिंपडले. थोड्यावेळाने जाळे खाली खाली उतरू लागले. काही तासांनी दिसेनासे झाले. एवढे मोठे ढळढळीत दिसणारे जाळे गेले कोठे ? खाली मान घालून त्यांच्या पायावर डोके ठेवण्यापलिकडे आपल्याजवळ त्यांना द्यायला काय होते ? मी नुसताच विचार करत होते. अशा अगणित आठवणी आहेत. त्यांच्या प्रेमळ आठवणी म्हणजे सागराच्या लाटा, मोजता न येणाऱ्या, मनात लाटांचा कल्लोळ आणि डोळ्यांत गंगायमुनेचे पाणी ह्याशिवाय काय आहे आपल्याजवळ त्यांना देण्यासारखे ? एकदा शिवरात्रीची पूजा होती. रात्रीची वेळ होती. आम्ही पूजा करून घरी निघालो. फर्लांगभर गेलो असू, मला विंचू चावला कळा मारायला लागल्या. मला पहिल्यांदा एकदा चावलेल्या विंचवाची आठवण झाली. वेदनेने डोळ्यांत पाणी यायला लागले. आता रात्रभर मला त्रास होणार ह्या चिंतेने मी बेजार झाले. चालणे अवघड झाले, मी सुशिला, कमलताईना धरून देऊळात गेले. स्वामी उठले. त्यांनी पुन्हा तीर्थ केले. माझ्या पायावर जोरात शिंपडले. थोड्या वेळाने वेदना कमी झाल्या. माझ्या डोळ्यांत जास्तच पाणी आले, पण ते विंचवाच्या चावण्यामुळे नव्हते; तर स्वामींनी केलेल्या मायेसाठी होते. मी चालत घरी आले. मला झोप लागली. हे काय गूढ ? काय त्यांची शक्ती ? त्यांनी काहींची मूळव्याध पण बरी केली आहे. असे अनेक अनुभव अनेकांना आलेले आहेत. अशा खूप अगणित आठवणी आहेत. त्या आता आठवण्यापलिकडे आपण काय करू शकतो ? आहे का त्याला काही उपाय ? होईल का ह्यात काही बदल ? तरीसुद्धा माझी खात्री आहे की ते आपणाला काही कमी पडू देणार नाहीत. स्वतः सगळ्यांची दुःखे झेलतील पण दुसऱ्यांना काही कष्ट पडू देणार नाहीत. इतके सोपे नाही ते ! ते त्यांच्यासारख्या युगपुरुषाशिवाय जमणे अशक्य आहे. अशा माझ्या अद्वितीय दिव्यस्वामींना कोटी कोटी प्रणाम !

कृष्णाकोयना नदीच्या प्रीतिसंगमावर त्यांची त्यांच्या सारखीच शांत, सुंदर समाधी आहे. परिसर सुंदर आणि निवांत आहे. आम्ही तेथे रोज सकाळी, संध्याकाळी जातो. आरती, पारायण, नमस्कार करतो. खूप बरे वाटते, ते आम्हाला मुक्त हस्तांनी प्रेमळ आशीर्वाद द्यायला सदैव जागृत असतात. ना झोप, ना विश्रांती, ना भिक्षा, धर्माची जागृती हेच सदैव ध्येय ! आम्हा पामरांच्या हातून हे ध्येय घडवून आणावे त्यांनीच !
त्यांनीच द्यावी स्फूर्ती, शक्ती, भक्ती.



।श्री।।

कृष्णातीरी पवित्र गाव। कराड नगरी त्याचे नाव।
भैरव मंदीर पुरातन छान । सद्गुरुचे वसति स्थान।
विजय पताका धर्माची। साक्षात् मूर्ति ज्ञानाची।
भक्तांची ही माय माऊली। करी कृपेची पूर्ण सावली।
बहु जन्माचे पुण्य जुळावे। तधीच स्वामी दर्शन व्हावे।
मोक्ष लक्ष्मी हाती यावी। जन्माची मग पूर्ति व्हावी।
नित्य घडावे तुमचे दर्शन। पादुकांचे हृदयी पूजन।
विश्व पसारा मिटून जावा। तव चरणाचा ठाव मिळावया।

(रचना: श्री. बाळूकाका कुलकर्णी)

## ॥ श्रीआंजनेयस्वरूपाय नमः ॥

## ॥ श्रीहनुमान प्रसन्न ॥

हनुमानदासजी महाराज, सांगली

श्री.प.पू. यतिश्वर ईश्वरानन्द सरस्वती यांची भेट मला कराडला भैरोबा मंदिरमध्ये झाली. मला पण कराडला काही दिवस राहायचे होते. मी त्यांचेजवळच १५ दिवस राहिलो. त्यांनी आणलेली माधुकरी मी प्रसाद म्हणून घेत असे. काही अध्यात्म विषयावर बोलणे होई. त्यांचे बोल फारच मोलाचे होते. त्यांचा सहवास लाभणे पूर्वपुण्याईचेच त्यांचेजवळ मी नोव्हेंबरअखेर पर्यंत राहिलो. १९६८-७० चा काळ वाटतो. त्यांचे लोकांचे बरोबर काही बोलणे झाले नाही तरी त्यांचे दृष्टीसमोर गेल्याचा प्रभाव वेगळाच जाणवायचा यालाच सत्संग म्हणायचा. कारण परमार्थ हा बोलण्याचा विषय नाही. त्याची आंतरिक जाणीव आवश्यक आहे. त्यांचे वास्तव्यात त्यांनी कोणालाच आपली ओळख होऊ दिली नाही. ज्योतिर्मय असे त्यांचे स्वरूप असून पण लोकांना जाणीव होणे कठीण होते. त्यांची कृपा फारच थोड्या भक्तांवर झाली. त्यांचे सहवासात राहून आपल्या जीवनाचे सार्थक करून घेतलेले व पुढे घराण्यावर कृपाप्रसाद संपादन करून नित्यानंदाच्या अनुभव डोहात न्हाणारे कित्येक असतील; पण माझ्या समोर परिचयाच्या व स्वामींचे सहवासात असणाऱ्या दोन व्यक्ती माझे डोळ्यांसमोर आहेत. ह्यांतील श्रीकांत जोशी, नगर व बाळूकाका यांना सत्संगाचा पूर्ण लाभ मिळाला.

समर्थांनी दिलेल्या बुध्दीप्रमाणे लिहिले. गोड मानून घ्या. सकळ करणे जगदीशाचे आणि कवित्व काय मनुष्याचे, हे अप्रमाण बोलण्याप्रमाणे होईल.

प.पू. परिव्राजकाचार्य महाराज की जय !

**भक्तिरस**



गुरू मला भक्तीचा रस कळेल का।
अनन्य भावे सेवा घडेल का ।।ध्रु०।।
अपराधांची असे मी हो खाण। दर्शनात पावन हो ते जाण।
मला मुक्तीचा रस्ता दाखवाल का ।।१।।
जपसंख्या असे ती हो कोटी। जिव्हाळ्याने मुखी येण्यासाठी।
अंगी नामाची शक्ती भराल का ।।२।।
अथांग शक्तीचा तू सागर। कसे कळेल हे वरवर।
भक्त पामर हा ताराल का ।।३।।

(रचना : सौ. मंगल गो. कुलकर्णी)

## क्षेत्रसंन्यासी :
## प. पू. श्री ईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामीमहाराज कराड.

डॉ. म.बा.जोशी, कराड

सातवाहनांच्या काळापासून करहाटक हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून सर्वत्र ख्यात आहे. येथील कृष्णा कोयना यांचा प्रीतिसंगम " सुरेख " च नव्हे; तर अतिपावन आहे. रामायणकालापर्यंत या नगरीचे संबंध जोडलेले असल्याचा उल्लेख "कऱ्हाडमहात्म्या " मंध्ये आहे. श्रावणबाळाची हत्या ही ब्रह्महत्या झाल्याने त्याचे प्रायश्चित्त घेण्यासाठी अयोध्येचा राजा दशरथ हा येथील गरुडक्षेत्रावर आल्याचा उल्लेख आढळतो. सध्याचा जो घाट आहे तेच गरुडतीर्थ होय. दशरथाला प्रीतिसंगमात स्नान करून हाटकेश्वराला अभिषेक करण्यास सांगितले होते म्हणून राजा दशरथ येथे येऊन गेल्याची कथा " कऱ्हाडमहात्म्या " मध्ये आढळते. अलिकडच्या काळातील प.पू. स्वामी श्रीपूर्णानंद रंगनाथमहाराज निगडीकर यांचे वडील यांनी येथे जलसमाधी घेतली होती. म्हणूनच अशा सत्पुरुषांच्या समाधीसाठी औंधकरांनी " स्वामीची बाग " ही जागा दिली. येथे अनेक सत्पुरुषांच्या समाधीसमवेतच यशवंतराव चव्हाण यांचीही समाधी असल्याने या जागेचा कायापालट झाला आहे. याच बागेत प.पू. काशीस्वामी यांची समाधी आहे. कऱ्हाडकरांना स्वामींचा खूप सहवास लाभला कारण ते क्षेत्रसंन्यासी होते. त्यांनी आपल्या सद्गुरुच्या आज्ञेनुसार श्रृङ्गेरीहून येथे प्रयाण व वास्तव्य केले. येथील श्रीकालभैरव मंदिरातील खोलीमध्ये ते राहिले, ही खोली त्यांना या मंदिराचे वहिवाटदार श्री ग्रामोपाध्ये यांनी बांधून दिली.

स्वामींचा दिनक्रम :– प.पू. काशीस्वामींचा दिवस पहाटे ३.३० वाजता सुरू होत असे. नियमितपणे पहाटे चार वाजता आपल्या शिष्यांसमवेत संगमात स्नान होत असे. प्रारंभी एकटेच जाणारे स्वामी हळुहळू शिष्यपरिवारात वाढ झाल्याने या स्नानाचा " सोहळा " झाला होता. तीर्थाला पावित्र्य येते ते सत्पुरुषांच्या तपामुळे. या स्नानाचा लाभ एक दोन वेळा मला गुरुपौर्णिमेच्या दिवशी घडला आहे. माझे ज्येष्ठ बंधू कै. शामराव बाबूराव जोशी हे नियमितपणे या स्नानाला जात असत. स्वामींच्या सहवासात राहण्याचे भाग्य माझ्यापेक्षा त्यांना अधिक लाभले. ज्यावेळी माझ्या बधूंनी कऱ्हाड सोडून पुणे येथे वास्तव्य करण्याचे ठरविले तेव्हा प.पू. स्वामींनी त्यांना स्वतःच्या वाचनात असलेली श्रीगुरुचरित्राची पोथी दिली. ती अद्याप देव्हाऱ्यात व्यवस्थित आहे. बंधूंनी गुरुचरित्रांची अनेक पारायणे केली होती याचाच हा प्रसाद असावा असे वाटते.

आम्ही १९७० पासून भैरोबा आळीतील श्री. गिजरे (लोकमान्य प्रेसचे मालक) यांच्या "यज्ञेश्वर" निवासात राहत असल्याने स्वामींचे दूर दर्शन घडत असे. जवळ जाण्याची इच्छा फक्त गुरुपौर्णिमेला पुरी होत असे. त्यांच्या नित्य दर्शनाच्या वेळाही जमण्यासारख्या नसत. आमच्या वाड्याच्या मालकीणबाई सौ. गिजरे त्यांना सर्वजण "आऊ" म्हणत – त्यांनी स्वामींचा अनुग्रह घेतलेला असल्याने त्यांच्याकडून स्वामींचा प्रसाद मिळत असे. स्वामींचे सोवळे कडक असल्यामुळे त्याचे पालन होत नसे म्हणून आम्ही त्यांचे दर्शन दूरूनच घेत असू. सौ. मात्र जात असे. जास्त परिचय वाढल्याने सौ. ने तिच्या बंधूंनाही स्वामींकडे नेले होते. श्री. अनिल काशिनाथ कुलकर्णी, इस्लामपूर व श्री. शरद काशीनाथ कुलकर्णी या दोघांनाही स्वामींनी मार्गदर्शन केल्याने त्यांच्या जीवनात कशी क्रांती झाली याचे वर्णन श्री. अनिल कुलकर्णी यांनी स्वतंत्र लेखात केले आहेच. स्वामींनी अनेक शिष्यांचे इप्सित पूर्ण केले आहे. त्यांपैकी एकच उदाहरण देतो. एकदा सकाळी सातसाडेसातचे सुमारास एक गृहस्थ आणि एक आठ–नऊ वर्षांचा मुलगा हिंदीतून, " यहाँ स्वामीजी कहाँ रहते हैं? " असे विचारीत भैरोबाचे देऊळ शोधीत शोधीत आले. त्यांना मीच देऊळ दाखविले. त्यांनी स्वामींना १०८ मण्यांची उत्तम अशी स्फटिकाची माळ अर्पण केली. साधारणपणे एक मण्याची किंमत शंभर ते दीडशे रुपये असावी. त्यानंतर एकदा स्वामींना त्या गृहस्थाबद्दल विचारले असता स्वामींनी ते गृहस्थ बडोद्यावरून आल्याचे सांगितले. श्रीस्वामींच्या आशीर्वादाने त्याला पुत्र झाला म्हणून ते गृहस्थ त्या मुलाला घेऊन स्वामींच्या दर्शनाला आले होते. अशा प्रकारे, " दिले धन, दारा, अपत्य " आणि भक्तांचे

मनोरथ पूर्ण केले लौकिक जीवन सुखी करण्याचा हेतू असा की त्यानंतर तरी त्याने भक्तिमार्गाकडे वळावे.

स्वामींचे अध्यात्मिक सामर्थ्य:- " कौमार आचरेत प्राज्ञः " कुमारवयातच वैराग्याचा अभ्यास करणारे स्वामी " चालते ज्ञानाचे बिंब। तयांच अवयव सुखाचे कोंब " याचे मूर्तिमंत उदाहरण होते. " जेणे घडे नारायणीं अंतराय। होत बापमाय वर्जावी ती " असे तुकारामांना सांगितल्याप्रमाणे स्वामींनी लहानपणीच घरादाराचा त्याग करून " अथा तो ब्रह्मजिज्ञासा " याचाच फक्त ध्यास घेतला नारायण प्रेम वा नारायणाची ओढ एवढेच जीवन ज्यांनी मानले त्यांच्या ज्ञान आणि वैराग्याचे सामर्थ्य काय वर्णावे ?

पैं यातें विरक्त पुरुष। त्यजिती कां जैसे विष।
निराशा तयां दुःख। दाविलें नावडें ।। (ज्ञानेश्वरी ५. १२८)

सारांश: विषयसंगाचा संबंध नसल्याने भौतिक दुःख म्हणजे काय याचा त्यांना स्पर्शही झाला नाही "देह दुःख ते सुख मानित जावें। " या समर्थाच्या वचनाचा त्यांनी पडताळा घेतला होता. उलट " जो जयाकडे वास पाहि। तेउती सुखाची सृष्टी हाये। " त्याप्रमाणे त्यांच्या कृपादृष्टीने सुखाचा साक्षात्कार झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. स्वामींचे जीवन म्हणजे " तपाने देहशुद्धी व निश्चयाने अनुवृत्ती " त्यामुळे " सदा चित्तशुद्धी " शम, दम, यम, नियम, संयम, निग्रह, धर्म, नीती इत्यादी सद्यकाळात फक्त शब्दकोशात सापडणारे शब्द स्वामींच्या रूपाने प्रत्यक्षात अवतीर्ण झाले होते. " देही उदास असावे। आशापाश नसावे "अशी त्यांची स्थिती होती. त्यांची प्रत्येक कृती परमेश्वरप्राप्तीच्या प्रीतीने भरलेली असल्याने त्यांनी केलेली नित्यपूजा लांबून पाहण्यात जो सात्विक आनंद मिळे तो अनुभवाशिवाय कळणे शक्य नाही. त्याची पूजेतील तन्मयता आणि आर्तता ज्यांनी अनुभविली आहे त्यांनाच ती कळणार, विशेषतः नवरात्रामध्ये केला जाणारा दुग्धाभिषेक पाहण्यासारखा असे. त्यांचे ते फुलाने गंध लावणे पाहून ईश्वराच्या " मार्दवाची " कल्पना येत असे. मानसपूजा प्रत्यक्षात साकार झाल्याचा साक्षात्कार होत असे.

" निर्दोष हि समं ब्रह्म तस्माद् ब्रह्मणि ते स्थितः" या भगवद्गीतेतील भाष्याप्रमाणे असणाऱ्या योगी आणि संन्यासी जसा समप्रज्ञ असतो तशी त्यांची स्थिती होती.

" तैसें नामरूप तयाचें। एऱ्हवी ब्रह्मची तो साचें।
मन साम्या आलें जयाचें। सर्वत्र गा ।। (ज्ञाने. ५.१०१)

थोडक्यात माऊलीनी म्हटल्याप्रमाणे " जे देहींचि ब्रह्मत्व पावले।"अशी त्यांची योग्यता होती, त्यांची सर्व साधना " तरि गुरु दाविलिया वाटा। येऊन विवेकतीर्थ तटा। धुऊनियां मळकटा। बुद्धीचा तेणें ।। तैसी शुद्धत्वें जडली। आपणयां बुद्धि ।।

स्वामींनी वैराग्य ही क्रिया मानली नाही, तर वैराग्य हा त्यांचा सहजभाव झाला होता. म्हणूनच कोणी काहीही दिले तरी त्यांनी त्याचा स्वीकार केला नाही. शिष्यांनी दिलेल्या भेटी त्यांनी आशीर्वादपूर्वक परत केल्या आहेत. याचे कारण सत्संग, सत्त्वनिष्ठा, सात्विक व परिमित आहार यांचा सहयोग होय, त्यामुळे त्याचा देह " दर्शने दोष नाशिती " असा " दिव्य "व " भव्य " होता. तपाचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर सदैव विलसत असे.

स्वामींची साधना: संन्यासदीक्षेपूर्वी आणि नंतरही स्वामींनी " ॐ कार "साधना केली. प्राणायाम आणि गायत्रीअनुष्ठान हीच त्यांची साधना होती. प्राणायामपूर्वक ॐ जप आणि गायत्री पुरश्चरण यामुळे त्यांचे "दर्शन " म्हणजे " तेजाचे अपौरुषेयतत्त्वाचे दर्शन होय "प्राणायमपूर्वक केलेला ॐ चा जप " त्रिलक्ष "म्हणजे बाह्य, आंतर व मध्य केंद्रित असून तो मूलाधार, हृदयधार, तालमूलाधार, नासिकाग्राधार, भ्रूमध्याधार व नेत्राधार यावर केंद्रित असे. यामुळे दृष्टी स्थिर होऊन मनही स्थिर होऊ लागते.

याचा परिणाम:

" विषयांचा विसरू पडे। इंद्रियांची कसमस मोडे । मनाची घडी घडे। हृदयामाजी "

त्यामुळेच त्यांच्या सर्व स्थिती शुद्ध झाल्या होत्या. शरीरशुद्धी, क्रियाशुद्धी व भावशुद्धी झालेली असल्याने योगशास्त्रातील सर्वोच्च समाधिसुखाची प्रचिती येते आणि ती सहज-कायम समाधी असते. त्यामुळेच त्यांचे पंचमहाभौतिक शरीर ब्रह्मभावयुक्त झाले होते. " अवघे पावित्र्य अवतरले " असे शरीर असल्यानेच ते कोणाला स्पर्शदर्शन देत नसत. याला अपवाद फक्त गुरुपौर्णिमेचा असे. या दिवशी मात्र ते सर्वांना स्पर्शदर्शन देत. माऊलींनी अशा सत्पुरुषांचे वर्णन -

म्हणौनि असो जो ऐसा। शुचित्वें तीर्था कुवासा ।।जेणें उल्लंघविले दिशां। मनोमळ तीर्थात ।।

तीर्थालाही पावन करण्याचे सामर्थ त्यांच्यात असते.

आंतु बाहेरी चोखाळू। सूर्य तैसा निर्मळु ।आणि तत्त्वार्थीचा पायाळु। देखणा जो ।।

अशा योग्यतेचा हा पुण्यात्मा कऱ्हाडक्षेत्री चाळीसहून अधिक वर्षे वास्तव्य करून होता. हे कऱ्हाडकरांचे भाग्य म्हणूनच त्यामुळे त्यांच्या निर्वाणानंतर जी पोकळी निर्माण झाली आहे ती कोणाकडून व केव्हा भरून निघेल हे कालभैरवच जाणे ? अशा अधिकारी पुण्यात्माच्या सहवासात येण्याची संधी आम्हा सर्वांना मिळाली हे आमचे भाग्यच आम्हा सर्वांवर त्यांची अशीच कृपा असावी हीच त्यांना प्रार्थना. शेवटी माऊलींच्या शब्दांतच त्यांचे महत्व वर्णन करूया -

जे नानागतीतें पाववितें। ते चित्त वरील आत्मयातें । मग कवण आठवी देहातें। गेलें की आहे।

**ॐ तत्सत्।**

### गुरुमाऊली

" माझी गुरुमाऊली प्रेमाची साऊली ।। धृ०।।
अजाणते आम्ही बाल। स्वैर निरंकार खट्याळ फार ।
त्यांनी आयुष्या दिला आकार। माझी मती त्यांची पाऊली।
अशी माझी गुरुमाऊली प्रेमाची साऊली ।।
तेजस्वी रूप प्रेमळ दृष्टी। ज्ञान-धर्माची त्यांची सृष्टी।
परोपकारा सदैव तत्पर। त्यांचे पुढती आम्ही पामर।
माझी मती त्यांचे पाऊली। माझी गुरुमाऊली प्रेमाची साऊली ।।२।।
'' ईश्वराचा आनंद '' हा आम्हात भरो। अज्ञान, अहंकार मागे सरो।
त्यांचे चरणी एक प्रार्थना। आत्म्याचे आस्तित्व दाखवा ।
माझी मती त्यांची पाऊली। माझी गुरुमाऊली प्रेमाची साऊली ।।३।।
विकारांना घाल आवर। काम तुझे होईल तत्पर।
नको काळजी चिंता पदोपदी। सांगे माझी गुरुमाऊली प्रेमाची साऊली ।।४।।
'' चैतन्यमय '' आयुष्य घडले। त्यांचेच कृपेने हे पार पडले।
शतशः प्रणाम त्यांचे चरणी। श्रद्धा, भक्ती होणे माझी करणी।
आशीर्वाद मागते सानुली। देईल माझी गुरुमाऊली कृपेची साऊली ।।५।।



(रचना: सौ. अंजली पाटील, पुणे)

# ।। गुरुशोध ।।

सौ. सुधा केशव शिराळकर, कराड

" सदाशिव समारम्भा शंकराचार्य मध्यमा।अस्मदाचार्य पर्यन्तां वन्दे गुरुपराम्पराम् ।। "

गुरुपरंपरा ही आदिनाथ शंकरापासून सुरू झाली. गुरू ही व्यक्ती नसून शक्ती आहे. गुरू या शब्दाचा अर्थच अज्ञानाचा अंध:कार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखविणारा. आता ज्ञान म्हणजे तरी काय ? तर ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, " मी कोण? " या प्रश्नाचे उत्तर देहबुद्धीचा त्याग करून आत्मबुद्धीत प्रवेश । भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात, " सर्वस्य चाऽहं हृदि सन्निविष्टो" सर्वांच्या हृदयात मी स्थित आहे; पण हा लपलेला ईश्वर शोधून देण्याचे कार्य गुरू करतात. त्यासाठी प्रत्येकाला गुरूची नितांत गरज आहे. परंतु गुरू हा पारखूनच घ्यावा लागतो. याचे कारण

" बहवो गुरवो लोके शिष्य वित्तापहारका।क्रचिन्तु तत्र दृश्यन्ते शिष्य चित्तापहारकाः ।।

(शिष्याचे वित्त घेऊन त्याला फसविणारे गुरू अनेक असतात पण शिष्याच्या चित्ताचा ताप हरण करणारा गुरू क्वचितच मिळतो), पण माझ्या सुदैवाने मला ईश्वरानन्द सरस्वतीसारखे निस्पृह गुरू लाभले.

मला गुरू तर करावयाचा होता, पण त्याची योग्य पारख झाल्याशिवाय नाही अशी मनाची धारणा होती पण माझ्या जीवनात योगायोग असा आला की, चैत्री पाडवा वर्षाचा पहिला दिवस म्हणून मी स्वामीजींच्या दर्शनाला गेले, त्याच दिवशी त्यांच्या एका मुंबईच्या भक्ताने स्वामीजींसाठी दोन हापूसचे सुंदर रसाळ आंबे आणले व ते त्यांना अर्पण केले. नंतर ते भक्त त्यांचा निरोप घेऊन निघून गेले. ते गृहस्थ गेल्यानंतर मी स्वामीजींना नमस्कार केला व जाण्यास निघाले, त्यावेळी स्वामीजींनी क्षणाचाही विलंब न लावता ते दोन आंबे प्रसाद म्हणून माझ्या ओट्यात घातले. मी ते घेण्यास नकार दिला पण स्वामींनी माझे ऐकले नाही. दुसऱ्या दिवशी त्याचा रस काढून स्वामीजींच्या भिक्षेच्या वेळी पाठविण्याचा निश्चय करून मी परतले. कारण त्या भक्ताच्या प्रेमाचा स्वीकार झाला पाहिजे याची मला जाणीव होती परंतु या छोट्याशा प्रसंगाने मला स्वामीजींच्या निस्पृहपणाची साक्ष पटली. सिझनमधले पहिले फळ, कोणाच्याही तोंडाला पाणी सुटेल पण या महात्म्याने सरळ ते दुसऱ्याला देऊनही टाकले. त्यावेळी मला ज्ञानेश्वरीतील एक ओवी आठवली, ती अशी –

'' तें शरीरभाव आटतीइंद्रिये विषय विसरती।˘''

जे महात्मे असतात त्यांनी आपली इंद्रिये जिंकलेली असतात. सर्वात रसना जिंकणे कठीण व इंद्रिये जिंकणे महाकठिण, कारण इंद्रियांचे विषय मानवाला सतत आपल्याकडे ओढतच असतात, परंतु स्वामीजींनी सर्वांवर विजय मिळविलेला होता. त्यांना कशाचाही लोभ नव्हता, पैशाचा नाही, कपड्याचा नाही, खाण्याचा नाही एका कौपिनाखेरीज दुसरे वस्त्र नसे. असा निरासक्त गुरु असताना अन्य कोठे जाण्याचे कारणच काय? जवळच दुथडी भरून गंगा वाहत असताना त्यात स्नान न करणारा दुर्दैवीच ठरणार । त्याच दिवशी मनाचा निश्चय केला की स्वामीजींचा अनुग्रह घ्यावयाचा कारण आचार, विचार व उच्चार यांचा त्रिवेणी संगम मला स्वामीजींच्या ठिकाणी दिसला.

स्वामीजींबरोबर श्रृङ्गेरीला जाण्याचा योग मला आला होता. श्रृङ्गेरी म्हणजे आद्य शंकराचार्यांची निर्वैर तपोभूमी स्वामीजींचा सत्संग हा मणिकांचन योगच होता. त्यांच्या सहवासातले ते दिवस म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गसुखच होते सुरुवातीच्या काळात मला त्यांची भीती वाटत असे. पण सहवासाने लक्षात आले की कोकणातल्या फणसासारखे बाहेरून करारी वाटले तरी आतून मात्र गऱ्यासारखे गोड व प्रेमळच आहेत. प्रवासात ते सतत आमची सर्वांची काळजी घेत असत. स्वामीजींचा उपदेश, जगद्गुरूंची प्रवचने हे सर्व श्रवण करताना जो अवर्णनीय आनंद मिळत असे तो शब्दातीत आहे. त्यावेळी जाणवले की आपल्यासारखे भाग्यवान आपणच !

आज स्वामीजी आपल्यात नाहीत. त्यांच्या वियोगाचे दुःख होते, परंतु त्यांचा कृपेचा अभयहस्त पाठीशी आहे व त्यांचा उपदेश अंतःकरणात निनादत आहे.

" ब्रह्मवाहं अहं ब्रह्म न चाहं ब्रह्मण पृथक् । नाहं देहो न मे देहः केवलोऽहं सनातनः ।। '

## ।। सद्गुरू ईश्वरानन्द सरस्वतीमहाराज यांनी माझे मातोश्रीचे कल्याण केले ।।

श्रीधर किरपेकर, कराड.

माझी आजी श्री स्वामी ईश्वरानन्द-सरस्वती महाराजांचे प्रवचनास जात असे. हे माझे आईच्या लक्षात आल्यावर ती घरातील सर्व कामे आटोपून स्वामीमहाराजांच्या प्रवचनास जाऊ लागली. परंतु सासूबाईंना कळू नये म्हणून मागे आडोसाला बसावे असा क्रम चालू झाला. एके दिवशी स्वामीमहाराजांचे लक्षात आले व ते म्हणाले " मागचे बाजूस बसलेले कोण आहे, बाळ पुढे येऊन बैस." लगेच माझी आजी म्हणाली ती माझी सून आहे. मी इथे आहे म्हणून पुढ येत नाही. त्यावर स्वामीमहाराज म्हणाले " मुली पुढे येऊन बैस. परमार्थास कोणी घाबरू नये. लहानवयात ऐकलेल कायम लक्षात राहते. घाबरू नकोस." यानंतर घरी वादविवाद झाला व आजीने प्रवचनास जाणे बंद केले. माझी आई मात्र सर्व काम आटोपून नेमाने प्रवचनास जाऊ लागली.

सन १९६४ साली माझे वडिलांची प्रकृती ढासळली. दुर्धर रोगाने त्यांना त्रस्त केले. अशा वेळीही सर्व प्रसंगास तोंड देत आईने नियमांत खंड पडू दिला नाही. दुदैवाने वडिलांचे निधन झाल्यावर आमचेवर आकाशच कोसळले. अशा वेळी स्वामीमहाराजांनी प्रवचनातून सांगितलेले आठवले की सकेशा न राहता पतीच्या मागे बाई जर सोवळी झाली तर पतीचा उद्धार होतो. हेच डोक्यात विचार घोळू लागले व तसा स्वामीमहाराजांचा निरोपही आला की सोवळी हो. मी परमेश्वराकडे तुझेबद्दल साकडे घालतो; तो तुला काही कमी पडू देणार नाही. मग मनाचा निश्चय करून वडिलांचे दहावे दिवशी आईने सोवळे होऊन जनअपवाद निंदा सोसण्याचे धाडस केले.

घरी मिळवते कोणीच नव्हते. आजीआजोबांनी वेगळे केलेले आमचे घर निराश्रीत झाले. एकच स्वामी-महाराजांचा आशीर्वाद आम्हाजवळ होता. कारण त्यांचे निरोपाप्रमाणे सोवळे होण्याचे (लहान वयात) धाडस केलेले त्यांना समजले. नंतर त्यांचे हृदय अतिशय कळवळले. आई जेव्हा त्यांचे दर्शनास गेली तेव्हा त्यानी डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. त्यामुळे परमार्थाची शक्तीच प्राप्त झाली आणि येईल त्या प्रसंगास तोंड देत संकटावर मात करीत व त्रिकालस्नान स्वामीमहाराजांचे दर्शन व परमार्थ अखंड चालू होता. त्यावेळी माझ्या मावशीने आम्हास बराच आधार देउन पुढील वाटचाल सुलभ केली. मावशीने तिचे मालक श्री. वसंतराव देशपांडे यांनी साथ देऊन आम्हाला उपकृत केले, स्वामीमहाराजांची कृपा असल्यामुळे आमचे व्यवस्थित चालले होते.

सन १९६९-७० साली गोष्ट स्वामीमहाराज काशीला निघाले. त्यावेळी १०-१२ माणसे (स्त्री व पुरुष) त्यांचे बरोबर होते. त्यात माझी आई काशीयात्रेस गेली होती. स्वामीमहाराजांचे सत्संगतीत आईची काशीयात्रा चालू होती. काशीमध्ये मुक्काम असताना योगायोगाने माझे लग्न ठरले. आईस तसे कळविले परंतु यात्रा अर्धवट सोडून ती येऊ शकली नाही. माझे काका-काकू , मामा-मामी व मावश्या यांनी मिळून लग्नसमारंभ उत्तम रीतीने पार पाडला. आईला अतिशय वाईट वाटले व तेथूनच आम्हा वधूवरांना शुभाशीर्वाद दिला. परमार्थाच्या उच्च पायरीवर पोहचलेशिवाय मन आवरणे शक्यच नव्हते. अशीच तिची परमार्थाची वाटचाल व यात्रा चालू होती. यात्रेहून परत आल्यावर आम्ही आमचे वाड्यातच स्वतंत्र राहू लागलो. त्यावेळी मला नोकरी लागलेली असल्यामुळे प्रपंच व्यवस्थित चालला होता. मुख्य स्वामीमहाराजांचे आशीर्वाद पाठीशी होते. आई घरातील कष्ट करुन तीन वेळा स्नान,स्वामी महाराजांचे दर्शन, पूजा व भैरव मंदिरात स्वामीमहाराज पूजा स्तोत्रपाठ करीत यातही सहभागी होत असे. याचे आम्हा सर्वांना आश्चर्य वाटत असे. परमेश्वराची शक्ती पाठीशी असल्याशिवाय हे शक्यच नव्हते.

परमार्थात अत्युच पातळी गाठुन संतसेवेत चंदनासारखा देह झिजवून स्वामीमहाराजांचे पूर्ण कृपेस पात्र होऊन आई १३-३-९९ रोजी ईश्वरचरणी लीन झाली. स्वामीमहाराजांनी तिच्या आयुष्याचे पूर्ण सार्थक केले. तिचे कल्याण झाले व तिच्या आशीर्वादाने व पुण्याईने आमची भरभराट झाली. स्वामीमहाराजांना व तिला वंदन करून लेख संपावितो.

## ।। श्रीधर्मशास्त्रपारंगताय नमः ।।

सौ. कालिंदी गुरुराजन, बेंगलोर

प. प. स्वामीजींचे चरणी भक्तिप्रेमपूर्वक वंदन करते. प. स्वामीजींचे दर्शन मला १२ वर्षांची असताना झाले, ज्यावेळी मी आठवीत होते. त्यावेळी माझा २२ वा नंबर शाळेत होता. मला शिक्षणाची आवड नव्हती. मे महिन्यांच्या सुट्टीत प. स्वामीजींच्या दर्शनास आले. त्यांचे दर्शन व आशीर्वाद घेतला व परत मी आदोनीस माझ्या घरी आले. स्वामीजींच्या आशीर्वादाने मी नववी व दहावीत उत्तम तऱ्हेने पास होऊन दुसरा नंबर आला. आदोनीस कॉलेज नसल्यामुळे पुढील शिक्षण झाले नाही.

माझ्या आईवडिलांनी माझे लग्न अठराव्या वर्षी करण्याचे ठरवले वडिलांनी स्थळ आणले. श्री गुरुराजन यांना मला दाखवण्याचा कार्यक्रम झाला. मला पसंत केले. सर्व ठरले. पण शेवटी सासरे म्हणाले की २५,००० रुपये हुंडा दिला पाहिजे, माझे वडील म्हणाले, ' मला होणार नाही ' म्हणून ते स्थळ सोडले. पण आश्चर्य म्हणजे प. स्वामीजींचे कृपेने एक दिवस सासरे आले व म्हणाले, ' तुमची मुलगी द्या ' मग लग्न ठरले. त्यांनी आमच्याकडून काहीही घेतले नाही, उलट मलाच त्यांनी दागिने व उत्तम साड्या घेतल्या. सासरी जाताना बरोबर प. स्वामीजींचा फोटो घेतला होता. त्याची रोज मनोभावे पूजा करत होते. त्यांचे आशीर्वादाने मला एक मुलगा व एक मुलगी आहे. स्वामीजींचा अगाध महिमा आहे.

माझे मिस्टर नियमित ऑफिसला जाऊन उत्तम काम करत होते. पुढे काय झाले त्यांना ऑफिसला जायचे म्हणाले की नको वाटू लागले, बसपर्यंत जायचे पण परत येत असत. मला दोन मुले! पगार नाही तर कसे होणार? मला आधार स्वामीजींचा. मी स्वामीजींना कळवले. त्यांनी मला एक मंत्र सांगितला. तो २१ वेळा व २१ दिवस म्हणण्यास सांगितला, त्याप्रमाणे मी केले. आश्चर्य म्हणजे २१ व्या दिवशी माझे मिस्टर ऑफिसला नियमित जाऊ लागले. स्वामीजीच्या शब्दांत अफाट सामर्थ्य होते ते महान तपस्वी, ब्रह्मज्ञानी व सर्वज्ञ होते.

एकदा स्वामीजी बेंगलोरला आले होते आम्हीही दोघे दर्शनास गेलो.त्यांची दिव्यमूर्ती व ब्रह्मतेज पाहून माझ्या मिस्टरांना आनंद वाटला ते म्हणाले, " तू मला आधी का सांगितले नाहीस " म्हणून त्यांना वाईट वाटले. प. स्वामीजींवर त्यांचा पूर्ण विश्वास बसला. दर गुरुपौर्णिमेला मला ते घेऊन येत होते.

एक दिवस माझ्या खोलीच्या दरवाज्यात उभे राहुन प. स्वामीजींनी मला आशीर्वाद देऊन धीर दिला. हे भास नव्हे तर प्रत्यक्ष होते मला काही कळेना पण त्याच रात्री माझे मिस्टरांचे पोट दुखले, लगेच दवाखान्यात घेऊन गेले. त्या दिवशी रविवार होता डॉक्टर कोठे निघाले होते. आम्हाला दोघांना पाहून परत आले. ते म्हणाले, " तू नशिबवान आहेस, मी आज पेशंट तपासत नाही. ऑपरेशन केले पाहिजे व आजच केले पाहिजे " त्याप्रमाणे ऑपरेशन लगेच केले. प. स्वामीजींचा महिमा अगाध आहे. त्यांनी मला आधार दिला, माझेजवळ मी त्यांना सतत पाहत होते, त्या संकटातून स्वामीजींनीच मला वर काढले. माझ्या मिस्टरांचा हात खूप दुखत होता. आम्ही स्वामीजींचे दर्शनास गेलो. त्यांनी हातास विभुती लावली हात बरा झाला व पुन्हा दुखला नाही माझ्या मिस्टरांना स्वामीजींची आठवण होते त्यांनाही ते प्रत्यक्ष दर्शन देतात. भक्तांचे रक्षणास स्वामीजी उभे आहेत. माझ्या मुलीचे पोट दुखत होते. औषध दिले परंतु थांबले नाही. प. स्वामीजींनी ११ दिवस लोणी दिले. ती बरी झाली. बी.ए.च्या परीक्षेच्या वेळी माझ्या मुलीचा अभ्यास झाला नाही. ती परीक्षेस गेल्यास मी प. स्वामीजींचे स्मरण करत बसले.

माझी मुलगी फर्स्टक्लास पास झाली. मुलीचे लग्न झाले व ५ वर्षे झाली पण मूल नाही. माझा सर्व भार स्वामीजींवर ! एक दिवस स्वामीजींनी मला स्वप्नात पहाटे एक लहान मुलगा आणून दिला. त्याच दिवशी संध्याकाळी मुलगी गरोदर आहे असे कळाले. तिला मुलगा झाला. मला अनेक अनुभव आहेत. हा संसार सगळा झाला, परंतु मुक्तीचा मार्ग दाखवा असे म्हणायचे. मला उमगलेच नाही आता मी रोज हेच मागणे मागते, माझी बहीण सौ. रजनी तिच्या मिस्टरांना ऑफिसमध्ये एक प्रॉब्लेम होता, ते स्वामीजींकडे आले. त्यांनी त्यांना एक श्लोक सांगितला. त्यानेच त्यांचे काम झाले. त्यांनी स्वामीजींपुढे फळे व पैसे ठेवून नमस्कार केला. स्वामीजींनी ती फळे व पैसे प्रसाद म्हणून परत दिली. मिस्टर खोलीच्या बाहेर आले. हसू लागले मी विचारले, " काय झाले? मिस्टर म्हणाले, सर्व परत करणारे स्वामी मी कोठे पाहिले नाहीत. " स्वामीजींना कशाचीही अपेक्षा नव्हती. माझी बहीण सौ. प्रभा हिला स्वामीजींनी उपदेश दिला होता. पण ती तो मंत्र बरोबर करत नव्हती. स्वामीजींनी स्वप्नात जाऊन तिला सांगितले, तू मंत्र चुकीचा करत आहेस. पुन्हा स्वप्नात तिला मंत्रोपदेश दिला. आता ती बरोबर जप करते. माझी लहान बहीण सौ. छाया आमचेबरोबर गुरुपौर्णिमेस आली होती तिने स्वामीजींना नमस्कार केला. तिला काय झाले ते सांगताच येईना.

श्री सद्गुरुचरणी भक्तीने वंदन करते.

कृष्णामाईच्या ग तीरी। कराड नाम वसे नगरी ।।१।।
रोज येती नाजूक नारी। करी घेऊनी घागरी ।।२।।
स्वामींच्या सुंदर बागेमधी। बाळगोळ हुंदडति नेहमी ।।३।।
रेणुकामाई आशीर्वाद देत। सतत कृष्णामाईच्या समवेत ।।४।।
कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमावर। यशवंत समाधी असे थोर ।।५।।
भव्य रुंद त्या घाटावर। उंच गोपुरे असती स्वार ।।६।।
विधात्यानें कृपा केली। संतमंडळी स्थिर झाली ।।७।।
सर्वांमध्ये आहे अग्रणी। बहिरोबा मंदीर मेरूमणी ।।८।।
मंदीरा त्या तेज आले। संन्यासी जेव्हा तेथे वसले ।।९।।
तिन्ही त्रिकाळ अंघोळ करूनी। ठाकीले तेजः पुंज दंड धरोनि ।।१०।।
खडावा भरदुपारी वाजती। गृहीणी भिक्षा घालोनी धन्य होती ।।११।।
धर्मश्रीः म्हणूनी भुषविले त्यांना। काशीच्या मठाधिपतींनी ।।१२।।
म्हणती त्यांना ''काशीस्वामी" लिन रहा सदा त्यांच्या चरणी ।।१३।।
व्यासपूजेच्या दरसाल मुहुर्तावर। नत सदा भी त्यांच्या पायावर ।।१४।।
तरू मी शकते तो भवसागर। आशीर्वाद त्यांचे असता भरपूर ।। १५।।



(रचना: डॉ. सौ. कल्याणी अ. अथणीकर, पुणे)

## ।। श्रीवैराग्यमूर्तये नमः ।।

विश्वनाथ रेठरेकर (सचिन), कराड

शास्त्र म्हणेल ते सांडावे। ते राज्यही तृण मानावे।
जे घेववी ते न म्हणावे। विषही विरुद्ध ।।

हे संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सर्वसामान्य जनतेस जीवन कृतार्थ करण्यासाठी दिलेल्या उपदेशांपैकी एक, परंतु महत्त्वाचा उपदेश. सर्व शास्त्रे जाणणे हे आजचे जगात सर्वांत अवघड आहे. तेव्हा श्रीसद्गुरू वाक्य/बोध हेच शास्त्र मानून त्याप्रमाणे आचरण करणे हा आत्मोन्नतीसाठी सर्वोत्तम मार्ग आहे.

" गुरूविना कोण दाखविल वाट ? "

शास्त्रांप्रमाणे श्री गुरुंशिवाय कोणतेही कर्म फळास जात नाही. गुरुमहिमा वर्णावा तेवढा थोडाच आहे. श्रीसद्गुरू अनुग्रह मिळणे ही केवळ पूर्वपुण्यसंचयायोगे होणारी गोष्ट आहे.

कराड नगरी ही प्राचीनकाळापासून तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे व ती अनेक संत-महात्म्यांचे वास्तव्याने पावन झाली आहे. प. प. ईश्वरानन्द सरस्वती स्वामीचे इथले वास्तव्य व आम्हा सर्व शिष्यांवरील त्यांची कृपा हे आमचे भाग्यच आहे. स्वामी म्हणजे आम्ही पाहिलेला सगुण परमेश्वर अंश. श्रीस्वामींचे समाजातील सर्व घरांतील, परिसरातील शिष्यवर्ग त्यांच्या पुर्णत्वाचा व श्रेष्ठतेचा पुरावाच आहे. धर्मरक्षण हे स्वामींचे उद्दिष्ट होते (इथे धर्माचा अर्थ आत्मोन्नती आहे. ) त्यासाठी सर्वांमध्ये असलेल्या परमात्म्याची जाणीव व त्याची अनुभूती सर्वांना त्यांनी घडवुन दिलेली आहे.

" जो जे वांच्छिल तो ते लाहो प्राणिजात ।। ''

या प्रमाणे श्रीसद्गुरूंनी सर्व शिष्यांचे सर्व मनोरथ पूर्ण केले. भले ते ऐहिक वा भौतिक असो. परंतु एक गोष्ट मात्र प्रकर्षाने सांगावी वाटते की या सर्व भौतिक मनोरथांचे परिवर्तन निश्चितच अध्यामिक उन्नतीस झाले आहे आणि त्याचे ओढीमुळे प्रत्येकास गती प्राप्त झाली आहे.

श्रीस्वामींचे मनोरथ पूर्ण करण्याचे बळ श्री स्वामींना केवळ त्यांच्या तपस्वीतेने व योग सामर्थ्याने आले होते. त्यांचा त्याग, वैराग्य व साधना असामान्य होते. आम्हांस त्यांचे झालेले प्रथमदर्शन (अनुग्रह) व त्यानंतर त्यांचा सहवास ही अवर्णनीय आनंदाची पर्वणीच होती. सर्व संतमहात्म्यांनी केलेल्या श्रीगुरूंचा कृपाप्रसाद व गुरूमहिमेच्या वर्णनाहून ती वेगळी तर निश्चित नाही यावरून स्वामींचे व परमतत्वाचे एकत्व लक्षात येते.

श्रीस्वामींचे सहवासाने आम्हात पूर्ण बदल घडून आला. त्यांनी कठीणकाळी मार्गदर्शन करून नेहमी आम्हास सफल केले आहे. त्याचा अनुभव आम्हांस आजही म्हणजे त्यांचे समाधीनंतरही येत आहे. त्यांनी दाखविलेल्या मार्गाचे व उपदेशाचे आमचेकडून आचरण व्हावे व सर्वांस ते अमृतत्व लाभावे ही श्रीसद्गुरू चरणी आमची मागणी राहील.

## ।। श्रीललितार्चनप्रियाय नमः ।।

दत्तात्रेय गोविंद कुलकर्णी, कराड

केवल पारमार्थिक लक्ष्य ठेऊन आत्मोन्नती करून घेणारे दिव्यपुरुष हे फारच कमी असतात. त्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भौतिक स्वरूपाचा नसतो, तर तो अध्यात्मिक स्वरूपाचा असतो. अशा या दिव्य पुरुषांची संगत आपल्या जीवनात काही क्षण, काही काळ मिळणे किंवा अनुग्रह व्हावयास सुद्धा आपले पूर्वकर्म शुद्ध असावे लागते. आमच्या सर्वांच्याच पूर्वपुण्याईने, माझ्या आईचे कृपेने आम्हाला असे सत्पुरुष पाहावयास लाभले. त्यांपैकी प.पू. श्रीधरस्वामीमहाराज हे एक होत. व त्यानंतर करहाटक क्षेत्रातील श्री. भैरवनाथ देवस्थानमध्ये वास्तव्यास असलेले श्री.प.प. ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामीमहाराज होत.

माझा एक अनुभव मी या ठिकाणी नमूद करतो, तो असा

स्वामीचे गुरुपौर्णिमा उत्सवाचे निमित्ताने दरवर्षी प्रमाणे श्री भैरव मंदिरात रंगरंगोटी होत असे. त्यासाठी श्री. भांबुरे पेंटर व त्यांचे सहकारी येत असत. आम्ही फक्त बाह्यमदत त्यांना करायचो कारण कलेतील काही एक गंध त्यावेळी मला नव्हता. परंतु त्यांची ती कला पाहून मनोमन वाटे की आपणास ही कला अवगत झाली तर बरे होईल. ते शिकवतील की नाही या शंकेमुळे मी प्रत्यक्ष स्वामींनाच एकदा विचारले की मला या कलेची आवड आहे. तुमच्या परवानगीने मी त्यांचेकडे शिकायला जावे असे म्हणतो. तेव्हा तुम्ही त्यांना विचारून मला शिकण्याची दीक्षा द्या. ही माझी विनंती कृपया मान्य करा. स्वामींनी त्याच क्षणी पेंटरना विचारून मला संमती दिली व त्याच क्षणी त्यांचेही शिष्यत्व पत्करून मी शिकावयास नियमाने जाऊ लागलो, बरीच वर्षे पाहिल्यानंतर मी एक दिवस स्वामींचे स्मरण करून स्वतंत्र ब्रश खरेदी करून ते स्वामीजींच्या पुढे ठेवले व मला प्रसाद म्हणून ते तुमच्या हाताने द्या अशी प्रार्थना केली. स्वामींनी मला ते प्रसादरूपी ब्रश दिले आणि मी प्रथमच बोर्ड तयार करावयास घेतला. मी श्री. भांबुरे पेंटर यांना कल्पना दिली नव्हती की बोर्ड तयार करण्यास घेतला आहे, मला मार्गदर्शन करा. आणि काय आश्चर्य तो पहिलाच बोर्ड साध्या पद्धतीने तयार करून रंगवून स्वामीना दाखविला आणि पेंटरनाही दाखविला व दोघांनी माझे कौतुक केले. श्री भांबुरे मला म्हणाले " माझ्याकडे आजपर्यंत ५२ विद्यार्थी येऊन गेले परंतु यात कोणीच तयार झाले नाही माझ्या अक्षरानुसारच तुझेही अक्षर आहे. माझे कोणते तुझे कोणते हे मलाच समजत नाही.एवढे हुबेहुब तुला कसे काय साध्य झाले. हे आश्चर्य आहे. मलाही मनस्वी आनंद वाटला.

माझ्याकडे कोणतेही सर्टिफीकेट किंवा ड्रॉईंग परीक्षा या पूर्वानुभव नव्हता. या दोन्ही गुरुकृपेमुळे जीवनात एक यशस्विता प्राप्त झाल्याचे मानसिक समाधान आजही वाटते. पुढे पुढे सरावानंतर गुरुपौर्णिमेचे रंगरंगोटीचे काम स्वामींचे आशिर्वादाने मी करु लागलो.

प. प. ईश्वरानन्द सरस्वती यांची तुलना करावयाची म्हटले तर माझ्यापुढे प्रामुख्याने दोन महान व्यक्तींचे स्मरण होते त्यात एक म्हणजे समर्थ रामदासस्वामीमहाराज व दुसरी म्हणजे प्रभुरामसेवक हनुमंतराय.

खालील गुणवर्णना वरूनच स्वामींची तुलना या दोहोंशी करता येईल.

प्रखर सन्यस्तवृत्ती, आध्यात्मिक अभ्यासाचा गर्भ, सत्याचरण, सतत नामस्मरण, अंतःकरणपूर्वक भक्तिमय, गंगास्नानाचा नित्यनेम, अभूतपूर्व मंत्रशक्ती, प्राणायाम शक्तीवर नियंत्रण, अखंड अनुष्ठान, धर्माचा सखोल अभ्यास, सर्व भाषांचा अभ्यास, उत्कृष्ट पूजापद्धती, षड्रिपूंवर नियंत्रण, मनाची एकाग्रता, दिव्य सहनशक्ती, देहाभिमानाचा विसर, त्यागभावना, सर्व कलांचा अभ्यास, प्रसिद्धिपराङ्मुख, फक्त परमेश्वरचिंतन, अंतर्बाह्य शुध्दता, प्रचंड इंद्रियनिग्रह, परोपकार वृत्ती, प्रखर उपासना, महाज्ञानी, महादानी, सर्व सिद्धींच्यावर विजय, अहंकारविरहित

जीवन, उत्कृष्ट लेखनकला, शुद्ध विचारपद्धती, संपूर्ण धर्माधिष्ठीत व शास्त्रास अनुसरून सर्व कार्य करणे, पशुपक्षांपासून ते सर्व समाजातील माणसांवर कृपादृष्टी आणि अंत:करणापासून प्रेम, दयाभावना अशा कितीतरी गोष्टी त्यांच्यात अंतर्भूत होत्या.

प्रत्येक मनुष्याने स्वधर्माचरण सोडून वागले तर मात्र त्यांना आवडायचे नाही, कारण यात अधोगती निश्चितच आहे म्हणून त्यात कोणीही कमी पडू नये या तळमळीने त्यांना दु:ख होत असे. ईश्वराचा नित्यनेम ते कधीच चुकवित नसत. आपण सामान्य माणसे मात्र असह्य परिस्थितीतच देवधर्म, गुरू यांचेकडे धाव घेत असतो.

आजच्या कलियुगात अशा पद्धतीचे संन्यासी पाहण्यास मिळणे अत्यंत दुर्लभ आहेत. स्वामी देहरूपाने जरी आज आपणास दिसत नसले तरी आत्मसाक्षी म्हणून ते प्रत्येक भक्ताच्या हृदयमंदिरी आपल्या कल्याणासाठी मार्ग दर्शविण्यासाठी समर्थ आहेत. फक्त आपण आपले स्वधर्माचरण व ईश्वरनिष्ठ आणि गुरूंचे स्मरण या गोष्टी आपणासच ज्यांचेपर्यंत नेऊन पोहोचवतील.



**प. पू. ईश्वरानन्द सरस्वतीस्वामीमहाराज यांचे पद**

(चाल: सारी सारी रात तेरी याद सताई)

एक बार दर्शन देई ईश्वरानन्द आई।
तयाविण दुजे देवा नको मज काही ।। धृ०।।
तुचि माता तुचि पिता गुरु बंधू त्राता। शरण मी आलो देवा कृपा करी आता ।।
आस लागलीसे मजला झालो लाहीलाही। तयाविण दुजे देवा नको मज काही ।।१।।
नित्य नित्य दर्शनाने हरतील दोष। ब्रह्मज्ञानाचा कानी पडेल की घोष।।
नको दूर लोटू आता कृपादृष्टी पाही। तयाविण दुजे देवा नको मज काही ।।२।।
ब्रहाज्ञानाचा गोड मेवा मज प्राप्त व्हावा। सदासर्वकाळ माझा संतसंगे जावा ।।
कृपा करी दिनावरी धाव लवलाही। तयाविण दुजे देवा नको मज काही ।। ३।
तव प्रेरणेने करी यशवंत दिन। माझे मन आपुले चरणी सदा व्हावे लीन ।।
हेचि भिक्षा मागतो मी देई लवलाही। तयाविण दुजे देवा नको मज काही ।।४।।



(रचना: श्री. य. ना. देशपांडे, सोलापूर)

## ।। श्रीस्वामी महाराजांचे विषयी मला आलेला अलौकिक अनुभव ।।

मदन पांडुरंग मोहोळकर, कराड

**गुरुर्ब्रह्मा गुरुविष्णु गुरुर्देवो महेश्वराः। गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ।।**

मी १९८१ साली श्रीस्वामी ईश्वरानन्द सरस्वती महाराजांचे सान्निध्यात आलो. स्वामींचे सहवासात आल्यापासून माझे स्वत:चे अस्तित्वच उरले नाही. मी पुरता स्वामीमय होऊन गेलो.


मला वरील श्लोकाप्रमाणे माझे सद्गुरूच काय मला साक्षात परब्रह्मच भेटल्याची अनुभूती मी अनेक वेळा अनुभवत होतो व तसाच प्रत्यय मी आजही अनुभवत आहे.

१९८१ सालापासून ते श्रीस्वामीच्या महानिर्वाणापर्यंत सगुण रूपातील दर्शनअभिलाषेने मी भैरोबा मंदिरात नियमित जात असे, त्यांच्या तेज:पुंज मुखमंडलाच्या दर्शनाने मन अत्यंत शांत व प्रसन्न होत असे. मी त्यांना प्रत्यक्ष काहीच मागितले नाही. तथापि, भक्तांच्या मनातील अपेक्षा अंतर्मनानेच त्यांना समजून येत आणि त्या पूर्ण होण्यासाठी त्याचा आशीर्वादही लाभत असे.

" अनंत हस्ते कमलाकराने देता किती घेशील दोन कराने ''या वचनाप्रमाणे त्यांनी आम्हाला उदंड दिले परंतु षडरिपूंच्या आहारी गेलेल्या आम्हा पामरांना ते घेताही आले नाही.

श्रीस्वामींचे महानिर्वाण झाले. त्यांच्या महानिर्वाणानंतर आपण पोरके झालोत असा भास सतत होत राहिला. संसाररूपी मोहजालात अडकेलेल्या वासनारूपी किड्यांच्या स्वरूपातील आम्हा पामरांच्या मनातील आशाआकांक्षांची पूर्तता आता कोण करणार? या प्रश्नांनी मन सतत चिंतातूर होवू लागले. मनात हे विचार आल्यानंतर श्रीस्वामींच्या समाधीस्थळाकडे गेले की मन शांत होत असे. कालांतराने समाधी मंदिर पूर्ण होऊन त्यात श्रीस्वामींची पिंडीच्या रूपात स्थापना झाली. त्यांच्या दर्शनाने मनातील सर्व प्रश्नाना तिलांजली मिळाली. तेथे जाऊन दर्शन घेतल्याने श्रीस्वामींच्या प्रत्यक्ष दर्शनाची अनुभूती मला मिळू लागली. श्रीस्वामी समर्थांच्या वचनाप्रमाण '' भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे. '' असा आश्वासक गुंजारव सतत कानापाशी होत असतो आणि श्रीस्वामी शरीराने जरी अनंतात विलीन झाले असले तरी गुप्त रूपाने येथेच वास करीत आहेत व भक्तकल्याणार्थ सतत कार्यमग्न आहेत हे जाणवल्यावाचून राहत नाही.

श्रीस्वामी चरणांची निरंतर सेवा आमचे कडून घडो अशी सदबुद्धी आम्हास होवो अशी श्रीचरणी विनम्र प्रार्थना !



दण्डकमंडलू भगवी छाटि । स्वामी पाहिले कृष्णे निकटी ।
त्रिकाल स्नान आत्मचिंतन । पतित पावन करी कृपादृष्टी ।।१।।
दत्तदिगंबर दीक्षा तुमची। त्यास मूर्ती संन्याशाची।
सुख शोधाया नरतनू कष्टी। माय पाहते अमृत दृष्टी ।।२।।
इच्छा होती बहुवर्षांची। एक मास तरी सानिध्याची।
समंत्रस्नाने देहात्मपुष्टी। यमनियमाची येथे कसोटी ।।३।।
करहाटक हे पुरातन क्षेत्र। कन्यागती ये गंगा भेटण्यार्थ।
कृष्णा कोयना गंगा त्रिवेणीची भेटी। यमनियमाची येथे कसोटी ।।४।।
भक्त पुरवावया छंद ईश्वरीय हो। आनंद भवप्रपंचाचा बोध।
चतुर्थाश्रमात सिद्ध । पावनही दासी स्वामीकृपा दृष्टी ।।५।।

(रचना: सौ. इंदूताई लोमटे)

## ॥ प. प. श्री ईश्वरानन्दस्वामी यांच्या आशीर्वादाची फलश्रुती ॥

ना. ल. उमराणी, कराड

मी खासगी नोकरीमध्ये सन १९५५ ते १९५९ पर्यंत डॉ. वाळिंबेकडे कंपौंडर म्हणून कामास होतो. त्यावेळी माझा विवाह झाला होता व एक कन्या (१९५७) मला होती, १४ ऑक्टोबर १९५९ मध्ये डॉ. वाळिंबे यांना देवाज्ञा झाली व माझी नोकरी गेली. तरी श्रीमती वाळिंबेवहिनींनी २ महिने तुला पगार दिला जाईल, तू नोकरीसाठी तोपर्यंत प्रयत्न कर, तेव्हा मी ऑक्टोबर ५९ ते नोव्हेंबर ५९ दोन महिने डॉक्टरांची बँकिंगची कामे व औषध बिलवसुली करत होतो. डिसेंबर ५९ मध्ये एक विचार माझ्या मनात आला की श्री.प. पू. स्वामी (ईश्वरानन्द-स्वामी) यांना भेटून नोकरीसाठी काय उपाय आहे का ते विचारावे; परंतु विचारायचे धाडस होत नव्हते कारण श्री. काशीस्वामींनी उपाय सांगितला तर त्याचे आचरण पूर्ण होईल का? व उपाय पूर्ण झाले व आताचे युगात आपले प्रयत्न अपुरे पडले तर..

डॉ. वाळिंबे यांचे मेहुणे डॉ. नेऊरगांवकर यांनी मला (डॉ. वाळिंबे यांचेकडे कंपौंडर म्हणून ६ वर्षे काम केले असे) सर्टिफिकेट दिले असले तरी व्यवहारात याचा किती उपयोग होईल या बाबतीत मी साशंक होतो. डिसेंबर ५९ चे पहिल्या आठवड्यात मी श्रीस्वामींना भैरोबा देवळात जाऊन नमस्कार केला व माझी समस्या सांगून विचारले की खासगी नोकरी मला कोणत्याही डॉक्टरकडे मिळेल परंतु सरकारी नोकरी (कंपौंडरची) मला मिळेल का ? (अर्थात हे माझे शक्य न होणारे धाडस आहे हे मला माहीत होते)

तेव्हा श्री.प.पु.स्वामी म्हणाले तुला सरकारी नोकरी मिळेल. परंतु मी तुला एक जप (१००० प्रमाणे रोज) सांगेन. तो जप १२ दिवस करावयाचा. जप झाल्यावर १ ते १।। महिन्यांत सरकारी नोकरी मिळेल. हे ऐकल्यावर मला आश्चर्याचा धक्काच बसला व हे कसे शक्य होईल याबद्दल शंका वाटू लागली. ५ मिनिटे मी गप्प बसलो. तेव्हा स्वामी म्हणाले, का रे? तू गप्प बसलास? तुला विश्वास वाटत नाही का? मी म्हणालो, असल्या जगात हे कसे शक्य होईल ?

तेव्हा स्वामी म्हणाले तू उद्या पहाटे ४ ते ४।। वाजता देवळात ये व नदीला जाऊन स्नान करून नदीत पूर्वेकडे तोंड करून गायत्री जपाची एक माळ ओढ. असे ५ दिवस स्नान करून व गायत्री जप दुसरे दिवशी २ माळा, ३ रे दिवशी तीन माळा, ४ थे दिवशी ४ माळा, ५ वे दिवशी ५ माळा नदीत उभे राहून करावयाच्या. नंतर देवळात ये पाचवे दिवशी मी जप देईन.

थंडीचे दिवस व पहाटे स्नान करून ५ दिवस जप करावयाचा हे मला झेपेल का? तसेच त्यानंतर स्वामी मला जप देणार हे मला अशक्य व अवघड वाटत होते. तरी मनाची तयारी करून स्वामींचेकडे गेलो. ५ दिवस स्नान केले व गायत्री जप केला व ५ वे दिवशी स्नान झाल्यावर देवळात स्वामींचेकडे गेलो. स्वामींनी बसावयास सांगितले. प्रथम आचमन कर व स्वतःच्या नावाचा उच्चार करून गोत्राचा उच्चार कर व " मला सरकारी नोकरी मिळावी ‘‘ असा संकल्प कर व पाणी खाली सोड. त्याप्रमाणे मी केल्यावर प. पू. ईश्वरानन्दस्वामींनी मला चार ओळींचा जप दिला रोज १००० याप्रमाणे १२ दिवस जप करावयाचा. जप चालू असताना जपाशिवाय काही उच्चार करावयाचा नाही व बाकीचे विधी करणेस उठावयाचे नाही. असे कडक पथ्य पाळले पाहिजेस;

कारण हा जप कामनापूर्तीसाठी आहे. हा तुझे हातून व्यवस्थित होणार असेल तरच जप कर. एकदा जपाला सुरुवात केली तर मध्ये त्रास होतो म्हणून जप सोडावयाचा नाही. (कारण ४ तास जप करताना उठावयाचे नाही) असे १२ दिवस करणेचे ठरविले.

(जप करताना) जप चालू असताना काही संकेत व विशिष्ट घटना घडतील त्या मला येऊन सांगावयाच्या असे स्वामींनी मला सांगितले होते. जपाला सुरुवात केली व जपाचे चौथे दिवशी पेपरला एक जाहिरात वाचली की गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकमध्ये " कंपौंडर '' पाहिजे. ती जाहिरात स्वामींना दाखवली. स्वामींनी सांगितले, तू अर्ज कर तुला ही नोकरी मिळेल, तरी माझा या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. काही दिवस गेल्यावर माझा जप कोणतीही अडचण न येता पूर्ण झाला. परंतु या काळात मला फार त्रास झाला. काही काळ गेल्यावर मला २१/१/६० रोजी मुलाखतीला बोलावले. मी मुलाखतीला गेलो. एकंदर २५ उमेदवार मुलाखतीला आले होते. त्यामुळे मला नोकरी लागेल अशी खात्री वाटत नव्हती. मुलाखत झाल्यावर मी घरी आलो. घरी वडिलांनी विचारले मुलाखत चांगली झाली का ? मी म्हणालो " मुलाखत झाली पण नोकरी लागेल अशी खात्री वाटत नाही."

तेव्हा वडील म्हणाले, प. पू. स्वामी हे अधिकारी पुरुष आहेत. त्यांचा शब्द व आशीर्वाद निष्फळ होणार नाहीत. दिनांक २२/१/६० रोजी घरी टपाल आले की तुमची कंपौंडर म्हणून नेमणूक केली आहे. तरी २/२/६० पूर्वी कामावर हजर व्हावे व तसा जॉइनिंग रिपोर्ट ऑफिसला करावा. २५/१/६० रोजी मी कामावर हजर झालो. परंतु २२/१/६० चे पत्र वाचल्यापासून मला आश्चर्य वाटत होते. मी स्वतःला सावरले आणि स्वतःच समजून घेतले की अशक्य वाटणाऱ्या घटना, कष्टाने, श्रद्धेने, अधिकारी पुरुषाच्या कृपाशीर्वादाने सफल होतात अन् याचा मला दिव्य अनुभव आला. त्यानंतर मी स्वामींचेकडून गुरुउपदेश घेतला. त्यामुळे स्वामींचा मी अत्यंत ऋणी आहे.





## काकड आरती

काकडआरती सद्गुरू ईश्वरानन्दा। सदवस्तुचे ज्ञान देऊनी छेदी भवबन्दा।

रज तम सत्त्व तीन गुणांचा। काकडा केला।

अज्ञान घृतामाजी पूर्ण भिजविला। ज्ञानदिपाने पेटविता जीव येई बोधा ।।१।।

सर्वसंग परित्यागी पाहिली कृष्णातिरी मूर्ती। दण्डकमंडलू भगवी छाटी कटी कौपिन बंदा ।।२।।

आपुले ते मुक्तपण पाहती डोळा। चार देहाचे निरसन करूनी आत्मा वेगळा। आत्मावेगळा भोगितो ब्रह्मानन्दा ।।३।।

आस्ति, भातीप्रियतम याच्यावर हे जग चाले महानुभव।

सर्वसंत ते सांगुनिया गेले आत्मानात्म सतत विचारे जिवन मुक्त सदा ।।४।।

आर्त जिज्ञासू आर्थार्थी चौथा ज्ञानिया। त्याही पलिकडील स्थिती असंग स्वामीया।

अनन्यभावे दासी नमिते आपुल्या नित्य पदा। काकड आरती सद्गुरू ईश्वरानन्दा ।।५।।

(रचना: सौ. इंदूताई लोमटे)

## ॥ सद्गुरू स्तुती ॥

रविंद्र पांडुरंग माळवदे, कराड

सद्गुरूकृपा मानवी जन्माचे खरे सार्थक, खरंच मानवाचा जन्म मिळाल्यावर आपल्याला काय साध्य करायचंय. खरं तर सुख, शाश्वत सुख, मोक्ष, मुक्ती, परमेश्वराशी एकरूपता हे मानवी जन्मामध्येच शक्य आहे व हे साध्य करायचं झाल्यास याच ठिकाणी सद्गुरूंची आवश्यकता आहे. त्यांच्या कृपेची आवश्यकता आहे. सद्गुरू म्हणजेच अनंतकोटी ब्रह्मांडनायक आणि हे मिळविण्यासाठीच सद्गुरूंना अनन्यभावे शरण गेल्याशिवाय दुसरा उपायच नाही.

सद्गुरू हे ज्ञानाचे पूर्णबिंब असतात. जेथे ज्ञान आहे तेथे अज्ञान, अविद्या, माया, विकार, अहंकार असणे शक्यच नाही. परमेश्वराचे जे निर्गुण, निराकार, मायातीत, आनंदघन, शाश्वत स्वरूप याचा सद्गुरूंनी प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असतो, नव्हे; तर ते प्रत्यक्ष देहातच देव असतात. देहातच आनंदरूप, मोक्षरूप असतात.

आमचे भाग्य थोर की सद्गुरू प.पू. धर्मश्री ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांची माझेवर (आम्हांवर) कृपा झाली. मानवी जन्माचा सर्वात आनंदाचा क्षण, उद्धाराचा क्षणच हा. हो, कारण परेच्याही पलिकडे असणारे शब्दातीत, निर्गुण, निराकार, शुद्ध चैतन्य परब्रह्माचे सगुण साकार सद्गुरू प.प.धर्मश्री ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांच्या रूपाने भेट झाली.

**" धन्य आजी दिन संत दर्शनाचा। अनंत जन्मींचा शिण गेला।**
**मज वाटे त्यांसी अलिंगन द्यावे। कदा न सोडावे चरण त्यांचे। "**

भेटीचा हा क्षण मला अनायासे लाभला.

अनायासे म्हणायचे कारण दरवर्षी स्वामी गुरुपौर्णिमेचा (व्यासपूजेचा) उत्सव येथील श्रीकालभैरव मंदिरामध्ये करीत असत. त्यावेळी देवळात रंगरंगोटी, पताका लावल्या जात असत. माझे चुलत भाऊ गोविंद माळवदे स्वामींचे दर्शनाला नेहमी जात असत. त्यांचेबरोबर रंगरंगोटी करण्याच्या निमित्ताने जेथे स्वामींचे वास्तव्य होते. त्या श्रीकालभैरव मंदिरामध्ये गेलो. तेथेच मला स्वामींचे दर्शन झाले. त्यांच्या चरणकमलांचे दर्शन झाले. जीवनाचे सार्थक झाले. ज्याठिकाणी स्वामींचे वास्तव्य होते ते मंदिर श्रीकालभैरव देवतेचे, श्रीकालभैरव आमचे कुलदैवत व त्याच ठिकाणी सद्गुरूंचे वास्तव्य किती सुंदर योगायोग. ज्यांच्या चरणांच्या स्पर्शाने तीर्थही शुद्ध होतात त्या सद्गुरूंच्या समवेत कृष्णेसारख्या पवित्र नदीमधील श्री कालभैरव तीर्थामध्ये स्नान करणेस मिळाले. स्वामींनी त्यांच्याकडे येणाऱ्या भक्तांच्या अनेक प्रापंचिक अडचणी दूर केल्या. सद्गुरू (परब्रह्म परमात्मा) यांना कोणतीच गोष्ट अशक्य नसते. जेथे ते भक्तांना भवसागरातून पार करून मोक्षप्राप्ती करून देण्यास समर्थ असतात तेथे प्रापंचिक अडचणी दूर केल्यास नवल कसले. आणि आता जरी ते देहामध्ये नसले तरी " जरी हे शरीर गेलो मी टाकूनी। तरी मी धावेन भक्तांसाठी ।। नवसास माझी पावेल समाधी। धरा दृढ बुद्धी माझे ठाई ।। " या साईबाबांच्या वचनाप्रमाणे किंवा " भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे " या स्वामी समर्थांच्या वचनाप्रमाणे किंवा

’ अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्माभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। ’

या गीतेतील श्रीकृष्णाचे वचनाप्रमाणे स्वामी आपल्या सतत पाठीशी आहेत. अशीच त्यांनी सर्व भक्तांवर कृपा करावी हीच स्वामींच्या चरणी अनन्यभावाने प्रार्थना.

सद्गुरू प.पू. धर्मश्रीः ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामींचे चरणी अर्पण,

## ।। श्रीईश्वरानन्दाय नमो नमः ।।

हणमंत नारायण माळवदे, कराड

परमेश्वरप्राप्तीची इच्छा व त्यासाठी लागणारे योग्य आचरण, भक्तिप्रेम यांचा जर ध्यास असेल तर परमेश्वरप्राप्ती शक्य असते. अनेक संतांनी प्रपंच व परमार्थ यांची योग्य सांगड घालून प्रपंचात राहूनही प्रपंचामधील सुखदुःखे भोगली; परंतु प्रपंच हा शाश्वत नाही तर तो फक्त मोहपाश आहे हे जाणून त्यांनी शाश्वत सुखाचा ध्यास घेऊन परमेश्वरप्राप्ती करून घेतली.

या सर्व संतांच्या जीवनाचा जर अभ्यास केला तर ते देहात असूनही निर्गुण विदेही अवस्थेपर्यंत पोहोचलेले असतात. शाश्वत सुखाचा आनंद उपभोगत असतात व देहामध्येच परमेश्वर रूप झालेले असतात. असेच थोर संत प.प.धर्मश्रीः ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांची माझेवर कृपा झाली. स्वामी मला भेटले आणि माझे जीवन आनंदाने भरून गेले.

स्वामी मला अगदी योगायोगानेच भेटले. तेथील श्रीकालभैरव मंदिरामध्ये स्वामीचे वास्तव्य होते. तेथे ते दरवर्षी गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा करीत असत. माझे बंधु श्री. गोविंद माळवदे हे दररोज स्वामींच्या दर्शनासाठी जात असत. त्यांचेबरोबर मी गुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठी देवळामध्ये रंगकाम करण्याच्या उद्देशाने गेलो. तेथे मला स्वामींचे दर्शन घडले. त्यांना पाहताच मी भाराऊन गेलो. माझे मन व बुद्धी स्वामींच्या चरणाशी एकरूप झाली. खरोखरच मी धन्य झालो होतो. आजच्या युगामध्ये स्वामींचेसारखे सद्गुरू भेटणे म्हणजे भाग्यच होय.

श्रीकालभैरव हे आमचे कुलदैवत व त्याठिकाणी सद्गुरूंचे स्थान यालाच योग म्हणतात. स्वामींबरोबर अनेकदा स्नानाचा योग आला. स्वामी तर ज्ञानगंगेतील स्थान होते. स्वामी भक्तांवर अत्यंत प्रेम करीत. एक वेळ गुरुपौर्णिमेच्या दिवशी काही काम असल्यामुळे स्वामींचे दर्शनास जाता आले नाही तेव्हा स्वामींनी प्रसाद माझे घरी पाठविला. स्वामी त्यांच्याकडे येणाऱ्या भक्तांच्या सर्व अडचणी दूर करीत असत. सद्गुरूंना कोणतीच गोष्ट अशक्य नसते.

सद्गुरू हे जन्मोजन्मीचे पाठीराखे असतात. त्यांची माझेवर कृपा झाली. माझे कुटुंबियांवर सुद्धा त्यांची कृपा झाली, त्यांनी या नश्वर संसारातून सोडवावे, त्यांनी सर्व भक्तांवर सर्वकाळ कृपेचा वरदहस्त ठेवावा हीच स्वामीचे चरणी प्रार्थना करतो.

श्रीसद्गुरूचरणी अर्पण ।

।। आचार्य देवो भव ।।

## ।। माझ्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग ।।

कु. रंजिता हणमंतराव जाधव, कराड

प.पू. धर्मश्री ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांचा सहवास आमच्या कुटुंबाला लाभला याचा मला खूप अभिमान आहे. मी लहानपणापासून माझ्या आजीबरोबर, कधी वडिलांबरोबर स्वामींचे दर्शनासाठी जात होते. स्वामींचे दर्शनासाठी येत असलेल्या भक्तांपैकी मी स्वामींची सर्वात लहान भक्त होते. प्रत्येक दिवशी स्वामी माझ्याशी बोलायचे. कदाचित मी कधी आले नाही की स्वामी लगेच माझी विचारपूस करायचे. म्हणून मला लहानपणापासूनच स्वामींची ओढ लागलेली होती.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी स्वामींना जवळून नमस्कार करताना माझ्या आनंदाला पारावार उरायचा नाही. स्वामींचे पायांवर डोके ठेवल्यावर एक वेगळाच चैतन्याचा भास मला झाला. माझ्या मनात विचार आला, स्वामींचे पाय इतके चैतन्यमय असतील तर स्वामींच्या संपूर्ण शरीराच्या चैतन्याची कल्पनाच करता येणार नाही. तेव्हाच मी निश्चय केला की पुढच्या गुरुपौर्णिमेला आपण स्वामींच्या मांडीवर बसायचं म्हणजे बसायचंच. त्यावेळी मी पहिल्या इयत्तेत शिकत होते. बघता बघता दुसरी गुरुपौर्णिमा आली सुद्धा...

आम्ही घरातील सर्वजण स्वामींच्या दर्शनाला गेलो. स्वामींच्या दर्शनासाठी मी रांगेत उभी राहिले. मनात एक प्रकारची धाकधूक वाटतच होती. मी स्वामींना नमस्कार करून म्हणाले,

'' स्वामी माझी एक इच्छा आहे.''
''स्वामी म्हणाले, काय इच्छा आहे ? ''
मी म्हणाले, '' मला तुमच्या मांडीवर बसायचंय.''

डोळ्याचे पाते लवते न लवते तोच दुसऱ्या क्षणी स्वामींनी माझ्या हाताला धरले आणि मांडीवर बसवले, त्यांच्या मांडीवर बसल्यावर मी कुठे आहे हेच मला समजत नव्हते, माझं मन हरवलं होतं. भोवतालचे सारे जगच मी विसरले होते आणि स्वामींचे चरणी समरस झाले होते. मला फक्त माझे स्वामीच दिसत होते. या प्रसंगामुळे माझ्या जीवनाला एक प्रकाशवाट मिळाली. त्यामुळे हा प्रसंग माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय प्रसंग आहे. त्यावेळी दुसऱ्या इयत्तेत मी शिकत होते. स्वामींच्या आशीर्वादाने आता मी पुढच्या वर्षी दहावीच्या बोर्डाची परीक्षा देणार आहे आणि निश्चितच भरघोस यश मिळवून दाखवणार आहे. माझ्या पाठीवर स्वामींचा हात कालही होता, आजही आहे आणि भविष्यकाळातही राहणार आहे.



## ।। सद्गुरू दृष्टांत ।।

**डॉ. विष्णु कोळेकर, कराड**

देवाचीये द्वारीं उभा क्षणभरी ।
तेणे मुक्ती चारी साधियेल्या।

देवाच्या दारात उभे राहिल्यास आपण या संसारसागरातून तरून जातो.
सद्गुरू हे भेटावे लागतात असे म्हणतात अगदी त्याचप्रमाणे स्वामींची व माझी भेट योगायोगानेच झाली. माझी आत्या येथील श्रीगोंदवलेकर श्रीराम मंदिरामध्ये दररोज श्रीरामाचे दर्शनासाठी जात असे व तिच्या सांगण्यावरून मीही रोज दर्शनासाठी जाऊ लागलो. श्रीराम मंदिराचे आसपास श्रीगणपती मंदिर, श्रीउत्तरालक्ष्मी मंदिर व श्रीकालभैरव मंदिर अशी देवालये आहेत. परंतु श्रीकालभैरव मंदिरासंबंधी मला काहीही माहिती नसलेने कुतुहल म्हणून मी सहज कोणत्या देवतेचे मंदिर आहे हे पाहण्यास देवळात गेलो. श्रीकालभैरव दैवतेचे दर्शन घेतले आणि योगायोग असा की, गुरुपौर्णिमेच्या उत्सवानिमित्त स्वामी तसेच कमलताई, विजूताई व सुशिलाताई रंग देण्याचे काम करीत होत्या आणि तेथे मला स्वामींचे दर्शन घडले. मी स्वामींकडे पाहातच राहिलो. खरंतर त्याचेवरून माझी दृष्टी व मन बाजूलाच होईना आणि त्याचवेळी माझ्या मनात रंग देण्याची ऊर्मी निर्माण झाली. मी स्वामींना थोडेसे भीतभीतच मी रंग देऊ का? असे विचारले. स्वामींनी माझेकडे पाहिले व मला एक पेंटर आणून दे असे सांगितले. त्याप्रमाणे मी त्यांना देवळात रंग देण्यासाठी व चित्रे काढण्यासाठी रघूनाथ पेंटर व भाबुरे पेंटर व डॉ. वामन भूर्के यांची गाठ घालून दिली आणि खरं पाहता स्वामीच्या दर्शनामुळे व कृपेमुळे माझ्या जीवनाचा रंग पालटला.

त्या दिवसापासून मी स्वामींचे दर्शनास रोज जाऊ लागलो मी त्यांना अनन्यभावे शरण गेलो. त्याची माझ्यावर कृपा झाली. स्वामींचेबरोबर मला अनेकदा स्नानास जाणेचा योग आला. स्वामी श्रीशारदा देवीचे भक्त होते. प.पू. जगद्गुरू श्रीआद्य शंकराचार्य यांनी श्रृंगेरी येथे मठ स्थापून तेथे श्रीशारदा देवीची स्थापना केलेली आहे. त्या ठिकाणी प.पू. जगद्गुरू श्रीआद्य शंकराचार्यापासून सद्गुरूपरंपरा चालू आहे. अशा पवित्र ठिकाणी स्वामींचेबरोबर जाणेस मिळाले. स्वामींचेमुळे माझा जीवनातील प्रापंचिक अडचणी दूर झाल्या, जे संसारसागरातून तरून नेतात त्यांनी प्रापंचिक अडचणी दूर केल्यास नवल असे काहीच नाही.

स्वामींची आमच्या सर्व कुटुंबावर कृपा झाली. आमचे जीवनाचे सार्थक झाले. जरी आज ते देहात नसले तरी ते सतत आमचे बरोबर आहेत. अशीच स्वामींची सर्व भक्तांवर कृपा व्हावी हीच त्यांचे चरणी प्रार्थना.
" प.प. धर्मश्री: श्री ईश्वरानन्द सरस्वती स्वामींचे चरणी अर्पण ''

*




**।।अभिवादन।।**

क्षितीजावर चमकला एकच तारा। अचानक आकाशी भणाणला वारा।
सांगे गर्जुनी त्या तेजाला। स्वामी अभिवादन तुमच्या स्मृतीला ।।१।।
आज जाहली शंभर वर्षे। ती देखील अचानक सरसे ।
आठवण तुमची मनात भरे। आशीर्वाद सदा शिरावर ।
जीवन तुमचे सत्कार्याचे। स्वामी अभिवादन तुमच्या स्मृतीला ।।२।।
माणूस म्हणून जगून दाखवलंत तुम्ही। माता-पिता होऊन दाखवलंत तुम्ही
जगायच कसं खरं शिकवलंत तुम्ही। मग का नसेल अभिमान आम्हा भक्तांना
स्वामी अभिवादन तुमच्या स्मृतीला ।।३।।
मनात आज उभारी आहे। काहीतरी करून दाखवायच आहे
आदर्श तुमचा नजरेसमोर आहे। सर्वांच स्वप्न साकारायचं आहे
थोरांचा आशीर्वाद असताना काळजी कसली आम्हाला।
स्वामी अभिवादन तुमच्या स्मृतीला ।।४।।

(रचना: कु. रंजिता हणमंतराव जाधव, कराड)

## ।। श्रीप्राणायामनिष्णाताय नमः ।।

सौ. विजया दि. ढवळीकर, कराड

प.प. स्वामी ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांचे चरणी मस्तक ठेवून माझा नमस्कार, माझ्या आयुष्यात मी तो प्रसंग कधीही विसरणार नाही. मी त्यावेळी मार्गशीर्ष स्नान करत होते. माझे कृष्णानदीमध्ये स्नान झाले. मी गंगेची पूजा केली आणि दिवा ओवाळून पाण्यात सोडला. " हर हर गंगे भागीरथी " मी म्हणाले आणि आश्चर्य माझ्या शेजारी दगडावर बसलेल्या एक गुरुजींच्या अंगात संचार झाल्यासारखे झाले. ते हालायला लागले. मी वर पाहिले, त्यांनी हातातून कुंकू काढून पुढे केले. मी ओंजळ केली आणि हातात कुंकू घेतले. ही गोष्ट प.प. स्वामीजींना कळली. ही बाई कोण आहे मला बघायची आहे. ते कळल्यावर मी त्यांच्याकडे दर्शनाला गेले. तेव्हापासून मी त्यांच्याकडे मधूनमधून दर्शनाला जाऊ लागले. दर्शन घेतल्याने मला खूप समाधान होत असे.

स्वामीजी तीन घरी भिक्षा मागून भिक्षा करीत असत. आमच्यासमोर येळगांवकर यांच्यात ते एक दिवसाआड भिक्षा घेत असत. त्यावेळी त्यांचे मौन असे. त्यांनी आपल्याकडे यावे असे मला फार वाटे पण ठराविक घराशिवाय ते कोठे जात नसत. दोन तिनदा ते माझ्या स्वप्नात भिक्षा मागायला आले. मला हुरहुर लागून राहिली. पण त्यांच्या नियमापुढे गप्प बसले. जाता येता मी त्यांचे दर्शन घेत असे, पण भिक्षा घालण्याची इच्छा खूप होती. पौष महिना होता. मी रेणुकेच्या दर्शनाला गेले होते. घरी येऊन मी भिंतीला टेकून बसले. जरा वेळाने आश्चर्य म्हणजे प.प.स्वामी भिक्षापात्र घेऊन माझ्याकडे भिक्षेला आले. मी क्षणभर चकीत झाले. अचानक आलेले पाहून मी उठून उभी राहिले. दोन मिनिटे थांबून मी चटकन सोवळे नेसून दोन पदार्थ ताबडतोब केले. नैवेद्याचा भात तयारच होता. ते सर्व मी त्यांना भिक्षापात्रांत घातले. त्यांना भिक्षेला अडचण आल्याने ते सोवळे म्हणून माझ्याकडे भिक्षेला आले. नंतर ते एका दिवसाआड माझ्याकडची भिक्षा घेऊ लागले. पुढे वयाच्या मानाने त्यांची भिक्षा बंद झाली. ते अगदी मोजकी भिक्षा घेत, त्यांचे नियम पण खूप होते. शास्त्राप्रमाणे त्यांची भिक्षा होती. शेवटी ते त्यांच्या शिष्या आणतील व त्यातलीच जाईल तेवढी भिक्षा खात असत. एकदा कोणी नसताना त्यांनी मला भिक्षा आणायला सांगितली. दोन दिवस मी भिक्षा नेत होते मला खूप आनंद झाला ते अगदी तोलून मापून खात असत. त्यातही मला आनंद वाटे माझी भिक्षा देण्याची इच्छा पुरी होत होती. त्या दिवशी मी जिलबी करायचे ठरवले होते त्यांचा वाढदिवस होता. कुणाला काही त्रास देणे त्यांना आवडत नसे. जिलेबी आणली तर मी खाणार नाही त्यांनी सांगून टाकले. त्यावर मी त्यांना म्हणाले, " बर. जिलबी आणत नाही, जे आणेन ते तरी खाल्ले पाहिजे. " ह्यावर ते काही बोलले नाहीत. मी अगदी मऊ असे चिरोटे करून नेले. ते त्यांना चावायच्या दृष्टीने छान पडले ते त्यांनी खाल्ले. मला अतिशय समाधान झाले.

मी नुकतीच केलेली नर्मदा परिक्रमेची सांगता केल्याचे मला अगदी समाधान झाले. मी ते बोलूनही दाखवले. ते नुसते हसले पण माझी इच्छा परिपूर्ण झाली. त्यांनी सगळ्यानांच अगदी पूर्ण आनंद देऊन संतुष्ट केलें स्वतः मात्र अतोनात कष्ट केले. ह्या सगळ्या आठवणी झाल्या की सगळे स्तब्ध होते. मती कुंठीत होते. आता ह्या सगळ्या आठवणीत आनंद मानायचा आणि त्यांच्यासारखे राहण्याचा प्रयत्न करायचा, ते तितके सोपे नाही. अशा ह्या अद्वितीय स्वामींचे चरणी पुन्हा मस्तक ठेवून नमस्कार करते. त्यांचा आशीर्वादच लाख मोलाचा आहे.

## ।। प. पू. धर्मश्री ईश्वरानन्द सरस्वती श्रीकाशीस्वामीमहाराज की जय ऽऽ।।

सौ. शुभांगी रा. येळगांवकर, कराड

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वराः।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ।।

ईश्वरापेक्षाही गुरुमाऊली श्रेष्ठ आहे. ईश्वरभक्ती-पेक्षाही गुरुभक्ती उत्तम आणि प्रशंसनीय आहे कारण ईश्वराठिकाणी असणारे पावित्र्य, निष्कलंकत्व, सत्य, प्रामाणिकपणा, संपूर्ण ज्ञान, करुणा, दया, निर्भयता आणि स्थितप्रज्ञता हे सर्व गुण गुरुमाऊलीच्या ठायीही असतात; पण फरक असतो तो म्हणजे ईश्वर आपणांस कधीच दिसत नाही आणि गुरूचे वास्तव्य आपणांमध्येच असल्याने त्यांचे दर्शनाचा लाभ आणि परमानंद आपणाला एखाद्या सागराप्रमाणे अथांग मिळत राहतो. ते एकवचनी, एकनिष्ठ असतात. गुरू नेहमी शिष्यांचे पाठीराखे असतात. शिष्यावर येणाऱ्या किंवा आलेल्या संकटात ते अदृष्य रूपात मदतीला धावूत जातात. गुरुंनी आशीर्वादाचा हात एकदा का आपल्या पाठीवर ठेवला की, तो कोणत्याही प्रसंगी ढळू देत नाहीत. शिष्याच्या हाकेला धावून जातात. आपले भाग्यच म्हणून आपणास गुरुंचा सहवास लाभत असतो. त्याप्रमाणे निष्कलंक, सर्वज्ञ, स्थितप्रज्ञ, निर्भय आणि प्रबळ अशी गुरुमाऊली मला लाभली आहे हे मी माझे सौभाग्यच समजते.

श्री ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांचा जन्म कौंडर गावचा आहे आणि त्यांचा वेदांचा सर्व अभ्यास काशी येथे झाला. ते फिरत फिरत आपल्या करहाटक गावी आले. कृष्णाकोयनेचा संगम पाहून त्याना वाटले की इथे दुसरी काशीच आहे. ही भूमी अत्यंत पुण्यकारक आहे. म्हणून स्वामींनी येथून कोठेही जायचे नाही असे ठरविले आणि कायम राहण्याचा निश्चय केला. म्हणून या कृष्णाकोयनेचे आपण शतशः ऋणी आहोत. तेव्हापासून ते कराडवासियांचे पाठिराखे झाले. आपल्याला गुरुमाऊलीचा अमूल्य आधार लाभला म्हणून आपण सर्वजण त्यांचे शतशः ऋणी आहोत

म्हणतात ना, " गुरुविना कोण दाखविल वाट? '' हे मात्र खरे आहे. कारण माझे आजोळ सोलापूरचे होते. तेथे माझे वडील एका सरकारी नोकरीत होते. त्यावेळी आमच्या घराण्याला अक्कलकोट श्रीस्वामी समर्थांचा वरदहस्त लाभला, नंतर वडिलांनी श्रीहनुमानमहाराजांना गुरू केले. या सर्वांच्या प्रेरणेने किंवा त्यांच्या कृपाप्रसादाने वडील त्या नोकरीचा राजीनामा देऊन कराडला श्रीगोंदवलेकर महाराजांच्या मठात श्रीरामाची सेवा करण्यासाठी आले त्यांचे बरोबर त्यांचा भाऊ (चुलते) भरतासारखा पाठीराखा आला. आणि काही काळातच ही श्री ईश्वरानंद सरस्वती काशीस्वामी नावाची गुरुमाऊली आम्हांला लाभली तेव्हा माझ्या वडिलांना परमानंद झाला स्वामी भैरव मंदिरात राहायचे, परंतु ते आमचे देवळात पहाटे ५ वाजता व दुपारी ४ वाजता नियमाने येत असत. त्यावेळी आम्ही सर्वजण त्यांच्या दर्शनाचा लाभ घेत असू. माझ्या वडिलांची त्यांच्यावर अत्यंत श्रद्धा होती. कोणत्याही महत्त्वाच्या कामात स्वामींचा निर्णय घेत असत. आजतागायत त्यांना स्वामींचे दृष्टांत होतात. म्हणतात ना, "'संत संग व्हावा जन्मोजन्मी।''

तसे माझे सासरही सद्गुरूंच्या सावलीत वाढलेले व उभे असलेले मला श्रीस्वामींच्या मुळेच लाभले हे माझे सौभाग्यच आहे. माझ्या कै. सौ आई (सासूबाई) ह्या अतिशय श्रद्धाळू, धार्मिक व भावनाप्रधान होत्या, श्रीस्वामींच्या विषयी त्यांना अतिशय आदर होता. त्यांचेही सर्व वागणे श्रीस्वामी म्हणतील तसेच असायचे आणि घरातील सर्वांना स्वामींनी त्याच मार्गाने नेले. सर्वांना त्यांनी सत्संग घडवला, आमच्या कै. सौ आई प्रथम श्रीस्वामींच्या दर्शनाला गेल्या त्यावेळी परिस्थिती अत्यंत गरिबीची होती, परंतु रिक्त हस्ताने संन्यासाचे दर्शन घ्यायचे नाही म्हणून त्यांनी

तांबडा नवा पैसा त्यांचेपुढे ठेवून दर्शन घेतले त्यावेळी श्रीस्वामींना त्यांच्या श्रद्धेचे फार कौतुक वाटले आणि परीस्थितीला झुंजण्याची आत्मविश्वासाची ताकद त्यांच्यात निर्माण केली. कै. सौ. आईंना जास्तीतजास्त शंकराची आराधना, उपासना करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी स्वत: च्या देहाची पर्वा न करता उपवास, व्रते-वैकल्ये खूप केली आणि घरात सर्वत्र आनंद पसरवला. प्रपंचात त्यांना अनेक संकटं, अडचणी आल्या, पण पहाडाप्रमाणे तटस्थ राहून त्यांनी प्रत्येकाला तोंड दिले. त्या कधी डगमगल्या नाहीत, कंटाळल्या, दमल्या नाहीत. हे फक्त स्वामींवरच्या श्रद्धेचेच फळ होते. गुरुपौर्णिमेला त्या वाटेल तेवढे कष्ट आनंदाने करत होत्या. त्यांच्याकडे धैर्य व श्रीस्वामींवरची श्रद्धा आणि त्यांचे आशीर्वाद याचा ओतप्रोत साठा होता. त्यांची पुण्याईसुद्धा जबरदस्त होती. म्हणून हे आज आमचे घराणे सौ आईच्या पुण्याईवर व श्रीस्वामीच्या आशीर्वादावर जगत आहे. श्रीस्वामींच्या आशीर्वादाने आमचे पहिले घर झाले. तेव्हा ते आमच्याकडे भिक्षेला येऊ लागले व भिक्षेनिमित्ताने का होईना आमचे घरात " गुरु साक्षात् परब्रह्म आले ''

सर्वांबद्दल सांगण्यात आणि स्वतः अनुभवण्यात एक वेगळाच आनंद असतो. नाही का ?

माझी मुलगी (भक्ती) ७-८ महिन्यांची होती. तेव्हा तिच्या हाताला नागिण झाली. तिची वाढ झपाट्याने होत होती. आमची घरगुती औषधे चालूच होती. तरीही डॉक्टरांचे औषध चालू होते. त्यांनी तिला १२ तासांची मुदत दिली होती. आमच्या तोंडचे पाणीच पळाले. नंतर कै. सौ. आईनी श्रीस्वामींना सांगितले. त्यांनी ताबडतोब तिला विभूती लावायला दिली व दुसऱ्या दिवशी कडक उन्हात बसून कळशीभर पाणी मंत्रून त्यांनी तिला अंघोळ घातली. तिला खूप बरे वाटले, संध्याकाळी डॉक्टरानी धोका टळला असे सांगितले.

माझ्यासुद्धा आजारपणात त्यांनी खूप आधार दिला, माझे मिस्टर ट्रकवर जायचे तर ते सुखरूप राहावे यासाठी खूप मार्गदर्शन केले. आमच्यावर (येळगांवकर घराण्यावर) त्यांचे अत्यंत लक्ष होते, जिव्हाळा होता. ते सर्वांची आपुलकीने चौकशी करत होते, आणि आजही ते आमच्या सर्वांच्या पाठीशी उभे आहेत.

आमच्या आजारपणात, संकटात त्यांनी वेळोवेळी मदतीचा हात दिला. त्यांच्या तपश्चर्येवर त्यांनी आम्हाला जीवदान दिले. आमच्या घरातील प्रत्येक व्यक्तीला त्यांचेबद्दल आदर, प्रेम वाटत आहे. म्हणून वाटते की, माणसाचे आयुष्य मृगजळासारखे आहे. आयुष्याचा भरवसा नाही म्हणून त्वरेने व तळमळीने कृतार्थ होण्याचा प्रयत्न करावा त्यासाठी असा एखादा गुरू प्रत्येकाला लाभावा, सत्संगाचा महिमा अपार आहे. म्हणूनच म्हणतात

" गुरू माझा पिता गुरू माझी माता।
गुरू माझी इष्ट देवता ।। ''

मातेप्रमाणे सावली देणारे आणि पित्याप्रमाणे रक्षण करणाऱ्या गुरूंच्या बद्दल चार अनुभव व चार शब्द लिहिण्याची आज मला संधी मिळाली याचा अत्यंत आनंद होत आहे. म्हणून त्यांच्या शिष्यवर्गाची मी अत्यंत ऋणी आहे.

श्री गुरुचरणार्पणमस्तु !



## ।। कऱ्हाडचे वैभव श्रीकाशीस्वामीमहाराज ।।

सौ. प्रतिभा म. जोशी, कराड

कऱ्हाडक्षेत्राचे नाव बरेच दिवस ऐकत होते. अगदी बालपणापासून या कराडचे नाव सतत ऐकत होते माझे मावसकाका आजीला भेटण्याकरिता अधूनमधून यायचे ते कराडहूनच! माझे पूर्वाश्रमीचे गांव इस्लामपूर गावात ना नदी, ना डोंगर, तर नुसता सपाट भागच. तसे धार्मिक वळण तर अजिबात नाही. त्यामुळे कोणतेच धार्मिक, सामाजिक कार्यक्रम कधी व्हायचे नाहीतच. हे कराडचे काका आले म्हणजे सोमवार पेठेतील देवळांची माहिती, धार्मिक कार्यक्रमाची माहिती आवर्जून सांगत असत. त्यामुळे या कराड गावासंबंधी कुतुहल, प्रेम जागे होतेच. सुदैवाने माझे लग्न झाले ते कराडला आणि राहणे पण कराडला झाले. त्यामुळे खूप बरे वाटले. नोकरी निमित्त राहणे इथेच झाले. भैरोबा गल्लीतील श्री यज्ञेश्वर निवारा येथील गिजरे यांचे घरी राहत होतो. सकाळचे काम झाले की गॅलरीत गप्पा मारणे हा नित्यक्रम उरलेला असायचा. बरोबर बारा वाजता श्रीस्वामी भिक्षेसाठी दारावरून गेलेले रोज बघायचे. त्यांना पाहताच आदर, थोडीफार भीतीपण वाटायची, परंतु रोज बारा वाजता ते येण्याजाण्याची वाट पाहत होते. त्यांच्याशी बोलावे किंवा त्यांना जवळून पाहावे असे सतत वाटे, पण कधी जमले नाही.

स्वामींचे नियम फार कडक होते. सोवळे खूपच असे. त्यामुळे त्यांची भीती सतत वाटत राही. असेच काही दिवस गेले अन् अचानक माझा भाऊ माझ्याकडे चिपळूणहून आला. त्याने स्वामींची भेट घेण्यासंबंधी सांगितले, म्हणून मग आम्ही दोघे येळगांवकर यांचे घरी गेलो. ते स्वामीचे अनुग्रहित होते. त्यांच्या घरी ते भिक्षेसाठी जात होते. त्यांच्या मदतीने एकदोन हेलपाटे झाल्यानंतर मग आम्हा बहीणभावंडाची श्रीस्वामींची प्रत्यक्ष जवळून भेट, बोलणे झाले. मनातील भीती त्याचवेळी नाहीशी झाली. एक प्रकारचा आदर, प्रेम आणि जिव्हाळा कधी निर्माण झाला ते समजलेच नाही. सकाळी ११ वाजता स्वामींचे दर्शन होई. ते त्यावेळी नदीवरून आलेले असत. संध्याकाळी ४ वाजता पुन्हा नदीला जात त्यावेळीसुद्धा दर्शन होई. नंतर ७ वाजता पुन्हा दर्शन होई. खूप समाधान वाटे. एखादा दिवस चुकला तर काहीतरी विसरल्यासारखे वाटत राही. त्यांची जीवनपद्धती काटेकोर नियमांनी बद्ध असे. कधीही कोणताही बदल व्हायचा नाही. वाचासिद्धी त्यांना प्राप्त होती. त्यामुळे ते बोलतील ते खरे व्हायचे, माझा अनुभव सांगते की एकदा मी त्यांना सहजच म्हटले माझी इच्छा आहे की तुम्ही माझ्या घरी भिक्षेसाठी यावे. स्वामी चटकन म्हणाले तुझ्या घरी, अग तू तर गिजरेच्या घरी राहतेस ना! जा तुझे घर झाल्यावरच मी येईन त्यांचे बोलणे ऐकून निराश झाले. पुन्हा काही बोलणे झालेच नाही. मीसुद्धा नंतर विसरून गेले. असेच काही दिवस गेले, अन् एक दिवस ह्यांच्या मित्रांनी अरे घर बांधणार का? एक जागा रिकामी आहे. बघ तरी प्रयत्न करून असा आग्रह केला. त्यांच्या आग्रहासाठी सहजच प्रयत्न केला; पण खरोखरच स्वामींच्या बोलण्याप्रमाणे स्वतःची वास्तू झाली. स्वामींनी वास्तुशांतीसाठी देवीचे पाठ वाचण्यास स्वतःची पुस्तके दिली. मंत्राक्षता दिल्या. त्यांची सदैव कृपाछाया आमचेवर राहिली. घरातील धार्मिक वातावरणामुळे मुलांना पण स्वामीजींबद्दल भक्तिप्रेम निर्माण झाले.

मुले लहान असताना प्रत्येक वेळी लहानसहान प्रसंगात आम्ही त्यांना सहज विचारत असू व ते प्रेमाने सांगत. मुलांच्या आजारपणात व नेहमीच ते अंगारा देत. औषधोपचार चालू असत पण स्वामींच्या प्रेमाने एक मोठा आधार वाटे. आज ते आपल्यात नाहीत पण स्वामींच्या बागेतील त्यांच्या समाधीचे दर्शन घेताच खूप बरे वाटते. जणू ते आपल्याला सांगतात की अरे मी तर इथेच आहे, तुम्ही सारे माझेच आहात ना. स्वामी म्हणजे आमच्या कराडचे वैभव, स्वामींची बाग ही खऱ्या अर्थाने वैभवशाली ती यांच्या समाधीमुळेच.



**|| श्रीदयासागराय नमः ||**

प्र. ग. ग्रामोपाध्ये, कराड

प.प. श्री ईश्वरानन्द सरस्वतीस्वामीमहाराजांना विनम्र नमन व स्मरण करून त्याचे सहवासातल्या काही मोलाच्या आध्यात्मिक गोष्टी ज्या स्वामींनी आम्हाला सांगितल्या त्या व शिवाय त्यांचेकडून गुरु-मंत्र मिळाले त्याचे अनुभव मी इथे आपणा सर्वांना कळावेत म्हणून देत आहे.

आमचे वडील त्यावेळी हयात नव्हते. त्यामुळे घरचा धार्मिक माणूस नसलेमुळे आम्ही भावंडे चुकीचे वागत होतो. जानवे नाही मग संध्या वगैरे सोडाच, पण असा प्रसंग आला की आर्थिक परिस्थितीने आम्ही जर्जर झालो मी महाराजांना विचारले स्वामीजी आमची अशी परिस्थिती आहे. त्यावेळी माझे लग्न झाले होते. दोन मुले आणि भावंड असा परिवार होता. त्यावेळी त्यांनी सांगितले मूळ आधी जानवे घाला मार्गस्थ व्हा. तसे आम्ही केलेनंतर त्यांनी मला आदिमायेचे स्तोत्र दिले. हे घे रोज तीनवेळा म्हणत जा. काळजी दूर होईल. मी त्याप्रमाणे करत राहिलो. गुरूंच्या मुखातून आलेली वाक्ये खरी ठरली. नंतर परिस्थितीही सुधारली, ती आजतागायत बरी आहे.

अशीच आणखी माझे संसारात एक गोष्ट घडली. माझी पत्नी त्यावेळी नोकरीस महिला उद्योगात होती. कोजागरी पौर्णिमा होती. त्या दिवशी कारखान्यात दुपारी बाराला जेवणाची सुट्टी झाली. सर्व बायका बाथरुममध्ये हातपाय धुऊन येतात. ती पण त्याप्रमाणे ग्रुपमध्ये आली, तेव्हा तिची मैत्रिण तिला म्हणाली, अगं ग्रामोपाध्ये बाथरुमजवळ " क्ष '' व्यक्तीने आळू लावलाय तो बघून ये. फारच छान आलाय. ती पाहण्यास गेली आणि तिला बाधा झाली. घरी आली. संध्याकाळी सवाष्णीला हळदी-कुंकू लावून मसाल्याचे दूध देतात. ती सर्व तयारी करून ते तसेच राहिले. अंगात ताप असताना बाहेर जाऊन बसली. घरात रात्रीचे ९ वाजले तरी आत येईना, मी संतापलो आणि बाहेर निघून गेलो. दहा वाजता आलो तरी ती बाहेरच बसलेली नंतर ती घरी आली तर अंगात भयंकर ताप, काय करायचे समजले नाही. डॉक्टरांकडे नेले. त्यांनी औषध दिले. थोडे बरे वाटले. सकाळी ठीक होते; संध्याकाळी पुन्हा ताप, जुलाब, काही कळेना. दातार हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. रोज ताप, जुलाब, डॉक्टर तपासत होते. रिपोर्ट निल. डॉक्टरांना काही समजेना. मी स्वामींना भेटलो. त्यांना हा प्रकार सांगितला, त्यांनी त्यांचेपैकी एका शिष्यिणीला तेथे बसवले. तिचे अंगावर तीर्थ टाकले. तिचे अंगात देवीचा संचार सुरू झाला. स्वामीजींनी देवीस विचारणा केली हा काय प्रकार आहे ? देवी बोलली की तिला झपाटले आहे. स्वामींनी एक फूल मंत्रून दिले व सांगितले, हे तुझे पत्नीचे अंगावर टाक. ती शक्ती त्रास देणार नाही. ती दवाखान्यात होती. हा त्रास सुरू होताच श्री भैरवनाथांची कालाष्टमी आली. त्याचे आदले दिवशी डिसचार्ज मिळाला. तब्येत बरी होती. दुसरे दिवशी ताप, जुलाब पुन्हा चालू. काय करायचे समजेना. दुसऱ्या दवाखान्यात दाखल केले तरी तिथे हाच प्रकार झाला. रिपोर्ट निल आला. मिरजेस न्या असे डॉक्टरांनी सांगितले. मी डॉक्टरांना सांगितले की इथेच ठेवा. मी स्वामींना सांगितले. स्वामी म्हणाले, मी तुला मंत्र दिला आहे, त्याचा उपयोग कर. मी स्वामींना म्हणालो, पण काय करायचे ते मला सांगा. मला काही येत नाही. त्यांनी मंत्राचा उपयोग प्रयोगरूपात सांगितला. त्याप्रमाणे मी प्रयोग दवाखान्यात केला. त्याचा परिणाम दडलेली शक्ती माझ्याशी बोलली. मी मुसलमान आहे. कारखान्यावर माझी वस्ती असते तेथे तुझे बायकोस धरले. माझे काही म्हणणे नाही. त्यांनी येवढे देणे द्या. त्यावेळी ५०/- पर्यंतचे असेल. स्वामी मला बायकोला मंदिरात आण म्हणत होते, पण जुलाब होत असताना मंदिरात जाणे मला बरे वाटले नाही म्हणून मी आणले नाही; पण माझी पत्नी मोकळी झाली.

असेच एक ब्रह्मसमंदाने माझे मेव्हण्यास झपाटले होते. आमचे बहिणीस जेवण करू देत नव्हता. पेटलेला स्टोव्ह फेकणे, दूध ओतून देणे वगैरे करत होता. बहिणीने मला सांगितले. मी तिला एक दोरा करून दिला. त्यावेळी मी तिच्या घरी गेलो होतो. दोरा बहिणीने गळ्यात बांधला. आतील शक्ती जागी होऊन माझे अंगावर मारण्यास आली. मी श्रीमहाराजांचे स्मरण केले. चमत्कार म्हणजे ती व्यक्ती ज्या त्वेषाने आली होती त्याच त्वेषाने मागे भिंतीवर जाऊन आपटली व माझे पाया पडू लागली. मी सुटलो.

तसेच अध्यात्मिक ज्ञानसुद्धा त्यांनी मला वेगवेगळ्या तऱ्हेने समजावून सांगितले. ते इथे सर्व जागेअभावी देता येत नाही. तरी अशी ही गुरुमाऊली आम्हांस भेटली. त्यांनी जीवनाचे रहस्य समजावले तसा तुम्हा आम्हांस त्यांचा आशीर्वाद असो, ही श्रीच्या ठिकाणी मी विनंती करून माझे लिखाण संपवतो.

जांभळे मदतीला धावून आले. त्यांनी धर्मसिंधू वगैरे बऱ्याच धार्मिक ग्रंथातले संदर्भ काढून पाद्यपूजा कशी करावी याची माहिती दिली. स्वामींना काय आवडते, काय आवडत नाही, हे सुशीलाताईंना विचारायला गेलो तर पहिल्यांदा त्यांचा विश्वासच बसेना. काय, स्वामी तुमच्या घरी येणार? अहो डॉक्टर, तुमचे भाग्य फार मोठे आहे कारण ते कुणाही गृहस्थाकडे जात नाहीत. असे सुशीलाताई म्हणाल्या. आणि त्यांनी स्पष्टपणे सांगितले की तुम्हाला जे काही अर्पण करायचे असेल ते करा पण ते काहीही स्वीकारणार नाहीत.

ठरलेल्या दिवशी मी गाडी घेऊन भैरोबाच्या मंदिरात गेलो व स्वामींना त्यांच्या शिष्योत्तमांबरोबर घरी घेऊन आलो. घरी चौरंगावर बसवून आम्ही अगदी शास्त्रोक्त पद्धतीने पाद्यपूजा करून फूल-पत्र फळे-दक्षिणा-शाल अर्पण केली. स्वामींनीही मोठ्या कौतुकाने पूजेचा स्वीकार केला. जसे एखाद्या बालकाचे कोडकौतुक पुरवुन द्यावे किंवा नामदेवाने हट्टाने भरविलेला घास घेण्यासाठी साक्षात पंढरीरायाने तोंड उघडावे त्याप्रमाणे, नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे आमचे आम्हालाच प्रसाद म्हणून पुन्हा वाटून टाकले. स्वामी मोकळेच। स्वामी फोटो काढलेत तर चालेल ना ?

मी घाबरत विचारले. त्यांनी सहजपणे परवानगी दिली. स्वामींच्या भेटीची आठवण देणारे ते फोटो अजूनही संग्रहात आहेत. मी स्वामींचा फोटो काढणार म्हणून हट्ट करून रुसून बसलेल्या आमच्या ५ वर्षाच्या कन्यारत्नास स्वामींनी जवळ घेऊन तिची समजूत काढली व दोन्ही मुलांना जवळ घेऊन फोटो काढून घेतला. त्यानंतर सर्व घर, प्रत्येक खोली फिरून पाहिली. देवघर कोठे आहे म्हणून चौकशी केली व देवघरात आवर्जुन काही वेळ थांबले. त्यांच्या तेजस्वी चेहऱ्यावर आणखीनच प्रसन्नता दिसून येत होती. त्यानंतर सर्व हॉस्पिटल फिरून त्यांनी समाधान व्यक्त केले.

नेत्रतज्ज्ञ म्हणून स्वामींचे दोन्ही डोळ्यांचे ऑपरेशन करायला मिळणे हे पूर्वजन्मीचे सुकृतच म्हटले पाहिजे. स्वामींचे चरणी वैद्यकीय सेवा रुजू झाली. भी कृतार्थ झालो. स्वामींच्या पाद्यपूजनाने व वात्सल्यस्पर्शाने आम्ही भरुन पावलो. आयुष्यातली ही एक मोठी जमेची बाजूच ।

You are, the greatest Lord,
Who is accepted, in the world
You are, the religious truth and kind,
Who ties us, with affectionate bind.
Your teachings, should be ever followed,
Which give us, eternal peace beyond
Your memory will, always remind,
Which brings, valuable lessons around
Meditating you, is, divine sound,
Which is, solvation to the whole mankind
Devoting you, itself is God,
Which inspires, holy thoughts in mind.
You can, never be described,
Which is, as such unsuffice of words.



**(Mrs. Sheela Rethrekar)**

## ।। श्रीराम समर्थ ।।

सौ. पद्मावती सीताराम कुलकर्णी, कराड

मी कराडची रहिवासी आहे. माझे घराणे समर्थ सांप्रदायिक आहे, समर्थांनी ११ मारुती स्थापन केले. त्यांपैकी पहिला मारुती मसुरजवळ शहापूर गावी आहे. कराडपासून जवळ आहे. तो आमच्या घरात स्थापन केला आहे. त्यामुळे आम्हाला शहापुरकर म्हणतात. आम्ही कराडात आमच्या सासुबाईच्या माहेरी घरी राहतो. त्यामुळे कराडात कोटणीस म्हणून ओळखतात. माझ्या नणदेचे नाव सौ. सुंदर असे होते. त्या सध्या हयात नाहीत. त्या श्री सद्गुरू काशीस्वामी यांच्या अनुग्रहित आहेत. त्यांच्यामुळे म्हणा किंवा मला अत्यंत आवड आहे व माझेसुद्धा श्री सद्गुरू भगवान श्रीधरस्वामी (वरदहळ्ळीचे) गुरू आहेत. आम्ही समर्थांचे पण उपदेशित आहोत. या माझ्या आवडीमुळे मी श्री सद्गुरू काशीस्वामींच्या दर्शनाला अधूनमधून जात होते.

एकदा एका गुरुपौर्णिमेला मी व माझे मिस्टर सीताराम विश्वनाथ कुलकर्णी असे आम्ही दोघे सज्जनगडावर गेलो. तसेच दर गुरुपौर्णिमेला मी श्रीकाशीस्वामींच्याकडे पण दर्शनाला जात असायची. तर गुरुपौर्णिमेला गडावर गेल्या कारणाने सगळा दिवस तिथे गेला व म्हणून श्रीकाशीस्वामींचे दर्शन घ्यायला रात्री ७.३० ते ८ वाजले, दर्शनाला पोहोचले तर तिथे संध्याकाळी श्रीस्वामी त्यांच्या गुरुंची पूजा करत होते. म्हणून मला आता त्यांच्या पायावर डोके ठेवायला कसे मिळणार असा विचार माझ्या मनात आला. पण मला पाहिल्यावर ते मला म्हणाले, माझ्या पायावर डोके ठेवू नकोस. मी आत्ताच स्नान केले आहे. शिवू नकोस, लांबूनच दर्शन घे. माझ्या मनातलं त्यांनी ओळखले. त्यानंतर चातुर्मासात मी रोज त्यांच्या दर्शनाला जात होते.

एकदा असेच स्वप्नात मी भैरोबाच्या देवळात श्रीकाशीस्वामींच्या दर्शनाला गेले तर ते स्नान करून आलेले होते. बाकी देवळात कोणीच नव्हते. फक्त स्वामीच होते. मी पण लांब उभी होते. मला त्यांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार करावा असे होते. स्वामींनी पण मला बघितले पण काहीच माझ्याशी बोलले नाहीत. मी पण तिथे नुसतीच उभी राहिले. आता काय करायचे. तेवढ्यात एक बाई तिथे आली आणि तिने स्वामींच्या पायावर डोके ठेवून दर्शन घेऊन निघून गेली. श्रीकाशीस्वामींच्या जागी श्री सद्गुरु श्रीधरस्वामी असल्याचे मला दिसले व मी लगेचच त्यांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. त्यावर मला लगेचच शब्द ऐकू आले की झाले ना तुझे समाधान व मी लगेचच स्वप्नातून जागी झाले. म्हणजेच त्यांनी मला त्यांच्या रूपात श्रीधरस्वामींचे दर्शन दिले.

**।। श्रीमर्यादापुरुषोत्तमाय नमः ।।**

सौ. सुनिता ना. कुलकर्णी, कराड

प.प. धर्मश्रीः काशीस्वामी ईश्वरानन्द सरस्वती यांचे चरणी लीन होऊन मी काही आठवणी सांगत आहे. आज महाराज आपल्यात शरीराने नाहीत; पण अंतःकरणात मात्र भरून आहेत.

मी लहानपणी तीर्थासाठी स्वामीचे देवळात रोज जात असे. कारण माझ्या काकूला तीर्थ रोज आणावे लागे. मीच रोज जात असे. स्वामीपण भिक्षेसाठी आमच्या घरी येत असत. पण पुढे पुढे काही कारणाने त्यांचे येणे बंद झाले. मी ९ वीत असेन त्यावेळी मला एकदा बरेच महिने शाळा बुडाली होती. डॉक्टरांचे औषध चालूच होते, पण स्वामींनी मला रोज तीर्थ व एक मंत्र जपण्यास दिला होता. त्यामुळे त्यातून मी पूर्ण बरी झाले. ही स्वामीचीच कृपा होय.

पुढे शिक्षण संपले. लग्न होऊन मी सासरी गेले. माझा आणि प.प. स्वामींचा संबंध जवळजवळ नव्हताच.

माझे पती चड्एइ मध्ये इंजिनिअर असल्याने आमच्या वरचेवर बदल्या होत असत. पण पुणे, सोलापूर, चांदवड, करत करत परत आम्ही कराडला आलो. माऊलींनीच त्यांच्या भेटीसाठी परत आणले. १९६० ते १९८० या काळात जवळजवळ २० वर्षे संबंध नव्हता. स्वामींची भेट घेण्याची मला पण इच्छा झाली नाही आणि कराडला परत आले ते स्वामी जेथे होते तेथेच जवळ राहायला आले आणि काय वाटले कोण जाणे मी अचानक भैरोबाच्या देवळात स्वामींना पाया पडायला गेले.

२० वर्षांनी मी गेले अन् स्वामी मला एकदम म्हणाले, तू पुष्पाच ना? मला विसरलीस तू, मला एकदम धक्काच बसला. खरेच मी विसरले पण गुरुमाऊलींनी मला ओळखले आणि आपल्याजवळ परत आणले. केवढी माझ्यावर कृपा केली. मग मात्र मी वरचेवर देवळात जायला लागले. गुरुमाऊली आमचा आधार झाली.

पुढे मला त्यांनी मंत्र दिला. रोज नामस्मरण करण्यास सांगितले. आमचे शहापूर येथे समर्थ स्थापित मारुतीचे मंदिर आहे. त्या मंदिरावर कळस बसवण्याचे ठरले होते. महाराज तसे वय झाल्याने थकलेले होतेच; पण मी त्यांना सांगितले, महाराज तुम्ही कळस बसवायला यावयाला हवे. काय आश्चर्य। फारसे कुठे न जाणारे स्वामी माझ्याकरिता शहापूरला आले व मंदिरावर कळस चढला. खूप आनंद झाला.

आज महाराज नाहीत पण त्यांच्या तसबिरीसमोर बसल्यावर मन खूप आठवणींनी भरून येते. वरचेवर सुखदुःखाच्या क्षणी माऊलींचा आम्हाला आधार होता.

मंदिरात आल्यावर मला ते पहिल्यांदा विचारीत, तू बरी आहेस ना? आईवडिलांच्याहूनही प्रेमळ अशी माझी ती गुरुमाऊली होती.

आणि एक दिवस मी संध्याकाळी जपाला बसले होते. आणि माझा पुतण्या मला सांगायला आला की महाराजांनी समाधी घेतली. माझा विश्वासच बसेना, मी सकाळीच देवळात जाऊन आले होते. स्वामींचा वाढदिवस होता. सर्वांना त्यांनी प्रसाद दिला. त्यावेळी ते चांगले होते. सर्वांना डोळे भरून आशीर्वाद देत होते. सर्वांना दृष्टी भरून पाहून आशीर्वाद देऊन महाराज अनंतात विलीन झाले. सर्व भक्तगण दुःखात बुडाले. अचानकच काही कल्पना नसताना झाले. सगळीकडे अंधार झाल्यासारखे वाटले. आम्ही खरोखरच पोरके झालो.

आज घाटावर स्वामींची समाधी आहे. ज्या ज्या वेळी मनाला अस्वस्थता वाटते त्या त्या वेळी मी तिथे जाऊन बसते. मन शांत होते आणि आपण एकटे नाही आहोत. महाराज आपला आधार म्हणून अजूनही आपल्यापाशी आहेत ह्याची साक्ष पटते.

शुभं भवतु ।

## ।। ॐ प.पू. श्रीईश्वरानन्द सरस्वती ।।
## ।। ॐ श्रीगजानन ।।

अनिल काशिनाथ कुलकर्णी, इस्लामपूर

१९७५ साली नोकरीचा प्रश्न ! जबाबदारी कशी पेलायची, लग्न झालेले, मुलगी एक वर्षाची लहान. असंख्य प्रश्न समोर उभे राहिले होते. पदवी व बी.एड. नसल्यामुळे कायम स्वरूपाची नोकरी मिळत नव्हती. प्रत्येक वर्षी नोटीस मिळायची. मे महिन्यात वर्तमानपत्रं पाहायची. जाहिरात बघून अर्ज टाकायचा. असे करत रत्नागिरी जिल्ह्यातील कुडाळ, केळशी, अंजली व शेवटी चिपळूणजवळील निरजोळी गावी आलो व तेथेही हीच समस्या उभी राहिली, कुटुंब मोठे (आईवडील, दोन बहिणी, पाच भाऊ) पण घरची परिस्थिती बेताचीच. त्यामुळे बी.एड करणे कठीणच. रिवाजाप्रमाणे मिरजोळी शाळेनेही नोटीस दिली होतीच.

सर्व सामान गोळा करून घरी इस्लामपूरला आलो होतो व वर्तमानपत्रातील " शिक्षक पाहिजेत " ह्या जाहिराती बघून अर्ज टाकत होतो व अपेक्षित उत्तराची वाट बघत होतो. मनामध्ये नोकरीचा विचार सोडून देऊन स्वतंत्र घरामध्येच इंग्रजीचे शिकवणी वर्ग सुरू करावेत असे विचार येत होते पण मूर्त स्वरूप मिळत नव्हते. घरातील कुणालाच हे पसंत नव्हते जम बसेलच कशावरून म्हणजेच सर्वांचा विरोध, त्यात आठ वर्षे इस्लामपूर सोडून बाहेरच. इस्लामपूरचा असूनही मला ओळखणारे कोणीच नव्हते. सर्व भाऊ नोकरीनिमित्त बाहेर, खर्च वाढता काय करायचे ?

१९७५ साली पगाराचे पैसे घेऊन जाण्यासाठी मिरजोळी हायस्कूलचे मे महिन्यात पत्र आले. चिपळूणला आलो. सर्व सहकारी, हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. डी. एम. आगवेकर भेटले. दुसरे दिवशी शाळेमध्ये गेलो. पगाराचे पैसे घेतले. सहकारी व नवीन काही शिक्षकांच्याबरोबर गप्पागोष्टी करण्यात बराच वेळ गेला, त्यामुळे त्यांच्या आग्रहास्तव एक रात्र चिपळूणातच राहण्याचे ठरवले.

सर्वजण मिळून संध्याकाळी वसिष्ठी नदीकाठी फिरावयास गेलो व नदीकाठी वाळवंटामध्ये गप्पागोष्टी सुरू झाल्या. त्याच वर्षी त्याच शाळेमध्ये नवीन आलेले श्री. भागवतसरही बरोबर होते. त्यांचा परिचय झाला. त्यांनी माझी सर्व चौकशी केली व आता पुढे काय करणार आहात म्हणून विचारणा केली. मी माझ्या मनातील विचार " इंग्रजी क्लासेस "चालू करण्याचे बोलून दाखविले, त्यांनी सर्व ऐकून घेतले व जाताना सांगितले की तुम्ही आता इस्लामपूरला जाणार आहात तेव्हा वाटेत कऱ्हाडला थांबून सोमवार पेठेत भैरोबाचे आळीमध्ये गोंदवलेकर महाराजांचे राममंदिर आहे त्याच्या समोरच भैरोबाचे मंदिर आहे तेथे एक स्वामी आहेत त्यांचे दर्शन घेऊनच इस्लामपूरला जा.

श्री. भागवतसरांच्या सांगण्याप्रमाणेच मी कऱ्हाडात धाकट्या बहिणीकडे मुक्काम करायचे ठरविले. माझे मेव्हणे डॉ. प्रा. एम. बी. जोशी (अलिकडेच श्री. पंत बाळेकुंद्रीमहाराज यांच्या वाङ्मयावर त्यांनी पीएच् डी मिळवली आहे) सोमवारातच गिजरे वाड्यात राहत होते त्यांच्याकडे मुक्कामास गेलो व चिपळूणातील श्री. भागवतसरांनी सांगितलेले सर्व सांगितले तेव्हा माझी धाकटी बहीण सौ. कुंदा लगेच म्हणाली की आपण उद्याच सकाळी स्वामींकडे जाऊ व त्याप्रमाणे सकाळी मंदिराचे दार बंद होते म्हणून दुपारी चार वाजता आम्ही दोघेही स्वामींच्या मंदिरामध्ये गेलो. मनामध्ये भिती व एक प्रकारचे दडपण होते. ते काय म्हणतील? त्यांना काय विचारावयाचे? त्यांना कसे सांगावयाचे ? असे अनेक विचार येत होते. पण...

प.प. स्वामींचे प्रथमदर्शन झाले व सर्व भीती, मनातील विचार नाहिसे झाले. साष्टांग नमस्कार केला व उभा राहिलो. तेव्हा स्वामींनी विचारणा केली का आला आहेस? तू ब्राह्मण ना? तुझ्या गळ्यात जानवे आहे का

? तुझे कुलदैवत नृसिंह सोवळे आवळे काही माहीत आहे काय ?

ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे अर्थातच नकारार्थी होती हे प.प. स्वामींनी जाणलेले होतेच. त्यांनी सांगितले की जा आणि क्लास चालू कर व गणपतीची उपासना कर.

त्याच दिवशी मी इस्लामपूरला गेलो नोकरी हा प्रश्न स्वामींनी सोडवला होता त्याप्रमाणे मी क्लासचा विचार करू लागलो. घरातीलच वडिलांचा टेलरिंग कामाचा फळा पडून होता त्यालाच काळा रंग दिला व १० जून १९७५ ला इंग्लिश क्लासेसचा शुभारंभ केला. तेव्हा मला 'कापुसखेड 'मधील जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. कै. वाय. एस. कुलकर्णी यांचे खूपच सहकार्य मिळाले. त्यांनीच आपल्या शाळेतील मुले मिळवून दिली. इथून पुढे माझा चांगला जम बसला. माझ्याकडे खूप मुले येऊ लागली. प्रत्येक वर्षी मे महिन्यात मी प.प. स्वामींकडे नवीन वर्षाचे वर्ग सुरू करण्यापूर्वी येत होतो. स्वामी क्लासची चौकशी करत असत व त्यांच्या आशीर्वादानेच माझे वर्ग भरत होते. त्याचवेळी माझी पत्नी सौ. कुंदा हिने कोल्हापूरात तिच्या भावाकडे राहून पत्रद्वारा डी.एड. पूर्ण केले व तिला १९७७ साली इस्लामपूरातील नवीन मराठी शाळेत नोकरी मिळाली व खऱ्या अर्थाने स्थैर्य प्राप्त झाले. " गुरुपौर्णिमा " मे महिना व कधी सौ. कुंदाकडे आल्यावर प.प. स्वामींच्या दर्शनास जात असे स्वामींनी माझे नावच क्लासवाला असे ठेवले होते. प.प.स्वामींच्या कृपाशीर्वादानेच क्लासच्या जागेचा प्रश्न मिटला व आज इस्लामपूरात एक व सांगलीत एक अशी दोन घरे झाली. प.प. स्वामींच्या आशीर्वादाने मला सर्वकाही मिळाले, माझी कन्या डिप्लोमा इंजिनियर होऊन तिचे लग्न झाले त्यावेळी आठवणीने स्वामींनी मंत्राक्षता पाठवून दिल्या व योग्यवेळी त्या तिच्या मस्तकावर टाकल्या गेल्या. माझा मुलगा चि. शंतनु कऱ्हाडलाच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत आहे.

प. प. स्वामींच्या भेटीने माझे सर्व जीवनच बदलून गेले. मला श्री भागवत सरांचेच शतशः आभार मानले पाहिजेत. त्यांनीच मला प. पू. स्वामीच्याकडे पाठवून दिले किंवा प.पू. स्वामींनीच त्यांच्याद्वारे मला बोलावून घेतले असे म्हटले तर वावगे होणार नाही.

आज मला कशाचीही कमतरता नाही मी पूर्ण समाधानी आहे. प.प. स्वामींचे आशीर्वाद माझ्या पाठीशी असल्यामुळे मला कशाचीसुद्धा चिंता नाही. त्यांच्या फोटोकडे बघितल्यावर पूर्ण समाधान मिळते व कोणतीही समस्या लगेच दूर होते. काळजी करणारा मी कोण ? माझी काळजी स्वामीच घेत आहेत.

एका गुरुपौर्णिमेला प.प. स्वामींनी माझ्या पाठीवर शाल घातली. तो क्षण म्हणजे माझ्या जीवनातील परमोच्च आनंदाचा क्षण होता. ती शाल म्हणजे सतत स्वामी माझ्याजवळ आहेतच, माझ्या नवीन घरात प.प. स्वामींच्या परिवारातील कोणीतरी मुक्कामास यावे अशी माझी इच्छा होती व तीसुद्धा प.प.स्वामींनी श्री. श्रीकांत जोशी यांच्या एक रात्र इथे इस्लामपूरात राहण्याने पूर्ण केली. (१६/७/२०००) गुरुपौर्णिमेला मी कऱ्हाड इथे मंदिरामध्येच श्री. श्रीकांत जोशींना विचारणा केली की इस्लामपूरला कधी येणार ? तेव्हा त्यांनी तूर्त नाही म्हणून सागितले. त्यानंतर दोन दिवसांत रात्री दहा वाजता त्यांचा फोन आला की आम्ही इथे आलो आहोत. आष्टा नाक्यावर आम्हाला नेण्यासाठी या. आमची गाडी नादुरुस्त झाली आहे. ते सर्वजण घरी आले. त्या रात्री एक वाजेपर्यंत प.प. स्वामींबद्दल श्री. श्रीकांत जोशी यांच्याकडून खूप गोष्टी समजल्या. अशा प्रकारे मला प.पू. स्वामींच्या आशीर्वादाने सर्वकाही मिळाले आहे. अशीच त्यांची कृपादृष्टी असावी एवढीच श्रीचरणी प्रार्थना.

## ।। श्रीजीवनमुक्ताय नमः ।।

सौ. इंदूताई लोमटे

। गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वराः
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः।।
बुद्धीप्रकाश द्यावा स्वामी माऊली.
आपुले अनुभव मजकडून वदवा हेच मागणे सद्गुरूदेवा

मी महिला सोसायटीत धान्य दुकानात कामाला असताना मला स्वामींचे दर्शन झाले. त्यावेळेला मी फक्त गुरुपौर्णिमेला दर्शनाला जात असे. कारण त्यांचे नियम फार कडक होते. ते प्रापंचिकाला पाळणे फार कठीण होते. एकदा मंद्रूळकर मंदा आमचेकडे सहज आली होती. तिला विचारले की मी स्वामींच्याबरोबर एक तरी कार्तिक स्नान करावे असे मला वाटते. परंतु त्यांच्या नेमाला त्रास होऊ नये म्हणून मी गप्प बसते. मंदा म्हणाली मी त्यांना तुम्ही कार्तिक स्नानाला येण्याविषयी विचारीन, त्याप्रमाणे तिने स्वामींना विचारले, तेव्हा ते म्हणाले मी १८ वर्षांचे पूर्वी तिला स्वप्नात स्नान घातले होते तीच का? तेव्हा ती म्हणाली ते काही त्यांनी मला सांगितले नाही. परिस्थितीमुळे त्या सोसायटीत नोकरी करतात. घरात सर्व पाळतात. तेव्हा मला ते स्वप्न आठवले मी ते स्वप्न कोणालाही सांगितले नव्हते, पण मला स्वामींचे दर्शन झाले होते. म्हणून त्यांनी मंदाला सांगितले तिला स्नानाला येऊ दे, त्यावरती एक वर्ष स्नान त्यांचेबरोबर केले आणि त्यांची कृपा मजवर झाली व मला तुळजाभवानीचा मंत्र त्यांचेकडून मिळाला आणि त्यांचे कृपाप्रसादाने अंबाबाईची सेवा घडते आहे. कोल्हापूराला जाताना पेठ नाका पेठगाव लागते तेथे तुळजाभवानी मंदिर आहे तेथील पूजा केली, परंतु परिस्थितीनुसार ती सकाम केली. देहरक्षणार्थ तसा मंदिराचा आधार मोठा होता.

स्वच्छता करणे पुढे पुढे जमेनासे झाले. गर्दी वाढू लागली दोघांना अवघड वाटू लागले म्हणून अंबाबाईची अनुज्ञा घेतली व तेथून निघालो. निघण्याचे आधी स्वामी स्वप्नात आले व तिघी योनिनी कु. कमलताई, कु. शिखरेताई व कु विजूताई यापण स्वप्नात आल्या तेव्हा स्वामी मला म्हणाले मी त्यांचे काव्य केले होते. ते त्यांना सगळेच्या सगळे स्वप्नांत म्हणून दाखविले, ते म्हणाले तुला आता अशी काव्यगाणी म्हणावी लागतील. तेव्हा त्यांचा आशय ओळखून मी म्हणाले आपल्या कृपेने स्वातंत्र्य सैनिकाची पेन्शन मिळते. मी फक्त आपलं भजन म्हणून म्हणीन यावर सकामता पैसा मिळावा म्हणून गाणी म्हणणार नाही. मी नेहमी माझा छंद म्हणूनच एकटी काव्य करत असते. तेव्हा स्वामींना स्वप्नातच आनंद वाटला. तो चेहरा अजून माझ्या स्मरणात व हृदयात साठविला गेला आहे. त्या आनंदात त्यांनी माझ्या ओट्यात पिकलेले पाच आंबे घातले, परंतु कु. कमलताईनी त्यांत म्हणजे ओट्यात दोन आंबे ठेवले व बाकीचे आंबे काढून घेतले आणि मला म्हणाल्या, परत जसे लागतील तसे देईन, शेवटी त्या म्हणजे एक महाशक्तीच आहेत हे मी जाणले. स्वप्नात बरं असे म्हटले. त्यांचाही मला आता व्यावहारिक अनुभव येत आहे. मी अज्ञानी आहे. मला शिक्षण नाही पूर्णविराम, स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह कुठे, केव्हा, कसे द्यावे समजत नाही. तरी आपण मला समजून घ्यावे, योग्य तेच यातील लिहून घ्यावे. अर्थशून्य असल्यास गाळावे.

## ।। श्रीवीतरागाय नमः ।।

योगेश व्यास, बडोदा

सन १९४५ से १९५० के समय दरम्यान मेरे पू. पिताश्री का प्रातः स्मरणीय प.पू. स्वामीजी से परिचय हुआ होगा ऐसा मैं मानता हूँ। मेरे परिवार में मुझसे दो बड़े भाईयों का बचपन में देहांत हुआ था और इस घटना के बाद वर्षतक कोई संतान नहीं हुआ था। इसी दौरान मेरे पिताजी का पू. स्वामीजी से परिचय हुआ होगा। पू. स्वामीजीने मेरे मातापिता को आशीर्वाद दिये थे और बारह साल बाद मेरे घर में मेरा जन्म हुआ। मैं मानता हूँ की मेरा जन्म और मेरा अस्तित्व पू. स्वामीजी के आशीर्वाद का परिणाम है।

हम सन १९६७ तक बंबई में रहते थे। तब तक हमारे घर में पू स्वामीजी का युवावस्था का फोटो रहता था । मुझे हमेशा याद रहता है। तत् पश्चात, हमारे गांव के पास गुजरात श्रीव्यास क्षेत्र में वे जब पू. कमलताई, पू. विजूताई आदी सब चातुर्मास करने आये थे तब मैंने उनके दर्शन किये थे। वह हमारे बडोदा घर में भिक्षा के लिए भी आये थे। हम सब के लिए वह क्षण धन्य थे।

हमारे परिवार पर और विशेषतः मेरी माताजी पर उनके अपार आशीर्वाद थे। मेरी माताजी के अंतिम संस्कार भी पू. स्वामीजी के प्रसाद में दी हुई साडी में किये गये थे और उन्होंने उस समय पत्र में कहा था की मेरी माँ की मुक्ति (मोक्ष) हो गयी है। सन १९९० में मेरे पिताजी के देहावसान पर भी उनका आश्वासन देता पत्र आया था और उनके स्नेहाशीर्वाद हमें हमेशा मिलते रहते थे।

कुछ सालों बाद मैं अपने परिवारसह पहली बार कराड उनके दर्शन करने गया और मध्यान्ह के समय भैरव मंदिर में उनको अपने सामने देखकर जो आनंद की अनुभूती हुई थी उसे शब्दों में वर्णन नहीं कर सकता। कितने साहजिक प्रेमसे उन्होंने हमारे भोजन की व्यवस्था सौ. शीलाताई के घर करवाई। बाद में मेरे माता, पिता, चाचा चाची इत्यादी के, मेरे बच्चों को आशीर्वाद दिये। वह सब क्षण में भूल नहीं पाता। जब मैं वहाँ पहुँचा तो पू. कमलताईने कहा की तीन दिनसे वह कह रहे है की बडोदासे योगेश आ रहा है। जब के मैंने मेरे वहाँ पहुँचने की कोई भी खबर नहीं दी थी। वे सब कुछ जानते थे। मन की बात तक उनसे छुप नहीं सकती थी।

मेरी पुत्री के विषय में मुझे कुछ चिंताए थी जिसपर उन्हों ने कहाँ की यह लड़की अपने आप खूब पढ़ेगी और उसकी कोई चिंता मुझे करनी नहीं पड़ेगी। उस वक्त मेरी बेटी हायर सेकंडरी में थी। उसके शिक्षण की कोई दिशा नहीं दिखती थह। पू.स्वामीजी के आशीर्वाद से आज वह Master of Computer Application (M.C.A.) के अभ्यास के अंतिम चरण में है और B.Sc. में भी गणितशास्त्र के साथ पास हुई। हमारे सारे परिवार पर उनका स्नेह रहना इसे मैं भगवान की कृपा ही मानता हूँ।

उनके समाधिस्थ होने के कुछही दिन पहले मैं फिर एक बार कराड सपरिवार गया था। उस वक्त भी उनका वही स्नेह और कृपा पायी। जब हम उन को प्रणाम करके भैरव मंदिर से बाहर निकले तो वे स्वयं भैरव मंदिर के बाहर आये और आशीर्वादसह हमें बिदाई दी। मैं जब कार में बैठा तो मेरे साथ आये हुए मेरे मित्र श्री. गिरीश भट को मैंने कहा की स्वामीजी आज द्वारतक विदा करने आये कहीं ऐसा तो नहीं की अब उनके दर्शन नहीं होनेवाले हो और वैसा ही हुआ। कुछ २०-२५ दिन बाद मुझे उनके समाधिस्थ होने के समाचार मिले। मनुष्यस्वभाव के कारण दुःख तो हुआ था किंतु तब से आज तक यही प्रतित होता है के वह हमेशा साथ ही है। उनके आराधना दिवसपर मेरे कराड आने की इच्छा भी उनके आशीर्वाद से पूर्ण होती है। हर बार कोई न कोई परिस्थिती पैदा होती है और ऑफिस से छुट्टी मिलेगी या नहीं यह अंत तक तय नहीं होता और फिर चमत्कार होता है। मैं अपने अधिकारी को पुछने जाता हूँ और बड़े प्रेम से मुझे कराड जाने की छुट्टी मील ही जाती है।

मैं और मेरे परिवार के लिए यह बहुत बडा सौभाग्य है के पू. स्वामीजी की कृपा और आशीर्वाद सदैव हमारे साथ है। साथ साथ पू. कमलताई, पू. सुशीलाताई, पू. विजूताई, सौ. शीलाताई के भी स्नेहपूर्ण आशीर्वाद हमारे साथ है। आराधना दिवसपर और भी गुरुबंधु-भगिनीओं को मिलने का संयोग होता है। श्री. श्रीकांत जोशी और उनके परिवार का स्नेह मिला है। पू. स्वामीजी की ही कृपा है।

अंत में पू. स्वामीजी के लिए जो भी कार्य हो रहे है उस में मुझे संमिलित होने का बहुत आनंद है। उनके आशीर्वाद हम सब पर इसी तरह रहेंगे और हम सब उनकी कृपासे यह संसाररूपी सफर पार कर मोक्ष पाएँ यहीं अभ्यर्थना । अस्तु। नमो नारायणाय ।

## HOMAGE TO SRI KASHISWAMI

**Mrinal Kanti Ganguli, Calcutta**

I came in contact with this Muktapurusha' at Sringeri Math in 1989 sealed on a cot in Shamkarkrupa. His holiness was reading something. With awe and veneration we two vowed down before this great soul. We took two pieces of garlands and offered them to his lotus feet. With great affection He began his preaching on Vedante Sushanta and I were spellbound for an hour. Sri S.S.Kulkami. Sri G.K.Kulkami. Kamaltal, Vijayatai and Sushilatai were there and I saw that they were always ready to serve their Great Guruji. Spending a few days at Sringeri we came back to Kalna but His appearance did not fade away from my heart. Within one year felt keen eageness of having His darshana. I along with Sushanta one day boarded on the Bombay Mall and via Bombay I reached Karad of Satara District which is a holy place of the great saint Ramadas Swami. Hiring an autorickshaw we arrived at the Kalbhairav Mandir on the holy juncture of the Krishna and the Koyama. Sri S.S.Kulkami was waiting there for us as he was pre-informed. Sri Kashiswami was seated in a very small room with a short height door. His holiness kindly came out of his room and blessed us. We stayed there only three days and in every moming and evening we used to meat him. Frankly speaking, it is beyond my capacity to express the Divine Life of Sri Kashiswamiji

Many great sages appeared in the hilly soil of Maharashtra in different ages. Ramadas Swami, Gnyan Dev. Tukaram preached the lofty ideas of Sanatan Dharma. Sri Iswarananda Saraswali who is wellknown as Kashiswami, appeared in 1900 in a Brahmin family of Maharashtra. This great soul does not recall his past ashram life. So that, no detail information can be known except his spiritual Divine life. -fter his Gayatri Initiation he renounced family life and wandered in search of -tmagnan. Since then he has not returned home for a single day even. His holiness took up sannyasa in Margashirsha Suddha Saptami Tithi in 1925. His holiness took the -dvaita Vedanta teaching directly from Jagadguru Shankaracharya Sri Chandrashekhara Bharati Mahaswamin, the 34th pontiff of Sringeri Math, He also spent a lot of years at Kashicham for meditation. So, he is wellknown as Kashiswami in Sringeri Math, Kamataka, Maharashtra, Gujrat and in West Bengal.

His Holiness travelled India twice on bare foot and last few years of his corporal life he stayed in Kalvairav Mandir at Karad. -t that time this luminous great soul usually gave holy darshanam to the devotees and visitors only on the Gurupumima Tithi. This walking God did never receive any material gift from anybody. He who came in contact with this walking God, received the touch of ecstasy.

Kashiswami alongwith prof. S.S.Kulkami, Kamalatai, Vijayatali, Sushilatai kindly visited Kalna (West Bengal) on 15th March, Sunday, 1992 -.D. in Suddha Ekadashi Tithi at 2 p.m. His Holiness stayed at Kalna upto 21st March and started for Pashupatinath (Nepal) via Calcutta. During his pious visiting here His holiness showed the way to etemal peace to numerous people. - few fortunate persons received also Mantropadesham. Yet he has been residing in the lotus heart of the devotees in West Bengal. The days with the close touch of this Mahatma at Puri, Sringeri, Karad, Kalna, Calcutta will remain ever memorable to this writer.

## ॥ कृपामृत ॥

बळवंत कृष्ण कुलकर्णी, माहुली, सातारा

प.पू. श्रीईश्वरानन्द सरस्वती जन्मशताब्दी सोहळा समारंभाचे निमित्ताने माझ्यासारख्या पामरास अल्पशा बुद्धीने दोन शब्द लिहावयाचा योग हा गुरुकृपायोग म्हणावा लागेल.

१९७९ सालामधील एका गुरुवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास भैरव मंदिरामध्ये गेलो. श्रीकाळभैरवाचे दर्शन घेऊन मी बाहेरील अंगणात स्वामींचे दर्शनाच्या प्रतिक्षेत थांबलो. साधारणपणे १०.३० चे सुमारास स्वामीजी खोलीचे दार उघडून बाहेरच्या पायरीवर आले. मी त्यांना पाहिले आणि क्षणभर डोळे घट्ट मिटून त्यांची मूर्ती हृदयात ठसविली.

प.पु. स्वामींचे दिव्य शरीर, त्यांची तेजः पुंज कांती, त्यांचे डोळ्यांतील अमृतवृष्टी यामुळे मी भारावून गेलो आणि पुन्हा त्यांचेसमोर नतमस्तक झालो, माझ्या जीवनात असे एकमेव योगीपुरुष पाहण्यात आले. त्यांच्या कृपादृष्टीमुळे माझ्या जीवनात अमूलाग्र बदल झाला. माझी संपूर्ण विचारधारा अध्यात्मिक बनली. सूर्यदर्शनाने जसे आसमंत फुलून निघते त्याप्रमाणे माझ्या जीवनातले काळवंडलेले आभाळाचे सावट दूर झाल्याचे मला त्यांचेकडे पाहिल्यावर जाणवले. त्याचक्षणी मी मनाशी निर्धार करून जेव्हा जेव्हा दर्शन होण्याचा योग होईल याची संधी साधून स्वामींचे सहवासात राहण्याचा प्रयत्न करू लागलो. ते माझ्या जन्म-जन्मांतरीचे गुरू झाले. त्यांचे कृपेने ऐहिक जीवनातले सर्व काही मिळालेच, परंतु त्याहीपेक्षा त्यांच्या दिव्य शक्तीचे दर्शन मला पाहावयास मिळाले. त्याचे आचरण, पूजापद्धती, प्रखर वैराग्य आणि नियमितपणा या गोष्टींचा जवळून पाहण्याचा योग मला वारंवार येऊ लागला. त्यांचा एक क्षणही भगवंतचिंतनाशिवाय जात नसे. ईश्वरी चमत्कार करून प्रसिद्धी व्हावी व समाजात मान्यता मिळवून आपला जय-जयकार व्हावा अशा विचारांचे अनेक साधुसंत पाहावयास मिळतात, परंतु हे सर्व सोडून आपण आपल्याच स्वरूपात पाहणारे ते एकमेव होते. सर्व सिद्धी, सर्व कला प्राप्त झालेले असे सर्वज्ञानी, परंतु त्यापासून कोणत्याही प्रकारचा अहंकार त्यांचेत नव्हता. त्यांचे जीवनाला कितीही विशेषणे लावावीत तेवढी मर्यादितच म्हणावी असे व्यक्तिमत्व आदर्शवत होते.

नोकरीचे निमित्ताने माझी बदली लांब ठिकाणी होणार होती व मला जावे लागणारच होते. मी मनातून खिन्न झालो कारण माझे स्वामींकडे जाणे, त्यांचे स्नानासाठी बरोबर जाणे या सर्व गोष्टी बंद पडणार होत्या. मी एक दिवस स्वामींना म्हणालो की माझी बदली लांब ठिकाणी होत आहे. मला जवळचे ठिकाणी जाण्याच्या योग आला तर बरे होईल. आणि मी सातारा येथे श्रीक्षेत्र माहुली या ठिकाणी बदलीची इच्छा व्यक्त केली आणि आश्चर्य म्हणजे मला सातारा येथेच हजर होण्यासंबंधी आदेश आला. तेथे राहून मी स्वामींचे चिंतन, मनन, स्मरण व श्रीमाहुली येथे श्रीकृष्णा नदीचे ठिकाणी स्नानास जाऊ लागलो.

हे माझ्या आयुष्यामधले एक महान योगीपुरुष, सिद्धयोगी व त्यागमूर्तीचे प्रखर उदाहरण आहे. अशी प्रखर संन्यस्तवृत्ती कलीयुगात पाहावयास मिळणे हे परम दुर्लभच म्हणावे लागेल.
प.प.स्वामींना माझे त्रिवार वंदन.

## ।। श्रीगुरुभ्यो नमः ।।

शरद वासुदेव शिखरे, चिपळूण

सर्व भक्तांनी प.पू. स्वामीजींच्या वर्णनाची महती व अनुभव स्मरणिकेच्या माध्यमातून विशद केलेली आहे मीसुद्धा त्याच्याविषयी आलेले अनुभव सादर करत आहे. माझी नोकरी पूर्णपणे कोकणातच झालेली आहे. लहानपणापासून आजतागायत कराडमध्ये मी व्यास-पूजेस प. स्वामीजींच्या दर्शनास येत आलो आहे.

मी ज्यावेळी चिपळूणहून कराडला व्यासपूजेला अथवा दर्शनास जात होतो त्या त्या वेळी हे मला कोकणाबद्दल विशेषत: चिपळूणबद्दल प्रश्न विचारत असत. उदा. कोकणात रेल्वेचे काम कितपत आले आहे ? चिपळूणला रेल्वे स्टेशन कोठे आहे? रेल्वे कशी कशी जाते ? यावरून त्याच्या मनात कोकणाविषयी आपुलकी व प्रेम दिसून येते. त्यांचे गाव चिपळूण तालुक्यातील कौंडर (भागवत घराणे) हे आहे लहानपणापासूनच ते घराबाहेर होते. तरीपण त्यांना स्वतःच्या गावाचा जिव्हाळा होता. माझी बहीण सौ. सुजाता हिच्या पत्रिकेत मंगळ होता. तिचे लग्न ठरवावयाचे निश्चित झाल्यावर स्थळे पाहण्याची सुरुवात केल्यावर " मंगळ ‘‘ ही काय चीज आहे याची प्रचिती आली तिला पुण्यातच द्यावयाचे ही माझी इच्छा होती. रजा काढून पुण्यात व अन्यत्र स्थळे पाहिली पण पत्रिका जमेना रजा संपवून कामावर हजर झालो. रात्री कॉटवर झोपलो व पहाटे ४ च्या सुमारास माझी कॉट दोनदा वरखाली झाली. मी एकदम जागा झालो. सकाळी ८.३० च्या दरम्यान चिपळूणच्या मुख्य ऑफिसमध्ये कामासाठी बोलावलेले आहे असा तातडीचा निरोप आला. आम्ही सकाळी ९ च्या सुमारास निघून चिपळूणला १०.३० वाजता पोहचलो व काम करणेसाठी संबंधिताकडे गेलो तो म्हणाला की मी ऑफिसला लवकर येऊन तुमचे काम पूर्ण केले आहे. तेथून १२ वाजता घरी आलो तोच भावाच्या बायकोचा निरोप आला की डोंबिवलीस सुजाताच्या स्थळासाठी ताबडतोब यावे. उद्या पाहण्याचा कार्यक्रम आहे मी लगेच डोंबिवलीत गेलो दुसरे दिवशी पाहण्याचा कार्यक्रम झाला. लग्न ठरले, लग्न झाले. माझी बहीण संसारात सुखी व आनंदी आहे. प. स्वामीजींचे आशीर्वाद व कृपासावली आमचे सर्वांवर आहे
प.प. स्वामीमहाराजांना शतशः प्रणाम।

।। आरती श्री गायत्रीमातेची आरती।।

आरती गायत्रीमाता। पावन करि गा मज पतिता ।।ध्रु०।। प्रभात समयी ब्रह्माणी। ऋग्वेदाची तव वाणी। हंसवाहिनी बालिका। परमविभूषित दिव्यका। तव स्पर्शाने, कणाकणाने, पावन ही धरती आर्ता। जय जय गायत्री माता ।।१।। रुद्राणी तू माध्यान्ही। नवयुवती गा त्रीनयनी। वृषभवाहिनी चिरतरुणी। रुद्राक्षे भूषित जननी। अभय मुद्रिका, चंद्र भूषिता, यजुः गायनी उद्धरिता। जय जय गायत्री माता ।।२।। सायंकाली वैष्णवी। वृद्धावस्था कृष्णांगी। गरुडवाहिनी चतुर्भुजा। शांखादिक भूषित हस्ता। मा भगवती, जगत्चालिनी, सामगायनी तू तृप्ता। जय जय गायत्री माता ।।३।। दर्शन घडू दे चरणांचे। आन न मागे तुज साचे। ज्ञान होऊ दे ब्रह्माचे। चुकु दे फेरे जन्माचे। विश्वमोहिनी, अखिल व्यापिनी, सार्थक जीवन तुज भजिता। जय जय गायत्री माता ।।४।।

(रचना : श्री बाळूकाका कुलकर्णी)

## ।। श्रीसद्गुरु महिमा ।।

सौ. शकुंतला वा. शिखरे, कराड

प. पू. ईश्वरानन्द सरस्वतीस्वामीजी थोर संन्यासी व महान तपस्वी होते. स्वामीजी योगी होते, ते फार दयाळू होते सर्वांवर प्रेम करीत असत. मला प. स्वामीजींनी अनुग्रह दिला आहे. त्यांनी मला अनुष्ठान सांगितले होते. ते मी केले त्याचे फळ मला मिळाले आहे. माझी स्वामीजींवर खूप श्रद्धा व विश्वास आहे. प. स्वामीजीं-सारखे गुरू लाभले. हे माझे भाग्यच. प. स्वामीजींच्या आशीर्वादानेच माझा मुलगा शरद इंजिनिअर होऊन चिपळूण येथे नोकरी करीत आहे. माझी मुलगी सुजातानेही स्वामीजींचा अनुग्रह घेतला आहे. तिचीही स्वामीजींवर भक्ती आहे. आमच्या घरातील सर्वमंडळी प. स्वामीजींचे दर्शनास जात असत. प. स्वामीजींचा आम्हाला आधार होता व आहे. त्यांनी सर्व प्रसंगी माझे रक्षण केले आहे. आम्हा सर्वांवर त्यांचा कृपाशीर्वाद आहे. माझी नात. कु. आरती प. स्वामीजींच्या कृपेने इंजिनिअर होऊन नोकरीस लागली आहे. तिने प. स्वामीजींचा फोटो आपल्याजवळ ठेवून त्यांचे स्मरण ठेवले आहे. प.स्वामीजींचे माझेवर उपकार आहेत.

एकदा माझ्या मुलीच्या पोटात खूप दुखत होते. वेदनेने ती लोळायला लागली. रात्रीची वेळ होती. तिला फार असह्य झाले. मी तिला घेऊन स्वामीजींकडे गेले. त्यांचे दार वाजवले. स्वामीजी उठले व दार उघडले. त्यांनी तिला विभुती दिली. लगेच पोट दुखणे थांबले.

१९७७ साली माझे मालक भाटघर डॅमवर नोकरीस होते. आम्ही भाटघर कॉलनीमध्ये राहत होतो. एक दिवस तेथे मोठे वादळ झाले. जोरात विज कडाडली. आमचे खोलीवर वीज पडून खोलीवरचे पत्रे उडाले. लाईट गेले. मी घाबरून गेले, माझी मुलगी ५ वर्षांची होती. तिला जवळ घेऊन बसले. सगळीकडे अंधार, काय करावे कळेना. मी देवाचा धावा केला व स्वामीजींना जोरात हाका मारल्या. शेवटी स्वामीजींनीच रक्षण केले. थोड्याच वेळात वादळ कमी झाले. तेथील ऑफिसर मंडळी बॅटरी घेऊन आली. त्यांनी उडालेले पत्रे बाजूला केले व आम्हाला बाहेर काढले. आम्हाला काहीही झाले नाही, ही स्वामीजींची कृपा, ऑफिसर-लोकांनी मला प्रश्न केला " तुम्ही कोणाला हाका मारीत होता ? ’’ मी सांगितले, माझे गुरूंना मी रक्षण करण्यास हाका मारीत होते. ’’ प. स्वामीजींनी मला या संकटातून वाचवले. प. स्वामीजींचे मी सतत स्मरण करते व अहोरात्र वंदन करते. कृष्णाकोयना प्रीतिसंगमावर पूजनीय प. प. ईश्वरानन्द सरस्वती (काशीस्वामी) योगीपुरुष व थोर संन्यासी याची सुंदर समाधी आहे. ती पाहून स्वामीजींचे साक्षात दर्शन होते.

प. प. स्वामीजींचे चरणी शतशः प्रणाम.

।। श्रीवेदव्यासांची आरती ।।

आरती श्रीवेदव्यास महिर्षीची अवघ्या गुरुपरंपरेची ।।धृ।। सनातन हिंदू धर्म त्राता। साही शास्त्रांचा निर्माता। पुराणे अठरांचा निर्माता। अद्भुत जयग्रंथ करता ।।१।। दर्शन आदिशंकरा दिधले। बुद्धीचे कौतुक ते केले। प्रभु जग उध्दरण्यास आले। शारदे जिव्हे वसवीले ।। "व्यासोच्छिष्ट‘‘जग हे म्हणती। गाऊ मी काय तूझी कीर्ती। स्मरावी मंगलमय मूर्ती। जीवना येई मग पूर्ती ।।३।।

रचना : बाळूकाका कुलकर्णी

## ।। श्रीस्वामी-महिमा ।।

### प. पू. श्रीस्वामीजींचे प्रथमदर्शन

श्री. मधुकर पानसे, पुणे

४० वर्षांपूर्वीचा तो क्षण आजही माझ्या डोळ्यांसमोर आहे. स्वामीजींनी काढलेले उद्‌गार माझ्या अजूनही लक्षात आहेत. ते म्हणाले, " मी तुम्हाला ओळखत नाही; परंतु तुमची पत्नी सुमती ही माझी शिष्या आहे. आता तिने संसारात पदार्पण केले आहे आणि ती तुमची आहे. वैदिक धर्माप्रमाणे तुमची परवानगी असेल तरच ती इथे माझ्याकडे दर्शनासाठी येईल." एवढ्या थोर विभुतीने असे काही म्हणावे यामुळे मी थक्कच झालो. सुमती तिथेच होती. आम्ही दोघांनी स्वामीजींना दंडवत घातला आणि त्या क्षणापासून त्यांच्यात विलीन झालो. स्वामीजींचा दंडक होता की त्यांच्या शिष्याने संध्या केली पाहिजे, गायत्री मंत्र नियमितपणे म्हणला पाहिजे.

### श्रीस्वामीजी येता घरा, तोची दिवाळी दसरा

माझे बंधू पौड फाट्यावरून आले होते. त्यांचे गुडघे फार सुजतात आणि दुखतात, इतके की त्यांना जमिनीवर बसता येत नसे आणि स्वामीजी तर जमिनीवरच्या आसनावर बसलेले, स्वामीजी म्हणाले असू दे. खुर्चीत बसा.

स्वामीजींनी आद्य शंकराचार्यांच्या एका ग्रंथातील श्लोक सांगितला, बाळूकाकांनी तो लिहून घेतला स्वामीजींनी त्या ग्रंथातील पान क्रमांक आणि श्लोकांची फलश्रुती असलेल्या पानांचा क्रमांक सांगितला. तांब्याचा आणि चांदीच्या श्रीयंत्राविषयी आणि मंत्र कितीवेळा म्हणावे ते त्यात लिहिले होते. दुसरे दिवशी पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयातून बंधूनी तो ग्रंथ आणला आणि त्यात तंतोतंत ती माहिती मिळाली. स्वामीजींची अचाट स्मरणशक्ती पाहून सर्वांचे मन थक्क झाले. तो दिवस म्हणजे आमचेकडे दिवाळीसारखा वाटला. आनंदीआनंद झाला. स्वामीजी पण येणाऱ्या प्रत्येकाची आस्थेवाईकपणे चौकशी करीत होते.

हो, विशेष म्हणजे सुमतीची इच्छा होती की आपल्या घरी स्वामीजींना भिक्षा घालावी. तीही इच्छा पूर्ण झाली.

### प. प. श्रीस्वामीजी आणि त्यांचे शिष्यांवरील अतूट प्रेम

पुण्यात स्वामीजी २/३ दिवस राहणार होते. दुसरे दिवशी सकाळीच गाईचे दूध, सुवासिक फुले, तुळशी, दुर्वा वगैरे आणले. स्वामीजी देवीला अभिषेक करणार होते. मी, सुमती, शेखर, मणी आम्ही सर्वच जरा बेचैन होतो, बेचैनी चेहऱ्यावर दिसत होती. सुशिलाताईने ते ओळखले. काय झाले आहे म्हणून तिने विचारले. तिला सर्वकाही सांगितले. २/३ महिने झाले होते. घरात ठेवलेले पगाराचे सर्व पैसे, अगदी सत्यनारायणच्या पोथीत ठेवले तरी गायब होत असत. दुपारच्या वेळी सुशिलाताईंनी स्वामीजींना हे सर्व सांगितले.

दुसरे दिवशी स्वामीजींचा देवीचा अभिषेक वगैरे झाल्यावर सुमतीला काळी शाई आणायला सांगितली. स्वामीजींनी बंगल्याभोवती प्रदक्षिणा घातली. कमंडलूतील पाणी सभोवार शिंपडले आणि भिंतीवर काळ्या शाईने काही आकृत्या काढल्या. मंत्र उच्चारले. काही वेळ ध्यान लावून बसले. आम्हा सर्वांच्या अंगावर कमंडलूतील पाणी शिंपडले. आता पुढे असा प्रकार होणार नाही असे म्हणाले. माझ्या शिष्यांची काळजी मला घेतलीच पाहिजे असे म्हणाले.

काही अदृष्य आणि अतृप्त शक्ती अशी वाईट आणि अघोरी कृत्ये करीत असतात. त्याचे वारे आपल्या घरावर आले. मी पूर्ण बंदोबस्त केला आहे. स्वामीजी आणि शिष्यगण दोन दिवसांनंतर कराडला परत गेले. आमचेकडे त्यानंतर असा प्रकार कधी घडला नाही.

प.पू. स्वामीजी शिष्यांची अशी काळजी घेत असत.

## ।। श्रीगुरवे नमः ।।

माधुरी चि. पाठक, ठाणे

कीर्तिरूपाने हयात असलेल्या माझ्या गुरूंच्या वयाला १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून त्यांच्या चरणी वंदन करून त्यांच्याबद्दल त्यांच्याच सामर्थ्याने अल्प शब्द लिहिण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

मानव जन्माला येतो ते तीन ऋणांचे ओझे डोक्यावर घेऊनच. मातृऋण, पितृऋण आणि आचार्यऋण. ही ऋणं तो कृतज्ञता व्यक्त करून काही अंशी फेडण्याचा प्रयत्न करतो म्हणूनच म्हणतात " मातृ देवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव। ''

गुरू ही भव्य शक्ती आपल्या हृदयात गुप्तरूपाने असते. त्या गुरुरूपाची ओळख जेव्हा आपल्याला पटते तेव्हा दुःख जाऊन सगळीकडे सुखच सुख येते.

मी अगदी लहान असताना १०/१५ वर्षांची असेन, कृष्णाकाठच्या परिसरात शांत असलेले भैरव मंदिर व त्यात वास्तव्य करणारे माझे गुरू धर्मश्रीः प. प. ईश्वरानन्द सरस्वती (काशीस्वामी) यांच्याकडून अनुग्रह घेतला. आज वयाची साठी ओलांडली तरी तो अविस्मरणीय सुवर्णदिवस आठवतो व मन गहिवरून येते. कृष्णावर प्रीती जास्त असल्याने कृष्णमंत्राचा उपदेश घेतला. " कृष्णभक्ती " केली व त्याच्याच सामर्थ्यावर सुखीसमाधानी व उत्कर्षाचे आयुष्य जगले. गुरूंचे वर्णन शब्दांत काय वर्णन करणार? शब्द व विचार तोकडेच पडणार. तरीसुद्धा

**ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति। द्वंदातीतं गगनसदृशं तत्वमस्यादि लक्षम् ।।**
**एकं नित्यं विमल वचनं सर्वधि साक्षिमूतं। भावातितं त्रिगुणरहितं सदगुरुं तं नमामी ।।**

हे सर्व वर्णन त्यांना तंतोतंत लागू पडते. त्यांनी मोठेपणा, पैसा कीर्ती, अशा कोणत्याही स्वार्थी हेतूने प्रेरित होऊन आत्मविधीचे दान केले नाही पवित्र प्रेम सर्वांना दिलेत महंत हेच सांगतात

**सद्गुरु वाचोनि सापडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी ।।**
**आपणासारिखे करती तत्काळ नाही काळवेळ तयालागी।।**

उपासनेच्या सर्व प्रकारांत नामस्मरण हा प्रकार सर्वश्रेष्ठ आहे तो सुलभ असल्याने श्रीगुरूंनी सांगितलेले श्रीभगवान श्रीकृष्णाचा नामजप सदैव करते. पुढेही करीन सदैव गुरुचरणाचे स्मरण करून त्यांचे पदतीर्थ घेईन.

**गुरोः पादोदकं यत्तु गयाऽसौ मौऽक्षयोंवटः ।तीर्थराजः प्रयागश्च गुरुमूर्ते नमो नमः ।**

श्री गुरुचरणाचे तीर्थ (मनात घेतल्याने) ते प्रत्यक्ष गयातीर्थ होते. गुरू जगचा चिरंतन वटवृक्ष. सर्व तीर्थात प्रमुख तीर्थ ते गुरूच. अशा या महान गुरुमूर्तीला त्रिवार वंदन आणि शतशः नमस्कार.

## गुरुविण कोण दाखवील वाट ?

श्रीमती सुनंदा पाटील, पुणे

खरंच सद्गुरूशिवाय मला कोण नेमकी वाट दाखवील? मी केवढी भाग्यवान कि मला श्रीपरमहंस परिव्राजकाचार्य धर्मश्रीः सद्गुरू ईश्वरानन्द सरस्वती श्रेष्ठ गुरु म्हणून लाभले. शिवाय माझ्यानंतर स्वामींनी कोणालाही मंत्र दिला नाही, म्हणजे मी स्वामींची शेवटची शिष्या म्हणून माझ्यावर त्यांची कृपा झाली. मला नेहमी ते संकटकाळी मार्ग दाखवितात. मागच्या गुरुपौर्णिमेला माझ्यासमोर राहणाऱ्या मैत्रिणीने मला ज्ञानेश्वरी दिली. मी ज्ञानेश्वरी वाचावी असा स्वामींचा आदेश आहे असे समजून मी ती वाचली. तेव्हा मला खूप समाधान झाले व आनंद वाटला.

**तुका म्हणे खरे आंधळे हे जन । गेले विसरून खऱ्या देवा ।।**

खरंच मी आंधळी होते कारण ब्रह्मस्वरूप स्वामींना मी रामदर्शन व्हावे असे सारखे म्हणायची. गुरूंचे श्रेष्ठत्व मला समजले नाही. कबीर म्हणत की गुरू व देव दोन्ही एकदम समोर आले तर प्रथम गुरूंना वंदन करावे कारण गुरूंनी देव दाखविला. स्वामींच्या कृपेने मला आत्मदर्शन घडावे हीच स्वामींच्या चरणी प्रार्थना.

## ।। श्रीभक्तकामफलप्रदाय नमः ।।

सौ. अपर्णा प्रदीप पोळ, पुणे

प.पू. स्वामींचे चरणी साष्टांग दंडवत.

स्वामीच्या शताब्दी महोत्सवानिमित्त स्मरणिका काढणार आहेत असे समजल्यावर माझ्या आनंदाला पारावर राहिला नाही. एखादी अशक्य गोष्ट अचानक शक्य झाल्याची अनुभूती जेव्हा आपल्याला होते तेव्हा हे काम आपल्या गुरूंमुळेच साध्य झाले असल्याचा आपला विश्वास अधिक दृढ होतो. घडलेली गोष्ट आपण उत्स्फूर्तीने सर्वांना श्रद्धापूर्वक सांगतो. कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एक सहजभाव आहे. अशीच मला आलेली प्रचिती मी आपल्याला सांगताना आपल्यासमवेत कृतज्ञताही पुनर्व्यक्त करणार आहे.

आमच्या सर्वाच्या आयुष्यात जे काही चांगले क्षण आहेत ते सर्व स्वामींचे कृपेनेच आहे. जे काही घडत आहे ते चांगले होण्यासाठीच घडत आहे अशी माझी श्रद्धा आहे.

माझ्या आयुष्यात घडलेला अनुभव मी कधीही विसरू शकत नाही. १९९४ सालची गोष्ट. मी स्वामींकडून गुरुमंत्र घेऊन ५/६ महिनेच झाले होते. मला व माझ्या यजमानांना प्रवासाची अत्यंत आवड असल्याने आम्ही बद्रीनाथ,केदारनाथला जायचे ठरवले, देवदर्शनाबरोबर हिमालयाचे प्रसन्न वातावरणही अनुभवायला मिळणार म्हणून आनंद झाला होता. प्रवासाची आखणी करून आम्ही तिकिटे काढण्यासाठी गेलो असता समजले की बुकिंग फुल आहे त्यामुळे थोडे नाराजीने सर्व एजंट्सकडे जाऊन आलो. जादा पैसे देऊनदेखील तिकीट मिळत नव्हते. नगर, सातारा, मनमाड सर्व ठिकाणी चौकशी केली पण तिकिटे मिळत नाही असे समजले, आम्ही घरी आलो. पाय धुऊन मी स्वामींच्या फोटोसमोर उभी राहिले. त्यांना प्रार्थना केली की स्वामी आम्हाला ट्रिपला जायचे आहे, मला तिकीट पाहिजे, बाकीचे मला काही माहीत नाही. त्याच रात्री मी नगरला भावाला (श्रीकांत जोशी) तिकीट मिळत नसल्याचे फोनवरून कळविले. तेव्हा त्याने बघतो, प्रयत्न करतो असा मला दिलासा दिला. त्याच रात्री त्याने कराडला श्री. येळगावकरांकडे फोन करून तिकिटांची गोष्ट त्यांच्या कानावर घातली. तेंव्हा श्री. येळगांवकरांनी स्वतः तसदी घेऊन तिकिटे मिळविली व आम्हाला पाठविली. सकाळी भावाचा फोन आला की कराडहून तिकिटे मिळाली आहेत. अक्षरशः मी स्वामींना साष्टांग नमस्कार घातला. येळगांवकरांच्या रूपातच स्वामींनी आम्हाला २४ तासांच्या आत कराडहून तिकिटे पाठविली असे मी समजते. हा अनुभव मी कधीही विसरू शकत नाही. असे छोटेमोठे अनुभव मला वारंवार येऊ देत अशीच स्वामींचे चरणी मी विनंती करते.

आपल्यावर येणारे संकट वरचेवर झेलून त्याची आपल्याला झळही लागणार नाही याची काळजी गुरू घेतात असे मी मानते, नव्हे, मला आलेली प्रचितीच आहे तशी. आयुष्यातील बऱ्यावाईट प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी गुरूंनी आपल्याला सहनशक्ती दिलेली असते. ते सतत आपल्या अवतीभवतीच राहतात. आपल्या शिष्याला कसलाही त्रास होऊ नये याची ते काळजी घेतात. म्हणून आईला देखील गुरूंची उपमा दिलेली आहे. पुन:श्च स्वामींचे चरणी शतशः प्रणाम....

## ।। प. पू. धर्मश्री श्री ईश्वरानन्द सरस्वती गुरुमाऊली काशीस्वामींच्या चरणी ।।

सौ. अंजली अजित पाटील, पुणे

**" गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वराः ।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ।''**

'गुरू, गुरुमहिमा हे सर्व पुस्तकात वाचले गेले होते. मी एक सर्वसामान्य गृहिणी आहे. माझ्या आयुष्यात माझ्या काही अपेक्षा, आकांक्षा, इच्छा होत्या व त्या हव्यासापोटी का होईना मला '' गुरुकृपा '' झाली. माझ्या लग्नाला १० वर्षे झाली तरी पाळणा हलेना, सर्व उपचार झाले. मन विषण्ण व्हायचे. आपल्यातील कमतरतेची जाणीव व्हायची व मग काय दुखःच दुःख.

अशातच आमच्या एका स्नेह्यांच्या सहकार्याने कृष्णेकाठी कराडला गेलो व आम्हास गुरुकृपा झाली. तोच आमच्या आयुष्यातील पवित्र क्षण होता. प्रथमदर्शनी भेट, दर्शन, चौकशी झाली व मग त्यांनी विशिष्ट दिवस गुरुमंत्रासाठी ठरविला. प्रथमदर्शनी मी खूप घाबरले. त्या तेजस्वी तपस्वी नारायणाकडे बघण्याची हिंमतच झाली नाही. तो गौरवर्णी देह, प्रेमळ दृष्टी व स्पष्ट कठोर आवाज आजही माझ्या लक्षात आहे.

दि. ३० जानेवारी १९९१, पुष्यनक्षत्र, पौर्णिमेला आम्ही स्वामींच्या कृपेचा लाभ घेऊ लागलो. या दिवशी मी. माझे यजमान व बंधू या तिघांनी गुरुमंत्र घेतला. तो दिवस जन्मात विसरणार नाही. त्यावेळी आम्ही अगदी अज्ञानी होतो. मंत्र, गुरू याचे महत्त्वही कळत नव्हते. फक्त अंतर्मन त्यांच्याकडे ओढ घेत होते व फार मोठी शक्ती अन् आधार आपल्या पाठीशी आहे एवढेच समजत होते. माहेरच्या सुखाइतके सुख तिथे भासत होते.

मधल्या काळात आमच्या घराचे काम निघाले. त्यात व्यावहारिक समस्या म्हणजे पैसा कसा उभारायचा व घर कसे होणार असे प्रश्न होते याचे एकमेव उत्तर माझी गुरुमाऊली होती. आजही ते दिवस आम्ही विसरणार नाही. त्यावेळी पैसा कोठून आला, कसा उभा राहिला व वास्तू कशी झाली हे समजलेच नाही. ही सर्व गुरुकृपाच होती त्यांचे कृपेनेच आमची वास्तू झाली हे त्रिवार सत्य आहे.

त्यानंतर मला त्यांच्या कृपेचा आशीर्वाद व अनुभव म्हणजे " अपत्यप्राप्ती " झाली. हे ही त्यांचेच वाणीचे यश आहे. त्यांचे आशीर्वादाने आमचे जीवनात चैतन्य निर्माण केले म्हणून त्याचे नाव " चैतन्य " ठेवले. " मी आहे ना? मग प्रश्न येतो कोठे ? " असे त्यांचे शेवटच्या भेटीतील उद्‌गार सार्थ झाले. अगदी छोटीशी गोष्ट सुध्दा आम्ही कानावर घालतो, संकटकाळी त्यांचा मोठा आधार असतो. अगदी " गुरुविण कोण दाखविल वाट " या उक्ती प्रमाणे तेच मार्ग दाखवितात.

शेवटचं एकच सांगते की आज आमच्या जीवनात असलेले सुख, समृद्धी, आनंद, समाधान ही सर्व त्यांचीच कृपा आहे. अशा माझ्या गुरुमाऊली श्रीकाशीस्वामींना आमचा शतशः प्रणाम।

## ।। अलौकिक अध्यात्म शक्तीचे महामेरू श्री ईश्वरानन्द सरस्वती प्रसन्न ।।

वसंतराव जोशी, अहमदनगर

ब्रह्मानंदम् परम सुखदम् केवलम् ज्ञानमूर्ति।
भावातीतम् त्रिगुण रहितम् तत्त्वमसया दिनित्यम्।
एकम् नित्यम् विमलं वचनं सर्वधि साक्षिभूतं।
भावातितं त्रिगुण रहितं। सद्गुरुं तं नमामि।

परमहंस परिव्राजकाचार्य धर्मश्री: श्री ईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामी यांच्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त कार्यकारी मंडळाने संपूर्ण वर्षभरात अनुष्ठादी, होमहवनादी व लघुरुद्रादी विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत, त्यातीलच एक भाग म्हणून परमपावन अतिमंगल चरणामृताचे अमृत रसपान करता आले तर पाहावे या हेतूने पूज्य स्वामींविषयी जी स्मरणिका प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे त्यात आपले तोडके मोडके चार शब्द पुढे ठेवावे असा माझा मानस असलेने मी लिहिण्यास प्रवण झालो.

मी अगदी सरळ सरळ मराठीतून त्यांचे म्हणजे पूज्य स्वामींचे अलौकिकाविषयी मला जो अनुभव आला तो आपणापुढे सादर करीत आहे. तो आपल्याला निश्चित भावेल अशी मला आशा आहे, पण जर भावला नाही तर तो माझ्या अज्ञानाचा भाग समजून त्याकडे पाहावे, ही विनंती. एवढे मात्र खरे की पूज्य स्वामीजींचे चरणी जी माझी अपारमती, श्रद्धा आहे त्या बळावरच मी हे लिहिण्याचे धाडस करीत आहे.

माझी १९६३ साली कराडला बदली झाल्याने तेथे आलो आणि अगदी प्रथमच मी कराडला किंवा सातारा सांगलीच्या पंचक्रोशीत येत असलेने कराडला मी नवीन होतो. तसे गाव लहान पण दैववशात माझे आय. टी. आय. मधील स्नेही श्री. उमराणी यांच्याशी संपर्क आला व ओघाओघाने स्वामीचे दर्शनासाठी आम्ही गेलो. प्रथमतःच दर्शन घडताक्षणी जी मूर्ती चर्मचक्षुपुढे आली तिचे तेज आणि नजरेची जरब माझे डोळे सहन करू शकत नव्हते. तेजः पुंज धारदार व्यक्तिमत्त्व, उंचीपुरी छाटी, लाल रंग, गोरापान देह अशी ती विभुती. तिचे दर्शन घेतले.

पुढेपुढे आम्ही दर रविवारी कुटुंबियांसह पूज्य स्वामींचे दर्शनासाठी जाऊ लागलो. त्यामुळे हळूहळू एक दोन वाक्ये ते बोलू लागले. पण त्यांची भेदक दृष्टीमुळे आम्ही घाबरत असू, पुढे १९६४ साली मी आणि सौ. ने त्यांचेकडून अनुग्रह घेतला. मला ते अनुग्रह देण्यास तयार झाले पण सौ. ला द्यायला तयार नव्हते. कारण पत्नीचे सर्वस्व पती असतो, तिला अनुग्रहाची जरुरी नाही. परंतु अनेक वेळा विनंती केल्यावर ते त्यासाठी तयार झाले व त्यांनी सौलाही अनुग्रह दिला. दिवसेंदिवस आमचे मनात प.प. स्वामींविषयी भक्तिभाव अधिकाधिक दृढ होत गेला. कालांतराने माझे सर्व कुटुंबीय अनुग्रहित झाले. कदाचित हा एकमेव अन् अद्वितीय योगच असला पाहिजे.

सरकारी नोकरीमुळे माझ्या बदल्या ठराविक काळानंतर चालूच होत्या. १९८३ साली पुन्हा माझी बदली कराडला पॉलिटेक्निकला झाली आणि तेंव्हापासून मी रोज पूज्य स्वामींचे दर्शनास दररोज सकाळी न चुकता जाऊ लागलो. पुढील एकदोन प्रसंग नमूद केल्यास आम्हा सर्वांचा भक्तिभाव अधिक दृढ होण्यास कसा कारणीभूत झाला याची आपल्याला खात्री पटेल.

माझा दोन नंबरचा मुलगा इंजिनिअर होऊन नगरला स्वतंत्र व्यवसाय करू लागला होता. त्यानंतर माझी बदली नगरला झाली. आम्ही रो हौसिंग स्किममध्ये तीन खोल्यांची जागा घेतली होती. त्या जागेजवळच

एका लष्करी अधिकाऱ्याचा एक प्लॉट होता तेथून ह्या प्लॉटकडे त्याला लक्ष देणे शक्य नव्हते म्हणून त्याने तो विक्रीला काढला होता. त्याचेशी पत्रव्यवहार करून प्लॉटखरेदीची रक्कम व तारीख निश्चित ठरली. ठरल्याप्रमाणे रक्कम उभी करण्यासाठी मी व माझा तीन नंबरचा मुलगा स्टेट बँकेत च.ख.ऊउ. विभागातील ब्रँच ऑफिसमध्ये गेलो व तेथे पैसे काढण्यासाठी फॉर्म भरला. पण ज्याचे नावावर पैसे होते त्याची खाते उघडतानाची सही व आताची सही यांत तफावत आढळून आली आणि म्हणून बँक अधिकाऱ्याने पैसे अदा करण्यास मनाई केली. तो दिवस होता शनिवारचा. ११.३० वाजून गेले होते. रक्कम मोठी होती. तेवढ्यात माझ्या इंजिनिअर मुलाचा फोन आला. त्याच बँकेत आम्ही तिथेच होतो. त्याला मी ही हकिगत सांगितली. त्याने आम्हाला नगरच्या कचेरीत लगेच येण्यास सांगितले. आम्ही लगेच कचेरीत गेलो. त्या मुलाने बँक ऑफ कराडमधून पैसे काढले व अगदी नाममात्र १५,००० रु. शिल्लक ठेवले व पैशाची व्यवस्था केली. खरेदीखत व्यवहार पूर्ण झाला व प्लॉट आमचे नावावर झाला. येथपर्यंत ठीकच झाले व ते व्यवहाराला धरूनही झाले पण लगेच ३-४ दिवसांचे अंतराने एका सायंकाळी रेडिओवरून मराठी बातम्यांत सांगितले गेले की बँक ऑफ कराडचे दिवाळे निघाले व ती बुडाली. ज्या खातेदारांचे पैसे बँकेत आहेत त्यांपैकी ३० हजारापेक्षा कमी असलेल्या लोकांना १५ दिवसांनी पैसे परत मिळतील व त्यापेक्षा जास्त रक्कम असलेल्या खातेदारांना सहामाहीनंतर मिळतील. आता मला सांगा, जर स्टेट बँकेत आम्हाला रक्कम मिळाली असती तर आम्ही बैंक ऑफ कराडमधील रक्कम काढलीच नसती व कसे अडकले गेलो असतो पण केवळ स्टेट बैंकमधील पैसे मिळाले नाहीत म्हणून कराड बँकेतून पैसे काढावे लागले व पैसे बुडण्यापासून आम्ही वाचलो. आम्हाला स्टेट बँकेतील पैसे न मिळणे आणि म्हणून कराड बँकेतूनच पैसे काढण्यासाठी प्रवृत्त करणे या सोयिस्कर घटनांमागे जी अज्ञात व्यक्ती कारणीभूत झाली ती अन्य कोणी नसून पूज्य स्वामीजी हीच व्यक्ती होती हे आमचे लगेच लक्षात आले. आपल्या भक्तांचे नुकसान टळावे या हेतूने पूज्य स्वामींनी केलेली ही सोय होती. अशा तऱ्हेने पूज्य स्वामींनी आम्हाला कराड बँकेतील पैसे बुडण्यापासून वाचवले.

दुसरा प्रसंग आणि तोही अत्यंत महत्त्वाचा माझे पत्नीचे ऑपरेशन १०-१२ वर्षांपूर्वी झाले होते. त्यामुळे आता तिला तसा काही त्रास नव्हता. पण १०-१२ वर्षांनंतर अचानक एकाएकी रक्तस्राव सुरू झाला. आम्ही घाबरलो, लगेच स्त्रीरोगचिकित्सक डॉक्टरांकडे धाव घेतली. त्यांनी सोनोग्राफी करण्यास सांगितले. त्यामध्ये एक गाठ दिसली व त्याचे कारण व ती कशाची असावी त्याबाबत अधिक चौकशी केली असता तज्ज्ञ डॉक्टरांनी ती काढून टाकण्याचे ठरविले. त्याप्रमाणे ती गाठ ऑपरेशन करून काढली तेव्हा ती आवळ्याच्या आकाराएवढी होती व ती आतील भागातील ब्लॅडरला चिकटलेली होती. त्यामुळे त्यांना ती सर्वस्वी काढता येईना. शेवटी जास्तीत जास्त काढता येईल तेवढी ८०-८५% काढली व पुढील तपासासाठी लॅबोरेटरीत पाठविली. तपासणीत ती गाठ कर्करोगाची असल्याचे आढळले व पुढील कार्यवाहीसाठी तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याकरिता पुण्याला हलविले. पुण्याला कॅन्सर एक्स्पर्टकडून CT Scanning करून घेतले. त्यांत फक्त शरीराच्या इश्ररववशी मध्ये गांठ असल्याचे आढळले. डॉक्टरांनी सांगितले की इश्ररववशी संपूर्ण काढून टाकावे. त्यानुसार ेशिरींलेप ठरले. दुसऱ्या दिवशी लगेचच ऑपरेशन ठरले. रात्री आम्ही घरी परतलो. दोन नंबरचा मुलगा सौ. चे जवळ राहिला. रात्रीचे ११ वाजले होते. सकाळी लवकर उठण्याचे उद्देशाने आम्ही निजलो मनात नैराश्याचा व दुःखाचा पूर आला होता. काही काही सुचत नव्हते. एवढी कठोर व्रतवैकल्ये आचरून देखील अशा सात्त्विक व्यक्तीवर असा दुर्धर प्रसंग यावा व तोही एक आठवड्याचे आत दुसरे मोठे ऑपरेशन करावे लागत असल्याने चिंतेने मन ग्रासले होते. त्यामुळे झोप येणे शक्यच नव्हते. १२ वाजले नी मी गिझर चालू केला. कन्येने सांगितले अहो आत्ताशी बारा वाजले आहेत. तेव्हा तिला योग्य शब्दात सांगितले तुम्ही झोपा व मी १२.३० वाजता अंघोळ केली, संध्या

केली, अर्ध्य पहाटे सूर्योदयापूर्वी दिले. गायत्री मंत्राच्या नेहमीच्या माळा जपल्या पूजा केली व सोमवार असल्याने रुद्रावर्तन केले. आरती नैवेद्य झाला नी प. पू. स्वामींनी गुरुमंत्र दिलेला जप सुरू केला व कधी माझे ध्यान लागले ते मला कळलेच नाही त्या ध्यानांत जे घडले ते शब्दांत वर्णन करता येत नाही. पण एवढे खरे की पूज्य स्वामींनी साक्षात् दर्शन देऊन मला घाबरून न जाण्याचे सांगितले व सगळे ठीक होईल. असा आशीर्वाद दिला व लगेच मी भानावर आलो. पहातो तो सगळेजण उठून हॉस्पिटलमध्ये निघण्याचे गडबडीत होते. मीही निघालो. सकाळी ८ वाजता सौ. ला ऑपरेशन थिएटरमध्ये नेले व दुपारी १.३० वाजता बाहेर आणून ख.उ. णपळीं मध्ये नेले. चार दिवसांनी बाहेर डशिलळरश्र वॉर्डमध्ये आणले. यथावकाश १३ दिवसांनंतर घरी आणले. पेशंट अक्षरशः मृत्यूच्या दाढेतून आणला गेला होता. शरीर अगदी क्षीण झालेले, पण चेहऱ्यावरचे तेज काही निराळेच असल्याचे डॉक्टरांना जाणवले. ते त्यांनी बोलूनही दाखविले. आज या गोष्टीला चार वर्ष होऊन गेली आहेत. माझी सौ. रोगमुक्त झाली आहे, हे सांगावयास मला आनंद वाटतो. हे काम अवघड जबाबदारी स्वीकारून यशस्वी करण्याचे कार्य करणाऱ्या डॉक्टरांचे आहे हे जरी खरे असले तरी ते संपूर्ण यशस्वी करण्यामागे जी अध्यात्मिक शक्ती होती ती अन्य कोणी नसून प.प. श्रीकाशीस्वामीच होते याची आम्हाला पुर्नप्रचिती आली आहे व आज माझी पत्नी मला पुनश्च मिळाली. यापेक्षा मोठा आनंद तो कोणता असणार.

असे हे अद्वितीय शक्ती तपसामर्थ्य असलेले प्रेमळ व भक्तांवर अपार माया करणारे व्यक्तिमत्त्व आमचे जीवनात आले. आमचे जीवनाचे सोने केले. यापर जीवनात दुसरे काही मिळवायचे राहिले नाही. त्या प.प. धर्मश्रीः ईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामीचरणी कोटी प्रणाम करून त्यांनी केलेल्या अद्वितीय कर्तृत्वाचे आजीवन ऋणी राहून होईल तेवढी त्यांची सेवा घडावी हेच त्यांचेपाशी मज दीन भक्ताचे मागणे आहे.

स्वामीजी अन्य नको वरदान<br>
स्वामीजी द्या असा वरद आम्हा<br>
अखंड घडो आपुली सेवा<br>
दीन दुबळ्यांना सहकार्याचा हात द्यावा



इति अलम

## अध्यात्ममार्ग



अध्यात्माचा मार्ग गुरूंचा सहज नाही कळतची हो।<br>
श्रुति, शास्त्र, ग्रंथ वाचून ओळख पटली त्यांची हो ।।१।।<br>
श्वास रोखूनी जन्म शतवरी ध्यान धारणा करिती हो।<br>
ब्रह्म प्रकटवुनी साक्ष देऊनी धन्य भक्त ते करीती हो ।।२।।<br>
नसे लोभ मनी वृत्ती निष्काम अंतर्मुख ते असती हो।<br>
ध्यान धारणा समाधी मार्गे मोक्ष पदासी जाती हो ।।३।।<br>
ईश्वरानन्द सरस्वतीस्वामी पाहूनी तुम्हासी वाटे हो।<br>
धन्य जगी या झालो आम्ही काव्य-पुष्प हे वाहते हो ।।४।।<br>
नाही आशा दुसरी मजसी द्या चरणी तव प्रीती हो।<br>
ईश्वरानन्दस्वामींचा आम्ही जयजयकारची करतो हो ।।५।।<br>
न्या आम्हांसी लौकर वरती विमान आणुनी खालती हो।<br>
यासाठी आम्ही वाट पाहातो लौकर या तुम्ही स्वामी हो ।।६।।

(रचना : सौ. मंगल गो. कुलकर्णी)

## ।। आम्हाला भेटलेला परमेश्वर ।।

वे.मू.श्री. चंद्रकांत लोहगांवकर
वे.मू.श्री. विनायक लोहगांवकर

माणसाचं नशीब जर कोणी बदलू शकत असेल तर ते म्हणजे फक्त गुरू. कारण परमेश्वर फक्त आपल्याला निर्माण करतो. पण गुरू खऱ्या अर्थाने आपल्याला घडवतो. हा प्रत्यक्ष अनुभव ज्यांनी अनुभवला व उपभोगला ते आम्ही लोहगावकर कुटुंबीय स्वामींच्या चरणी शतशः विलीन आहोत.

प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा मनात स्मरण केल्यानंतर समोर उभा राहतो. अशा ऋषितुल्य गुरुंची म्हणजेच परमपूज्य स्वामींची आमची गाठ पडली, हा खरोखरच आमच्या पूर्वसंचिताचा भाग असेल, जगात गुरू-अभिमान सर्वश्रेष्ठ समजला जातो. अशा अभिमानास्पद गुरुंचा अनुग्रह मिळाला या भाग्याचा हेवा वाटतो.

प्रथमदर्शनाचा योग आला. मनात उत्सुकता, आदरयुक्त भीती व परमेश्वराला भेटण्याची इच्छा. एका योगी पुरुषाने केलेल्या त्यांच्याबद्दलच्या वर्णनाची खूणगाठ बांधूनच आम्ही त्यांना भेटायला गेलो. ते वर्णन काय होते की गुलाबी रंगाचे गुलाबाचे फूल जर श्रींच्या समोर धरले तर फुलाच्या रंगात व श्रींच्या रंगात कोणताही फरक जाणवणार नाही आणि घडलेही तसेच.

प्रथमदर्शनी आलेला त्यांचा अनुभव म्हणजे उगवत्या सूर्याचं चमकतं तेज आपण पाहत आहोत असं वाटत राहिलं, त्या तेजानं जणू आमची सर्व पापं नष्ट होऊन पूर्णत्वाची एक नवीन जाणीव आली. चैतन्याचा एक नवीन अनुभव आला. या अनुभूतीनंतर जणू आम्हाला आभाळच ठेंगणं झालं. ज्यांच्या प्राप्तीसाठी आपण जन्मोजन्म धडपडतो ते मिळाल्याचा परमानंद झाला. आम्ही जणू परमेश्वराच्या मुखातून गुरुमंत्र घेतला. घरातील सर्व मंडळींना त्यांचा अनुग्रह झाला. अंध:कारातून आमचे कुटुंबीय जणू एका तेजोवलयाकडे जात आहे. जणू काही जन्मोजन्मीची पापे धुतली जाऊन आनंदमय प्रवास चालू झाला. त्यातले अगणित अनुभव वर्णावे तेवढे थोडे आहेत.

एकदा श्री जगदगुरू शंकराचार्य कऱ्हाडला आलेले असताना त्यांनी सहजपणे माझी चौकशी केली त्यावेळी त्यांचा अंर्तभाव मनाला कळला नाही आणि नंतर पंधराच दिवसाच्या आत गुरुकृपेमुळे मला उत्तम सहचारिणीचा लाभ झाला तिच्या पुण्याईमुळे तिलाही लगेचच गुरुमाऊलींचा कृपाप्रसाद मिळाला. त्यानंतर एक वर्षाने लगेच उत्तम पुत्रप्राप्ती झाली.

माझ्या जेष्ठ बंधूंनाही सद्गुरूचा असाच एक अलौकिक अनुभव आला त्यांच्याच भाषेत तो पुढीलप्रमाणे - मला स्वामींची प्रथम भेट झाली. ती स्वप्नात येऊन, स्वामींना भेटायच्या आधी एक महिना, स्वामी ध्यानास बसत त्याप्रमाणे ते बसले होते दुसरे एक योगी मला सांगत आहेत की हे स्वामी तुझे गुरू आहेत हे तुला गुरुमंत्र देणार आहेत, पण थांब आत्ताच नाही त्यानंतर एक महिन्याचा कालावधी लोटल्यानंतर अकस्मात स्वामींची भेट झाली व अगदी स्वप्नातील पद्धतीनेच त्यांचे प्रथमदर्शन झाले. मी थक्क झालो. त्यानंतर दीक्षा देण्याचा दिवस ठरला. त्यावेळी दीक्षा दिल्यानंतर परत स्वप्नात येऊन त्या योगींनी विचारले " झाले ना मनासारखे ? मिळाला ना गुरुमंत्र ? " याप्रमाणे श्रीस्वामी हे माझे गुरू झाल्याने जीवनात आमुलाग्र बदल झाला व जीवन कृतार्थ झाले.

याप्रमाणे सदोदित गुरु सान्निध्य आम्हाला लाभेल व त्याच्या अस्तित्वाची जाणीव आम्हाला त्यांचा फोटोकडे बघून होईल अशा स्वरूपाचा फोटो काढण्याची संधीही गुरुमाऊलींनी दिली. अशा या आमच्या गुरूचे चरणी आमचे शतशः प्रणाम

त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एकच सांगावसे वाटते

कुठे शोधीसी काशी, कुठे शोधीसी रामेश्वर,
असा आहे कायम आमच्या समोर आमचा परमेश्वर।

## ।। श्रीविद्याविनयसंपन्नाय नमः ।।

सौ. वेदवती श्रीकांत जोशी, अहमदनगर

आनंदमानंद करं प्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोध रूपं ।
योगीन्द्रमीडयं भवरोग वैद्यं श्रीमद्गुरूं नित्यमहं नमामि ।।

या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणे सद्गुरू मिळणे हे भक्ताचे परमभाग्यच म्हणले पाहिजे. अशा भाग्यवंतांपैकी मी एक. प.पू. श्रीईश्वरानन्द सरस्वतीस्वामीसारखे जीवनमुक्त असलेले गुरू मला लाभले.

माझे सासूसासरे सौ. शालिनी जोशी आणि श्री वसंतराव जोशी यांनी तर १९६४ साली प.पू. स्वामींकडून अनुग्रह घेतला आहे. पुढे १९८७ नंतर आमच्या कुटुंबातील उर्वरित म्हणजे दोनही दीर, जावा, आम्ही उभयतां, आमची मुले, सर्वांना प.पू. स्वामींनी गुरुमंत्र दिला व आमच्या कुटुंबाला परतत्त्वाचा स्पर्श झाला.प. पू. स्वामी हे कडक जरी वाटले, तरी ते अतिशय मायाळू होते. ते अतिशय शिस्तप्रिय होते. साधी काडेपेटी ठेवण्यामध्येसुद्धा ते सुबकता पाहत.प.पू. स्वामींनी अनाठायी खर्च आवडत नसे. माझे यजमान प.प. स्वामींना पत्र नेहमी पाकिटातून पाठवत मजकुर थोडा असला तरी पाकिट असायचे. स्वामी त्यांना म्हणावयाचे की तू काय सावकार आहेस। अन् खरोखरच प.पू. स्वामींचे वाणीमुळे श्रीमहालक्ष्मी आमचे कुटुंबावर प्रसन्न झाली आहे.

कराडला जायचं म्हणलं की आनंदाला कोण भरतं यायचं. तिथे आल्यावरसुद्धा आमची अतिशय आत्मियतेने चौकशी करत. जेवणाखाण्याची व्यवस्था नीट होत आहे की नाही ते पाहत. जेव्हा मीन राशीला साडेसाती सुरू होणार होती तेव्हा ते श्री. बाळूकाकांना म्हणाले, श्रीकांतला साडेसाती सुरू होणार आहे त्याला पुढीलप्रमाणे उपासना करावयाला सांग, पत्राने नीट कळव त्याचवेळी साडेसातीच्या कल्पनेने मी अतिशय अस्वस्थ व चिंताक्रांत होते. झोपसुद्धा नीट येत नसे. एका पहाटे मला स्वप्न पडले. मी प. प. स्वामीसमोर रडवेली होऊन उभी आहे व प. पू. स्वामी मजकडे पाहत आहेत, तेवढ्यात स्वामींनी समोरच्या वाटीतून कुंकू घेतले व माझ्या कपाळावर मोठा टिळा लावला अन् सांगितले की तुझ्या सौभाग्याची काळजी करू नकोस. अन् खरोखरच स्वामीकृपेचा हा एवढा मोठा अनुभव आहे की साडेसातीमध्ये काहीही त्रास झाला नाही, उलट, दोन संन्याशांची समाधिमंदिरे व श्रीमारुतीचे मंदिराचे बांधकाम करण्याचे भाग्य यांना मिळाले.

प.पू. स्वामींच्या समाधीपूर्वी साधारण वर्षभर आधी माझे सासूसासऱ्यांनी प.प. स्वामींच्या चंदनाच्या पादुका करून घेतल्या व प.पू.स्वामींना त्या घालायची विनंती करून प.प. स्वामींची पाद्यपूजा केली. त्या प्रासादिक पादुकांच्या माध्यमातून प.पू. स्वामी आजही आमच्या " ईश्वरानन्द '' या वास्तूमध्ये आहेत.

याच पाद्यपूजेवेळी आमच्या सासूबाईना वाटत होते की प.प. स्वामींना आपण भिक्षा करून वाढावी. त्यांचे काही विचारण्याचे धाडस होईना. प.प. स्वामीच त्यांना म्हणाले, '' शालिनी आज तू भिक्षा करून आण.'' सासूबाईना इतका आनंद झाला की बस्स.

प.प. स्वामींनी समाधिस्थ होण्यापूर्वी अनेकांना संकेत दिले हे आपणा सर्वांना माहीत आहेच, त्या दिवशी संध्याकाळी प.प. स्वामींचे पूजेच्या वेळेस घरात एवढा सुगंध पसरला होता की वर्णन करणे अवघड आहे अन् आरती झाल्यावर माझा मुलगा सुमित ''आपण सर्व कराडला जाऊ''असे म्हणून झोपी गेला. हे मिटिंगसाठी घराबाहेर पडले व आकाशातून एक तारा निखळून पडला अन् अर्ध्या तासात कराडहून फोन आला की प.प. स्वामी समाधिस्थ झाले. तेव्हा कोठे त्या सुगंधाचा, चि. सुमितच्या बोलण्याचा व तारा निखळण्याचा मथितार्थ कळाला,प.प. स्वामींच्या समाधीनंतर एकदोन वर्षांनी हे पंढरपूरला पायी वारीसाठी जायला गोंदवल्याला गेले. हे पोहोचले तेव्हा दिंडी पुढच्या गावात पोहोचली होती. हे त्या गावात गेले व दिंडी गाठली. रात्रीची वेळ होती. श्री. बाळूकाका, कु. विजूताई, श्री. श्रीधर किरपेकर सर्वजण भेटले. नंतर सर्व झोपी गेले. पहाटे प.प. स्वामी यांच्या स्वप्नात आले व म्हणाले, '' बोल तुला काय पाहिजे ते माग. '' प.प.स्वामींना हे म्हणाले,'' मला ज्ञानप्राप्ती व्हावी अशी माझी इच्छा आहे. '' प. प. स्वामी तथास्त म्हणाले व प.प. स्वामींनी यांच्या मस्तकावर हात ठेवला,

खरोखरंच, सद्गुरूंजवळ काय मागावं याचीसुद्धा सदबुद्धी देणारे सद्गुरू आम्हाला मिळाले अन् आम्ही कृतार्थ झालो.

## ।। श्री धर्मश्रीः ईश्वरानन्द सरस्वती गुरवे नमः ।।

सौ. रोहिणी चंद्रकांत लोहगांवकर, पुणे

**ब्रह्मानंदम् परमसुखदम् केवलं ज्ञानमूर्ति।दंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्याधी लक्षणम् ।**
**एकम् नित्यं विमलविचलम् सर्वधि साक्षिभूतम् । भावातीत त्रिगुणरहित सद्गुरु तं नमामि**

प्रत्येकजण आयुष्यात गुरू करतो. गुरुचरित्रात सांगितल्याप्रमाणे पतंगपक्षीसुद्धा गुरू होतो. पण '' सद्गुरू '' एकच असतो. सदासर्वदा, सर्वकाळ सद्विचार असणारे श्री. ईश्वरानन्द काशीस्वामी गुरू म्हणून भेटले. त्यां नामातच ईश्वराचा आनंद भरला आहे, तर त्यांच्या मुखातून मंत्र आचरण केल्याने आपण ईश्वराच्या सानिध्यात आहोत असे वाटते.


आयुष्यात एक प्रवास स्वामींबरोबर झाला, तो म्हणजे जगद्गुरू श्रीशंकराचार्यांच्या समाधीला कळस चढविण्यासाठी आम्ही उभयतां गेलो होतो. तापी नदीत ब्राह्ममुहूर्तावर गुरूंसमवेत स्नान करून जगद्गुरू श्रीशंकराचार्य समाधीला कळस चढविण्याचा कार्यक्रम हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग आहे. दुर्दैवाने त्याच श्रृङ्गेरीतील काही गाईना विषबाधा झाली. स्वामींचे विभूतीने त्या खडखडीत उठून उभ्या राहिल्या. हा स्वामीच चमत्कारच म्हणावा लागेल.

अशा माझ्या सद्गुरूंना माझा साष्टांग प्रणिपात, आमचे स्वामी असेच अदृष्यरीत्या आमच्या समवेत सदैव राहो व आम्हाला ज्ञान मार्गाची वाट दाखवो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

नमो सद्गुरु नमो ईश्वरानन्द

तुम्हापासोनी मिळे चित् परमानंद
घडो तुमची सेवा कराने, मनाने म्या पामराने काय तुम्हा द्यावे घ्यावे
तुम्ही जे द्याल ते मना होओ स्फूर्ती
नमस्कार माझा सद्गुरू ज्ञानकीर्ती ।।

## ।। गुरुमाई।।




भगवान के द्वारे, खड़ी पलभरी
नाम लेके तेरी, पंचदशाक्षरी
लगातार उच्चारी, जीवन उद्धारी ।।
तू है सृष्टी का, मूलाधारी
तुझ बिन मै अनाथ निराधारी ।।
तू है सबका, मंगलकारी,
इस भवदुःखसागरसे तारी ।।
तड़प रही हूँ, दर्शन के लिए तेरी
यहीं एक है प्यासी इच्छा मेरी
दयासे करो, ये पूरी ।।
आयी हूँ मैं, शरण में तेरी
माफ करो भूल, हमरी
सुनो मेरी, पुकारी ।।
चरणों में लो, मुझे तुम्हारी
बस यहीं एक है, प्रार्थना मेरी ।।

(रचना : सौ. शीला रेठरेकर)

## ।। मला भेटलेले सद्गुरू श्री ईश्वरानन्द सरस्वतीमहाराज ।।

यशवंत नारायण देशपांडे, सोलापूर

एक दिवस माझे मनात आले की स्वामीमहाराजांचे पदकमलावर डोके ठेवून कृतार्थ व्हावे. त्या विचाराने मी शिवरात्रीचे दिवशी कृष्णा-कोयना संगमात स्नान करून ओल्यानेच स्वामीमहाराजांचे दर्शनासाठी भैरवमंदिरात आलो. स्वामीमहाराजांनी माझी संपूर्ण चौकशी केली व येण्याचे कारण विचारले. आपले पदस्पर्शाचे दर्शनासाठी मी आलो आहे. त्यावर त्यांनी मला निक्षून सांगितले की मी पददर्शन देणार नाही. तू ओल्याने उभा राहू नकोस. संध्या-वंदन करतोस का? जप किती करतो ? हे विचारून घेतले व मी दर्शन देत नाही, घरी जा असे सांगितले. २/३ तास भी उभा राहून लांबूनच दर्शन घेऊन घरी परतलो व निराश होऊन बसलो. माझी बहीण (श्रीधर किरपेकरची आई) त्रिकाल स्नान व स्वामीमहाराजांचे दर्शन पूजनासाठी जात असे. तिचेजवळ स्वामीमहाराजांनी निरोप पाठविला की तुझ्या भावास सोवळे नेसून माझे दर्शन व पूजेसाठी घेऊन ये. काल तो निराश होऊन परत गेला. संतहृदय दयेने व कृपेने भरलेले असते ते यालाच म्हणातात. हा माझा पहिला अनुभव होता. दुसरे दिवशी मी स्नान संध्यावंदन करून सोवळे नेसून स्वामीमहाराजांचे पदस्पर्श दर्शन व पूजन केले व धन्य धन्य झालो.

एक दिवस माझे पत्नीस सौ. विजयास स्वामीमहाराजांनी सांगितले की आज तुझे हातून भिक्षा (दुपारचे भोजन) घेणार. त्याप्रमाणे तिच्या हातूनच भिक्षा घेतली व आम्हास कृतार्थ केले.

सन १९९२ सालामधील गोष्ट. मला एकाएकी हृदयरोगाने ग्रस्त केले. २/३ महिने मी उपचार घेत होतो. त्यावेळ मी महाराजांना पत्राने सविस्तर हकिगत कळवून आपले आशीर्वादच तारणार, तरी आपली कृपादृष्टी असावी अशी मनोभावे विनंती केली. त्यावेळी महाराजांनी माझी बहीण ताई किरपेकर हिचेजवळ निरोप पाठविला की देवीचे कृपेन बरे होईल. काळजी नसावी. माझा आशीर्वाद आहे. त्याप्रमाणे मला बरे वाटले. त्यावेळी स्वामीमहाराज अतिशय थकलेले होते.

येथे एकच सांगावेसे वाटते की संतांचे सांगणेप्रमाणे वागून प्रपंच व परमार्थ केल्यास त्यांचे कृपाशीर्वादाने कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. त्या संत विभूती स्वामीमहाराजांना त्रिकाल नमन करून लेख पूर्ण करीत आहे. एवढे सत्य की -

पूर्वज्यांच्या पुण्यकोटी। संग्रही असेल गाठी
तरीच ऐशीयांची भेटी। होय जनासी

।। शुभंभवतु ।।



## ॥ श्रीईश्वरानन्द काशीस्वामी सुप्रसन्न ॥

सौ. निता सुनिल लोहगांवकर,पुणे

श्रीईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांना माझा शतशः प्रणाम. लग्नाआधी मी एक सामान्य मुलगी होते; माझ्या पूर्वपुण्याईमुळे व पतीच्या इच्छेनुसार मला स्वामींकडून गुरुमंत्र मिळाला. हे मी माझे भाग्य समजते.

मला स्वामींचा जास्त सहवास लाभला नाही; पण गुरुपौर्णिमेला फक्त दोनच वेळा मला त्यांच्या दर्शनाचा व सेवेचा लाभ झाला. मी पाहिलेली स्वामींनी साजरी केलेली गुरुपौर्णिमा मला अजूनही आठवते, खूप आनंदाने ते पूजेची तयारी करायचे, फुलं, पानं, चौरंग सजवणे, धूप-दीप, देवाची आराधना, त्यांच्या गुरूंची आराधना व त्यांना प्रत्यक्ष बोलावून आवाहन करून ते ती पूजा करायचे. अशा वेळी फक्त गुरू, आपण व ती पूजा करण्यात तल्लीन झालेले स्वामी. ह्यावेळी बाहेरच्या सर्व जगाचा विसर पडायचा, नंतर पूजा झाल्यावर त्यांनी भरभरून दिलेला आशीर्वादही आठवतो. त्यांनी पाठीवरून हात फिरवल्यावर प्रत्यक्ष परमेश्वरच आपल्या पाठीवरून व मस्तकावरून हात फिरवीत आहे व सांगतोय की, भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे, सदैव राहीन. तुम्ही जेव्हा जेव्हा माझे स्मरण कराल तेव्हा मी तुमच्या जवळ असेन.

संकटात स्वामींचे स्मरण केले तर सदैव मला असा भास होतो की, स्वामी हे संकट दूर करणारच एका गुरुपौर्णिमेला भीतभीतच पण धीर करून स्वामींना सांगितले की मला पुत्र व्हावा अशी इच्छा आहे. त्यावेळी ते गालातल्या गालात हसत आहेत असे मला भासले. त्यांनी तत्काळ एक फळ देऊन तुझी इच्छा पूर्ण होईल असे सांगितले व त्याप्रमाणे मला पुत्रलाभ झाला.

मी माझ्या वैवाहिक जीवनात अत्यंत समाधानी आहे. मला माझ्या जीवनात मार्गदर्शन करणारा, संकटातून सोडविणारा असा गुरूचा लाभ झाला. कलियुगात नामस्मरणाला अत्यंत महत्त्व आहे. गुरूंचा आशीर्वाद मला या जन्मी मिळाला पण तो जन्मोजन्मीही मिळावा ही प्रार्थना. स्वामी जेव्हा आपल्यातून सोडून त्या ईश्वराजवळ गेले त्या दिवशी आम्हाला फार वाईट वाटले. त्यांची दिनचर्या, ती गुरुपौर्णिमा, तो आनंद, ती पर्वणी पुन्हा पाहायला मिळणार नाही. स्वामी सदैव आमच्या पाठीशी आहेत, त्यांचा आशीर्वाद आहेच. हे जीवन त्यांच्या कृपेमुळे कृतार्थ झाले. माणसाला आयुष्यात गुरू लाभावा हे थोरांचे बोल आहेत. मला माझ्या आयुष्यात गुरूंचा लाभ झाला तसाच मोक्षही मिळो, ही गुरूचरणी विनम्र प्रार्थना.



## ।। आजि म्यां परब्रह्म पाहिले ।।

यशवंत वासुदेव ऊर्फ आप्पा कुलकर्णी, पुणे

माझे मित्र श्री वसंतराव जोशी, अहिल्यानगर हे स्वतः व त्यांचे सर्व कुटुंबीय प.पू. ईश्वरानन्द सरस्वती ऊर्फ काशीस्वामी (या लेखात काशीस्वामी म्हणून संबोधू) यांचे अनुग्रहित आहेत. त्यांच्यामुळे मला ८८-८९ मध्ये काशीस्वामींचे दर्शनाचा प्रथमतःच लाभ झाला. मी स्वतः पुणे येथील वासुदेव-निवासमधील प.पू. गुळवणी महाराजांची शक्तिपात मंत्र दीक्षा १९६० मध्ये घेतली व त्यांच्या नित्य दर्शनसमयी, योगमार्गातील प्रत्येक साधक हा एकमेकांचा गुरु असतो व निरनिराळे सिद्धगुरुदेव हे स्वतःच्या गुरूसमान असतात ही शिकवण मिळत होती. मित्र श्री. वसंतराव जोशी यांनी काशीस्वामींबद्दल अल्पशी माहिती व स्वभाव सांगितला होता. कराड येथील भैरव मंदिरात, काशीस्वामींचे प्रथमदर्शन झाले त्यावेळी मनात एक अस्पष्टशी भीती वाटत होती; परंतु विकल्पाची बाधा। होऊ नये चित्ता पाहतो परीक्षा। गुरुदेव ।। या योगउक्तीनुसार मनात काहीही विकल्प न आणता स्वामींचे दर्शन घेतले.

त्यावेळी काशीस्वामींनी आपण कोण? हा प्रश्न करताच, प्रत्येक साधकास एकदा मंत्रदीक्षित झाल्यावर, मोक्षगुरुपरिचयाशिवाय स्वतंत्र परिचय नसतो. मी माझा योगसंप्रदाय व मोक्षगुरू कथन केले. साधकास प्रथमतः आईवडील हे गुरू, नंतर बालपण संपताच शिक्षण देणारा गुरू, तरुणपणात विवाहबंधनात जाताना " अग्नि''हा गुरू व गृहस्थामात साधनमार्ग देणारा मोक्षगुरू असतो. परममहायोगी श्रीदत्तात्रयांनी तर २४ गुरू केले होते. तेव्हा साधका जे जे सिद्धयोगी दर्शनास मिळतात ते एका परीने गुरूसमान असतात. तेव्हा मला प.पू. गुळवणीमहाराज व प.पू. काशीस्वामी यांचेमधे कोणतेही द्वैत वाटले नाही, उलट स्वामींचा प्रदीर्घ परिचय असावा असे वाटले. काशीस्वामी हे आद्यशंकराचार्य परंपरेतील एक महान सिद्ध श्रीविद्या (श्रीयंत्र) पूजक व साक्षात श्रीशारदांबाचा वरदहस्त असलेले वाटले. पुढे श्रीदत्तमहाराज कविश्वरांनी (माझे ज्येष्ठ गुरुबंधू) त्याला पुष्टीच दिली व काशीस्वामींचे दर्शनाचा लाभ घेत जावा असे सांगितले.

काशीस्वामींचे प्रथमदर्शनाच्या वेळी, स्वामींनी, श्रीगुळवणीमहाराज व श्रीदत्तमहाराज कविश्वरांनी, शक्तिपात दीक्षा देण्याचा व तो सुद्धा मुक्त हस्ते देण्याचा वापर का केला असे विचारले स्वामींसारखे महान सिद्धाने विचारलेल्या प्रश्नास उत्तर देणे हे माझ्यासारख्या सामान्य साधकास कठीणच होते, पण काशीस्वामी दर्शनामुळे मी एक प्रकारच्या भावसमाधी अवस्थेत गेल्याने कळत-नकळत स्वामींनीच पुढील उत्तर माझ्याकडून वदवून घेतले. " योगमार्ग संप्रदायात, मोक्षगुरू हे पर-आपर भाव न पाहता त्यांचे मोक्षगुरूंनी दिलेल्या ज्ञानाचा-विद्येचा-योगक्रियेचा मुक्तहस्ते प्रदान करतात कारण तशी त्याच्या मोक्षगुरूंची अप्रत्यक्ष आज्ञाच असते व ती योगमार्गपरंपरा चालू ठेवण्यासाठी असते तेव्हा योग मार्ग प्रवीण श्री लोकनाथतीर्थांनी त्यांचे शिष्यास म्हणजे श्रीगुळवणीमहाराज यांना तसे आज्ञापिले असल्याने, उचित होय " यावेळी स्वामींच्या मुद्रेवर एक प्रकारचे असामान्य तेज दिसले व त्यावेळी मी भावसमाधी अवस्थेत जाणे क्रमप्राप्त होते व या वेळी एक प्रकारचा मधुर सुगंध जणु काय केशरअत्तर लेपनाचा असावा असे वाटले व स्वामींची तेजः पूर्ण मुद्रा पाहता-पाहता, जे कधी न अनुभवले। ते मी अनुभवले। सिद्ध दर्शन झाले। वाटले आजि म्या परखा पाहिलें ।।

पुढे तीनचार वेळा स्वामीदर्शनाचा योग आला व काशीस्वामी हे महान यती असल्याने परग्रह करीतच नव्हते सिद्धाचे दर्शन रिक्तहस्ते घेऊ नये असे गुरुवचन असल्याने, श्रीदत्तमहाराज कविश्वर यांचे सांगण्यानुसार मीं काशीस्वामींना माझ्या जवळील आठ उत्तम रुद्राक्ष अर्पण केले. मग काय चमत्कार स्वामींनी ते स्वीकारले वर स्वत च्या हाती ठेवले व चार मला प्रसाद म्हणून दिले व म्हणाले," संन्याशास रुद्राक्ष स्वीकारणेच योग्य असते कारण ते वैराग्यदर्शक असतात व यतीस वैराग्याशिवाय काहीही स्वीकारणे अनुचित असते." स्वामींसारख्या महान सिद्धांकडून चारी ऐहिक धर्माचे पालन कर म्हणूनच चार रुद्राक्ष प्रसादस्वरूप मिळाले धन्य वाटले. अजूनही ते चार रुद्राक्ष पाहताना, प. पू स्वामी हे समोरच बसले आहेत असे वाटते. म्हणूनच मला स्वामीदर्शन हे " आजि म्यां पराब्रह्म पाहिले " असेच वाटले. स्वामींची ही कृपा नित्य मजवरी राहो ही एकमात्र मनेच्छा व त्यांच्याजवळ मा

## ।। श्रीसत्यज्ञानस्वरूपाय नमः ।।

वे.मू. चि. मयूर लोहगांवकर पुण

मी, चि मयूर नं. लोहगांवकर, एक पूर्वकर्म, पूर्वदोषपीडित, सर्वसामान्य अज्ञान बालक, पण परमेश्वरजगतातला जो सिद्धांत कोणालाही मिळाला नसेल असा अपूर्व योग माझ्या नशिबाने माझ्या आयुष्यात आला.

ब्राह्मणाच्या जन्मात वेदारंभ आणि उपनयन संस्कार सर्वश्रेष्ठ समजले जातात. या प्रसंगाला पिता आपल्या पुत्राला " गायत्रीमंत्र " देऊन गुरुपद स्वीकारतो. हा उपनयन संस्कार कोणाचाही होत नसेल अशा पद्धतीने प्रत्यक्ष स्वामींचे समोर घडला आणि तत्क्षणी स्वामींनी मला गुरुदीक्षा दिली असा अपूर्व योग जन्मोजन्मीच्या पुण्याई शिवाय मिळणे दुर्लभच

शालेय जीवनात असताना मी अपयशी ठरलो, खूप निराश झालो, पण त्यांच्या कृपेमुळे आज मी अवघड असे वेदाध्ययन पूर्ण करून उत्तम प्रकारे पौरोहित्य करीत आहे ही स्वामींची अलौकिक कृपा आमच्यावर झाली यांना माझे शतशः प्रणाम

---

## ।। श्रीनारायण प्रसन्न ।।

व. शं. आठल्ये, डोंबिवली

वंदनीय धर्मश्री प.पू. ईश्वरानन्द सरस्वती ह्यांस सादर शतकोटी प्रणाम.

आपण ह्यावेळी जगन्नाथपुरी, पशुपती वगैरे राहिलेल्या तीर्थधामांस जाऊन ह्या ९३ वर्षीय उतारवयात थकलेल्या शरीरप्रकृतीतही चारीधामाचा संकल्प पूर्ण करून आलात ह्यात ईश-शक्तीच्या प्रेरणेचाच भाग दृष्टोत्पत्तीस येतो. आम्ही ह्या थकलेल्या प्रकृतीचा विचार करूनच स्टेशनवर (कल्याण) खुर्चीची व्यवस्था, स्टेशनमास्तरतर्फे केली होती; परंतु ती नाकारून आपण चार फलाटाचा जिना चढ-उतार करीत मार्गस्थ झालात ह्यात दुर्दम्य अन्तःस्थ शक्तीचे दर्शन घडते. दीड महिने अवधीचा दीर्घ प्रवास करून थकलेले भागलेले शरीर असताना आमचे वास्तूस भेट देण्याचे केलेने आम्ही सर्वचजण अक्षरशः भारावून गेलो. ह्यामागे आमची १०-१२ वर्षांची आर्जवी तपश्चर्या कामास आली व आमचे मनातील इतक्या वर्षांचे प्रयत्नास यश आले. तसेच आपण आमचे सर्व वास्तू फिरून मांगल्याचे दर्शन घडवून आणलेत. ह्याबद्दल श्रीनारायणाचे आम्ही ऋणी आहोत. आपलेबरोबर तिघी ब्रह्मकुमारी योगीनी, कमलताई शिराळकर, सुशिलाताई शिखरे, विजुताई पाठक तसेच छोटे स्वामी ब्रह्मचारी बाळकाका असा शिष्यवर्ग आपले सेवेत असल्याने हे चारीधाम यात्रा संकल्प सिद्धीस नेण्यास समर्थ ठरले, आपले ऋषितुल्य मंगल जीवन ह्या सर्वांचे जीवन सार्थकी लावण्यात कृतार्थ ठरावे असे महान आहे. आपले श्रेष्ठत्वाचे क्वचितसे घडणारे दर्शन आम्हांस आपले श्रृङ्गेरी मठातील १५ दिवसांचे वास्तव्याने निदर्शनास आले. आमची वास्तू पुनीत पदस्पर्शाने, आपल्या शिष्यगणां समवेत संपन्न व्हावी हा आमचे पत्रिकेतील उच्चतम योगच म्हणावा लागेल असे उत्तुंग, विशाल वैभव लाभावे ह्यांतच ईश-प्रेरणेचे दर्शन घडून येते

## ।। श्रीसद्गुरू प्रसाद ।।

### प. पू. सद्गुरू श्रीकाशीस्वामी यांची माझ्या जीवनातील पहिली ओळख व सद्गुरूंच्या आठवणी

सौ. निर्मला केळकर, मिरज.

माझ्या मुलाची मुंज कराड येथे असताना आम्ही नेहमीप्रमाणे मुंजीची अक्षता श्रीगणपती, श्रीकृष्णाबाई मंदिरात ठेवली आणि श्रीबहिरोबाला द्यायला म्हणून देवळात गेलो. देवाला अक्षता दिली आणि त्याच वेळेस माझ्या यजमानांनी मला सांगितले की, तुझ्या आजोबांनी (सौ. आईचे वडील) श्रीकाशीस्वामींची भेट घ्या म्हटले आहे मला

सांगितले होते. त्याची आठवण त्यांना झाली, असे म्हणेपर्यंत बाहेर खोलीतून (मठातून) स्वामी बाहेर आले आणि माझ्याकडे पाहून म्हणाले की, तू इंदूची मुलगी ना ? यापूर्वी आम्ही कधीही एकमेकांना बघितले नसताना त्यांनी मला कसे काय ओळखले ते त्यांच्या दिव्यदृष्टी–मुळेच. आम्ही उभयतांनी त्यांना मुंजीचे निमंत्रण दिले, पण त्यांनी सांगितले की, आम्ही संन्यासी कोठे जात नाही. परंतु तू मुंज झाल्यावर मठात घेऊन ये त्यांच्या कृपेने मुंज व्यवस्थित पार पडली, मठात जाऊन स्वामींना हार घातला, पेढे दिले, नमस्कार केला. त्यावेळेस मुलांकडून गायत्री मंत्राचा जप करून घेण्यास सांगितले. मुंज झालेल्या दिवशी सद्गुरूंच्या पायावर घालण्याचे भाग्य आम्हाला लाभले.

### श्रीस्वामींना केव्हापासून गुरू मानू लागले

गुरुपौर्णिमेच्या दिवशी मी स्वामींनी दिलेल्या फोटोची पूजा करून टेंबेस्वामींनी सातशे श्लोकी गुरुचरित्र लिहिले आहे ते वाचत असे. एकदा गुरुपौर्णिमेच्या आधी त्यांनी स्वप्नात माझ्या डोळ्यांवर हात ठेवला. त्याचवेळेस मला माझ्या डोळ्यात काय झाले त्याची अजूनही आठवण आहे. असे दोन तीन वर्षे लागोपाठ होऊ लागले. शेवटच्या वेळेस तर मी नमस्कार केला व उभी राहिले. तेव्हा ते म्हणाले, तुला काय पाहिजे? आता द्यायला माझ्याकडे काही नाही. मी पण मला काहीही नको असे म्हणाले. तेव्हा त्यांनी मला खालची माती उचलण्यास सांगितले आणि कपाळाला लावण्यास सांगितले, म्हणजे माझ्यामध्ये त्यांनी विरक्ती निर्माण केली. तेव्हापासून त्यांना मी गुरुस्थानी मानत आहे. जेवढी जमेल तेवढी सेवा करते. जप करते.

### परमपूज्य श्रीईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांचे चरणी अर्पण

माझी प्रकृती जवळजवळ सहा वर्षे बरी नव्हती. मी डोकेदुखीने त्रासून गेले होते. खूप दवाखाने, आयुर्वेदिक औषधे, घरगुती उपाय, कुलधर्म, कुलाचार सर्व काही केले; परंतु कशानेच मला फरक पडेना. अशातच एके दिवशी मावशी आमच्याकडे आल्या त्यांनी मला परमपूज्य स्वामींचे दर्शनासाठी नेले. मी आठ–दहा दिवस रोज त्यांचे दर्शनासाठी जात होते. त्यावेळी मला डोकेदुखीचा त्रास होतच होता, त्रासामुळे माझ्या डोळ्यातून अश्रू येऊ लागल. तेव्हा स्वामींनी माझ्या डोक्यावर हात ठेवून मला देवीची उपासना करणेस सांगितले व मला काही मंत्र दिले. तेव्हा–पासून माझी तब्येत सुधारू लागली व काही दिवसांत एकदम चांगली झाली. त्यामुळे माझी त  द्धा बसली. मी परमपूज्य श्रीस्वामींना हे चार शब्द अर्पण करते.

## || श्रीयोगमार्गतत्पराय नमः ||

सौ. शालिनी वसंतराव जोशी, अहमदनगर

आमची १९६३ साली सोलापूरहून कराडला बदली झाली. आमच्याकडे डॉ. नाना उमराणी येत असत. ते ह्यांच्याच ऑफिसमध्ये होते. ते नेहमी स्वामींचे दर्शनाला जात असत. एकदा ते जोशींना घेऊन स्वामींकडे गेले असताना त्यांनी आम्हाला गुरुमंत्र देण्याविषयी विषयी काढला. १९६४ साली में महिन्यात आम्हास त्यांनी बोलावले जोशींना प. पू. स्वामीनी गुरुमंत्र दिला व मला विचारले, तुला गुरुमंत्र कशाला पाहिजे. परंतु मी हट्टच धरला अन् सर्व अटी पाळून वागण्याचे मी प. पू. स्वामींना आश्वासन दिले. त्यानंतर त्यांनी मला गुरुमंत्र दिला.

आम्ही दर रविवारी दर्शनाला जात असू. त्यावेळी मुलं लहान होती. तीर्थ घेऊन दर्शन घ्यायचो व परतायचो. तेथे सर्व भगिनींशी ओळख झाली. ते भगिनींकडे माधुकरीला जातात असं कळल्यापासून आपल्याकडेसुद्धा प. पू. स्वामींनी मधुकरीला यावे अशी माझी प्रबळ इच्छा होती. त्यासाठी त्याचे सोवळे पाळण्याची सुद्धा तयारी होती. परंतु नंतर कळले की प. पू. स्वामी सोमवार पेठे व्यतिरिक्त कोठेच मधुकरीसाठी जात नव्हते. त्यामुळे ती इच्छा अपुरीच राहिली.

नंतर आमची बदली नगरला झाली नगरहून दर गुरुपौणिमेला दर्शनासाठी आम्ही जात असू माझ्या धाकट्या सुनेला गुरुमंत्र घ्यायचा होता म्हणून आम्ही कराडला गेलो होतो. तेव्हा मी बाळूकाकांना विचारले, मी उद्या स्वामींना माधुकरी देऊ का? याबाबत त्यांनी मला प.पू. स्वामींनाच विचारायला सुचविले. मी भीतभीत स्वामींना विचारले," मी उद्या मधुकरी आणू का ? ‘‘ यावर स्वामी म्हणाले, " तू कोठून आणणार माधुकरी यावर मी म्हणाले, " मी बाळूकाकांच्या घरी करून आणेन." ते क्षणभर गप्प बसले व नंतर म्हणाले. " आण जा. मला खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी मी घाटावर स्नान करून बाळूकाकांकडे स्वयंपाक केला व प.पू. स्वामींना माधुकरी दिली तो क्षण मी कधीच विसरणार नाही.

त्यानंतर मला संधिवाताचा खूप त्रास होऊ लागला होता, एकदा स्वामी स्वप्नात आमच्या घरी आले. मला काही नीट चालता येत नव्हते, माझी मुलगी अपर्णा म्हणाली, " अग स्वामींना पायावरून हात फिरवण्यास सांगायचे होते म्हणजे तुझे पाय बरे झाले असते " नंतर आम्ही गुरुपौर्णिमेला गेलो. दर्शन घेताना स्वामी म्हणाले. कसे आहेत तुझे पाय, त्यानी माझ्या पायावरून हात फिरविला. अशा खूप गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. किती सांगू असे होते त्यांतली अजून एक सांगते. आमच्या घरातीलच एक व्यक्ती आहे. बाबू मुळे त्याच्या मुलीला पुत्ररत्न हवे होते म्हणून मी बाळूकाकांना सांगितले की स्वामींना तिच्या ओटीत नारळ द्यायला सांगा. वेळ व दिवस सर्व ठरले. ठरलेल्या वेळी वैशाली मुळेची मुलगी काही येऊ शकली नाही. तिला यायला १० मिनिटे उशीर झाला, परंतु उशीर होऊनही स्वामींनी तिला ओटीत नारळ दिला. तिला पुत्ररत्न झाले. तेव्हापासून बाळू मुळे समाधीचे दर्शन घेतल्याशिवाय ऑफिसला जात नाहीत. विशेष म्हणजे आम्ही उभयतांनी १९६४ साली गुरुमंत्र घेतला आणि नंतर माझी तीन मुली व तीनही सुना, मुलगी व जावई यांनाही गुरुमंत्राचा लाभ झालेला आहे. आम्ही बंगला बांधला तेव्हा बंगल्याला " ईश्वरानन्द " नाव द्यायचे ठरवले होते. त्यासाठी माझा मुलगा श्रीकांत स्वामींची परवानगी घ्यायला गेला होता. त्यावेळी ते श्रीकांतला म्हणाले, तो बंगला माझाच आहे. तेव्हा श्रीकांत म्हणाला, सर्व तुमचेच आहे ते श्रीकांतला सावकार म्हणत. त्यांच्या कृपेने ते आज खरे झाले आहे. प.पू. स्वामींना माझे कोटी कोटी प्रणाम.

## आर्शिवचन

प.प. ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी, कऱ्हाड.

आतम्बंतोषर्तते । भौमस्य बह्मणोब्राह्मणत्वस्य रक्षणाय सदातदावतरन् बेदयोनिरादिनारायणः तेषामनुष्ठानेन संतुच्य तदभिलषित सिद्धिदानेन साननुगुण्हातु इति संवाध्यं विरम्यते । पुण्यस्य फलमिन्ति पुष्यं नेच्छन्ति मानवाः। न पापफलमिच्छन्ति पापं कुर्वन्ति मत्लतः । गुसार्या सर्व जंतूनां मताः सर्वाः प्रवृत्तयः। मुझे हि न बिना धर्म तम्माद्धमं परोभवेत्। धर्ममतिर्भवतुवः सततोत्थिना सब एक परलोक गतस्य बंधुः । अर्थाः स्त्रियश्च निपुणैरपि म्यमाना। नैवारमभावः मुपयन्ति न च स्थिरत्वम् ।

श्रीमद्देवीभागवते मागविषये भगवता बादरा-यणेन विचारः कृतोऽरित। व्यागाचार्या जनमेजयं बदन्ति । युधिष्ठिरेण राजनूययागः कृतः। माग समाप्त्यनंतर अल्पकालादेव राज्य नाशः बनवासश्च कर्तव्यः आपतितः । किमेतदेव राजसूययाग फलं । विपरीत फले कारणं किचिदवयंस्यात्। ऋत्वि सिडिकारणानि तत्र किमपि न्यूनं स्यात् । हिमरवाः ।। यजमानो बुधिष्ठिरः यज्ञफलदाता स्वंय भगवान् श्रीकृष्णः। राजसूय यागश्च एवं सत्यपि बदा मागस्य विपरीत फलम् तदा किमपि निश्चितादित्येवं ज्ञातम्यम ।


आचारहीन न पुनंति बेदा यद्यप्यधांताः सह पभिरने हरिति भगवतासनत्सुजातेन घुष्टराष्ट्र प्रति कथितम। ।लरींश सरअॅव षर ऱ्रिशअॅरीं चरळूशपळवेपळली क्शरअॅपळपस ुशळर्पींशर ्ज्ञ्ज्ञ्ँञ्ञ ग्रिं क्र्ंञ्ञंज ाारअॅअॅळशी ेषरपळशपीं रश्रराळश्रू शरीं ुळषश ुञ्ञ यञ्ञुड्ड डअॅळारींशी क्र्ञ्ञ ींअॅ ऱ्रिश्रु ेपिश ींशळ्ळशश्रू ञ्ञ ु्घ्ञ्ञ्ञ बलवत्या भवनमा प्रतिबोधिता।

म्हाडाच्या वैदिक बहाणाःपरंपरा नानाविध दुवन्द्वारार्थ सविध गुणावाच महता प्रधानेन याहेननुरुपानु हार्थ पंचविमति संवरसरेभ्यो दुग्वेद स्वाहाकार जनाना वैदिकानामणि आचार विषये अतीय शैथिल्यं । तेन वेदमंत्रा निविर्मा तथा सति आधारहीन निर्वायंमरण्यैः षद्धाभस्तिविरहितः कृतानि कर्माणि कर्मफलं न दास्यन्ति। कर्महरा फलं न प्राप्यते चेत् तदाऽनुष्ठातृगुमत्रानुष्ठानेच अषद्धा जायते। किच निष्कृतिर्नास्ति वेदाना मंत्राणा कलिदोषतः । कनिदोषनियर्थ गायत्रीमाश्यये द्विजः। इति मंत्राणां नाकलिकालेन आगत मालिन्य दूरीकृत्म अनुष्ठान कृत बेह्ला फनदायि भवति । इति ऋम्विधानेःपि उक्त । तस्मातपूर्व मंत्रदोष निवारणार्थ प्रयत्नः कर्तव्यः इति। सर्वरति तयोक्तम्। स्वाहाकारमारभ्य पंचविशति संवत्सरा जातास्तस्मा दस्वानुष्ठानस्य रौप्यमहोत्सवः कर्तव्यः इति निर्णीतमस्ति । अस्माभिरिति शास्त्रभिरुक्तं तत्र किथितद्वाडमयं वैदिक अनुष्ठानविषये प्रसिद्धी बर्त निश्चितमस्ति । तत्राशीर्वादरूपेण किचित्यामि भिरवि लेखनीयमिति तैरुक्तं यत्किचित लिक्षितम् । वर्णविष्यन्ति। बेदमाम्यं तदनुष्ठान श्रेष्ठपंच अस्माभिस्तु यागसेवारूपेण किचिह्लिक्षितमस्ति । तेन वेदमाता तुष्यतु ।

असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योर्मा अमृतं गमय ।


आस्ते श्रीगुरुचरण निरवधिरास्ते तदीक्षणे

## प. प. स्वामींच्या हस्ताक्षरातील काही प्रभावी मंत्र


जले रक्षतु वाराह: स्थले रक्षतु वामन:
अटव्यां नारसिंहश्च सर्वत: पातु केशव:
जले रक्षतु नंदीश: स्थले रक्षतु भैरव:
अटव्यां वीरभद्रश्च सर्वत: पातु शंकर:
अर्जुन: फाल्गुनो जिष्णु: किरीटी श्वेतवाहन:
बिभत्सु विजयी कृष्ण: सव्यसाची धनंजय:
तिस्त्रो भार्या: कफल्लकस्य दाहिनी मोहिनी सती
तासां स्मरण मात्रेण चोरो गच्छति निष्फल:
कफल्लक कफल्लक कफल्लक


### ॥ देहमंदिर ॥

" उठतांही तूं, बसतांही तू, तूंच तूं चहूंकडे; तूंच तूं ।"
मस्तकात बुद्धिची सिद्धी तू, ललाटलिखिता ब्रह्महीे तू ।
भुवईमध्ये ध्यानाची ज्योती तू, नयनांत दृष्टीचे रविकिरणही तू ।।
तूच तू तूहीच तूं ।।१।।
नासिकांत श्वासाचा वायू तू, गालांचे वैभव-वल्लभ तू।
ओठांत जपाचा यशही तू, जीभेवरचे उच्चार र्‍हींकार तू ।।
तूच तू तूहींच तूं ।।२।।
कर्णाचे नाद-विष्णू तू, कंठाच्या ध्वनिलहरी-नीलकंठ तू ।
उदरात अन्नब्रह्म-श्रीहरी तू, पाठीवरचे पुरंदर विठ्ठल तू ।।
तूच तू तूहीच तू ।।३।।
करांत कर्माची शक्ती तू, पदांत नुपूर-नाद तू।
मनांत शिव-मंदिरही तू, ह्रदयात गुरुची मूर्तीही तू ।।
तूच तू तूहीच तू ।।४।।
श्वासोच्छवासात "ओहं-सोहं" तू, तृषेला जलोदक गंगा तू।
भुकेला रामनामाचे पायस तू, आत्मसांगातीची सोबत तू ।।
तूच तू तूहीच तू ।।५।।



(रचना : सौ. शीला रेठरेकर)

## प. प. स्वामींच्या हस्ताक्षरातील काही प्रभावी मंत्र




## ।। स्वामी कृपा ।।

धन्य स्वामीनी, धन्य स्वामीनी आज कृपा केली ।।
वरदहस्त मस्तकी ठेविता निजरूपी निज आली ।। धृ०।।
स्वामीकृपेने, मायेने न्हाईयले।
मज घेऊ पदकमली ।।
पूर्ण कृपेचे तेल माझ्या माथ्यावर घाली ।।
निज बोधाचे निर्मळ पाणी वरचेवर घाली ।।
सत्त्वमयी वस्त्राने पुसता प्रपंच मळ गेला ।। धन्य.. ।।धृ०।।
पुसुनी सत्त्वर त्रिगुणाची कुंची लेववीली।
घालुनी नयनी ज्ञानांजन, मज दिव्य दृष्टी दिधली ।।
सोहंम् शब्द कानी फुंकीता आत्मप्रभा पटली ।।
अज्ञानरूपी दैत्यांनी तिथून वस्ती हालविली ।। धन्य..।।ध्रु०।।
चहुमुक्तीचे खुर विजय गात त्रिगुणाचा।
तेजाची शेज केली पलंग स्वामीघरचा।
पांघराया स्वामीघरचा शेला मोलाचा।
निजवूनी मज जागविले थापटूनी स्वामींनी ।। धन्य..।। धृ०।।
अशा परीने स्वामींनी मम पालन केले।
भव सेवेचे हरण घेत मज बाळकडू दिधले।
अमृतदृष्टीचे दूध मजला वरवर पाजियले।
मम मातेचा पान्हा पिवूनी अमर गडे झाले।
भ्रमर होऊनी पदकमली तव नित्य रुंजी घाली।
वरदहस्त मस्तकी ठेवीता निजरूपी निज आली ।। धन्य..।।धृ०।।

(रचना: सौ. मनिषा बिडकर)

**।। परंमहंस परिव्राजकाचार्य धर्मश्रीः श्री ईश्वरानन्द सरस्वती तथा काहीस्वामी महात्म्य ।।**

ॐ नमो श्रीगणराया। मस्तक ठेवोनी तूज पाया। चित्ती तव रूप साठवोनीया। प्रार्थितो तूजला ये समयी ।।१।। नमन तुज सरस्वती माता। विद्येची तू देवता। तुझी कृपा होता। नाही काही अशक्य ।।२।। हे राजराजेश्वरी माते। हे भुवनेश्वरी देवते। कृपा करी तव बालक स्तवना । बाला माते ।।३।। वंदन माझे वेदव्यासांस। नमन त्या महर्षित। नमन त्यांसी खास। या समयी ।।४।। देव-ऋषी गण हो। प्रार्थितो त्वां उत्कट भावो। कृपा करावी भक्तालागी। स्तवनासाठी ।।५।। स्तवन लाडक्या भक्ताचे । स्तवन लाडक्या शिष्याचे। आपुल्या कृपे झाला जो । ब्रह्मस्वरूप ।।६।। स्तवनांसाठी सद्गुरुस्मरण। वंदूनी त्यांचे चरण। गुरुपरंपरेचे स्मरण स्तवनांलागी ।।७।। श्री आद्यशंकराचार्यांचे पुण्यस्मरण। श्रीसचिदानन्दसरस्वतीचे स्मरण। श्रीचंद्रशेखर भारतींचे स्मरण। स्मरण सद्गुरूंचे स्तवनासाठी ।।८।। ऐके प्रस्थापिला धर्म। ऐके दिला संन्यासधर्म । ऐके दिले आत्मज्ञान । वंदन त्यांना पुनःपुनः ।।९।। स्तवन माझ्या सद्गुरूंचे। स्तवन ब्रह्मस्वरूपाचे। स्तवन तेजस्वरूपाचे। सदा जे ब्रह्मलीन ।।१०।। आवाहन केले स्तवनांसाठी उभ्या राहो देवतांपाठी। माझी बुद्धी नाठी। स्तवनासाठी ।।११।। परशुराने जी निर्मिली भूमी। नमन त्या कोकणभूमी। ज्या भूमिने दिधला सुपुत्र ऐसा ।।१२।। नमन चिपळूण तालुक्यासी। नमन कौंडर ग्रामांसी। नमन भागवत घराण्यांसी। नमन सर्वा पुनःपुनः ।।१३।। गंगामाता पतिव्रता। केशव नामे पिता। जन्मले ऐशा घरी शिवस्वरूप ।।१४।। कौंडर ग्रामदैवत श्रीगजानन । त्यांची सेवा केलीया जाण। प्रसाद म्हणून पोटी आले । ब्रह्मस्वरूप ।।१५।। सन एकोणिसशे सालांस । मे महिन्याच्या तीस तारखेस । सुमुहूर्तावर जन्मला। गंगाधर बाळ ।।१६।। बाळ हूड, खोडकर। परंतु अत्यंत बुद्धिमान। विद्याभ्यासी निष्णात। असे सदैव पहिला ।।१७।। पुढे पुढील शिक्षणासाठी आला तो चिपळूणांसी । अन्नपूर्णाकाकूंच्या सावलीत। वाढू लागला ।।१८।। सोडले चिपळूणांसी। गेले मुंबापुरीसी। खडतर कष्ट सोसोनिया। झाले पदवीधर ।।१९।। गेले एका सभेस । आवाहन केले कोणी खास आहे । आहे का कोणी तयार । संन्यास घ्यावया ।।२०।। उठले तीन जण तरुण । पैकी एक गंगाधर । आहो आम्ही तयार । धर्मप्रचारासाठी ।।२१।। संन्यासधर्माचे शिवधनुष्य । पेलणे अतीअवघड । जाणून हे अंती गळाले इतर दोघे ।।२२।। गंगाधर नाम शंकराचे। रूप दुसरे वैराग्याचे। त्याजला संन्यास । काय तो काठे ।।२३।। सचिदानन्द सरस्वतींचा सहवास । मुंबापुरीमध्ये रहिवास। गुरुसेवा केली मनोभावे । काही दिवस ।।२४।। नाव ईश्वरानन्द सरस्वती। ईश्वराला प्रसन्न करती। आनंदवली सरस्वती। अनुष्ठाने नी स्वाध्याये ।।२५।। गुरुआज्ञेने सोडीली मुंबापुरी। पायी निघाली स्वारी। आचरण संन्यासधर्माचे । धर्मासाठी ।।२६।। एके जागी राहो नये । भिक्षेविण काही घेवो नये । अग्निस्पर्श करो नये । कदापिही ।।२७।। एकदा असा प्रसंग पातला। तीन दिवस उपवास घडला । भिक्षा नाही मिळाली। कांहिही ।।२८।। घडोनिया उपवास। नाही खंत नाही खेद। तडजोड व्रतामांजी। नाही केली ।।२९।। धर्माबद्दल बोलावे । धर्माबद्दल सांगावे। जनलोकांस सांगावे। महत्त्व धर्माचरणाचे ।।३०।। धर्माबद्दल माहिती सांगावी। धर्माची महती गावी। गाता गाता स्वोदाहरणे। आचरून दावावी ।।३१।। काशी क्षेत्र पवित्र । गंगाकाठ पवित्र। अविरत वाहाते जिथे। ज्ञानगंगा ।। ३२।। तेथे केले वास्तव्य । शास्त्रचर्चा प्रवचन। स्तिमित झाले विद्वज्जन। समस्त ते काशीचे ।।३३। विद्वान म्हणतीं

ही विभुती। ज्ञानी अन् साक्षात्कारी। केला पाहिजे सन्मान। यथोचित ।।३४।। धर्मसभा बोलावली। स्तुतीसुमने ओवाळली । धर्मश्रीः पदवी दिली। अतिविनम्र भावे ।। ३५।। देशाटनासी फिरताफिरता। रस्त्यामध्ये श्रृङ्गेरी लागता। आनंदा येई भरता। लक्षण काही कळेना ।।३६।। आनंदाचा कल्लोळ । ह्दयी विलक्षण तळमळ । गुरुओढीचा परिमळ। माउली वाट पाहे ।।३७।। दर्शन घडता माउलीचे। सद्गुरू भेटता सत्शिष्याते । प्रकटीकरण अद्वैताचे । श्रृङ्गेरीत झाले पुन्हा ।।३८।। श्रीचंद्रशेखरभारती माउली। तिच्या कृपाछत्राची सावली । गुरुशिष्याची जोडगोळी। श्रृङ्गेरीत प्रसिद्ध ।।३९।। शुद्ध ते आचरण। संन्यासधर्माचे रक्षण । घोर ते अनुष्ठान । सोबत गुरुसेवा ।।४०।। गुरुसेवा फळा आली। माउलीने कृपा केली। आत्मखूण ते पटली। साक्षात्कारे ।।४१।। प्रस्थानत्रयीवरचे प्रवचन। आचार्यांचे श्रीमुखातून। श्रवणाचे भाग्य मिळाले । सानुग्रह ।।४२।। लौकिक, परा अपरा। ऐशा ज्या त्रिविद्या। सद्गुरूंनी करवून घेतल्या । त्या आत्मसात ।।४३।। सौन्दर्यलहरी आचार्यकृत। दिव्य असती महामंत्र ज्यांत। त्यांची केली साधना । कृपानुग्रहपूर्वक ।।४४।। गुरुप्रेम, गुरुभक्ती। पाठी असता गुरुशक्ती । आनंदाचा सोहळा । गुरुसेवेत ।।४५।। अवघड प्रसंग पातला। गुरुदेह क्षीण झाला। काय करावे सुचेनां । काही केल्या ।।४६।। परब्रह्माने मार्ग दाविला। मनी एक संकल्प केला। अनुष्ठान करण्याचा । गुरु आरोग्यासाठी ।।४७।। गुरुआज्ञेने सोडता श्रृङ्गेरी। मन धावे ते माघारी। धाव घेवून कवटाळावे। वाटे गुरुचरण ।।४८।। धरली उत्तरेची वाट । लागले रस्त्यामध्ये करहाट । रम्य तो कृष्णेचा घाट । प्रतीकाशी ।।४९।। कांशीसारखी नदीतीरे। कांशीसारखी मंदीरे। कृष्णेमध्ये गंगा अवतरे । स्वामी वाटें ।।५०।। जागा पाहिजे राहाण्यांस। जागा पाहिजे अनुष्ठानांस। भैरवमंदिरी केला वास । नदीकाठी ।।५१।। गरुडतीर्थी, भैरवतीर्थी स्नान। संध्यावंदन पूजन। त्रिशतीने अभिषेक । श्रीचक्रे ।।५२।। मग होता माध्यान्ह। पुन्हा करावे गंगास्नान। करुनिया संध्यावंदन । निघावे भिक्षेसाठी ।।५३।। ते रुप मी काय वर्णावे। त्या रूपांसी काय म्हणावे। ज्याचे त्याने जाणावे । तेजस्वरूप ।।५४।। गूढगंभीर मुद्रा करारी। भिक्षेसाठी निघता स्वारी। बालके पळती दूरी । उगाच भये ।।५५।। चालणे असे वेगांत। चालणे असे ढांगांत। चालला पहा हनुमंत। माउली म्हणतसे ।।५६।। ज्या घरी शुद्ध आचरण। तेथील भिक्षा घेईल जाण। भिक्षेचे ते प्रमाण। मोजके असे ।।५७।। भिक्षेमधील कांही भाग। देत असती पांखरांस। माउलीवाचून ऐसी चिंता । कोण करी ।।५८।। भिक्षेनंतर विश्रांती । विश्रांतीनंतर एकांती। एकांती अनुष्ठान। चालीतसे ।।५९।। धर्मग्रंथांचे वाचन । आणि करावे परिशीलन। सतत मनी चिंतन। परब्रह्माचे ।।६०।। वेदान्त तत्व चिंतन । यतीधर्माचे अनुष्ठान। निमग्न ऐसे ध्यान। आदर्श जाणावे ।।६१।। सायंकाळी स्तवन। नित्याचे पारायण। सोबत असे शिष्यगण । भैरवासमोरी ।। ६२।। आदिशिष्ये ती कमला। नंतर आली सुशिला। उभयतें केली सेवा । मनोभावे ।।६३।। श्रीरामभक्त विजया । सद्गुरू ते पुजूनीया। करीतसे सेवा । रांगोळी काढून ।।६४।। नंतर आला शिष्योत्तम। नांव त्याचे शांताराम। प्रेमे म्हणती स्वामी। अरे बाळू ।।६५।। शिष्यांसमवेत तीर्थाटन। तीर्थक्षेत्री तीर्थस्नान। सर्व शिष्या घालत असती। स्नान स्वहस्ते ।।६६।। व्यासपूजेचा उत्सव । त्यांचा तो उत्साह । गुरुपूजे गुरू स्मरता। अश्रू ढाळी ।।६७।। श्रीगणेशपूजनाने सुरवात। रुद्र आणि पुरुषसुक्त यांनी असे अभिषेक। श्रीपादुकांना ।।६८।। कैवल्योपनिषद आणि दैव्योपनिषद । सोबत देवी अथर्वशीर्ष यांनी ही अभिषेक। पादूकांना ।।६९।। नंतर त्रिशतीने अभिषेक । सोबत विष्णुसहस्त्रनाम। व्यास-आरती, गुरुस्तवन। सांगता मंत्रपुष्पे ।।७०।। पादस्पर्शा उत्सुक । शिष्य तो प्रत्येक । मिळे ही संधी । वर्षातून एकदा ।।७१।। शिष्यांसाठी खास अनुष्ठान । शिष्यांचे एवढे भान।

सद्गुरुवाचोन दूजे कोणी । करेचीना ।।७२।। आलेली गुरुदक्षिणा। पाठवे श्रृङ्गेरी जाणा । स्वतःसाठी कांही। ठेवेचिना ।।७३।। प्रथमदर्शनी रागीट । परंतु अंतरी मधाळ । बाहेरून कठीण। जैसे की श्रीफळ ।।७४।। कोणी कांही मागितले। मला देता येत नांही म्हणावे । पुन्हा माघारी बोलवावे । संकट परिमार्जनासाठी ।।७५।। गुरुमाउली मायाळू। फार असे कनवाळू। गरीबांचे दुःख पाहावेचिना ।।७६।। सांगे घरी जाय। करी हा उपाय। यश मिळेल खचित। या मंत्रजपे ।।७७।। कित्येकांसी ऐंसी। अनुभुती आली जैसी। त्याची जंत्री करणे। महाकठिण ।।७८।। उदाहरणादाखल कांही। प्रसंग सांगतो बाही। सागरातून ओंजळभर। जैसे पाणी ।।७९।। कमलताईंच्या मातोश्रींस जाणी। कथिले होते कोणी। येईल संन्यासी झणी। देण्या मुक्ती ।।८०।। स्वामी गेले अवचित । उभे राहीले दारांत। यायचे आहे आंत। विभुती लावण्या ।।८१।। अंगास लावता विभुती। तेजस्वी झाली सती। मिळाली तिला मुक्ती। स्वामीस्पर्शे ।।८२।। स्वामीसेवेत अडचण खरी। होऊ लागली नोकरी। आले सोडून माघारी । बाळूकाका ।।८३।। तात्काळ त्यांना कराडात । नोकरी मिळाली उत्तम । स्वामीसेवा सहज । झाली शक्य ।।८४।। श्रृङ्गेरी गोशाळेतील गायींची। भूतबाधा काढण्यासाची । जगद्गुरूंनी पाचारण। असे केले स्वामींना ।।८५।। आधी गोमातेचा कळवळा । त्यांत गुरुघरचा लळा। उपाय तात्काळ । केला स्वामींनी ।।८६।। धडधडा उठल्या गोमाता। ज्या होत्या गात्रगलिता। चाटू लागल्या प्रेमाने। स्वामींचे चरण ।।८७।। बडोद्याच्या व्यासांस झाला पहा सुपुत्र । नाम त्याचे योगेश । स्वामीकृपे ।।८८।। अजित अंजली दंपती । त्यांना नव्हती संतती । प्रकटली " चैतन्य ‘‘ मूर्ती । स्वामीकृपे ।।८९।। कराडातील उमराण्यास। नोकरी मिळाली शासकीय। अशक्य झाले शक्य । स्वामी उपाये ।।९०।। मोहोळकराचे बुडालेले पैसे । मिळाले त्याला परत कैसे। स्वामींवाचून दूजे कोणी । करावे कैसे ।।९१।। भूतबाधा, भानामती । मधुकर पानस्याघरची। दूर केली स्वामींनी । आत्मबळे ।।९२।। शालिनी जोशीच्या कर्कबाधेस। वसंत जोशीच्या पक्षाघातास । पिटाळल दूर । स्वामींनी स्वबळे ।।९३।। जीवंतपणी मुक्त। ऐसा हा संत। कराडकर भाग्यवंत। खरोखरी ।।९४।। ऐशा या स्वामींनी। संकल्प केला मनी। सद्गुरुंसारखीच । घ्यायची समाधी ।।९५।। संन्यास दीक्षा दिन। अन् समाधी दिन । असावा एकच । शिष्यसोये ।।९६।। बाळूकाकांना स्वप्नांत। झाला एक दृष्टान्त । नांही कळाला संकेत । तरीसुद्धा ।।९७।। वाहत आली नदीतून। पादूका अन् छाटी। हाती आल्या पादूका। गेली वाहून छाटी ।।९८।। मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी। संन्यासदीक्षा दिनी। आमंत्रिले सर्व शिष्या। पूजेसाठी ।। ९९।। प्रत्येकाशी बोलणे। प्रत्येकाची चौकशी। श्रीफळ प्रसाद। आवर्जुन प्रत्येका ।।१००।। बाहेरगांवच्या शिष्यांना। संकेतसमाधीचा स्वामींनी विविध प्रकारे। दिला असे ।।१०१।। नगरच्या जोशींचा नातू। सुमित नामे बालकू। सांगू लागला सर्वांना। कराडला जायचे ।।१०२।। नगरच्या घरी सायंकाळी। ठीक आरतीच्या वेळी। साक्षात आले स्वामी। वायुरूपे ।।१०३।। ऐंशी सूचना अनेकांना । मिळाली असे जाणा । समाधीची स्वामींच्या खरोखरी ।। १०४।। गीतेमध्ये कथील्याप्रमाणे । " प्रयाणकाले मनसाऽचलेन । ‘‘ ऐशा या श्लोकातील। उक्तीप्रमाणे ।।१०५।। स्वामींनी घातले आसन। सद्गुरूंचे केले स्मरण। आणून दोन भृकूटीमध्ये प्राण। केला देहत्याग ।।१०६।। देहरूपातून स्वामी जरी। जाहले अनंतरूप तरी। भेटतील ते कोठेही। भावबळे ।।१०७।। त्यांचे हे स्तवन। करतो त्यांनाच अर्पण । दोष, चूक कांही । क्षमा करा ।।१०८।। इति



**रचना: श्रीकांत वसंतराव जोशी**

## प. प. स्वामींच्या उल्लेख

(३)

**परमपूज्य ईश्वरानंद सरस्वती, काशीस्वामी यांचा मंगल आशीर्वाद.**

।। श्री ।। मुक्काम:– कऱ्हाड


सकल कल्याणकारी प्रभू नृसिंहाच्या कृपाशीर्वादाने जी 'श्री क्षेत्र कोळे नरसिंहपूर' परिचय पुस्तिका पूर्ण झाली, ती आज श्रवण केली.

सुमारे चाळीस वर्षापूर्वी डॉ. भाऊराव वैद्य यांच्या समवेत श्री–नृसिंह दर्शनार्थ नरसिंहपूर येथे जाणे झाले होते. स्थान आणि देवता यांच्या साक्षात्कारी सामर्थ्याबद्दल या पुस्तकेत लेखकांनी विस्ताराने प्रवाही भाषेत जे मांडले आहे ते ऐकून त्या वास्तव्यातील स्मृतीनी पुनः-प्रत्यय आणून दिला.

श्री नृसिंह उपासना एक महान प्रत्ययदायिनी शीघ्रफलदायी वैदिक उपासना आहे. नरसिंहपूर श्रीनृसिंह उपासकांना कल्याण मार्ग त्वरित दाखवणारे साक्षात्कारी स्थान आहे. अनन्य श्रद्धा असणारांचा हा विषय आहे. ही पुस्तिका लिहिणारे लेखक, प्रेरणा देणारे सश्रद्ध सहाय्यक, या सर्वांवर श्रीनृसिंहप्रभूची कृपा होवो हाच मंगल आशीर्वाद,

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८९७ ईश्वरानंद सरस्वती

## प. प. स्वामींच्या हस्ताक्षरातील काही प्रभावी मंत्र



फट् स्वाहा ठः ठः ठः ठः नमः
दृष्टिनाश धनारक्ष मंत्र

चांमेव ह्रौं ह्रुं दुर्गे भगवति मंत्राग्रहं मथ मथ
छिन्द्धि पिशाचीन्यो रक्षसाद्यासादय
हिल दृष्ट्या हिल दृष्टि पर दृष्टि सर्प दृष्टि
सर्व दृष्टि विष नाशय नाशय हुं फट्
स्वाहा


अर्धशिशी मंत्र
वन मे ब्याई अंजनी कच्चा फल खाय
हाक मारी हनुमंत न, इस पिंड से आधा
शीशी उतर जाय

रक्तमूळव्याध
ॐ कुमती कुमती चल चल स्वाहा
(नाडा दोरा घेऊन २१ वेळा जप करून तीन गाठी मारणे)

| | |
|---|---|
| ७३ | ४२ |
| ३११ | ७७ |

अर्धशिशी यंत्र


# प. प. स्वामींच्या हस्ताक्षरातील काही प्रभावी मंत्र



॥ श्री ॥

हरि: ॐ नमो भगवते श्री नारायणाय
नमो नारायणाय विश्वमूर्तये नम:
श्री पुरुषोत्तमाय दुष्ट दृष्टिं प्रत्यक्षं वा परोक्षं
वा अजीर्णं पंचविषूचिकां हन २ ऐकाहिकं
द्व्याहिकं त्र्याहिकं चातुर्थिकं ज्वरं नाशय २
चतुरशीति वातान् अष्टादश कुष्ठान् अष्ट
दश क्षयरोगान् हन २ सर्व दोषान् भंजय २
तत्सर्वं नाशय २ शोषय २ आकर्षय २
शत्रून् मारय २ उच्चाटय उच्चाटय विद्वेषय २
स्तंभय २ निवारय २ विघ्नैर्हन २ दह २ मथय २
विध्वंसय २ चक्रं गृहीत्वा शीघ्रं
आगच्छ आगच्छ चक्रेण हत्वा परं
विद्यां छेदय २ भेदय २ चतुरशीतानि
विस्फोटय २ अर्श वात शूल दृष्टि सर्प
सिंह व्याघ्र द्विपद चतुष्पद पर बाह्यान्तर
भुव्यन्तरिक्षे अन्येपि केचित् तान्द्वेषकान्
सर्वान् हन २ विद्युन्मेघ नदी पर्वत
टवी सर्व स्थान रात्रि दिन पथ चोरान्
वशीकुरु २ हरि: ॐ नमो भगवते ह्रीं हुं

# &&ngm`XmZ Ÿ&&



आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसुर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु या भूतां ।।
चलां कल्पतरुंचे अरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।
चंद्रमे जें अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।।
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।
येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।
सुखिया जाला ।। सुखिया जाला ।। सुखिया जाला ।।



मार्गशीर्ष शु।। सप्तमी शके १९४७,
गुरुवार २७ नोव्हेंबर २०२५ रोजी
प. प. स्वामींच्या संन्यास ग्रहणास
या वर्षी शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत
त्यानिमित्ताने

**संन्यास दीक्षा ग्रहण शताब्दी सोहळा**

ज्ञानेश्वरी पारामण सोहोळा २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर.
पारामणाला बसणाऱ्मा स्वामी भक्तांची मादी.

१ पू. पाटील काका
८२ ह भ प पू श्री पांडुरंग म.
३ श्री प्रभाकर वैद्य
४ सौ वैद्य
५ श्री शैलेश कुलकर्णी
६ सौ अश्विनी कुलकर्णी
७ सौ नमिता करंदीकर
८ माळवदे ताई
९ रवि माळवदे
१० नितीन जोशी
११ सौ ऋचा जोशी
१२ सौ वेदवती जोशी
१३ श्रीकांत जोशी
१४ हेमंत जोशी
१५ सौ प्रज्ञा जोशी
१६ सौ अपर्णा पोळ
१७ श्री प्रदीप पोळ
१८. सौ सुमन हणमंत जाधव
१९. राजश्री रामचंद्र कुलकर्णी
२०. सौ सुरभी गिजरे
२१. सौ अरुंधती साने
२२. सौ माधुरी आरणके
२३. सौ शुभांगी मेळगावकर
२४ सौ अर्चना मेळगावकर
२५. दिगंबर कुलकर्णी (संभाजी)
२६. शिला ढवळे
२७. सौ मनीषा कुलकर्णी
२८. सौ दीप्ती किरपेकर
२९. श्रीराम नागेश मेळगावकर
३०. संध्मा भिंगारे
३१. चंदा चव्हाण
३२. मालिनी गाडेकर
३३. सुषमा फडणीस
३४. वृषाली साने
३५. अनुजा गद्रे
३६. स्वाती गोडसे
३७. सौ सुचेता मंत्री
३८. सौ रोहिणी कुलकर्णी
३९. सौ आशा टोणपे
४०. सौ मोहिनी टोणपे
४१. श्रीकांत ढवळे
४२. मदन मोहोळकर
४३. भक्ती मेळगावकर
४४. आशालता कुलकर्णी
४५. पुरुषोत्तम कुलकर्णी
४६. स्नेहलता कुलकर्णी
४७. सौ संगिता सिताराम दळवी
४८. श्रीधर घळसासी
४९. सौ वीणा घळसासी
५०. गजानन घळसासी
५१. जमश्री घळसासी
५२. श्री बलकुंदीकर
५३. सौ बलकुंदीकर
५४. सौ मुग्धा शैलेश कुलकर्णी
५५. अपूर्वा टोणपे
५६. जमश्री खेर
५७. स्मिता पालकर
५८. सौ रमा रमेश गोसावी
५९. शरदचंद्र पाटील
६०. जमश्री आवले
६१. संजम एकनाथ जोशी
६२. सौ संध्मा संजम जोशी
६३. सौ शितल कुलकर्णी
६४. शांताराम कुलकर्णी
६५. सौ स्मिता उमराणी
६६. अंजू पारगावकर

६७. अनू पटेल
६८. सौ. डुबल
६९. श्री. डुबल
७०. मोहिनी धोपाटे
७१. सौ गुरव
७२. श्री विजम कुलकर्णी
७३. सौ वैशाली कुलकर्णी
७४. श्मामल कुलकर्णी
७५. शैला देशपांडे
७६. पंडितराव देशपांडे
७७. बी जी जाधव
७८. मालती बोडस
७९. शैला पुजारी
८० वैशाली मोहिरे
८१ श्मामला देशपांडे
८२ अनुजा अमोल कुलकर्णी
८३ अमृता अवधूत कुलकर्णी
८४ सौं शालन राजाराम विभुते
८५ विक्रमी जोशी
८६ सौं रेणुका भालचंद्र हादिमणी
८७ सौं अलका जोशी, डोंबिवली
८८ श्री जोशी, डोंबिवली
८९ नीता गिजरे
७९. शैला पुजारी
८० वैशाली मोहिरे
८१ श्मामला देशपांडे
८२ अनुजा अमोल कुलकर्णी
८३ अमृता अवधूत कुलकर्णी
८४ सौं शालन राजाराम विभुते
८५ विक्रमी जोशी
८६ सौं रेणुका भालचंद्र हादिमणी
८७ सौं अलका जोशी, डोंबिवली
८८ श्री जोशी, डोंबिवली
८९ नीता गिजरे
९० सुभाष गिजरे
९१कुंदा लिबे
९२ स्वाती माजगावकर
९३ कल्पना जगताप
९४ धनश्री जोशी
९५ प्रदीप जोशी
९६ रघुनाथ जोशी
९७ उमा गोसावी
९८रेखा चव्हाण
९९ स्मितांजली जोगळेकर
१०० सौ किरपेकर
१०१ मोहन साने
१०२उमागोसावी

# संन्यास दीक्षा ग्रहण शताब्दी सोहळा

श्री. श्रीकांत जोशी

प. प. श्री ईश्वरानन्द सरस्वती तथा श्री काशी स्वामी महाराज यांच्या संन्यास दीक्षा ग्रहण शताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने एखादा कार्यक्रम करावा असे मनात आले. त्यानंतर कराडला जाऊन परमपूजनीय सुशीलाआत्यांशी बोलणे केले त्या म्हणाल्या '' माझे वय ९६ आहे आणि मी काही मदत करू शकणार नाही'' त्यांना मी म्हणालो '' आपले फक्त आशीर्वाद द्या कार्यक्रम होऊन जाईल '' त्याप्रमाणे त्यांचे आशीर्वाद घेतले नंतर डॉक्टर श्रीकृष्ण ढगे यांना फोनवरून विनंती केली व मानस सांगितला व त्यांना आपण या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष व्हावे अशी विनंती केली. त्यांनी ती तात्काळ मान्य केली. तसेच श्री. योगेशजी व्यास, बडोदा यांना विनंती केली की काशी स्वामी भक्त मंडळ कराड, याचे अध्यक्षपद आपण स्विकारावे. या दोघांच्या मार्गदर्शनाखाली पुढील हालचाली सुरू केल्या.

प्रथमतः कृष्णाबाई मंगल कार्यालय बुकिंगचे पैसे भरले व कार्यालय २१ ते २८ नोव्हेंबर असे बुकिंग केले. त्याच वेळेला २६ व २७, २८ नोव्हेंबर तारखा या धोपाटे प्रतिष्ठानने आरक्षित केल्याचे समजले. त्या दिवशी सायंकाळी ज्ञानेश्वरी जयंती उत्सव मंडळाचा प्रवचने व समारोप असा कार्यक्रम असल्याचे कळाले. त्याचवेळी मंडळाचे अध्यक्ष श्री. बोधे काका तिथे आले व ते म्हणाले सायंकाळी या तेथे श्री धोपाटे भेटतील, असेही समजले. त्या कार्यक्रमात बोधे काकांची भेट झाली. त्यांनी पुढे बोलाविले व संयोजकांची गाठ घालून दिली. संयोजक म्हणाले " तुम्हाला जे म्हणणे म्हणायचे आहे ते मला सांगा, मी जाहीर करतो " त्याप्रमाणे त्यांनी दिनांक २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व २८ नोव्हेंबरला श्री समाराधना असा उपक्रम काशी स्वामी भक्त मंडळ, कराड या तर्फे होणार असल्याचे जाहीर केले व नाव नोंदणीसाठी माझा क्रमांक व श्री. अभय धोपाटे यांचा क्रमांक जाहीर करण्यात आला. ती घोषणा झाल्याबरोबर श्री. अरविंद साने मला येऊन भेटले त्यांनी आणि बोधे काकांनी आम्ही पूर्ण सहकार्य करू असे सांगितले श्री. अभय धोपाटे यांच्याकडे काहीतरी दुःखद घटना घडल्यामुळे ते घाईत होते तरी पण त्यांनी मला विश्वास दिला की आपण हा कार्यक्रम एकत्रित करू ! त्यामुळे मी सुटकेचा निश्वास टाकला, स्वामींनी हे सगळे घडवून आणले अशी माझी ठाम धारणा आहे.

त्यानंतर पुन्हा एकदा कराड प्रवासाला गेलो. सर्व कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. सगळ्यांनी ते उचलून धरले मग अभयजी बरोबर बसून कार्यक्रमाची पक्की रूपरेषा आखली व कार्यक्रम पत्रिका तयार करण्यात आली. या सोहळ्यामध्ये कार्यक्रमांचे दोन भाग करण्यात आले. एक भाग म्हणजे धार्मिक कार्यक्रम व दुसरा भाग पारायण सोहळा. यात धार्मिक कार्यक्रम हे साधारणतः परम पूजनीय काशी स्वामींच्या समाधी मंदिरात व्हावेत. पारायण सोहळा व समाराधना हे कृष्णाबाई मंगल कार्यालयात व्हावेत असे ठरले.

समाधी मंदिरात रोज रुद्राच्या आवर्तनाने अभिषेक व्हावा. संन्यास दीक्षा ग्रहण दिनाच्या दिवशी लघुरुद्र व्हावा तसेच समाराधनेच्या दिवशी लघुरुद्र व्हावा असे नियोजन केले. संपूर्ण सोहळ्याच्या प्रारंभी श्री गणेश पूजन व्हावे पुण्याहवाचन व्हावे. गोमाता पूजन व्हावे व ग्रंथाची पूजा व्हावी असे ठरवले.

या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यामध्ये व्यासपीठ प्रवर्तक म्हणून ज्यांची ज्ञानेश्वरी मुखोद्गत आहे व ज्यांना वाराणसी येथील सांगवेद विद्यालयाचा ज्ञानेश्वरी कंठ भूषण पुरस्कार मिळाला आहे असे व प. प. श्री आनंदाश्रम स्वामी यांचे उत्तराधिकारी असलेले श्री पांडुरंग महाराज क्षीरसागर,आळंदी यांनी याचे दायित्व स्वीकारावे अशी त्यांना विनंती करण्यात आली. तसेच त्यांचे व आम्हा सर्वांचे मार्गदर्शक पूजनीय पाटील काका यांनी पण या सर्व सोहळ्यांमध्ये उपस्थित राहून आम्हा सर्वांना मार्गदर्शन करावे अशी त्यांना विनंती करण्यात आली. अत्यंत आनंदाने या दोघांनीही होकार भरला व आमचा दुसरा ताण कमी केला.

आता फक्त नियोजन राहिले होते.

पूजनीय पांडुरंग महाराजांनी असे सुचवले की ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर कदम (गोसेवक) माऊली यांना विनंती करून ज्ञानेश्वर महाराजांची चरित्र रोज जर श्रोत्यांसाठी ठेवले तर चांगले होईल. त्याप्रमाणे कदम माऊलींना विनंती केली आणि त्यांनी ती मोठ्या अंतकरणाने मान्य केली. तसेच सायंकाळच्या प्रवचनांमध्ये कोणाकोणाला बोलवायचे याची चर्चा होऊन एक दिवस ह.भ.प. पू. पांडुरंग महाराज क्षीरसागर, दुसरे दिवशी ह.भ.प. श्री. खनपटे माऊली ऋषिकेश, तिसरे दिवशी स्वामींचे चरित्र कथन करण्यासाठी श्रीकांत जोशी, चौथे दिवशी औदुंबरचे कीर्तनकार ह.भ.प. श्री. वासुदेव जोशी, पाचवे दिवशी श्री. सुधीर माऊली ऋषिकेश यांचे, आणि सहाव्या दिवशी ह.भ.प. श्री. चिदंबरेश्वर साखरे महाराज, यांचे प्रवचन ठेवण्याचे ठरवले. तसेच सातव्या दिवशी काल्याचे किर्तन हे ही ह. भ. प. श्री. चिदंबरेश्वर महाराज साखरे यांचे करण्याचे ठरले.

त्याप्रमाणे निमंत्रण पत्रिका तयार करून घेतल्या व पहिले निमंत्रण पूजनीय काशी स्वामींच्या चरणी ठेवले त्यांना प्रार्थना केली की '' हे शिवधनुष्य हे तुमच्या श्रद्धेने उचलण्याचा प्रयत्न करत आहे आपण नक्कीच यश द्याल '' त्यानंतर निमंत्रण पत्रिका श्री भैरव मंदिर गोंदवलेकर राम मंदिर, उत्तरा लक्ष्मी मंदिर व कृष्णाबाई मंदिर येथे ठेवली व सर्व देवतांना प्रार्थना केली की '' आपल्या लाडक्या शिष्याच्या संन्यास दीक्षा ग्रहण शताब्दीसोहळ्यामध्ये आपण सर्व देवता उपस्थित राहून आशीर्वाद द्यावेत''

त्यानंतर निमंत्रण पत्रिका घेऊन श्रीक्षेत्र वाराणसी साठी निघालो पुण्यात येऊन विमानाने वाराणसीला गेलो तेथे सांगवेद विद्यालयांमध्ये परमपूजनीय श्री. गणेश्वर शास्त्री द्राविड यांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. त्यांनी ते आनंदाने स्वीकारले. त्यांची तब्येत बरी नसते तसेच दोन दिवसांनी वेदशास्त्र संपन्न श्रीयुत देवव्रत रेखी यांचे दंडक्रम पारायण २९ नोव्हेंबर पर्यंत सांगवेद विद्यालयात होणार आहे हेही त्यांनी सांगितले. तरी पण मी कराडला येऊन जाईन असा पूजनीय गुरुजींनी शब्द दिला त्यानंतर त्यांनी काशी विश्वनाथ यांच्या दर्शनाची माझी व्यवस्था केली. काशी विश्वनाथाच्या चरणी स्वामींची पत्रिका ठेवली आणि नगरला परतलो.

नंतर पुन्हा कराडला गेलो सगळ्यांच्या भेटी घेतल्या व कोल्हापूरसाठी प्रस्थान ठेवले. कोल्हापूर येथे प. प. श्री. विद्यानृसिंह भारती करवीर पिठाधीश यांना नम्रतापूर्वक निमंत्रण दिले त्यांनी ते आनंदाने स्वीकारले. २४ तारखेला सर्व भक्त मंडळींना आशीर्वाद देण्यासाठी प्रत्यक्ष येण्याचे कबूल केले . या गोष्टीचा खूपच आनंद झाला. त्यानंतर त्यांनी सुचवले की ज्ञानेश्वरी पारायण सोहळा तर कराच पण संन्याशांना प्रिय असणारे '' प्रस्थानत्रयी भाष्य पारायण'' जर आपण केलेत तर अधिक चांगले होईल. त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानून असे पारायण करणारे विद्वान शोधण्यास प्रारंभ केला. यामध्ये धारवाडचे वेदशास्त्र संपन्न वाचस्पती व परभणीचे वेदशास्त्र संपन्न प्रमोद शास्त्री यांनी मदत केली. नंतर त्यांचा निरोप घेऊन शृंगेरीकडे जगद्गुरुंना निमंत्रण देण्यासाठी प्रस्थान ठेवले.

शृंगेरीत महासंनिधान जगद्गुरु श्री भारतीतीर्थ स्वामीजी यांच्या चरणी काशीस्वामी भक्त मंडळातर्फे भिक्षावंदन केले. निमंत्रण पत्रिका त्यांना देऊन कार्यक्रमाचा उद्देश, कार्यक्रमाची रूपरेषा त्यांना कथन केली. त्यांना अत्यंत आनंद झाला कारण काशीस्वामीं बद्दल ते असे म्हणाले की ''काशीस्वामी माझे बहिस्थ प्राण होते '' व प. प. चंद्रशेखरभारती स्वामी यांचे ते काशी स्वामी अत्यंत लाडके शिष्य होते. या सर्व सोहळ्यास त्यांनी आपले आशीर्वाद आहेत असे सांगितले त्यानंतर दुसरे दिवशी त्यांचे उत्तर अधिकारी संनिधान प. प. विधूशेखरभारती यांना पण भिक्षा अर्पण केली आणि काशीस्वामी भक्त मंडळातर्फे कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. त्यांनाही खूप आनंद झाला व त्यांनी आठवणीने सांगितले की आता आठ पंधरा दिवसात काशीस्वामींची समाराधना आहे. दरवर्षीप्रमाणे आम्ही ती शृंगेरीत करणार आहोत. आपण पण करणार आहात का? त्यांना होकार भरला व ते पण करणार आहेत हे ऐकून आणि याचे स्मरण त्यांना आहे हे ऐकून खूप आनंद झाला.

शृंगेरीत चौकशी केली की किती जणांच्या समाराधना तिथे होतात. तर उत्तर मिळाले पूर्वीचे चार शंकराचार्य व काशीस्वामी यांचीच फक्त समाराधना शृंगेरीत होते म्हणजे आपले काशीस्वामी किती महान आहेत, याची भक्तांना कल्पना येईल. त्यांचे आशीर्वाद प्राप्त करून पुन्हा नगरला गेलो.

नगरला पोहोचताच शृंगेरीहून प.प.श्री. भारतीतीर्थ स्वामींचे स्वीय सहाय्यक व धाकटे बंधू श्री पूजनीय श्री दक्षिणामूर्ती यांचा दूरध्वनी आला व त्यांनी सांगितले की जगद्गुरुंनी असे सुचविले आहे की ''आपण प्रस्थानत्रयी भाष्य पारायण करणार आहातच त्याचबरोबर काशीस्वामींचे लाडके प्राणप्रिय गुरू प. प. श्री चंद्रशेखरभारती स्वामी यांनी आचार्यांच्या विवेकचुडामणीवर भाष्य लिहिले आहे त्या भाष्याचे पारायण केले तर अधिक चांगले होईल''

त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानून त्याप्रमाणे प्रस्थानत्रयी भाष्य पारायण व विवेकचुडामणी भाष्य पारायण करण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणे श्री. प्रमोद शास्त्री व श्री गणेश्वरशास्त्री द्राविड यांचे शिष्य वेदशास्त्र संपन्न श्री. अनिकेत कुलकर्णी, आळंदी यांच्याशी संवाद केला त्यांनी आणखीन दोन वेदशास्त्र संपन्न गुरुजींशी संपर्क करून हे सर्व भाष्य पारायण करण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे वेदशास्त्र संपन्न अनिकेत कुलकर्णी, वेदशास्त्र संपन्न श्री. नरहरी जोशी अंबेजोगाई व वेदशास्त्र संपन्न भागवताचार्य श्री ऋषिकेश जोशी तुळजापूर या तिघांनी प्रस्थानत्रयी भाष्य पारायण व विवेकचुडामणी भाष्य पारायण करण्याचे मान्य केले. त्यानंतर पुन्हा कराडला रवाना झालो व सर्व कार्यकर्त्यांची दूरध्वनीवर संवाद साधून श्रीयुत बोधे काका, श्रीयुत अभय धोपाटे, श्री अरविंद साने व सौ. सुरभी गिजरे यांच्याशी संवाद साधून सर्व कार्यकर्त्यांची एकत्रित बैठक कृष्णाबाई मंगल कार्यालयात बोलावली.

आश्चर्य म्हणजे ४० कार्यकर्ते निस्पृहपणे निस्वार्थीपणाने या बैठकीला उपस्थित राहिले . कार्यक्रमाची सर्व रूपरेषा त्यांना सांगण्यात आली. त्यांनी संपूर्ण सहकार्य करून हा सोहळा यशस्वी होईल अशी ग्वाही दिली. या बैठकीत विविध खात्यांचे प्रमुख ठरवण्यात आले. त्यामध्ये भोजन विभाग प्रमुख म्हणून श्रीयुत सुरेश पटेल, त्यांना सहाय्यक म्हणून श्रीयुत श्रीकांत ढवळे. देणगी विभाग श्रीयुत आर. बी. कुलकर्णी, श्रीयुत संजय जोशी, श्रीयुत संजय शरद बोकील तर हार फुले विभाग व यांचे दायित्व श्री अरविंद साने यांनी स्वीकारली. संपर्क विभाग प्रमुख म्हणून श्रीयुत प्रशांत आवले हे काम पाहतील असे ठरले. व्यासपीठ रचना सभागृह रचना व भाजी खरेदी विभाग या मध्ये श्रीयुत अभय धोपाटे हे काम करतील असे ठरले. तसेच दूध दही हा विभाग श्रीयुत आर. बी. कुलकर्णी हाताळतील असे ठरले. कोठी प्रमुख म्हणून सौ. ऋचा जोशी तसेच आर्थिक विभाग प्रमुख म्हणून सौ. सुरभी गिजरे सौ. सीमा विभूते व सौ नमिता करंदीकर यांनी हाताळण्याचे ठरले. त्यांना सहाय्यक म्हणून श्रीयुत प्रदीप पोळ हे काम करतील असे ठरले. धार्मिक विधी प्रमुख म्हणून वेदशास्त्र संपन्न श्री सचिनजी गरुड यांची एकमताने निवड झाली. बैठक अत्यंत आनंदात पार पडली व सर्वांचा उत्साह शतगुणीत झाला सर्वजण आपापल्या कामाला लागले.

यानिमित्ताने प. प. श्री ईश्वरानंद सरस्वती यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने २००० साली छापलेली स्मरणिका पुन्हा नवीन स्वरूपात व या शताब्दी सोहळ्याच्या आठवणी त्यात अंतर्भूत करून प्रकाशित करावी असे माननीय स्वागताध्यक्ष व अध्यक्ष श्री व्यास यांच्याशी चर्चा करून ठरले. श्री अभय धोपाटे यांच्याशी चर्चा केल्यावर कराड मधले व्यापारी बँका इत्यादी आपली जनमानसात धार्मिक कार्याला प्रोत्साहन देणारी प्रतिमा निर्माण व्हावी म्हणून आनंदाने जाहिरात देतील. अशी ग्वाही अभयजींनी दिली. त्याप्रमाणे स्मरणिकेचे ही काम सुरू झाले व सर्व भक्तांना पूजनीय स्वामींचे अनुभव लिखित स्वरूपात पाठवण्याची विनंती करण्यात आली. त्याचबरोबर पाच वर्षांपूर्वी श्री. सौरभ कुलकर्णी यांनी पण एक स्मरणिका काढली होती त्यातील काही लेख काही स्तोत्रे या स्मरणिकेत मुद्रित करावेत म्हणून श्री. सौरभ कुलकर्णी यांची पण परवानगी घेण्यात आली

त्यांनी ती आनंदाने दिली. त्यामुळे पूजनीय स्वामींच्या कार्याचा एकत्रित आढावा या स्मरणिकेत घेण्यात आला आहे. या स्मरणिकेचे प्रूफ रीडिंग श्रीयुत रविंद्र माळवदे व सौ. नमिता करंदीकर व श्री. विशारद पेटकर , नगर यांनी आनंदाने केले.

विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये धार्मिक श्रद्धा रुजवावी, दृढ व्हावी व श्रीमत् भगवत्गीतेवरील मराठीतील टीका ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी याच्याशी विद्यार्थ्यांची जवळीक व्हावी व हे ग्रंथ अभ्यासावेत अशी प्रेरणा त्यांच्यात निर्माण व्हावी म्हणून ज्ञानेश्वरीतील ओव्यांची पाठांतर स्पर्धा घ्यावी, असे एकमताने ठरले व शाळांशी संपर्क करण्यात आला त्याला पण शाळांमधून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सोहळ्याची पूर्व संध्येला व्यासपीठावर लावण्यासाठी मोठा बॅनर करून आणण्यात आला होता तो बसवून घेतला. व्यासपीठाची रचना केली पूजनीय स्वामींचा नॉन रिप्लेटिव्ह ग्लास मधला फोटो, मोठी फ्रेम करून आणला होता. त्याची रचना केली पारायणासाठी लोकांची बसण्याची टेबल खुर्च्यांची व्यवस्था केली. व्यासपीठावर पारायण प्रवर्तकांना बसण्यासाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली. व्यासपीठाच्या बाजूला रांगोळी काढण्यात आली. सर्व तयारी चालू होती. सर्व कार्यकर्ते पळत होते. प्रत्येक जण आपापलं काम नीटनेटकं करत होता. तेवढ्यात पू. पाटील काका व ह. भ. प. पांडुरंग महाराज क्षीरसागर यांची गाडी येऊन थांबली. लगबगीने सगळे खाली गेला. दारात त्यांची पाद्य पूजा केली. औक्षण केले व त्यांना मोठ्या इतमामाने त्यांच्या राहायच्या खोलीमध्ये आणून बसवले. त्याचवेळी दुसरी गाडी आली त्यातून ह.भ.प. ज्ञानदेव कदम, गोसेवक माऊली श्री गणेश सुधीर डावरे पाटील त्यांच्या मातोश्री कदमबाई ही सगळी मंडळी आली सगळ्यांचे आगत स्वागत व्यवस्थित केले. दुसऱ्या दिवसाची काळजी होतीच. दुसऱ्या दिवशी नेमके श्री खंडेरायाचे नवरात्र (चंपाशष्ठी) बसणार होते त्यामुळे पहिल्या दिवसाचे पारायण सात ऐवजी आठ वाजता सुरू करण्याचे ठरले. हा निर्णय सर्व माता भगिनींच्या विनंतीवरून घेण्यात आला आणि तो योग्यच होता. वेदशास्त्र संपन्न सचिनजी गरुड येऊन गेले. दुसऱ्या दिवशीच्या समाधी मंदिरातील रुद्रावर्तन पूजा व कार्यालयातील श्री गणेश पूजन पुण्याहवाचन, गोमाता पूजन याच्या तयारीचा आढावा घेण्यात आला.

## पूर्वतयारी

पूर्वतयारी मध्ये इकडे प. प. श्री काशी स्वामींच्या समाधी मंदिराची रंगरंगोटी करण्यात आली. अत्यंत सुंदर असा सोनेरी रंग कळसाला देण्यात आला. मंदिर आतून धूवुन काढण्यात आले. मंदिरामधील स्वामींचा जो फोटो होता. त्या फोटोची फ्रेम बदलली. त्याची काच नॉन रिफ्लेक्टिव्ह अशी बसवली की जेणेकरून दर्शन घेताना त्यात आपले प्रतिबिंब दिसणार नाही. तसेच प. प. श्री चंद्रशेखरभारती, प.प. आद्य शंकराचार्य स्वामी, प. प. भारतीतीर्थ स्वामी, प. प. विधूशेखरभारती स्वामी यांच्या पण नवीन तस्बीरी करून लावण्यात आल्या. मंदिराला मोठा मांडव घालण्यात आला होता व संपूर्ण मंदिराला आकर्षक अशी रोषणाई करण्यात आली होती. मारुती मंदिराच्या पुढे सोनेरी कमान टाकण्यात आली होती. मंदिराला रोज फुलाचे तोरण, आतल्या फोटोंना रोज हार, पिंडीला हार फुले गजरा व रोज किमान रुद्राच्या एका आवर्तनाने अभिषेक, अशी व्यवस्था केली होती. कार्यालयाच्या दारात सुद्धा एक मोठी कमान टाकण्यात आली होती. दोन्ही ठिकाणी रोज नवीन नवीन रांगोळी काढण्याची व्यवस्था ही करण्यात आली होती.

# १ ला दिवस

**तो दिवस उगवला मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा** – इतके दिवस ज्याची आतुरतेने वाट पाहिली तो

दिवस अखेर उगवला होता. शतकपूर्ती सोहळ्याच्या पहिला दिवस पहाटे चारला उठूनच सर्व तयारीचा आढावा घेतला. सगळे व्यवस्थित होते. तरीपण एक दडपण होते. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा या प्रथम दिवशी श्री प्रदीप पोळ यांनी पिंडीला रुद्राभिषेक केला व सोहळ्याचा प्रारंभ झाला तसेच दुपार नंतर वे. शा. सं .श्री अनिकेत कुलकर्णी आळंदी, श्री नरहर जोशी, आंबेजोगाई, श्री. ऋषिकेश जोशी, तुळजापूर या तिघांनी समाधी मंदिरात प्रस्थानत्रयी भाष्य पारायणाचा प्रारंभ केला.

पहिल्या दिवशी कालभैरव मंदिरात जिथे स्वामींची खोली होती तिथली स्वच्छता करून घेण्यात आली व तेथील पादुकांना नवीन वस्त्रे, फोटोची नवीन फ्रेम हे सगळे करण्यात आले व तेथील फोटोला रोज हार याची पण व्यवस्था करण्यात आली.

समाधी मंदिरात वेळेवर रुद्रावर्तन सुरू झाले. गुरुजी वेळेत आले व श्री गणेश पूजन व पुण्याहवाचनला सुरुवात झाली. यजमान होते नगरचे श्री हेमंत वसंतराव जोशी आणि सौ. प्रज्ञा हेमंत जोशी वे.शा. सं. सचिनजी गरुड यांनी यथासांग पूजा सांगितली व पूर्ण करून घेतली. जवळच्या शिष्य मंडळींनी यजमानांचे व श्री गणेशाचे औक्षण केले. त्याचवेळी बाहेर सवत्स धेनू घेऊन गवळी आला होता. त्या दोघांची पूजा यजमानांनी केली. बाकी महिला मंडळाने औक्षण केले. आता वाट होती पारायणाला किती जण, किती वेळेत येतात याची आणि खरोखर कराडकर बंधू-भगिनी कमाल केली ८ वाजेपर्यंत ६० टक्के सभागृह भरलेले होते आणि ८.२० पर्यंत शंभर टक्के सभागृह भरले होते. बरोबर ८ वाजता श्रीविष्णुसहस्रनामाला प्रारंभ झाला होता व ८.२५ वाजता पारायण प्रवर्तक ह. भ. प. श्री पांडुरंग महाराज क्षीरसागर व्यासपीठावर विराजमान झाले आणि बरोबर ८.३० वाजता ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ झाला.

सकाळी १० ते १०.३० अशी उपहाराची सुट्टी झाली व नंतर पारायणाला पुन्हा प्रारंभ झाला ते एक वाजेपर्यंत त्यानंतर प्रसाद भोजन झाले.

आता उत्सुकता होती दुसऱ्या सत्रातील कार्यक्रमांची त्यात प्रथमतः ह.भ.प. श्री. ज्ञानदेव माऊली कदम गोसेवक हे श्री ज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र सांगणार होते. ५.१५ वाजल्यापासूनच सभागृह भरू लागले. ५.३० वाजेपर्यंत सर्व सभागृह पूर्ण भरले होते. ५.३० वा. माऊलींनी व्यासपीठावरून माऊलींचे चरित्र सांगण्यास प्रारंभ केला आणि बघता बघता श्रोत्यांच्या मनाची पकड घेतली. त्यांचा व्यासंग बोलण्यातील नम्रता आवाजावरील हुकूमत आणि भावपूर्णतः यांनी श्रोते भक्तीमय वातावरण वातावरणात रंगून गेले होते. ६.३० कधी वाजले आणि प्रवचनाची वेळ झाली कळालेच नाही.

पहिल्या दिवसाचे प्रवचन हे ह. भ. प. पांडुरंग महाराज क्षीरसागर ज्यांना वाराणसी येथील श्री गणेश्वर शास्त्री द्राविड यांच्या सांगवेद विद्यालयाने ज्ञानेश्वरी कंठभूषण पुरस्कार दिला आहे त्यांचे होते. श्लोक होता '' अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे । गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः ।। '' साध्या, सोप्या सरळ भाषेत महाराजांनी विषय समजावून सांगितला '' त्यानंतर आरती झाली, हरिपाठ झाला व प्रसाद भोजन झाले.

**दुसरा दिवस –** मार्गशीर्ष शुद्ध व्दितीया – आज विष्णुसहस्रनाम बरोबर ७ वाजता सुरू झाले आणि ७.३० वाजता ज्ञानेश्वरी पारायण याला सुरुवात झाली . पारायणाला बसलेली सर्व मंडळी ही बरोबर ७ वाजता जागेवर येऊन बसली होती. ९.३० वाजेपर्यंत पारायण झाले व नंतर अर्ध्या तासाची

विश्रांती उपहार घेऊन पुन्हा परायणाला प्रारंभ झाला पारायण नंतर आरती झाली प्रसाद भोजन झाले दुपारच्या सत्रामध्ये ह. भ. प. श्री माऊली कदम यांचे चरित्र कथन झाले. तदनंतर ह. भ. प. श्री खनपटे माऊली, ऋषिकेश यांचे '' । प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् । आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।।'' या श्लोकावर व्यासंग पूर्ण प्रवचन झाले. त्यात श्लोकातील पदे, त्यांचा अन्वय व त्याचा शब्दार्थ, भावार्थ त्यांनी स्पष्ट करुन सांगितला. ज्याने सर्व इच्छांचा मनातून, कृतीतून त्याग केला आहे त्याला स्थितीप्रज्ञ म्हणतात. हे सोदाहरणं सांगितले. त्यानंतर आरती झाली, हरिपाठ झाला, प्रसाद भोजन होऊन दुसऱ्या दिवसाची सांगता झाली.

## ३ रा दिवस

तिसरा दिवस पहाटे ३.१५ वाजता वे. शा. सं. पद्मश्री गणेश्वर शास्त्री द्राविड यांचे कार्यालयात आगमन झाले, थोडा वेळ विश्रांती घेऊन त्यांनी निवासव्यवस्था दुसरीकडे होईल का याची चौकशी करण्यास सांगितले. त्यांचे सहाय्यक श्री. अवधजी यांना घेऊन श्री. सचिन गरुड व श्री राजू गिजरे यांची निवासस्थाने दाखविली. सचिनजींच्या घरी जायला पायऱ्या उतरून चढाव्या लागत असल्यामुळे त्यांनी राजू गिजरे यांचे घर पसंत केले व राजीव गिजरे यांच्या घरी जाण्याचे ठरले. प. पू. गुरुजी राजुजी यांच्या घरी गेले. कार्यालयात त्यांची विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली.

तिसरा दिवशी रोजच्या वेळेत सकाळी ७.०० वाजता विष्णुसहस्रनामाला प्रारंभ झाला व ७.३० वाजता ह. भ. प. श्री. पांडुरंग महाराज क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री ज्ञानेश्वरी पारायण सुरू झाले. रोजच्याप्रमाणे मधली सुट्टी,उपहार नंतर पुन्हा पारायण आरती , प्रसाद, भोजन यानंतर सकाळचे सत्र संपले.

दुपारच्या सत्राचा प्रारंभ भजनी मंडळाच्या भजनाने झाला अत्यंत सुश्राव्य आणि भक्तीपूर्ण अशी भजने झाली भजनी मंडळाचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर ५.१५ वाजता ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कदम यांनी श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या चरित्र करताना कथनास प्रारंभ केला व ६.१५ कथनाला स्वल्पविराम दिला.

४.३० वा. ह. भ. प. श्री बबन महाराज मस्के यांचे आगमन झाले.

६.३० वाजता श्रीकांत जोशी यांनी पाऊण तास प. प. काशीस्वामींचे चरित्र कथन केले. त्यामध्ये स्वामीजींचे पूर्व आयुष्य त्यानंतर संन्यासश्रम, काशी मधील आगमन, काशीमध्ये विद्वतसभेकडून ''धर्मश्री:'' ही पदवी प्राप्ती नंतर प.प. श्री चंद्रशेखरभारती स्वामी यांच्या सहवासातील जवळजवळ पंचवीस वर्षे व त्यांच्या तप सामर्थ्यांचा परिणाम' त्यांच्यासारखी अनुष्ठाने करण्याचे वेड, तसेच सतत परमेश्वराच्या अनुसंधानात राहणं, प्रसिद्धी परांडमुखता, निस्पृहता असे संस्कार घेऊन कराडमध्ये प्रवेश, कराड मधील दिनक्रम, शिष्यांचे अनुभव व समाधी असे थोडक्यात वर्णन केले. त्यानंतर ह. भ. प. श्री. बबन महाराज मस्के यांचे सूश्राव्य प्रवचन झाले नंतर हरिपाठ होऊन भोजन प्रसाद झाला.

## ४ था दिवस

चौथ्या दिवसाची सुरुवात पहाटे ३ लाच झाली.

रोजच्या वेळेत विष्णुसहस्रनाम सुरू झाले . पारायण सुरू झाले मग ९.४५ वाजता जगद्गुरु करवीर

पिठाधीश प. प. श्री विद्यानरसिंहभारती यांचे आगमन पारायण स्थळी झाले. फुलांच्या पायघड्या व जगद्गुरुंचा जयजयकार या घोषामध्ये जगद्गुरुंना औक्षण करून सभागृहात आणण्यात आले. तेथे त्यांची पाद्य पूजा करण्यात आली. महावस्त्र, भिक्षा झाली. त्यानंतर त्यांनी सर्व भक्तांना मार्गदर्शन केले. सर्व भक्तांना आशीर्वाद दिले आणि त्यांनी प्रस्थान ठेवले.

पारायण पूर्ववत सुरू झाले व ते १.०० वाजेपर्यंत चालले नंतर भोजन प्रसाद झाला. दुपारच्या सत्रामध्ये भजनी मंडळ आले होते. त्यांनी सुंदर भजने सादर केली. नंतर ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथन झाले. त्यानंतर ह. भ. प. श्री वासुदेव बुवा जोशी औदुंबर यांचे ‘‘ जो होय मज अनन्य शरण । तयाचे निवारी मी जन्म मरण। या लागी शरणागतासी शरण्य । मीच एक ।। ‘‘ या ओवीवर प्रवचन झाले.

नंतर प.पू. पद्मश्री गणेश्वर शास्त्री द्राविड यांचे आगमन झाले. त्यांना औक्षण करुन अत्यंत आदराने सभागृहात आणण्यात आले. श्री गुरुजींनी काशी स्वामी संन्यास दीक्षा शताब्दीपूर्ती सोहोळ्याच्या आयोजनाबद्दल प्रसन्नता व्यक्त केली. संन्यास व्रत किती कठीण असतें हे सांगितले व या निमित्ताने होतं असलेल्या प्रस्थानत्रयी भाष्य पारायण, विवेकचुडामणी भाष्य पारायण व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण, लघुरुद्रादी व समाराधना इ. बद्दल अत्यंत आनंद प्रकट केला. पू. पाटीलकाका व ह. भ. प. श्री पांडुरंग महाराज यांच्या सारख्या महात्म्याच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व चालले असल्याबद्दल अत्यंत प्रसन्नता व्यक्त केली. सर्व भक्त मंडळींना चरणस्पर्श दर्शन झाले. श्री गुरुजींनी सगळ्यांना आशीर्वाद दिलें व त्यांची पाद्यपुजा करण्यात आली. नंतर त्यांनी प्रस्थान ठेवले नंतर हरिपाठ झाला व प्रसाद भोजन झाले.

चौथ्या दिवशी दुपारच्या वेळेत शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या ज्ञानेश्वरी ओव्या पाठांतराची स्पर्धा कृष्णाबाई मंगल कार्यालय (नवे) येथे घेण्यात आली परीक्षक म्हणून श्रीमती मालिनी गाडेकर सौ. नमिता करंदीकर ह. भ. प. श्री माऊली कदम गोसेवक आळंदी यांनी काम केले स्पर्धांचे आयोजनात श्री रवींद्र माळवदे श्री. अभय धोपाटे इत्यादींनी सहकार्य केले. तसेच श्रीयुत पालकर यांनी नवीन कार्यालय उपलब्ध करून दिले. स्पर्धा अत्यंत उत्तम वातावरणात पार पडल्या मुलांमधला आणि पालकांमधला उत्साह वाखाणण्या सारखा होता.

## ५ वा दिवस

मार्गशीर्ष शुद्ध पंचमी, ५ व्या दिवसाची सुरुवात सकाळी श्री विष्णुसहस्रनामाने झाली व तदनंतर ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण वेळेवर सुरू झाले. ९.३० वाजता उपहाराची सुट्टी झाली व १० वाजता पुन्हा पारायणाला प्रारंभ झाली. आज जरा जास्ती ओव्या घेऊन पारायण आटोक्यात आणण्यात आले.

पाचव्या दिवशी आणखीन एक महत्वाची घटना घडणार होती. त्या घटनेचे साक्षीदार पारायणास बसलेली सर्व भाविक मंडळी होणार होती. ती घटना म्हणजे आपल्या सर्व भारतीय लोकांचे श्रद्धास्थान असलेली अयोध्या आणि अयोध्येतील राम मंदिर. त्या राम मंदिरावर भगवा फडकवला जाणार होता. वेळ होती दुपारी बरोबर १२ वाजताची आणि सर्वांना सूचना देण्यात आली होती की सर्व बांधवांनी बरोबर ११ वाजून ५५ मिनिटानंतर आपापल्या घरी घंटा नाद करावा. शंख वाजवावेत. प्रभू रामचंद्रांचा जयजयकार करावा. या सूचनेचा विचार करून बरोबर ११ वाजून ५२ मिनिटांनी पारायण थांबवण्यात आले. सर्व भाविकांना तशी सूचना देण्यात आली व सर्वांनी ११:५५ पासून बारा वाजून पाच मिनिटापर्यंत प्रभू श्री रामचंद्रांचा जयघोष घंटा नाद व शंख घोष करण्यात आला. माता भगिनी उस्फूर्तपणाने फुगड्या खेळायला लागल्या आणि सर्वत्र आनंदाचा कल्लोळ अनुभवास आला. सर्वांना अत्यंत आनंद झालेला होता. व्यासपीठावरील संतवृंद सुद्धा या जयघोषा मध्ये

सहभागी होता आणि हे आनंदाचे क्षण सगळेजण आपल्या हृदयामध्ये साठवून ठेवत होते.

साधारण दुपारी दीडच्या आसपास भोजनाची सुट्टी झाली. प्रसाद घेऊन वाचक घरी गेले. ४ वाजता स्वरांजली भजनी मंडळ यांनी आपल्या भजनाचा सुश्राव्य कार्यक्रम केला तर नंतर श्री माऊली कदम गोसेवक यांचे श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथनाचे शेवटचे सत्र ५.१५ पाच वाजता सुरू झाले. श्रोते आधीपासूनच येऊन बसले होते. आज माऊली समाधीस्थ होणार या कल्पनेने सर्व श्रोते व्याकुळ झालेले होते आणि खरोखरच जेव्हा त्या प्रसंगाचे वर्णन कदम माऊलींनी केले त्यावेळी श्रोत्यांचे डोळे भरून आले होते कंठ दाटून आला होता अत्यंत भावपूर्ण वातावरणात हे चरित्र कथन संपन्न झाले.

त्यानंतर ६.३० वाजता श्री ह.भ.प. श्री. सुधीर महाराज कांडेकर, ऋषिकेश यांचे ''। सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः । मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ।। '' या श्लोकावर प्रवचन झाले तर नंतर आरती झाली हरिपाठ झाला व प्रसाद भोजन झाले.

## ६ वा दिवस

मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी, आज चंपाषष्ठी त्यामुळे पारायणाची वेळ थोडी बदलण्यात आली. माता भगिनींना कुळधर्माची तयारी करायची असल्यामुळे ८.०० वाजता विष्णुसहस्रनाम सुरू करण्यात आले व ८.३० वाजता श्री ज्ञानेश्वरी पारायण सुरू झाले. १० वाजेपर्यंत ज्ञानेश्वरी पारायण पूर्ण झाले होते व ग्रंथराज ज्ञानेश्वरी चे पूजन श्री विनायक गुरुजी यांचे पौरोहित्याखाली,श्रीकांत जोशी सौ. वेदवती जोशी यांचे हस्ते करण्यात आले. पारायणातल्या सर्व वाचकांनी सुद्धा आपापल्या जागी आपापल्या ग्रंथाची मनोभावे पूजा केली. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पूजनानंतर पूजनीय पाटील काका यांचे पूजन करण्यात येऊन त्यानंतर व्यासपीठ प्रमुख ह. भ. प. ज्ञानेश्वरी कंठभूषण पुरस्कार विजेते श्री. पांडुरंग महाराज क्षीरसागर यांचे पूजन करण्यात आले तसेच ह. भ. प. श्री सुधीर महाराज कांडेकर व ह. भ. प. श्री गणेश महाराज आळंदी तसेच ह. भ. प. श्री. झरेकर महाराज चिखली यांस सर्वांना वस्त्र, श्रीफळ, मानधन देऊन सत्कार करण्यात आला, चिखलीहून आलेल्या श्रीमती कदम बाई यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला तसेच दौंड होऊन आलेले राळेभात दांपत्य यांचा पण सत्कार करणयांत आला. नंतर प्रसाद भोजन झाले व दुपारची सुट्टी झाली.

सायंकाळी ४ वाजता शारदा भजनी मंडळ कराड. यांचा अत्यंत देखणा असा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. ५.१५ वाजता आपल्या काशीस्वामी भक्त मंडळ कराडचे अध्यक्ष श्री. योगेशजी व्यास यांचे बडोद्याहून आगमन झाले. त्यांच्या भक्ती गीताचा कार्यक्रम बरोबर ५.४५ सुरू झाला. ६.३० वाजेपर्यंत तो कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण असा झाला. त्यांच्या गायनाला असलेली शास्त्रीय बैठक, त्यांची स्वामींवर असलेली श्रद्धा यामुळे कार्यक्रम एका वेगळ्याच उंचीवर गेला. त्यांना संवादिनीवर साथ करण्यासाठी श्रीयुत घळसासी होते तर तबल्यावर डॉ. आगवेकर होते.

कैलासवासी बाळकृष्ण तथा राघू अण्णा वामन धोपाटे व कै इंदिराबाई बाळकृष्ण धोपाटे यांचे स्मरणार्थ धोपाटे प्रतिष्ठान तर्फे ह. भ. प. श्री चिदंबरेश्वर किसन महाराज साखरे, आळंदी यांचे आजचे प्रवचन आयोजित केले होते. त्याप्रमाणे महाराज व त्यांच्या पूजनीय मातोश्री यांचे आगमन झाले. प्रवेशद्वारावर त्यांचे यथोचित स्वागत, औक्षण करण्यात आले व सन्मानाने त्यांना सभागृहात आणण्यात आले नंतर महाराजांचे

''।। गुरु तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन । दर्शनीं समाधान । आथी जैसें ।। '' या ओवी वर अत्यंत रसाळ असे

प्रवचन झाले आपल्या प्रवचनात त्यांनी प. प. शी काशी स्वामी यांच्या कार्याचा उल्लेख केला व संन्यास दीक्षा शताब्दी महोत्सव घडवून आणल्याबद्दल कौतुक केले. त्यांच्या प्रवचनानंतर आरती झाली. भोजन प्रसाद झाला व सहावा दिवस संपन्न झाला.

## ७ वा दिवस

मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी. सोहळ्याचा मुख्य दिवस. हाच तो दिवस ज्या दिवशी शंभर वर्षांपूर्वी परमहंस परिव्रजकाचार्य श्री सच्चिदानंद सरस्वती यांचे कडून पूर्वाश्रमीचे श्री. गंगाधर केशव भागवत यांनी संन्यास दीक्षा ग्रहण करून प. प. श्री ईश्वरानंद सरस्वती हे नामानिधान धारण केले होते तोच हा सोनेरी दिवस. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ।। संन्यास धर्माचं अत्यंत कठीण असं शिवधनुष्य स्वामींनी पेलण्याचा संकल्प केला आणि संकल्प पूर्तीचा तो दिवस होता प. प. स्वामींच्या संन्यासाश्रम आचरणामध्ये त्यांचे आदर्श होते प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती उपाख्य टेंबे स्वामी महाराज. अत्यंत कठोर असे हे व्रत स्वामींनी ६८ वर्षे आचरले. कराडकर बांधव याचे १९५४ ते १९९३ पर्यंत साक्षी होते. त्रिकाल कृष्णा स्नान, भिक्षा ग्रहण अपरिग्रह, निस्पृहता, धर्माबद्दल अभिमान, वर्णाश्रमातील आचरणाबद्दल आग्रह या सर्व गोष्टी यामुळे स्वामींबद्दल एक आदरयुक्त धाक कराडकर बांधव आणि शिष्य समुदाय यांच्यामध्ये होता. शृंगेरी पिठाधीश प. प. श्री चंद्रशेखर भारती स्वामी यांचा सहवास स्वामींना जवळजवळ पंचवीस वर्षे लाभला व ते त्यांचे पट्ट शिष्य झाले त्यांचे सहअध्यायी नंतर पीठाधीश झालेले प. प. श्री. अभिनवविद्यातीर्थ व नंतरचे पीठाधीश श्री भारतीयतीर्थ व प. प. श्री. विधूशेखरभारती या सर्वांनाच स्वामींवर प्रचंड प्रेम, आत्मीयता आणि आदर. प. प. श्री. भारतीतीर्थांचे एक वाक्य माझ्या अजूनही स्मरणात आहे ते म्हणाले होते '' काशी स्वामी मेरा बहिस्थ प्राण है । '' त्यामुळे हे सर्व पीठाधीश जेव्हा जेव्हा त्यांची महाराष्ट्रात विजय यात्रा असायची तेंव्हा वाकडी वाट करून सुद्धा ते कराडला येऊन काशीस्वामींना भेटून जात असत. स्वामींनी देह ठेवल्यावर सुद्धा स्वामी भक्तांसाठी २००७ साली प. प. भारतीतीर्थ स्वामी व २०१८ साली प.प. विधुशेखरभारती कराडला स्वामी भक्तांना भेटण्यासाठी येऊन गेले.
अशा स्वामींचा आज संन्यास दीक्षा ग्रहण शताब्दीपूर्ती दिन सकाळीच समाधीला लघु रुद्राभिषेक करण्यात आला. तसेच श्री कृष्णाबाई, श्री उत्तरालक्ष्मी देवीला व ज्या श्री भैरव मंदिरात परमपूज्य स्वामींचा रहिवास झाला त्या श्री कालभैरवाला, श्री गोंदवलेकर महाराजांना, श्रीराम मंदिरातील श्रीरामपंचायतनाला स्वामिनीं तर्फे अभिषेक करण्यात आला. वस्त्र ओटी प्रदान करण्यात आली. समाधी मंदिर फुलांनी सजवलेले होते. मंदिरावर रोषणाई करण्यात आली होती. मोठा मांडव घालण्यात आला होता. सर्व भक्तांची समाधीच्या दर्शनासाठी रीघ लागलेली होती. लघुरुद्र संपन्न झाल्यावर स्वामींची आरती झाली. स्वामींच्या नावाचा स्वामींच्या गुरुपरंपरेचा जयघोष करण्यात आला. प्रसाद वाटप झाले आणि इकडे कार्यालयात काल्याचे कीर्तनाची तयारी सुरू झाली.

काल्याचे किर्तन ह. भ. प. श्री चिदंबरेश्वर महाराज साखरे हेच करणार होते बरोबर ९.४५ वाजता कीर्तन सुरू झाले व ११.०० वाजता ते संपन्न झाले. सर्व भक्तांना काल्याचा प्रसाद वाटण्यात आला.

आता तयारी सुरू झाली दिंडीची, पालखीची. पालखीमध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी व प.प. श्री काशी स्वामी यांच्या पादुका ठेवण्यात आल्या. पालखीने कार्यालयातून प्रस्थान ठेवून ती समाधी मंदिरापाशी आली. सोबत पूजनीय पाटील काका ह. भ. प श्री पांडुरंग महाराज क्षीरसागर ह. भ. प. श्री चिदंबरेश्वर महाराज साखरे तसेच जयराम स्वामींचे उत्तराधिकारी हेही बरोबर होते. या सर्वांनी समाधीचे दर्शन घेतले आणि पालखी निघाली पुढे स्वामींच्या पालखीसाठी कराडचे श्री. अटकेकर कुलकर्णी यांनी आपली जीप सेवा म्हणून उपलब्ध करून दिली.

त्या जीपमध्ये पूजनीय पाटील काका, जयराम स्वामींचे उत्तराधिकारी बसले. पुढे स्वामींचा फोटो लावलेला होता. पुढे वाजंत्री वाजत होती. मागे पुढे सगळीकडे नटून थटून सजून आलेल्या माता भगिनी पुरुष मंडळी, पालकर शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी तेही नटून थटून आलेले विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पोशाख घातलेला तर विद्यार्थिनींनी नऊवारी नेसलेली अशी अत्यंत थाटामाटात पालखी निघाली. सोमवार पेठेत जणू दिवाळीच होती. सर्व रस्त्यांवर माता भगिनींनी रांगोळ्या काढलेल्या होत्या. पालखीवर पूष्पवृष्टी होत होती. माता भगिनी पालखीचे महाराजांचे औक्षण करत होत्या व पालखी मोठ्या डौलात भैरव मंदिरापाशी गेली. हेच ते मंदिर ज्या मंदिरामध्ये स्वामी ३८ वर्षे राहिले. सर्व मान्यवरांनी त्या स्थानाचे दर्शन घेतले. भैरवनाथाचे दर्शन घेतले. गोंदवलेकर रामाचे दर्शन घेतले. वड्याचा गणपती, उत्तरालक्ष्मी याचे दर्शन घेऊन पाण्याच्या टाकी, हटकेश्वर मार्गे दिंडी पालखी कार्यालयात पोहोचली. रस्त्यामध्ये नागरिकांनी प्यायच्या पाण्याची सोय केली होती. विद्यार्थी विद्यार्थिनींना खाऊ वाटप करण्यात आले. नंतर भोजन प्रसाद झाला व पारायण सोहळा संपन्न झाला.

सप्तमीच्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजता सर्व भाविक भक्तगण अनौपचारिक रित्या एकत्र जमले आणि भक्ती संगीताची एक सुरेल अशी मैफिल कार्यालयामध्ये जमली. सर्वजण अत्यंत भक्तीभावाने आपली गायन सेवा आपल्या लाडक्या श्री गुरूंच्या चरणी समर्पित करण्यास उत्सुक होते. यात अगदी पाच वर्षाच्या बालकापासून ते ८० वर्षे वयापर्यंतच्या भक्तांनी भाग घेतला. यात ज्यांनी ज्यांनी सेवा सादर केली त्यांची नावे कुमारी अन्वी जोशी, चिरंजीव शर्व जोशी, चि. अभिषेक जोशी, श्री. योगेशजी व्यास, सौ. रश्मी व्यास, सौ माधुरी धोपाटे, श्री. अभय धोपाटे, श्री. रवी माळवदे, श्रीकांत ढवळे, सौ. अनुजा गद्रे, सौ. अपर्णा पोळ, सौ. वेदवती जोशी, सौ. उमराणी, श्री. जोशी डोंबिवली, श्री. श्रीकांत जोशी इ. नंतर हरिपाठ झाला. संध्याकाळची आरती झाली. भोजन प्रसाद झाला व वेध लागले ८ व्या दिवसाचे, समाराधनेचे.............................................

# ८ वा दिवस

## समाराधना

आज मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी. आजच्याच दिवशी बरोबर ३२ वर्षांपूर्वी प.प. स्वामींनी देह ठेवला होता आणि ते विदेह मुक्त झाले होते. सकाळी ८ वाजता स्वामी समाधी मंदिरामध्ये लघुरुद्राची जोरदार तयारी चालू होती. श्री. सचिनजी गरुड व त्यांचे सर्व गुरूजी मंडळी वेळेवर उपस्थित झाली. लघु रुद्राला यजमान म्हणून श्री. अभिषेक जोशी बसले होते. संपूर्ण मंडप भाविकांनी गजबजला होता. मंदिर फुलांनी सजवले होते त्याच्यावर रोषणाई होती. रांगोळी काढलेली होती. स्वामींचा मोठा फोटो बाहेर ठेवला होता त्यालाही हार घालण्यात आले होते. साधारण दोन तासात लघुरुद्र संपन्न झाले. पिंडीला दूध आणि अभिषेक झाला होता. सर्व पिंड स्वच्छ धुऊन गरम पाण्याने धुऊन स्वच्छ पुसून त्याच्यावर गंध लेपन झाले होते फुलांनी सजवली होती. हार घातला होता. मंदिरातील सर्व तस्बीरींना सुगंधी फुलांचे हार घालण्यात आले होते. वरती गजरे बांधण्यात आले होते. सर्व वातावरण अत्यंत सुगंधित आणि भक्तीरसपूर्ण असे होते. आरती पूर्वी माननीय आमदार श्री. अतुल बाबा समाधीच्या दर्शनासाठी आले. त्यांनी दर्शन घेतले पूजनीय सुशीलाआत्या यांच्याशी ते बोलले. वे. शा. सं. सचिनजी गरुड यांनी आपल्या मंदिराला वरून पत्र्याचे शेड असावे ही मागणी त्यांच्यापुढे मांडली व ती त्यांनी आनंदाने कबूल केली. त्यांना श्रीफळ देण्यात आले. प्रसाद देण्यात आला नंतर आरती झाली वाजंत्री वाजली प.प. स्वामींच्या सर्व गुरुजनांचा व प. प. स्वामींच्या नावाचा जयघोष करण्यात आला सर्वांना प्रसाद वाटण्यात आला व मंदिरातील

समाराधने निमित्त आयोजित लघुरुद्राचा कार्यक्रम संपन्न झाला.

त्यानंतर कृष्णाबाई मंगल कार्यालयामध्ये बरोबर १२ वाजता समाराधना पूजेची मांडणी करण्यात आली १६ गुरुजी आलेले होते श्रीकांत जोशी पूजेला बसले होते. समाराधाने मध्ये १६ ब्राह्मण बसवले जातात. त्यामध्ये पहिले श्री गुरु, परात्पर गुरु, परमेष्टी गुरु व इतर ब्रह्मवृंद हे साक्षात देवता स्वरूपात आलेले असतात त्यांच्या त्यांची पाद्य पूजा करून त्या पाद्यपूजेचे तीर्थ एका कलशांमध्ये भरून त्या कलशाची पूजा केली जाते. ती षोडशोपचार पूजा झाल्यावर तो कलश मस्तकावर धारण करून नाचायचे असते. तत्पूर्वी षोडशोपचार पूजेतला भाग म्हणून सर्व सोळा ब्राह्मणांना नैवेद्य दाखवला जातो. त्यांना पंचपक्वानांचे भोजन दिले जाते. यथोचित वस्त्र दक्षिणा दिली जाते विडे दिले जातात आणि त्यानंतर तो कलश मस्तकावर धारण करून उपनिषदातल्या मंत्रांच्या गजरावर नर्तन केले जाते. त्या कलशाचे सर्वांनी दर्शन घ्यावे पूजन करावे व त्यातील तीर्थ प्राशन करावे असा हा उत्सव असतो. हे तीर्थ मिळणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. संन्याशाने देह ठेवल्यानंतरच समाराधना होते . सामान्य श्राद्ध आणि समाराधना याच्यात जमीन आसमानाचा फरक आहे. श्राद्धाचे भोजन फक्त नातेवाईकच घेतात पण समाराधनेचा प्रसाद मिळणे हे महदभाग्याचे लक्षण आहे. ते सहसा मिळत नाही ज्यांना मिळाले ते भाग्यवान. समाराधना चालू असतानाच परमपूज्य वेदशास्त्र संपन्न पद्मश्री श्री. गणेश्वर शास्त्री द्राविड यांचे आगमन झाले. त्यांनी समाराधनेची चौकशी केली. सगळ्यांना मार्गदर्शन केले. सर्वांना दर्शन दिले. आशीर्वाद दिला आणि त्यांनी प्रस्थान ठेवले. ब्राह्मण भोजन चालू असताना विष्णुसहस्रनाम, आत्मा अनुसंधान, स्तुती, विज्ञान नौका इत्यादी स्तोत्रे म्हणण्यात आली. नंतर सर्व भाविकांना प्रसाद भोजन देण्यात आले सर्व भाविकांनी तीर्थ आणि प्रसाद ग्रहण करून आनंद व्यक्त केला.

अशा रीतीने हा आठ दिवसाचा सोहळा अतिशय मंगलमय उत्साहवर्धक अशा वातावरणात संत महंतांच्या सहवासात, महात्म्यांच्या आगमनाने, मार्गदर्शनाने एका वेगळ्या अध्यात्मिक उंचीवर पोहोचलेला. असा हा सोहळा संपन्न झाला. साक्षात ईश्वराचाच वास या सोहळ्यामध्ये सतत जाणवत होता. '' सामर्थ्य आहे चळवळीचे जो जे करील तयांचे परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे '' या समर्थ उक्तीचा अनुभव सतत येत होता. हे कठीण शिवधनुष्य उचलले गेले ते या अधिष्ठानामुळे, स्वामींच्या कृपेने व देता किती घेशील दो कराने असे म्हणणाऱ्या भगवंताच्या कृपाशीर्वादाने!

या सोहळ्यामध्ये कराडकर भाविकांनी जो प्रतिसाद दिला तो अत्यंत अभूतपूर्व असा होता पहाटेची वेळ असून सुद्धा भर थंडीत माता–भगिनी अगदी वेळेवर येऊन बसत होत्या आणि कार्यक्रमातील क्षण क्षण आपल्या हळुवार अंतकरणाने टिपून घेत होत्या त्यांची दाद त्यांच्या हळूहळू भावा वरून त्यांच्या डोळ्यातील तरणाऱ्या अश्रुवरून कळून येत होती सर्वांचे किती धन्यवाद द्यावेत किती आभार मानावेत तेवढे थोडे आहेत.

आपण कराड करांनी आमच्यावर फार मोठी कृपा केली आहे आपणा सर्वांचे ऋण व्यक्त करतो व इथेच थांबतो.

।। जय हरि ।।



# स्वप्न दृष्टान्त

आदिती

१९९२ ला प. पू. काशीस्वामी आमच्या नवीन बांधून झालेल्या हॉस्पिटल व घराच्या वास्तूत आले होते. त्यावेळी त्यांच्या समवेत त्यांचे शिष्योत्तम बाळू काका कुलकर्णी,कमल आत्या,सुशीला आत्या,विजू आत्या होत्या.

स्वामींची आमच्या कडून शास्त्रशुद्ध पाद्यपूजा झाली.

माझी कन्या आदिती तेंव्हा ७ वर्षांची होती.

मी माझ्या कॅमेऱ्याने फोटो काढत असताना तिने कॅमेरा द्या म्हणून हट्ट धरला. मी कॅमेरा दिला नाही म्हणून ती रुसली. ते पाहून तिला स्वामींनी जवळ घेऊन तिची समजूत काढली.

आम्हीं दोघे पती पत्नी दोन लहान मुलांना घेऊन वरचेवर भैरोबाच्या देवळात स्वामींना भेटायला जात असू. तेंव्हा स्वामी दोन्ही मुलांना जवळ घेऊन खडीसाखर देत असत.

स्वामी समाधिस्त होऊन अनेक वर्षं लोटली. दोन्ही मुले चाळीशीत आली. डॉक्टर झाली.

आदितीला हिमालमातल्या ट्रेकिंग ची आवड असल्याने तिचे हिमालमातील भ्रमण सुरू असते. हिमालयातील अनेक दुर्गम ठिकाणी विशेषतः पंच कैलास ही शिवाची अवघड जागी असलेली आणि जिथे ट्रेकर्स शिवाय कुणी जात नाही अशी स्थाने तिन्ही सर केली आहेत.

अशीच एकदा हिमालयात भटकंती करताना २०१९ साली तिला स्वामींचा स्वप्न दृष्टांत झाला.

तसेच हिमालयात अत्यंत दुर्गम जागी असलेल्या पंच कैलासांपैकी श्रीखंड महादेव ह्या शिखरावर जाण्यावेळी मार्गात एकेठिकाणी बर्फाच्छादित उंच कड्यावर स्वामी उभे असून हात हलवून तिला त्यांच्याकडे ये म्हणून सांगत आहेत, असा स्वप्नदृष्टान्त तिला झाला.

खरं तर स्वामींच्या निर्वाणानंतर शिक्षणासाठी ती बाहेरगावी असल्याने तिला कधीही स्वामींच्या समाधीवर जाणे किंवा संबंधित कुठल्या कार्यक्रमाला हजर राहणे जमले नाही. पण इतकी वर्षे लोटल्यावर ही तिला स्वामींनी स्वप्न दृष्टांत द्यावा आणि तो ही हिमालमात, पंच कैलासांचे अवघड ट्रेकिंग करताना हा खरोखरच विस्ममकारक आणि भाग्याचा योग आहे असे आम्हांला वाटते.



।। श्री राम समर्थ ।।

# श्री काशी स्वामी संन्यास दीक्षा शतकपुर्ती व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सन २०२५ अभिप्राय

रामचंद्र बळवंत कुलकर्णी (आर.बी.) कराड
मो.नं. ९७३०८१६९९६

श्रीकांतजी यांना

प. पू. श्री. ईश्वरानंद सरस्वती तथा काशी स्वामी यांनी, प. पू. सच्चिदानंद सरस्वती यांच्याकडून दिक्षा स्विकारली, या घटनेस मार्गशीर्ष शु. सप्तमी, दि.२७/११/२०२५ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. तो, शताब्दी सोहळा, आपण न भूतो न भविष्यती अशा स्वरुपात संपन्न केला. शताब्दी सोहळ्याचे औचीत्य साधून कराडच्या संत नगरीत, कृष्णा कोयना संगमाच्या पवित्र तीर्थक्षेत्रावर, शंभर साधकांच्या उपस्थितीत, श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, आपल्या अथक परिश्रमातून संपन्न झाला. या सोहळ्याला असलेली दुसरी किनार म्हणजे चालु वर्षी श्री ज्ञानेश्वरमाउली प्रगट दिनास ७५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याचेही औचीत्य आपण साधले, ही आनंदाची बाब आहे.

दररोज ज्ञानेश्वरी पारायण, माउली चरित्र, आपल्याकडून श्री काशीस्वामी चरित्र, थोर, जेष्ठ व तज्ञ प्रवचनकारांची प्रवचने, हरिपाठ इ. धार्मीक कार्यात कराडकर नगरीतील भक्त, अक्षरशः आठ दिवस भक्ती सागरात डुंबत होते. ह.भ.प. पांडुरंग महाराज क्षिरसागर, व्यासपीठ चालक म्हणून लाभले, हे आपले भाग्य होय. श्रीकांतजी आपणांमुळे, आम्हा कराडच्या साधकांना, प.पू. वेदमूर्ती श्री. गणेश शास्त्री द्रवीड, करवीर पिठाचार्य प.पू. जगद्गुरु शंकराचार्य, यांचे दर्शन व मार्गदर्शन लाभले. प.पू. पाटील काकांचे आशीर्वाद लाभले. हा दुग्ध शर्करा योग आहे. लघुरुद्र व समाराधना चे कार्यक्रम मंत्रांच्या घोषात संपन्न झाले. इतकेच नाही तर ग्रंथ दिंडी सोहळा, अत्यंत उत्साहात, शिस्तीने, दिमाखात संपन्न झाल्यानंतर कराड नगरी तृप्त झाली. त्याचबरोबर भक्तांना, दररोज मिष्टान्न भोजनाचा, प्रसाद म्हणून लाभ झाला.

आपण, गेल्या अनेक महिन्यापासून अखंड, अविरत प्रयत्न, सर्व व्यक्ती, संस्था, मंडळे यांचेशी अत्यंत कौशल्याने संपर्क केला. सर्वसमावेशक व्यक्तीमत्व, पात्रतेनुसार कामाची विभागणी करणे इत्यादी व इतर अनेक, आपल्या अंगच्यागुणामुळे उपरोक्त सोहळा संपन्न झाला. आपल्या कुटुंबियांचे व नातेवाईकांचे सहकार्य आपणास लाभले, ही एक जमेची बाजू आहे. हे शिवधनुष्य उचलताना, आपण आपल्या चेहऱ्यावरचा आनंद, तजेला, उत्साह, तसूभर ही कमी होऊ दिला नाही. उलट कार्यकत्यांना उत्साह व प्रेरणा दिलेली आहे. ही आपणावर असलेली स्वामीची कृपाच होय. श्री . पटेल साहेब, श्री. ढवळे साहेब, श्री. पोळ साहेब, रुचा जोशी ताई व इतर अनेकांचे मोलाचे सहकार्य आपणास लाभले आहे. महंताप्रमाणे आपण लोकसंग्रह करताना, डोक्यावरती बर्फ, तोंडात साखर व पायाला भिंगरी याप्रमाणे कार्य केल्याचे जाणवले.

श्रीकांतजी आपल्या सहवासात आले नंतर, आपले संघटन कौशल्य, लोकसंग्रह, विविध विचार सरणीच्या भक्तांना एकाच तंबूत एकत्र आणणे, असे आपल्या स्वभावाचे विविध पैलू, अनुभवास आले. आपला कष्टाळू, श्रध्दाळू, प्रेमळ स्वभाव व परोपकार वृत्ती, मधुरवाणी इत्यादी स्वभावाच्या विविध छटा अनुभवास आल्या. शांत, कोमल, अखंड उत्साही, सदेव आनंदी व अखंड क्रियाशिलता या सारखे आपल्या स्वभावाचे अनेक पैलू पहावयास मिळाले. आपल्या स्वरुपात मला, प. पू. श्री काशीस्वामी व श्री ज्ञानेश्वर माउली यांचे दर्शन घडले.

प. पू. श्री काशीस्वामी दीक्षा शताब्दी सोहळ्याच्या घटनांच्या, आठवणींची साठवण,करणेचा अल्पसा प्रयत्न, माझ्या अल्पशा बुध्दीने केला आहे. लेखनाचे काम त्या परमेश्वर शक्तीने करुन घेतले आहे, त्यास विनम्र वंदन करतो आणि थांबतो.

।। जय जय रघुवीर समर्थ।।

# गुरुभक्ति

श्री. विठ्ठल काशिनाथ कुलकर्णी
एमएमएबीएड माजी शिक्षक पर्यवेक्षक व
मुख्याध्यापक वारणा प्रसाद विद्यालय
बिळाशी तालुका शिराळा जिल्हा सांगली

नमस्कार
श्रीगणेशाय नमः
।। गुरुब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा गुरु साक्षात परबह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।।

श्री स्वामींचे स्मरण करून व त्यांना नम्र प्रणाम करून मी स्वामींचा मला कृपाशीर्वाद लाभला याचे मी वर्णन करीत आहे मला श्री स्वामींचा कृपा आशीर्वाद माझे बंधू श्री. अनिल आकाशनाथ कुलकर्णी यांच्यामुळे झाला. सध्या ते पुणे येथे असून त्यांच्या मुलाजवळ राहत आहेत. माझे घर १९९५ साली बांधण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी मी महाराजांना माझे विद्यार्थी श्री. चंद्रकांत अनंत शेटे हे इंजिनीयर आहेत त्यांना मी माझे काम देऊ का ? असे विचारले स्वामींनी दे ! असे सांगितले त्या पूर्वी शेटे यांनी माझ्याकडे ५० हजार रुपये मागितले बांधकाम सुरू होण्यापूर्वी हे पैसे द्यायचे होते. महाराजांना विचारले तर दे असे म्हणाले. माझ्या घरातील माणसांनी मला मूर्खात काढले. कामाच्या आधीच कामाचा काहीच पत्ता नसताना तू पैसे कसे देतोस.

जेव्हा घर बांधून पूर्ण झाले त्यावेळेस महाराजांना घर बांधून पूर्ण झाले आहे. वास्तुशांती केव्हा करू ,राहावयास केव्हा जाऊ, असे महाराजांना विचारणार होतो परंतु त्यापूर्वीच त्यांनी देह ठेवला होता. म्हणून मी माझ्या घरास ईश्वरानंद असे नाव दिले आहे . महाराजांना वाचा सिद्धी होती ते बोललेले खरे होत असे, माझ्या पोटाच्या तक्रारी होत्या. अन्नपचन होत नव्हते तेव्हा महाराजांना मी याबद्दल विचारले तेव्हा ते म्हणाले मी सांगतो तो व्यायाम कर व दररोज मारुतीला तुला जेवढ्या प्रदक्षिणा घालता येणे शक्य असेल तेवढ्या प्रदक्षिणा मारुतीला घालत जा ! स्वामींच्या आज्ञेवरुन मी हा उपक्रम चालू केला तेव्हा माझे प्रकृती सुधारली व मला चांगला अनुभव आला माझ्या घरात तुळशी वृंदावनात दक्षिणामुखी मारुती बसविलेला आहे त्यास मी रोज ३० मिनिटे प्रदक्षिणा घालतो व तीस मिनिटे व्यायाम करतो. आज माझे वय ७७ वर्षे आहे तरी देखील हा उपक्रम सुरू आहे माझे कल्याण झाले. मी श्रीराम जयराम जयजयराम असा जप रोज करतो त्याबद्दल श्री महाराजांवर विचारले असता स्वामी म्हणाले ‘‘ तू गायत्री मंत्र माळ १०८ मण्यांची अगोदर जप कर असे केले तर तुझा संकल्प १००० माळ रोज पूर्ण होईल ‘‘ स्वामींनी सांगितल्याप्रमाणे माझा संकल्प सुरू आहे तो निश्चित पूर्ण होईल असे मार्गदर्शन गुरु शिवाय कोण करणार स्वामींचा गायत्री मंत्रावर विशेष भर होता. जर कोणी ब्राह्मण मनुष्य त्यांच्या दर्शनाला गेला तर त्याच्या गळ्यात जानवे नसेल तर त्यास ‘‘ उभे राहू नकोस माझ्या पुढून चालता हो ‘‘ असे म्हणत, त्यांच्या सांगण्याप्रमाणे जे वागले त्यांचे कल्याण झाले. असा सत्पुरुष पुन्हा जन्मास येणे अशक्यच. त्यांचे दर्शन मला झाले त्यांचा आशीर्वाद मला मिळाला यासारखे दुसरे भाग्य नाही. एवढे वर्णन करून मी माझे मोडके तोडके वर्णन पुरे करतो.

# ।। गुरुभक्ती ।।

सौ. नमिता करंदीकर, पुणे
मोबा. ९९९९४४४८१०

९१ सोमवार पेठ, कराड ,ही वास्तु माझ्यासाठी अत्यंत पवित्र स्थान आहे. माझा जन्म कराडचा आणि हे माझ्या आईचे माहेर, त्यामुळे हे माझे पहिले घरकुल. सुमती विठ्ठल शिखरे ही शिखरे परिवारातील कन्या .सुशीला शिखरे यांची लहान बहीण, आणि माझी आई.

प प काशी स्वामी १९५४/ ५५ मध्येच कराडला आले होते आणि माझं जन्म त्यानंतरचा. माझे नामकरण सुद्धा स्वामीजींनी केले आहे. गुरू, भक्ती, इतकं सगळं समजण्याचं माझं ते वयच नव्हतं ,पण घरातील एक ज्येष्ठ आणि आदरणीय व्यक्ती म्हणूनच माझ्यासाठी स्वामीजी होते. आम्ही त्यावेळेस व्यास पूजेला पुण्याहून येत होतो. तो एक मोठा सणच असायचा .फुले, हार, मिठाई अशा सगळ्या गोष्टी घेऊन आम्ही कराडला निघायचो, खूप आनंदात .आज इतकी वर्षे झाली तरी त्या पूजा विसरू शकत शकत नाही . त्या दिवशी स्वामींच्या पायावर डोकं ठेवता यायचे, चरण स्पर्श करता यायचा आणि मग जो पाठीवर " आशीर्वाद " मिळायचा त्याचे वर्णन शब्दात करणे केवळ अशक्य. ते ज्यांनी अनुभवलं असेल ते धन्य झाले.

अशी काही वर्षे गेली, मग लग्न , त्यामुळे महाराष्ट्र बाहेर वास्तव्य होते. त्यामुळे काही वर्ष नियमित कराडला जाणं होत नव्हते पण स्वामींच्या निर्वाणाच्या दिवशी मात्र मी कराडला होते. त्यामुळे समाधी स्थानाचे महत्त्व आणि त्यांचे तिथले अस्तित्व अजूनही प्रकर्षाने जाणवते.

सन २०१७ ला आम्ही परत पुण्यात आलो. मग तेव्हापासून पुन्हा कराडच्या वाऱ्या सुरू झाल्या. माझ्यासाठी माझं कराड हेच माझं " चारधाम "आणि कराड हेच माझं प्रेक्षणीय स्थळ अगदी " काश्मीर " आणि आत्ता या वर्षाच्या सुरुवातीस १७ जानेवारीला श्रीकांतजी यांचा मेसेज आला की स्वामींच्या संन्यास दीक्षेस शंभर वर्षे पूर्ण होत आहेत, तर हे शताब्दी वर्ष साजरे करावे असे वाटते आहे. विचार तेव्हापासूनच सुरु झाला, आणि मग कार्यक्रमाची तयारी माझ्याकडून सप्टेंबर पासून सुरू झाली. आणि २१ नोव्हेंबरला पारायणास सुरुवात झाली. वाचन सुरू झाले, वाचकांची संख्या वाढत राहिली आणि या कार्यक्रमाचा आवाका हा वाढतो आहे, मोठा होतो आहे याची जाणीव झाली. काम वाढले. श्रीकांतजी आणि त्यांचे कुटुंबीय यांच्याबरोबरच मी पूर्ण दहा दिवस राहिले. कार्यालयात आपण लग्नकार्यासाठी एक दिवस राहतो पण या पारायणासाठी आम्ही सर्व एकत्र " संत मंडळीं " च्या बरोबर राहिलो, हे माझे परमभाग्यच.

हे ज्ञानेश्वरी पारायण " एक पर्व, अविस्मरणीय झाले याचे श्रेय श्रीकांत जोशी आणि पारायणातील प्रत्येकाने आपापल्या परीने शंभर टक्के कार्य केले त्यां सर्वांना. सकाळी साडेचार वाजता आम्हाला गरम पाणी

करून देणाऱ्या ताईंपासून, रात्री उशिरा दरवाजा बंद करण्यापर्यंत काम करणाऱ्या प्रत्येकाला.

मला असं वाटत होतं की आपली ही एक मोठी नाव पैलतीराला जाण्यास निघाली आहे. आपल्याला सर्व संत मंडळी ही मार्गदर्शन करत आहेत आणि ज्ञान देत आहेत आणि ही नाव श्रीकांतजीच्या नेतृत्वाने आपण यशस्वी रित्या पैलतीराला नेली.

हां कार्यक्रम यशस्वी होण्याचे श्रेय कार्यकर्ते मंडळींना पण जाते काही नावे आवर्जून सांगावीशी वाटतात

श्री. व सौ. धोपाटे, श्री. रवींद्र माळवदे, संभाजी, सुनील कुलकर्णी, प्रदीप पोळ, सौ. सुरभी गिजरे प्रवीण वेदपाठक, प्रशांत, आफळे , आर. बी. कुलकर्णी , सुरेश पटेल, मोहन साने, बोधे काका, गोसावी , जरंडीकर, संजय जोशी, श्री. व सौ. गद्रे , बोकील, पाटील, विभुते, आवळे, ढवळे, शेंडे, सावंत, घळसासी सौ. श्रोत्री, सौ. ढवळीकर श्रीमती गुंजीकर आणि सर्व मंडळी जी पारायणाला होती....

आणि काही राहिली असतील तर क्षमस्व.

सर्व कराड करांचे मनापासून आभार असेच परत परत एकत्र येत राहू,

पुढील कार्य करत राहू.

धन्यवाद



।। श्री गणेशाय नम: ।।

## ।। गुरुविण कोण दाखवील वाट ।।

सौ. शुभांगी श्रीराम येळगांवकर
कराड.

आज माझ्या स्वामींच्या संन्यास दीक्षा घेतलेला शतक महोत्सवा प्रसंगी मला माझ्या आठवणी मांडण्याची संधी मिळाली आहे. त्याबद्दल मी आपली खूप आभारी आहे.

मी लहान असताना माझी आई गेल्यानंतर स्वामींनी मला एक परकर पोलके दिले. कुमारिका पूजन केले. नंतर ते त्यांच्या भिक्षेतले काही गोड पदार्थ वगैरे मला दयायचे. हे मला कळायचे नाही, पण माझे वडील म्हणायचे " कार्टी भाग्यवान आहे, भिक्षेतले खायला मिळते."

माझे लग्न झाल्यानंतर मला कळले की गुरु म्हणजे काय असते. मी संधीवाताने खूप आजारी होते, झोपून होते पण त्यांनीच मला बरे केले. गुरु मंत्र दिला. त्यापासून संधीवाताचा त्रास मला झाला नाही.

आमचे घरी गुरुपौर्णिमेला खूप लोक (शिष्यगण) भोजनास येत होते. माझ्या सासूबाई स्वामींची खूप मनापासून सेवा करत होत्या. खूप वर्ष ते आमचेकडे भिक्षेसाठी एक दिवसाआड येत असत.


सासूबाई गेल्यानंतर आम्ही दिवाळीला नांदेड ला गेलो होतो, तेव्हा माझ्या नावाची साडी, ओटी बाजूला ठेवून मला त्यांनी आल्यावर ती ओटी दिली.

माझ्या मुलांवर त्यांचे प्रेम होते. त्यांच्या मुंजी झाल्यावर ते मुलांना आशीर्वाद देताना त्यांचे फोटो काढले. आम्हाला काही अडचणी आल्या की ते विभूती देत असत. आज आम्ही त्यांच्या कृपेने सर्वजण आनंदात आणि आरोग्यदायी आहोत. त्यांचे छत्र खूप मोलाचे आहे.

मला त्यांचा सहवास खूप लहान असल्यापासून मिळाला आहे. त्यामुळे कितीही आठवणी सांगितल्या किंवा लिहील्या तरी त्या कमी आहेत.

अशा या महान गुरु मूर्तिला त्रिवार वंदन करते आणि शतशः प्रणाम नमस्कार करते.

### ।। प. पू. इश्वरानन्द सरस्वती काशी स्वामी महाराज की जय ।।



।। श्री ।।

# ।। आठवण ।।

सौ. शुभांगी रामचंद्र सामक-घळसासी
मो. ९४०३२७५३७०
दि ७ डिसेंबर २०२५

आदरणीय श्री श्रीकांत जोशी
यांना सादर प्रणाम .

परमहंस परिव्राजकाचार्य धर्म:श्री ईश्वरानन्द सरस्वती काशीस्वामी यांच्या संन्यास दीक्षा शतकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित केलेल्या अखंड हरिनाम ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा अपूर्व आनंद एक दिवस का होईना (सध्या मी कराडमध्ये नसल्यामुळे ) आम्हा उभयतांना अनुभवता आला.

ज्ञानेश्वरी भूषण असलेल्या वारकरी संप्रदायातील गुरुवर्यांचे प्रवचन, स्वामींजींचा महाप्रसाद यामुळे तना - मनाला समाधान लाभले !

हा सोहळा उत्तमपणे पार पडण्यासाठी अविश्रांतपणे धडपडणाऱ्या आपल्या व आपल्या परिवाराच्या व सहकाऱ्यांच्या भेटीचा योग जुळून आला. आपली प्रत्यक्ष भेट आणि बोलणे झाल्यामुळे स्वामींच्या स्नेही परिवारातील आपल्यासारख्या ज्ञानवंतांचे दर्शन घडले हा ही एक विलक्षण योग आहे !

स्वामीजींच्या भक्तमंडळाने आपण आपल्या परिवाराने आणि साधकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सोहळा उत्तमरीत्या संपन्न झाला हे व्हाट्सअप वरील फोटोंवरून वृत्तांत मधून आणि साधकांच्या प्रतिक्रियातून समजले आणि आपण पूर्णवेळ तेथे उपस्थित नाही याची खंत मनाला लागून राहिली. सोहळा अनुभवताना माझ्या माहेरच्या घळसासी परिवारावर श्री स्वामीजींचा असलेला आशीर्वाद आणि स्मरण आठवणी डोळ्यासमोर तरळून गेल्या.

आपल्या कुटुंबीयांच्या स्नेही परिवारातील व स्वामींच्या अनुग्रहित भक्त गणांमधील माझ्या आई-वडिलांनी सौ. राधिका व श्री. श्यामराव घळसासी या माझ्या मातापित्यांनी स्वामींच्या सेवेद्वारे प्राप्त केलेल्या कृपादृष्टीच्या आठवणी अनंत आहेत. काहींचा उल्लेख करते.

गुरुपौर्णिमेला स्वामीजींचे दर्शन घेऊन आई दवाखान्यात गेली आणि माझा जन्म झाला. त्यामुळे जन्मापासून ते माझे लग्न होईपर्यंत जवळजवळ २६ /२७ वर्षे आमच्या "श्याम-धाम" परिवाराला स्वामीजींचा सहवास लाभला आणि माझ्या जन्मापासूनच त्यांच्या कृपादृष्टीचा अलभ्य लाभ आम्हा सर्वांना झाला .

"श्याम- धाम " या आमच्या वाड्यात आजीने लावलेला पारिजातक वृक्ष होता अंगणात पारिजातकाच्या फुलांचा सुंदर सडा पडत असे. ताज्या फुलांची परडी घेऊन आम्ही माझी आत्ये भावंडे, गुरुकृपा लाभलेल्या आत्या स्वामीजींच्या दर्शनाला सकाळी लवकर उठून जात असू आणि नित्यनेमाने स्वामीजींच्या चरणी फुले अर्पण करत असू. त्यानिमित्ताने दररोज सकाळी ध्यानस्थ स्वामीजींचे अलौकिक आणि तेज:पुंज दर्शन घडत असे. दिवसाची सुरुवात सात्त्विक मनाने होई.

श्री कालभैरव मंदिरात गुरुपौर्णिमेला स्वामीजींचा गुरु पूजनाचा कार्यक्रम हा दरवर्षी गुरुपौर्णिमा आली की मनासमोर उभा राहतो. अलैकिक असा गुरुपूजनाचा सोहळा, स्वामीजींचे जमलेले शिष्यगण आणि गुरूपूजनाचा दिव्य सोहळा, नेत्रदीपक व भक्तिमय वातावरणात कराडच्या कालभैरवमंदिरात होत असे. माझे वडील कै .श्री श्याम घळसासी यांची अथक-अविश्रांत धडपड त्यासाठी असे. स्वामीजींवरील अढळ श्रद्धा त्यांना वेगळेच बळ

देत असे .

गुरुपौर्णिमेचा महाप्रसाद आमच्या घरात-वाड्यात होत असे. स्वामींच्या विविध ठिकाणाहून,परदेशातून येणाऱ्या भक्तगणांचे, गुरुवर्यांचे पाय आमच्या घराला लागत. अगदी लग्न सोहळ्याप्रमाणे आम्हा सर्वांची लगबग चालू असे. अपूर्व अशा गुरुपौर्णिमेचा सोहळा आमच्या घरात " साधुसंत येती घरात तोचि दिवाळी-दसरा " या भावनेने संपन्न होई. सगळे घर गुरुमय वातावरणाने भारलेले असे.

पुराणे ,महाभारत- भागवतादि ग्रंथांचे वाचन - श्रवण करून बहुश्रुत झालेल्या माझ्या दीर्घायुषी आजीने स्वामीजींच्या कडून गुरुमंत्र घेतला असल्यामुळे ती नेहमी सोवळ्यात वावरत असे. घरातील वातावरण धार्मिक पद्धतीचे आणि शुचुर्भुत असल्यामुळे माझ्या आई-वडिलांनी स्वामीजींचा कृपाप्रसाद आणि कृपाशीर्वाद सदैव मस्तकावर धारण केला होता .

माझी आई सोवळ्यात नऊवारी साडीत स्वामीजींच्या भिक्षेसाठी भोजन सज्जता करत असे. कराड मधील अगदी मोजकी घरे स्वामीजींच्या भिक्षेसाठी होती,त्या मध्ये आमचे घर होते. आमच्या वाड्याला स्वामींचा पदस्पर्श होत असे. आम्ही दारात पायरीवर बसून दुपारी बरोबर १२ वाजता एक दिवसाआड भिक्षेसाठी पाण्याच्या टाकीकडून येणाऱ्या स्वामींची तेजस्वी मूर्ती पहात असू आणि पळत जाऊन आईला वर्दी देत असू . "आई स्वामी आले गं.. ," मग पांढऱ्याशुभ्र नऊवारीतील माझी आजी जपमाळ ओढत देवघरापुढे येई आणि नऊवारी साडीतील सोवळ्यातील माझी आई स्वामींच्या मोजक्या भिक्षेसाठी हातात ताट घेऊन तयार होई. कटोऱ्यामध्ये भिक्षा घेऊन हातातील पाणी प्रोक्षण करून परतणारी तेजपूंज स्वामींची पाठमोरी मूर्ती मला स्वामी समर्थांप्रमाणे अतिशय बलशाली आणि तेजोमय दिसत असे. भराभर दमदार पावले टाकत स्वामी येत आणि आल्याप्रमाणेच मंदिराकडे काही क्षणात अदृश्यमान होत असत. स्वामीजींवरील अढळनिष्ठा आणि कृपामयी आशीर्वचने माझ्या आई-वडिलांच्या अनेक चांगल्या वाईट प्रसंगात सदैव त्यांना प्रेरणा देत राहिली.

माझ्या शिक्षण काळातही एम.ए. ला संस्कृत घेऊन मी विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी दुर्मिळ असे संस्कृत ग्रंथ मला दिले होते. त्यांचा प्रेमळ वरदहस्त माझे पाठीवरून अनेकवेळा फिरला आहे. त्यांचे अनंत आशीर्वादांनी माझे आयुष्य कृतार्थ केले आहे .

आज शिक्षणक्षेत्रातून घेतलेल्या सेवानिवृत्तीनंतर सुद्धा आमचे संस्कारक्षम घर,स्वामीजींचा तेथे मिळालेला सहवास आणि कृपाशीर्वादाचा पाठीवरून फिरलेला हात मला मानसिक बळ देत राहतो.

संन्यास दीक्षा सोहळ्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा चैतन्यमूर्ती अशा स्वामीजींच्या काही आठवणी ताज्या झाल्या. सन २०२५ साली संपन्न झालेल्या या सोहळ्यामुळे आपल्या भक्त मंडळाचा स्नेहबंध जुळून आला. असाच स्नेहभाव आपल्या स्वामी परिवारातील भक्तांमध्ये परस्परांबद्दल राहो. आणि सर्वांना सस्नेह नमस्कार. परमपूज्य स्वामींच्या चरणी अखंड दंडवत .

,

धन्यवाद मनःपूर्वक

स्नेहाकांक्षी,



# ।। माझे स्वामी ।।

श्रीकांत जोशी

ईश्वरानंद सरस्वती तथा काशीस्वामी यांचे जीवन हे पूर्णपणे आदर्श संन्यासी कसा असावा याप्रमाणे होते नारदांनी एक नारद परिव्राजक उपनिषद लिहिले आहे. त्याच्या कसोटीवर विचार करायचा ठरला तर स्वामींचे जीवन कसे होते याचा एक आढावा या निमित्ताने घेत आहे. स्वामींना एकांतप्रिय होता. लोकांमध्ये ते रमाईचे नाहीत. कारण संन्याशाबरोबर एक माणूस राहिला तर त्याला मिथुन म्हणतात. दोन माणसे राहिली तर त्याला गावाबरोबर राहिला असे समजले जाते. परंतु स्वामींनी एकांतच पसंत केला व त्याप्रमाणेच ते राहिले तसेच वस्त्राच्या बाबतीतही एक वस्त्र राहिले. कोटींशिवाय कोपीनशिवाय काहीही धारण केले नाही. कोणताही ऋतू असो थंडी उन्हाळा पावसाळा या गोष्टींचा परिणाम त्यांच्या वस्त्र परावरणावर झाला नाही. एकांतात राहून स्वामी सतत मनाने वाणीने आणि शरीराने ज्या ज्या क्रिया करत त्या सगळ्या ब्रह्मचिंतनाशी निगडित असत. संन्यासनी सहा प्रकारे आपले जीवन ठेवले पाहिजे. नपुसक, पांगळा, अंध, बहिरा, मुका आणि जडबुद्धी. स्वामी तसेच जगले. नवजात कन्या ते वृद्ध स्त्री कोणालाही पाहिल्यावर त्यांच्या मनामध्ये कधीही प्रेम अथवा द्वेष या भावना कधीच निर्माण झाल्या नाहीत. अशा जगण्याला शंख असे म्हणतात. नेहमी खरे आणि मोजून मापून बोलणे आणि आवश्यक तेवढेच बोलणे याला मुका असे म्हणतात. जे संन्यासी फक्त भिक्षा मागण्यासाठी किंवा स्नान वगैरे करण्यासाठी चालतात त्यांना पंगु म्हणतात. चालताना ज्यांची नजर दहा पावलाच्या पुढे जात नाही त्यांना अंध म्हणतात. कल्याणकारी किंवा अ कल्याणकारी सुखकारक किंवा दुःखकारक कोणतीही बातमी ऐकली तरी ज्यांची मनशांती ढळत नाही त्यांना बहिरा म्हणतात. तसेच भोग्याविषयी जवळ असून इंद्रिय सक्षम असून जो पुरुष गाढ झोपलेल्या व्यक्तीप्रमाणे त्या विषयांकडे उत्कृष्ट होत नाही त्याला मूड असे म्हटले आहे. या सहाही गुणांचा अविष्कार स्वामींच्या ठिकाणी होता

नाटक, सिनेमा, स्त्रिया, नातेवाईक, खाण्यापिण्याचे पदार्थ अथवा रजस्वला स्त्री या सहाही गोष्टींवर स्वामींची कधीच नजर नसे, त्यांच्याकडे ते पाहत नसत, प्रेम, द्वेष, मद, माया, दुसऱ्याच्या बद्दलचा द्रोह किंवा आपल्या लोकांबद्दल चे प्रेम किंवा मोह असा कुठलाही अपपर भाव किंवा कुठलाही विकार स्वामींच्या ठिकाणी कधीही दिसला नाही. त्यांचा सख्खा पुतण्या जेव्हा येत असे दर्शनाला तेव्हा ते कधीच म्हणाले नाहीत की पुतण्या आलाय तर ते म्हणत असत अरे भागवत सर आलेत असे आदर्श वागणे. त्यांचे असे. खुर्ची, पांढरे कपडे, स्त्रियांबद्दलची चर्चा ,इंद्रियांचे कोड कौतुक, दिवसा झोपणे या गोष्टी त्यांच्याकडून कधीच घडल्या नाहीत. सदोदित स्वामी ब्रह्मसुत्रे,,उपनिषदे ,भगवद्गीता ,विवेक चूडामणी, इत्यादी वेदांता वरील ग्रंथांच्या चिंतनात्मकरासत मग्न असत. ते कुठेही प्रवचनाला कीर्तनाला जात नसत. त्यांना कुणी काही विचारायला आले तर म्हणत असत मला काही येत नाही. निष्काम एकांत वास हेच त्यांचे वैशिष्ट्य होते. ज्याप्रमाणे एखादा जीवनमुक्त असतो तसे ते राहत असत. कडकडीत वैराग्य हे त्यांचे फार मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. नारद मुनींनी ब्रह्माजींना एक प्रश्न केला होता की यज्ञपवितेचा त्याग केल्यावर ती व्यक्ती ब्राह्मण कशी राहू शकते तर नारजींना उत्तर देण्यात आले की " वैराग्यशील पुरुषाने यज्ञपवितेचा त्याग केला, शेंडीचा त्याग केला आणि तो जर अविनाशी परब्रह्मचिंतनात सदोदित रत असेल तर त्याच्या ब्राह्मण असण्यात काही फरक पडत नाही ,यज्ञपवित हे एक सूत्र आहे आणि सूत्र म्हणजे काय ज्ञानासाठी जे धारण केले जाते ते सूत्र आणि या सूत्राचा त्याग जरी केला तरी ज्ञानार्जनाचे सूत्र ब्रह्मचिंतनाचे सूत्र हे संन्याशाने सदैव धारण केलेले असते आणि असावे स्वामी या प्रकारच्या चिंतनात कायम

घडलेले असतात. तसेच त्यांनी शेंडी जरी काढून टाकली असली तरी ज्ञानरूपी शेंडी त्यांनी कायम धारण केलेली होती. बालरूपी. ज्ञानरूपी स्वामी त्यांची कोणी निंदा केली तरी त्याने डगमगत नसत. अर्थात कोणी करतही नसेल पण निंदा अहंकार मत्सर, गर्व, दंभ, ईर्षा, असूया, दोषदृष्टी, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, काम, क्रोध, लोभ, मोह या सगळ्यांवर स्वामींनी मात केलेली होती. कारण ते आत बाहेर फक्त आत्मचिंत आत्माच पाहत होते. ईश्वरीचे ने इच्छेने जे काही भिक्षा प्राप्त होईल त्यातील एक तृतीयांश भागच ते ग्रहण करत असत. बाकीचा गाईंना आणि पक्षांना आवर्जून देत असत. सकाळच्या वेळेला ते जेव्हा उन्हात बसत असत तेव्हा अनेक चिमण्या त्यांच्या अत्यंत जवळ बसून राहत. त्यांना कधीही स्वामींपासून भय वाटले नाही. आप्तांबद्दल एखादी सुखद किंवा दुःखद बातमी आली तरी स्वामीजी विचलित होत नसत. त्यांनी शोक आणि मोह यांचा त्याग केलेला होता. अहिंसा, सत्य, असत्य. ब्रह्मचर्य, अपरिग्रह दिनतेचा त्याग, स्वाभाविक प्रसन्नता, स्थिरता, सरलता, गुरु सेवा, श्रद्धा, क्षमा, इंद्रिय संयम, मनोनिग्रह, धीरता, मधुरता, सहनशीलता, करुणा, ज्ञानविज्ञान परायणता, अल्प आहार या सर्व गुणांनी संपन्न होते. म्हणजे जगापरी ते उदासीनच होते. उदासीन या शब्दाचा अर्थ उद अधिक असीन म्हणजे वर आणि असीन म्हणजे स्थिर झालेला, अशा पद्धतीने व्यावहारिक जगत ज्यांच्या दृष्टीने मिथ्या झाले आहे. अशा सतत ब्रह्म स्वरूपात आनंद स्वरूपात असणाऱ्या व्यक्तीच असा अनुभव घेऊ शकतात किंवा अनुभव स्वरूप होऊ शकतात.

स्वामी कराडमध्ये जवळजवळ ३८ वर्षे राहत होते परंतु सोमवार पेठेतील काही घरे सोडल्यास कोणालाही इथे एक असा महात्मा राहतो हे माहीत नव्हते. कारण ते म्हणत असत मला काही येत नाही. त्यावेळी मी काही सांगणार नाही अर्थात ते दयाळूही तेवढेच होते. कारण कोणाही गरीबाचे दुःख बघितले की त्याला दुःख मुक्त करण्यासाठी काही ना काही उपाय ते नक्की सांगत असत.

असे अनेक संसारी पुरुष मी पाहिले आहेत त्यांच्याशी बोलणे झाले आहे आणि अनेकांनी त्यांचे अनुभव या पुस्तकात दिले आहेत या स्मरणिकेत दिले आहेत

श्रीमती वैशाली श्रीपाद रेठरेकर
कराड :- २.९६५७७१९८७१

## ।। गायन सेवा ।।

सत्संगाची घडे संगती तेथे करी मना वसती । धृ।
श्रवण, कीर्तन, स्मरण, सेवा। अर्चन, वंदन, दास्य, सख्यवा ।।
आत्मनिवेदन करता घडते ।
नववीधा भक्ती ।।
वेद. शास्त्र, ग्रंथ पुराणी। एक ब्रध्मवाकय ङ्क्ङ्क मांडणी ।।
साधन सोपे हाती येता। मोक्षपदाची तुज प्राजी १२१
शरणांगत ला होऊनी रहावे । संतचरणी नीत लिन स्वभावे ।।
जन्म सार्थकी होण्यासाठी। चाल याच पंथी ३।
तेथे करी मनां वसती तेथे करीमना वसती ३५ तेथेड करी मनां ऽऽ वडसड ती डड
श्री:- श्रीगणेशा श्री गुरुसेवेचा !
का: कांक्षा मनीं, ध्यास सदाचा !!
तः- तपश्चर्यापूर्ततेसाठी आशिष सद्गुरूंचा !!!
जो :- जोडीला सहाय्य करीती सुहृद सृजन !
शी :- शीण जाईल दुर निघून !!
कार्य शक्तिच्या अखंडते साठी !
अनेकोत्तम शुभेच्छा व शुभाशिर्वाद

।। रामकृष्ण हरि।।

# अभिप्राय

प्रवीण रामचंद्र वेदपाठक
व्यवस्थापक, कृष्णाबाई उत्सव कमिटी ट्रस्ट कराड
मो.९७६५३८२४५

श्रीराम समर्थ

दि. २७/ ११ /२०२५

श्री. आदरणीय जोशी साहेब नमस्कार विनंती विशेष

प. प. काशीस्वामींचे निस्सीम भक्त व एक आदर्श व्यक्तिमत्वे असलेल्या आपणास सोबत गेला महिनाभर सर्व वेळ खूपच आनंदमयी वातावरणात गेला. दयेचा सागर अशी काही व्यक्तिमत्व माझ्या नजरेसमोर येतात त्यामध्ये आपण एक असेच आदर्श व्यक्तिमत्व. आपला व सौ वहिनींचा स्वभाव खूपच आवडला. आपण व आपले बंधू वहिनी सर्वांकडे ।। दिव्यत्वाची जेथे प्रचिती. तेथे कर माझे जुळती ।। यानुसार आपणास सर्वांकडे आकृष्ट झालो. तुम्हा सर्वांचा सहवास व कृपाप्रसाद मिळाला हे माझे भाग्य समजतो.

एक संसारी माणसाच्या वाट्याला इतकं सारं. हा सुद्धा एक योगायोग आहे असे वाटते तुम्हा सर्वांची आयुष्य ही तुम्हा सर्वांच्या क्षेत्रातील कोरीव लेणी आहेत. माझ्या दृष्टीने देतो तो देव हा देव मी तुमच्यात पाहिला. तुम्हा सर्वांच्या सहवासात गेले आठ दिवस खूप आनंदात गेले. माझ्या दृष्टीने आपण सर्वजण माझ्यासाठी राधाकृष्ण आहात. या निमित्ताने बांधलेल्या या ऋणानुबंधांच्या गाठी चिरंतन राहाव्यात हीच श्री समर्थ चरणी प्रार्थना !

।। सर्वांना नमस्कार जय जय रघुवीर समर्थ ।।

# अभिप्राय

अतिशय सुंदर दिमाखदार असा अविस्मरणीय असा ज्ञानेश्वरी पारायण सोहळा. परमपूज्य श्री ईश्वरानंद सरस्वती तथा काशीस्वामी भक्त मंडळातर्फे आयोजित झाला. यात सर्वांनी आपल्या परीने जो सहभाग घेतला त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन. यासाठी घेतलेले परिश्रम फार मोलाचे होते. या पारायण सोहळ्यासाठी तीन-चार महिन्यापूर्वी जे विचारपूर्वक सर्व बारीक सारीक गोष्टी लक्षात घेऊन जे प्लॅनिंग केले त्याचे २१ ते २७ नोव्हेंबर या काळात इम्पलीमेंटेशन प्रत्यक्षात उतरले. त्यामुळेच हे घवघवीत अविस्मरणीय यश मिळाले. कराड येथील उत्साही भक्त मंडळांचा सहभाग, त्यांना श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देऊन गौरव करण्यात आला. त्याबद्दल आभारी आहोत.

तरीसुद्धा श्री श्रीकांत जोशी आणि कुटुंबीय व श्री अभय धोपाटे यांचे आभार व अभिनंदन यापुढे कराडकरांना असेच सोहळे अनुभवायला मिळोत ही सदिच्छा !

आपले श्री. व सौ. लता प्रभाकर वैद्य
मो. ९४३९४५१८ ९४०३९४५१८

# अभिप्राय

शुभांगी सूर्यकांत कुलकर्णी
सोमवार पेठ कराड

।। श्रीराम समर्थ ।।

प्रथमता मी एक आठवण सांगू इच्छिते स्वामी ठराविक वेळेलाच इतरांना दर्शन देत असत माझी मुलगी दर्शनाला त्यावेळी जायची त्यांच्या आठवणी सांगताना श्रीकांतजींनी स्वामींनी देह ठेवला त्या दिवसाची नारळाची एक आठवण सांगितली होती. त्यादिवशी माझी मुलगी व तिची मैत्रीण स्वामींच्या दर्शनास गेल्या आणि त्यांना नारळाचा प्रसाद मिळाला व त्याच दिवशी त्यांनी देह ठेवल्याचे समजले. त्यांचे त्याच दिवशीचे दर्शन हे मात्र शेवटचे ठरले.

असो ज्ञानेश्वरी जयंतीचा उत्सव चालू असताना स्वामींच्या आराधनेच्या निमित्ताने ज्ञानेश्वरी पारायण करण्याचा मानस समजला होता आणि त्याप्रमाणे हा उत्सव सुरू झाला. समर्थांनी सांगितल्याप्रमाणे ।। मनी धरावे ते होते। विघ्न अवघेची निरसूनी जाते । कृपा केली आरुणाते प्रचिती येते ।। श्रीकांतजींनी मनातील गोष्ट सांगितली त्याप्रमाणे प्रयत्नही केले अर्थात या ठिकाणी गुरूंचा आशीर्वाद आवश्यक आहे. परंतु केवळ गुरु योग्यतेचा असून चालत नाही तर शिष्य पण त्याच पात्रतेचा असावा लागतो खरा शिष्य तो म्हणावा की त्याचा गुरुवर पूर्ण विश्वास असतो गुरुचा आशीर्वाद, अथक प्रयत्न लोकाबरोबर संपर्क साधणे, कार्यक्रमाचे नियोजन करणे इत्यादी गोष्टीमुळेच हा कार्यक्रम सुरळीत पार पडत आहे या आराधनेच्या निमित्ताने जणू संतांची मांदीआळी या ठिकाणी जमल्यासारखे वाटत होते. भगवंतांनी नारदांना ज्या ठिकाणी नामसंकीर्तन सुरू असेल त्या ठिकाणी मी सापडेल असे जणू स्वतःचा पत्ताच सांगितला असावा.

सकाळी चालू असलेले ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण दुपारी ज्ञानेश्वर माऊलींचे चरित्र सायंकाळी असणारी विविध विषयावरील प्रवचने आणि त्याच वेळी रोज स्वामींच्या समाधी मंदिरात होणारी रुद्राभिषेक पूजा या सर्व गोष्टींनी जणू सगळे वातावरण भक्तीमय झालेले दिसले ज्यावेळी माऊलींच्या समाधीचे वर्णन सांगून झाले स्वामींच्या आठवणीही सांगून झाल्या त्यावेळी फुलांच्या सुगंधाची जाणीव झाल्याचा अनुभव लोकांनी सांगितला म्हणजेच त्यावेळी माऊली , स्वामी इत्यादी चे अस्तित्व सूक्ष्म रूपाने त्या ठिकाणी होते असेच वाटले. हा आराधना उत्सव सुरू होण्यापूर्वीपासून त्याची सांगता होईपर्यंत अनेक हात मदत करत आहेत, कुठेही आरडाओरडा नाही, गोंधळ नाही, ठरलेल्या वेळेत पूर्ण कार्यक्रम व्यवस्थित पार पडत आहे, प्रत्येक जण सेवा करतोय' पण मी करतो ही भावना कोणाच्याच मनात नाही, तर माझ्याकडून स्वामींची सेवा ,स्वामीच जणू करून घेत आहेत ही भावना आहे , मला यासाठी शेवटी म्हणावेसे वाटते की ।। व्हावी पूर्ण गुरुकृपा मजवरी, प्राप्तीत भावे तुला । वारी सर्व अरिष्ट नेहूनी लया । संमोह जो वाढला। अज्ञानान जनासी मुक्त करू नये । शांती पदी बैसवी ।विनंती हीच असे न मागत तुझे भक्ती तुझी ही हवी ।। जय जय रघुवीर समर्थ

# अभिप्राय ४

श्रीमती वैशाली श्रीपाद रेठरेकर
मो. ९९५७७१९८७१

ओम कर्मयोगी बजावा रामकृष्ण हरी

प. प. श्री ईश्वरानन्द सरस्वती संन्यास दीक्षा शतकपूर्ती सोहळा अनुभूती व अभिप्राय

कराड अर्थात करहाटक हे सुख क्षेत्र कृष्णा कोयनेच्या जगप्रसिद्ध प्रीतीसंगमाचे तीर्थस्थान पण या ठिकाणी असलेला डोह फक्त आणि फक्त आनंदाचाच आहे. अशा या आनंदाच्या डोहीचा आनंद तरंग असणारा अखंडित प्रवाहित राहणारा हा सुनियोजित श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा त्याचे सहज सुलभ सुनियोजन व त्यायोगे एकत्र श्री काशीस्वामींचे अनुग्रहित भक्तजन व श्री धोपाटे प्रतिष्ठान यांच्या समविचारांचा संगम अशा या संगमी भक्ती गंगेचा महापूरच म्हणावा लागेल.

त्याच सोहळ्यात श्रीराम मंदिरावरील भव्य ध्वजारोहण कार्यक्रमाचा आनंदोत्सव हा दुग्ध शर्करा योग. त्याची अनुभूती घेणारे आम्ही समस्त साधक. " अवघा हलकल्लोळ करावा देव मस्तकी धरावा " या श्री समर्थ रामदास स्वामींच्या उपदेशाचा साक्षात परिसर जणू अनुभवाला मिळाला. कराडमध्ये आध्यात्मिक परमार्थिक अशा अनेक सोहळ्याची परंपरा अव्याहत प्रवाहित असते. त्यामध्ये हा संन्यास दीक्षा शतकपूर्ती सोहळा कोहिनूर हिऱ्याप्रमाणे अखंड तळपत राहील हे निश्चित.

" धन्य तो सोहळा व धन्य व तृप्त आम्ही साधक, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम "

श्री बरोबर श्री गणेशा श्री गुरु सेवेचा काकांच्या मनी ध्यास, सदाचा तपश्चर्या पूर्ततेसाठी आशिष सद्गुरूंचा जो जोडीला सहाय्य, जोडीला सहाय्यक रीती, सुरत सुजन शीण जाईल दूर दूर निघून कार्यशक्तीच्या अखंडतेसाठी अनेक उत्तम शुभेच्छा व शुभाशिर्वाद

# अभिप्राय ५

श्रीमती चंदा चंद्रकांत चव्हाण
तालुका-कराड जिल्हा-सातारा

प. प. श्री ईश्वरानन्द सरस्वती संन्यास दीक्षा शतकपूर्ती सोहळा कराड नगरीचे नाव ऐकताच डोळ्यांसमोर प्रथम उभा राहतो तो कृष्णा कोयना नद्यांचा प्रीतीसंगम, वाळवंट आणि कृष्णामाई मंदिर अशी सुंदर नगरी पाहून काशी स्वामींना कराडला वास्तव्य करावेसे वाटले. खरंतर आम्हा कराडवासीयांचे हे परम सौभाग्य. यांच्याकडे पाहून असे वाटायचे की यांचे सोवळे आणि कडक स्वभाव, करारी चेहरा म्हणून थोडेसे भिऊन राहिलो पण मनातून आदर आणि प्रेम होते. पण स्वामी निर्वतले, अतिशय दुःख झाले. स्वामींचा समाधी सोहळा पूर्णपणे बघितला. घरातील सगळेच गेलो होतो. त्यावेळी मला माझ्या लहानग्या असलेल्या मुलाला म्हणजेचेतनला आजही तो प्रसंग चांगलाच आठवत आहे. पारायणाला बसून भक्ती द्विगुणीत व्हावी. ती झाली, पारायण शिस्तीचे झाले ,समय सुचकता, रामाला अभिवादन केले , सगळ्यांचा उत्साह बघायला मिळाला, मन आनंदित झाले,

खरच देवाचे आभार मानावे तेवढे थोडेच ! देवा अशीच चांगली सेवा करायची बुद्धी शेवटपर्यंत दे! असे वय झाले तरी म्हणावेसे वाटते ! धन्यवाद !

श्रीकांत जोशी व कुटुंबिय व सर्व सहकारी ,स्वामीजींचे शिष्यमंडळी यांच्यामुळे कार्यक्रम खूप मोठा,सुनियोजित,सुरेख झाला.आनंद वाटला.सर्वांना खूप खूप धन्यवाद.

श्रीमती डॉ. मीरा लोमटे

श्रीकांत जोशी व कुटुंबिय व सर्व सहकारी ,स्वामीजींचे शिष्यमंडळी यांच्यामुळे कार्यक्रम खूप मोठा,सुनियोजित,सुरेख झाला.आनंद वाटला.सर्वांना खूप खूप धन्यवाद.

सौ. सुरभी गिजरे

संन्यास दीक्षा शतकपूर्ती सोहळा हा समारंभ श्रीकांत दादा आणि जोशी परिवार तसेच सर्व भक्तगण यांच्या सहकार्याने अतिशय सुंदरपणे पार पडला याबद्दल सर्वांना धन्यवाद.

सौ. राजश्री कुलकर्णी

श्रीकांत जोशी, त्यांचे सर्व कुटुंबीय व सर्व स्वामी भक्त यांनी अहोरात्र अथक परिश्रम घेऊन अप्रतिम सुनियोजित सुंदर कार्यक्रम केला. सर्व महान निमंत्रित प्रवचनकार, संत, श्रीकांत जोशी यांचे समक्ष प्रेमाचे अगत्य निमंत्रणामुळे आले. हीच खरी पोहोच पावती होय.

उचलून एव्हडा मोठा कार्यक्रम करणे अतिशय कौतुकास्पद आहे. पुनःश्च त्रिवार अभिनंदन.

श्री. राजू गिजरे

समस्त जोशी परिवाराचे मनःपूर्वक आभार

सर्व कार्यक्रम आणि नियोजन खूप छान होते. धन्यवाद

सौ. गौरी कुलकर्णी येळगांवकर

श्रीकांत जोशी कुटुंबीय अहिल्यानगरकर, अभय धोपाटे कुटुंबीय, काशीस्वामी भक्तगण याच्यामुळे या सोहळ्यात सामील होण्याची संधी मिळाली. मनःपूर्वक धन्यवाद. आठ दिवसांत चूकून काही ऊणे बोलले गेले असेल तर क्षमस्व. असेच सोहळे वारंवार साजरे होवोत ही सदिच्छा.

राज जरंडीकर

श्रीकांत जोशी सर यांच्यामुळे आम्हाला आदरणीय पाटील काका, आदरणीय द्रविड गुरुजी, श्री शंकराचार्य व अनेक महात्मे यांचे दर्शन झाले.

सर्व सोहळा अप्रतिम झाला धन्यवाद सर

सुभाष एकांडे

श्रीकांत जोशी सर तुमच्या मुळे आम्हाला ह्या अभूतपूर्व सोहळ्यात सहभागी होता आले.

सौ रमा रमेश गोसावी

श्रीकांत जोशी कुटुंबीय अहिल्यानगरकर अभय धोपाटे कुटुंबीय काशी स्वामी भक्तगण याच्यामुळे या सोहळ्यात सामील होण्याची संधी मिळाली. मनःपूर्वक धन्यवाद. आठ दिवसांत चूकून काही ऊणे बोलले गेले असेल तर क्षमस्व. असेच सोहळे वारंवार साजरे होवोत ही सदिच्छा.

मोहन पाटील नांदलापूर

जोशी सर सोहोळा अप्रतिम झाला. मोठ्या संत ,महंताचे दर्शन झाले. भक्तीमय अशा सुंदर सोहळ्यात आम्हाला सहभागी होता आले उचलून दुसरी कडे कोणताही कार्यक्रम करणे कठिणच असते तुमचे अभिनंदन.

श्रीमती पालकर

श्रीयुत जोशी काका तुम्ही आम्हाला खूप आनंद आणि प्रवचन गायनसेवा याचा मनमुराद आनंद दिलात धन्यवाद शब्द अपुरे पडतात खूप च छान कार्यक्रम झाला

श्रीमती शीतल कुलकर्णी

आदरणीय श्रीकांत सर,

सस्नेह नमस्कार.

मी पुणे येथे असताना आमचे जिवलग स्नेही अभय दादाचां फोन आला,काकू दि.२१/११/२५ ते २८/११/२५ या कालावधीत ज्ञानेश्वर महाराज पारायण व ज्ञानयज्ञ सोहळा आणि प.प. श्री.ईश्वरानंद सरस्वती संन्यास दिक्षा शतकपुर्ती सोहळा करणेचे ठरवले आहे,तरी तुम्ही लवकर कराडला या. मनात विचार आला या आठवड्यातले चार दिवस लग्न व वास्तूशांत समारंभ आहेत. पारायण पार पडेल का? परंतु कराडला आल्यावर श्री. श्रीकांत सर घरी येऊन कार्यक्रमाची रूपरेषा सांगत अगदी आठवडाभरचा मेनू यांचा गोषवारा वर्णन केल्यानंतर मनात थोडी चलबिचल झाली.अभयदादा व श्रीकांत सर यांचा अमाप उत्साह बघून मन परीवर्तन झाले व पारायण करण्याचा निर्णय घेतला.

सगळे कार्यक्रम अतिशय थाटात संपन्न झाले. संतमहांताचे दर्शन, ह.भ.प.साखरे महारांजाचे किर्तन, दिंडी सोहळा इत्यादी अनेक कार्यक्रम सुंदर पद्धतीने पार पडले. या सगळ्या गोष्टींचे श्रेय आदरणीय श्रीकांत सर, अभयदादा, सगळे मनापासून झटून काम करणारे कार्यकर्ते, प्रशांत भाऊनी सांभाळलेली साउंड सिस्टीम व फोटोग्राफी या सगळ्या जणांचे आहे. येळगावकर यांनी केलेली चहा, नाष्टा व भोजनाची व्यवस्था तर वाखाणण्याजोगी आहे.

असो एकंदरीत कार्यक्रम फारच सुरेख मनाला भावणारा अशा पद्धतीने पार पडला. असेच वारंवार पारायण सोहळे पार पडावेत अशी माऊलींच्या चरणी नतमस्तक होऊन प्रार्थना !

सगळ्यांना मनःपूर्वक धन्यवाद व शत शत नमन.

श्रीमती देवयानी पानसरे
विद्यानगर,कराड

सादर नमस्कार श्रीकांतभाऊ,

हा आपला विनय आहे. जसे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली अनेक मावळे लढले तसे आपल्या पुढाकाराने माझ्यासारखे अनेक जण प्रोत्साहित होऊन कामाला लागले. स्वामींनी आपल्याला निमित्त मात्र करून हा सोहळा पार पाडून घेतला. अहिल्यानगर वरून कराडमध्ये येऊन मिळेल त्या परिस्थितीत निवास करून,अनेक कुटुंबियांशी ,व्यक्ती,संस्था ह्यांच्याशी संपर्क करून सर्व कार्य उभारण्याचे शिवधनुष्य पेलणे सोपी गोष्ट नाही.आणि सुरुवातीपासून शेवटच्या क्षणापर्यंत आपण चेहऱ्यावरचे स्मित,तजेला तसूभरही कमी होऊ न देता अतिशय स्फूर्ती आणि उत्साहाने पार पाडलेत ही स्वामींची आपणावर असलेली अपरंपार कृपाच होय असे मला वाटते.

शृंगेरी पर्यंत धडक मारून स्वामींचे आशीर्वचन मिळविणे,करवीर शंकराचार्य,गणेश शास्त्री द्रविड,आळंदीची संत आणि कथाकार मंडळी,मोठमोठे प्रवचनकार आमंत्रित करणे,कार्यालयात अल्पोपहार, दोन्ही वेळेचा प्रसाद,ठरल्याप्रमाणे प्रत्येक गोष्ट अचूक करवून घेणे आणि आम्हां सर्वांना पारमार्थिक लाभ मिळवून देणे ही किमया साध्य केली ही ईश्वरी कृपाच.

स्वामींचे दैवी आशीर्वाद सतत आपल्यासोबत राहणार ह्या विषयी शंका नाही.

डॉ. श्रीकृष्ण ढगे

श्रीराम,

नमस्कार,

श्री.श्रीकांतजी काका, स. न.

प.पू.ईश्वरानंद सरस्वती दिक्षा शतकपुरती सोहळा,न भूतो न भविष्यती असा संपन्न झाला. आपल्यामुळे, माझ्या सारख्या सामान्य माणसाला प.प._ श्री. गणेश्वर शास्त्री द्रविड, करवीर पिठाचार्य प. पू. शंकराचार्य, प. पू. पाटील काका,यांच्या सारख्या महान व्यक्तींचे दर्शन झाले.

आर. बी. कुलकर्णी

मनःपूर्वक नमस्कार

श्री. श्रीकांत जोशी दादा,

आपणा कडुन हे अलौकिक कार्य श्री स्वामींनी करवुन घेतले ज्यांना कोणाला आपण आमंत्रित केले ती श्री स्वामींची आज्ञा होती. मी या दैवी कार्याचा भाग बनते हे पुर्व संचित होते. या पुढेही अशिच स्वामींची कृपा आम्हावर राहो. अलौकिक सतदर्शन व घडले अवर्णनिय कार्यक्रम झाला. ही एक पर्वणी होती आमच्या साठी असेच पुण्य कार्य सतत आपल्या हातुन घडो. त्यात सहभाग हीच प्रार्थना आपले शतशः आभार

नीता गिजरे

Shree Shrikanth Joshi na namaskar
Thumhi he karyakram adbhuth pramanane kele.
Punah punah

नमस्कार
कालिंदीताई अंदोनी

Shri Shrikant Joshi khup khup
धन्यवाद

शैलजा मांडे देव

जय जय श्रीराम.

श्री. श्रीकांतजी. सादर सप्रेम नमस्कार.

दि. १४/९/२०२५ रोजी रात्री पंकज हॉटेल समोरील पेट्रोल पंपावर आपली अचानक भेट झाली आणि तेथूनच आपल्या अकृत्रिम प्रेमाने व प. पू. स्वामीच्या आशीर्वादाने प. पू.ईश्वरानंद सरस्वती स्वामीच्या संन्यास दीक्षा शतकपुर्ती सोहोळा व यानिमित्ताने होणाऱ्या सामुदायिक श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहोळ्यात सहभागी होण्याची नांदी झाली.

कराडमध्ये जन्म होऊनही गेल्या ७० वर्षात प. पू. स्वामीचे प्रसंगोचित दर्शनाचा लाभ मिळाला. आपल्यामुळे, माझ्या सारख्या सामान्य माणसाला या निमित्ताने स्वामींची महानता समजून घेण्याची व श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पहिल्यांदा वाचून पारायण करण्याची, तसेच यानिमित्ताने या सोहोळ्यात सर्व वाचकांना व साधकांना आशीर्वाद देण्यासाठी आलेले प.पू.श्री.गणेश्वर शास्त्री द्रविड गुरुजी, करवीर पिठाचार्य प. पू. श्री शंकराचार्य, प. पू. श्री पाटील काका, प. पू श्री पांडुरंग महाराज यांच्या सारख्या महान व्यक्तींचे दर्शन झाले. याचे सर्व श्रेय आपलेच आहे. " जेथे जातो तेथे तू माझा सांगाती चालविसी हाती धरोनिया " या संत वचनाप्रमाणे आपण या सर्व कार्यक्रमात मला सहभागी करून उपकृत केलेत. याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. आपल्या मार्गदर्शनाने सर्व कार्यक्रम अत्यंत सुनियोजित, शिस्तबद्ध व वेळेवर संपन्न झाले त्यातून आपले मॅनेजमेंट स्किल व प.पू. स्वामींच्या प्रति असलेली आपली अपूर्व श्रद्धा , प्रेम अनुभवण्यास मिळाले.

आपल्या सर्व कुटुंबियांचा यातील सहभाग हा ही एक दुर्मिळ अनुभव पाहण्यास मिळाला.

सर्वाना पुन्हा एकदा मनःपूर्वक

धन्यवाद.

श्रीकांत ढवळे , कराड

Shreekant,

I am feeling short of words to express my gratitude to you for so successfully and flaelessly organising Swamiji's event. Swamiji enabled all of us to carry out our Kartavya. We both enjoyed fully the hospitality and love of all Gurubandhus and Bhaginis.

You and Sau. Vedvati now deserve some rest for the herculian task you undertook.

I also thank you for introducing Pujya Patil Kaka and rhage Saheb, besides all your friends who made my life richer.

Take care.

With lots of love,
Jay Ishwaranand,

**Rashmi Yogesh Vyas.**

आदरणीय श्रीकांत जोशी.

खरोखर आपले कौतुक व आभार मानावेत, तेवढे थोडेच. ऊत्कृष्ट नियोजन, सहकारी बरोबर घेऊन, अतिशय चांगला कार्यक्रम खूपच यशस्वी केलात. आमचे ज्ञानेश्वरी मंडळ, धोपाटे प्रतिष्ठान, असंख्य भक्त, यांचे मनापासून सहकार्य, व आपले संयमी, शांत, नेतृत्व, संघटन चातुर्य हे कार्यक्रमाच्या यशस्वीतेचे गमक आहे. अहिल्यानगरहून येऊन एवढा मोठा कार्यक्रम आपण यशस्वी केलात, खरतर प. प. काशी स्वामींची आपणावर कृपा आहे, याचे द्योतक आहे. आमचे भाग्य आम्ही स्वामीच्या शेजारी २५ वर्षे ईनामदार वाड्यात राहत होतो व या कार्यक्रमात सहभागी झालो. हि स्वामींचीच कृपा.

पुनश्च आपले अभिनंदन, व कराडात कार्यक्रम घेऊन आम्हाला सहभागाची संधी दिलीत, त्याबद्दल आपले ऋणी आहोत.

पंडितराव देशपांडे,

Karyakram khup khup chhan zala. swaminchya Aathavani lihinyalchi punha sandi milali ani sohalyacha manmurad Aanand milala palkhila dar awaArun ghetlyamule owalnyachi sandhi milali dhayawad

शुभांगी श्रीराम येळगावकर

श्रीकांत जोशी सर व कुटुंबीय सोहळा अप्रतिम झाला संत, महंतांचे दर्शन झाले भक्तिमय सुंदर सोहळ्यात आम्हाला सहभागी होता आले आमचे भाग्य ! मन पूर्वक धन्यवाद !

रमेश गोसावी, कराड

जोशी कुटुंबीय, धोपाटे कुटुंबीय आणि त्यांना मदत करणारे इतर सर्व यांच्या अथक प्रयत्नांमुळे संपूर्ण सोहळा अतिशय उत्तम पार पडला. या सोहळ्यात सहभागी होण्याचे भाग्य आम्हाला लाभले याचा खूप आनंद होतोय. या निमित्ताने ध्यानी मनी नसताना अनेक महंतांचे दर्शन आणि आशीर्वाद घेता आले. अशा शिस्तबद्ध आणि उत्तम नियोजन असणारा सोहळा आयोजित करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद

स्वाती माजगांवकर

।।धर्मो रक्षति रक्षितः।।

श्री. श्रीकांत भैय्या

खरोखर आपण कमाल करून दाखविली. डॉ. ढगे सरांनी अगदी योग्य शब्दात आपल्या कामाचं कौतुक केलं आहे. श्रीकांत भैय्याच्या संघटन कौशल्याची खात्री होतीच.ती त्यांनी प. प. स्वामींचे कृपेने सिध्द करून दाखविली.

त्याचबरोबर त्यांना साथ देऊन काम करणाऱ्या भक्तांचे तितकेच कष्टाचे हात या कार्यात लागले आहेत. या सर्वांना साष्टांग नमस्कार.

संभाजी तथा दिगंबर कुलकर्णी

श्री श्रीकांत जी

आपल्या मुळे स्वामीजींचा दीक्षा शताब्दी महोत्सव खूप छान पार पडला. आपले शिस्तबद्ध नियोजन खूप आवडले. अर्थात आपल्याला यात खूप कष्ट झाले हे मात्र खरे, तरी आता आपण थोडी विश्रांती घ्यावी.

तुमच्या पुढाकारा मुळे आम्हाला हा अलभ्य लाभ झाला
तेव्हा आम्ही तुमचे खूप आभारी आहोत

अलका जोशी, डोंबिवली

नमस्कार,

कार्यक्रम नाही सोहळा खूपच छान झाला. आम्ही यात खारीचा वाटा म्हणून फक्त सहभाग नोंदवला आमच्यासाठी स्वामींची काही सेवा असेल तर नक्की सांगा.

अंजली सावजी

श्री. जोशी काका व सर्व कुटुंबीयातील सदस्य यांना सस्नेह नमस्कार

मी राम मंदिरामध्ये आरतीसाठी गेले होते. त्यावेळी माझी मैत्रीण सुरभी गजरे यांनी मला सांगितले पारायणासाठी माझ्याकडे नावे द्यायची आहेत. मी म्हणाले माझे नाव घे माझे पण पारायणाला बसायची इच्छा आहे व काही सेवा असेल तर आपण जरूर करू या ! म्हणून आम्ही नाव नोंदणी केली त्याच्यानंतर श्री काकांनी मला फोन केला व आमचे फोनवर बोलणे झाले. माझे घर कृष्णाबाई कार्यालयाच्या शेजारी आहे असे त्यांना सूरभींने माहिती दिली होती. त्यामुळे ते माझ्या घरी आले व त्यांच्याशी माझे बोलणे झाले हा आमचा पहिलाच परिचय. त्या वेळी काका मला म्हणाले दोन चार लोकांची राहायची सोय इथे होईल का ? म्हणून मी माझे छोटेसे घर त्यांना दाखवले मग ते म्हणाले त्यावेळी बघू या मग ते पुढच्या कामासाठी गेले त्यानंतर कार्यक्रमाच्या अगोदर दोन दिवस ते माझ्या घरी आले. त्यावेळी त्यांच्या घरचेही त्यांच्यासोबत होते त्यांनी माझी ओळख करून दिली. सर्वांचा परिचय झाला. चहापान झाले मग वेदवतीची ताई सर्वजणी कार्यालयामध्ये गेल्या. मी राम मंदिरात आरतीसाठी गेली. चहा KV AgVnZm r E¶mg m hUmb oAmU BWoOdU H$ê$AmhÀ¶mKar EH$ ~gy Z E¶mdi r E¶m hUmë¶m" आम्ही डबे घेऊन आलो आहोत, पोळी भाजीचे ते आम्ही कार्यालयात खाऊन तिथे झोपतो" मी म्हणाले " मी घरी करीन वरण भात " त्यांचा माझा पहिलाच परिचय होता मी पण घाबरत घाबरत त्यांच्याशी बोलत होते माझे घर माझे बोलणे त्यांना आवडते की नाही मला काहीच अंदाज नव्हता. मी त्यांना जास्त प्रेशर केले नाही. पण थोड्यावेळाने त्यांना काय जाणवले काही माहित नाही. ती पहिली स्वामींची कृपा मला वेदवती ताईंचा फोन आला " अनुजा, आम्हाला थोडा भात लाव गरम, आम्ही जेवायला तुझ्याकडे येतो" मला खूपच आनंद झाला. मी राम मंदिरातून तशीच घरी आली. मनातून खूप भीती होती. त्यांची आवड आपली आवड, पण आमचे विचार आणि आमचे नाते खूपच जवळ आले. माझी मनातील भीती हळूहळू कमी होऊन मला कोणीतरी त्या आपल्याच घरच्यासारख्या वाटू लागल्या. खूप प्रेमळ खूप शांत स्वभावाच्या होत्या सर्वजणी. मला समजून घेत होत्या काहीही कुठेही कमी पडले तरी सुचवत होत्या. वेळोवेळी मला या गोष्टीचा आनंद वाटत होता. मी व माझ्या मिस्टरांनी त्यांना कुठलीही गोष्ट कमी पडू नये. म्हणून काळजी घेत होतो. महाराजच आम्हाला बुद्धी देत होते व स्वामीच आमच्याकडून सर्व सेवा करून घेत होते.

त्यांनी सर्वांनी हा सोहळा खूप छान पद्धतीने खूप आनंदाने कोणत्याही गोष्टीची उणीव भासू न देता खूप छान पार पडला. अगदी सुंदर की वर्णन करायला शब्दही अपुरे पडत आहेत. आमच्या थोडासा खारीचा वाटा होता. त्या सेवेमध्ये तो महाराजांनी करून घेतला. आमच्याकडून ही या गोष्टीचा राहून राहून परत परत आनंद होत आहे. अगदी पहाटे पाच वाजता जाग यायची तेव्हापासून आवरायची लगबग लगबग जायचे आहे. आपण पारायणाला बसलोय आवराआवरी नंतर नाष्टा जेवण नंतर थोडीशी विश्रांती संध्याकाळचे ही कार्यक्रम पूर्ण नियोजनबद्ध दहा दिवस कसे गेले कळले नाही. आम्हाला संध्याकाळी सुद्धा प्रवचन सुंदर ९ वाजता हरिपाठ, सर्व कार्यक्रमात हिरीरीने भाग घेत होतो, सर्व स्वामींची कृपा हे सर्व काकांच्या मुळे आम्हालाही शक्य झाले, त्यांच्या घरचेही सर्वजण खूप प्रेमाने मदत करत होते व एकमेकांशी कनेक्टेड होते, खूप आदर्श कुटुंब आहे. मोठ्या मोठ्या संत महात्म्यांचे दर्शन झाले त्यांचे आशीर्वाद आम्हा कुटुंबीयांना मिळाली ही सर्व काकांची कृपा आहे. स्वामींची कृपा आहे माझ्या घरी गोंदवलेकर महाराजांचा फोटो आहे, मला सारखा भास होत होता श्री काकांच्या कडे पाहिल्यावरती महाराजच आले आहेत. खूप प्रसन्न कधीही बघावे. तेव्हा काका कधीही कंटाळलेले नसायचे. खूप आनंदी नेहमी हसरा चेहरा. वेदवती ताई सुद्धा खूप शांत स्वभावाच्या. बोलणे गोड. सर्व सर्वच आवडले खूप छान. आम्हीही तुमच्या मागोमाग चालण्याचा प्रयत्न करतो असेच परमेश्वराची सेवा हातून घडावी हीच महाराजांच्या चरणी प्रार्थना व राहिलेले सर्व आयुष्यातील क्षण आणि क्षण अशाच सत्संग करणाऱ्या लोकांच्या सोबत जावो, हीच महाराजांच्या चरणी गोड प्रार्थना

।। श्रीराम जय राम जय जय राम ।।

पुनश्च सर्वांचे अभिनंदन व सर्वांना धन्यवाद सर्वांना नमस्कार.



सौ. अनुजा गद्रे

# कृतज्ञता

नमस्कार!! समूहातील सर्व भक्तांना श्रीकांत चा साष्टांग नमस्कार!! आपली अपूर्व भक्ती, प्रखर शिस्तपालन,श्रद्धा, चिकाटी व ईश्वर निष्ठता, या मुळे व प प श्री ईश्वरानंद सरस्वतीं च्या असीम कृपेनें योजलेला सोहोळा, कल्पने पेक्षा ही जास्त यशस्वी झाला!

सर्व कराडकरांच्या चरणी साष्टांग प्रणिपात. या यशाचे वाटेकरी अनेक जण आहेत. त्या सर्वांना मानाचा मुजरा! ज्या त्रुटी राहिल्या त्याची जवाबदारी मी स्विकारतो व त्या बद्दल आपली क्षमा मागतो!

या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष डॉ श्री ढगे, अध्यक्ष श्री व्यास, श्री धोपाटे, बोधेकाका, मोहनराव साने, विनायक विभुते, पटेलजी, श्रीकांतजी, बोकील, आर. बी. कुलकर्णी, गोसावी, विजयराव, अनुजाताई, सुरभी ताई, सीमा विभुते, भक्ती , शिवानीताई, श्रोत्री या व आपणा सर्वांनी अनंत हातांनी मदत केलीत मी आजन्म आपला ऋणी आहे!

श्रीकांत जोशी